ISSN 0971-6955

आमची श्रीवाणी

संयुक्त अंक
वर्ष ३०, अंक १ – ऑक्टोबर २०२२ ते जाने. २०२३
अंक २ – फेब्रुवारी २०२३ ते मे २०२३

सत्यशोधक समाज : चळवळ आणि साहित्य

विशेषांक



का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेचे मुखपत्र
ISSN 0971-6955

आमची
श्रीवाणी

सत्यशोधक समाज : चळवळ आणि साहित्य

(विशेषांक)

संयुक्त अंक
वर्ष ३०, अंक १ – ऑक्टोबर २०२२ ते जाने. २०२३
अंक २ – फेब्रुवारी २०२३ ते मे २०२३

(या अंकासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले आहे.)
'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.'

- **प्रमुख संपादक**
  वंदना महाजन
- **संपादक मंडळ**
  प्रल्हाद लुलेकर
  संजयकुमार करंदीकर
  महेंद्र कदम
  पृथ्वीराज तौर
- **सल्लागार**
  यशवंत मनोहर
  प्रभाकर मांडे
  मनोहर जाधव
  शोभा शिंदे
- **संपादकीय व व्यवस्थापकीय संपर्क**
  का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था
  उन्नतिनगर, देवपूर, धुळे - ४२४ ००२.
  दूरध्वनी : २२३६५४, २२२७६२.
- **मुद्रक व प्रकाशक**
  प्रा. डॉ. वंदना महाजन
  संचालक,
  का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था,
  उन्नतिनगर, देवपूर, धुळे - ४२४ ००२
- वार्षिक वर्गणी : रु.३००/-(३ अंक)
- द्वैवार्षिक वर्गणी : रु.५००/-(६ अंक)
- संस्था व व्यक्तीकरिता ५ वर्षासाठी वर्गणी: रु.१५००/-
- या अंकाची किंमत रु.१६०/-

या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या साहित्यातील मतांशी 'आमची श्रीवाणी'चे संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

अनुक्रमणिका

१) महात्मा जोतीराव फुले : साहित्यविषयक विचार १
- *प्रल्हाद लुलेकर*

२) खानदेशातील सत्यशोधक वर्तमानपत्रे व जलसे ७
- *सर्जेराव भामरे*

३) फुलेवादाची मूलतत्वे व त्यांची प्रस्तुतता! १४
- *श्रावण देवरे*

४) सत्यशोधकीय नियतकालिके २४
- *अरुण कृष्णा शिंदे*

५) सत्यशोधक समाजाचे वैचारिक साहित्य ३७
- *शिरीष लांडगे - पाटील*

६) सत्यशोधकीय स्त्रियांचे साहित्य ४२
- *प्राजक्ता शित्रे*

७) महात्मा फुले व सत्यशोधक चळवळ ४८
- *शोभा शिंदे*

८) 'सत्यशोधकीय परंपरेतील नाटके : स्वरूपविचार' ५४
- *दैवशाला हाक्के*

९) सत्यशोधक नियतकालिके ५९
- *अमृता तायडे*

१०) सत्यशोधकी जलशांचे समाजप्रबोधनातील योगदान ६७
- *प्रशांत भंडे*

११) सत्यशोधक चळवळ आणि कोकणातील तीन सत्यशोधक विचारवंत ७१
- *बाळकृष्ण लळीत.*

१२) 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील यांची खंडकाव्ये : आशय विचार' ७८
- *गोविंद काळे*

संपादकीय

सत्यशोधक समाजाला १५० वर्षे पूर्ण झाले आहेत. २४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. १८७३ मध्ये त्यांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहिला. अमेरिकेतील निग्रो चळवळीचा अभ्यास जोतीराव फुले यांनी केला होता. राष्ट्रपरत्वे शोषणाच्या आणि गुलामीच्या व्याख्या बदलत जातात. एखाद्या राष्ट्रातील शोषणाचे मूळ समजून घेतांना ते व्यवस्थेच्या खालच्या स्तरावरील माणसांच्या जगण्यावरून लक्षात घ्यावे लागते.

शोषणाचे प्रारूप ठरवताना स्त्रियांचा सामाजिक दर्जा लक्षात घेणेही आवश्यक आहे. सामाजिक समतेची मांडणी करताना स्त्री आणि शूद्रातिशूद्र यांचे होणारे शोषण किती अमानवीय आहे हे महात्मा फुले यांनी स्पष्ट केले. भारतीय गुलामगिरीची चिकित्सा करत असताना त्यांनी धर्मव्यवस्थेची तसेच जात, वर्ण, वर्ग आणि लिंग यांच्या आधारे होणाऱ्या शोषणाची चिकित्सा केली.

ब्राह्मणी धर्मव्यवस्थेची मीमांसा करताना महात्मा फुले तार्किक आणि विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा वापर करतात. भट, पुरोहितांनी धर्माचे अवडंबर माजवून स्त्रिया आणि शूद्र, अतिशूद्रांना गुलाम केले. धर्म हेच शोषणाचे मूळ आहे. त्यातून शोषणाचे स्तर निर्माण केले गेले. हे सत्य त्यांनी पद्धतशीरपणे उलगडून दाखवले. वेद, पुराणे, रामायण, महाभारत ते संत साहित्य या व्यापक पटावर सांस्कृतिक संघर्षाचे प्रारूप आणि त्यातून आकाराला आलेली गुलामी व्यवस्था याची चिकित्सा महात्मा फुले यांनी केली. ते फक्त गुलामीची चिकित्सा करून किंवा ब्राह्मणी धर्म नाकारून थांबले नाहीत तर अनुभवनिष्ठ ज्ञान आणि इतिहासाच्या उपलब्ध संदर्भांच्या अभ्यासांती हाती आलेल्या निष्कर्षांच्या आधारे इतिहासाचा यथायोग्य अन्वयार्थ लावला. बहुजनांच्या स्वातंत्र्याची आणि त्यांच्या मानवी हक्काची मांडणी करण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ लिहून बहुजनांना आपल्या जगण्याचा खरा सांस्कृतिक आधार मिळवून दिला. स्त्रियांचे मानवी अधिकार, शूद्र, अतिशूद्र यांच्या अधिकारांची मांडणी, आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहाचा पुरस्कार, त्यासाठीची समतावादी विवाहपद्धती देऊन सत्यशोधनाचा आग्रह धरला. सांस्कृतिक चिकित्सेच्या पद्धती रूढ केल्या.

सत्यशोधक समाज हा त्या काळातील तळागाळापर्यंत पोहोचलेला एकमेव समाज होता. शोषण आणि गुलामीला नकार देऊन सत्यशोधक समाजाची व्यापक परंपरा यातून निर्माण झालेली दिसते. सत्यशोधक समाजाची तत्त्वप्रणाली विशद करणारा ''सार्वजनिक सत्यधर्म'' हा ग्रंथ लिहून त्यांनी समतावादी, सत्यान्वेषी सत्यधर्माची मांडणी केली. महात्मा फुले यांनी स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र यांच्या प्रश्नांची एकत्रित मांडणी करून शोषणाची प्रारूपे स्पष्ट केली. सत्यशोधक समाजाने धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक पुरुषसत्ताक व्यवस्थेत हस्तक्षेप नोंदवत साहित्याची निर्मिती केली. नियतकालिके सुरू केली. सत्यशोधकीय जलशांमधून लोकजागृती केली. महात्मा फुले यांनी वेगवेगळे रचनाबंध वापरून साहित्यनिर्मिती आणि प्रबोधन यांचे एकत्व स्पष्ट केले. सावित्रीबाई फुले, मुक्ता साळवे, फातिमा शेख, ताराबाई शिंदे, तान्हुबाई बिर्जे इ.स्त्रियांनी सत्यशोधक चळवळ आणि साहित्यात योगदान दिले.

लहुजी वस्ताद, गणू मांग, राणबा महार, उस्मान शेख, जोतिरावांचे ब्राह्मण सहकारी चिपळूणकर, गोवंडे, भवाळकर, भिडे, भांडारकर तसेच सत्यशोधक चळवळीतील सहकारी आणि सत्यशोधक विचारांना प्रमाण मानून साहित्यनिर्मिती करणारे लेखक, विचारवंत नारायण मेघाजी लोखंडे, डॉ. विश्राम घोले, कृष्णराव भालेकर, भाऊ डुंबरे पाटील, धोंडीबा रोडे, मुकुंदराव पाटील, सयाजी गायकवाड महाराज, छत्रपती शाहू महाराज, जेधे, जवळकर, पाळेकर, प्रबोधनकार ठाकरे, भास्करराव जाधव, कर्मवीर भाऊराव पाटील ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत सत्यशोधक समाजाचा विस्तार झालेला दिसतो. सत्यशोधक समाजाच्या एकंदरीत कार्याची, साहित्य निर्मितीची, सांस्कृतिक धार्मिक संघर्षाची पुनर्मांडणी करत असताना सद्य परिस्थितीत सत्यशोधक विचारांची मांडणी आणि या विचारातून वर्तमान काळाची चिकित्सा करणे आवश्यक ठरते. धर्मांध व्यवस्थेचे ब्राह्मणी प्रारूप आज नव्या स्वरूपात समोर उभे ठाकले आहे. आधीच्या काळापेक्षा त्याचे रूप अधिक गुंतागुंतीचे आहे. धर्मांध व्यवस्था आणि भांडवलशाही यांच्या एकीकरणातून लोकशाहीचा गैरवापर होताना दिसतो आहे. यात पुन्हा स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र, अल्पसंख्यांक यांना लक्ष्य बनवले जात आहे. भांडवलासाठीचा हा संघर्ष अधिक क्रूर आणि जीवघेणा आहे. सत्यशोधक समाजाच्या कार्याची आणि विचारांची पुनर्मांडणी करून वर्तमान भारतातील सांस्कृतिक संघर्षाची चिकित्सा करणे यासाठी आवश्यक आहे.

- वंदना महाजन

महात्मा जोतीराव फुले : साहित्यविषयक विचार

- प्रल्हाद लुलेकर

महात्मा जोतीराव फुले यांच्या साहित्याने आणि साहित्यविषयक भूमिकेने मराठी साहित्याला नवे रूप, नवी दिशा आणि अगणित शूद्रातिशूद्र लेखक कवी मिळाले. साहित्य आणि संस्कृतीला नवी दृष्टी मिळाली. जीवन जगण्याच्या वास्तवाचे प्रत्ययकारी दर्शन घडवण्याचा लौकिकवादी वस्तुपाठच त्यांनी साहित्यासमोर उभा केला. त्यामुळे साहित्याच्या निर्मितीची कारणे, प्रयोजन बदलून गेले.

साहित्य आणि संस्कृती यांचा अनुबंध मोलाचा आहे. संस्कृतीसाठीचा अवकाश व्यापक करण्याचे, संस्कृतीला नव्या दिशा देण्याचे आणि संस्कृतीच्या परिवर्तनासाठी जनमानस घडविण्याचे कार्य साहित्य करीत असते. त्याप्रमाणेच संस्कृतीमुळेच साहित्याला मूलद्रव्य मिळतात. अनेकार्थाने साहित्य आणि संस्कृती यांचा अनुबंध आहे हे मीमांसकानी वारंवार स्पष्ट केले आहे. समाजाचे साचलेपण संस्कृतीला अमान्य असते आणि साहित्याचे साचलेपण ही संस्कृतीला अमान्य असते. साहित्य आणि संस्कृती यांचा संबंध परिवर्तनाशी, गतीशी आणि वर्तमानाशी असतो. तसा संबंध नसेल तर समाजाची गती मंदावल्याचे ते निदर्शक आहे. महात्मा जोतीराव फुले यांनी याच कारणाने सामाजिक क्रांतीचे नवे पर्व निर्माण करताना याचा संबंध चळवळीशी जोडतात. हे त्यांच्या अन्वेषक दृष्टीचे द्योतक आहे. स्मृती-पुराणे आदी संबंधी त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली. एकूणच साहित्यासंबंधी त्यांची भूमिका स्पष्ट होती. त्यांच्या संपूर्ण लेखनातून त्यांची साहित्यविषयक भूमिका आलेली आहेच. परंपरागत साहित्यातून शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांच्या हिताचा, त्यांच्या अभ्युदयाचा विचार येणे असंभवनीय आहे. उलट धर्म, जात, वर्ण आणि लिंग या भेदाच्या आधाराने सामाजिक-सांस्कृतिक विषमता जोपासण्याचे कार्य साहित्य करते. त्यामुळे हे साहित्य आपले जीवन संपन्न करणारे असूच शकत नाही. पूर्वापार साहित्य शूद्रातिशूद्रांस आणि स्त्रियांस 'दास' बनवणारे आहे. 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' हीच अनुभूती या बनावट कृत्रिम पुस्तकातून आली आहे. महात्मा जोतीराव फुले यांच्या साहित्यविषयक भूमिका त्यांच्या संपूर्ण लेखनात आली आहे. त्यांच्या ग्रंथकारसभेस लिहिलेल्या पत्रातून त्यांची भूमिका अधिक नेमक्या शब्दातून व्यक्त झाली आहे.

महात्मा जोतीराव फुले यांना दुसऱ्या ग्रंथकार संमेलनाचे निमंत्रण न्या. रानडे यांनी पाठविले. या ग्रंथकार संमेलनामध्ये सहभागी होण्याची विनंती केली.

'ग्रंथकारांच्या मार्गातील अडचणी दूर व्हाव्या' या हेतूने न्या. रानडे व 'लोकहितवादी' गोपाळ हरी देशमुख यांनी १८७८ च्या मे महिन्यात 'मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी'ची स्थापना केली. या मंडळीकडून ११ मे १८७८ रोजी पुण्यात पहिले ग्रंथकार संमेलन घेतले. हे संमेलन यशस्वी झाले नाही. फारच कमी ग्रंथकार या संमेलनास उपस्थित होते अशी नोंद न्या. रानडे चरित्रात न. र. फाटक यांनी केली आहे. जे आले होते त्यांची सरबराई व्यवस्थित झाली नाही. त्यानंतर न्या. रानडे यांनी २४ मे १८८५ रोजी दुसरे ग्रंथकार संमेलन भरवले. हीच ग्रंथकार संमेलने पुढे अ. भा. मराठी साहित्य संमेलने म्हणून नावारूपाला आली. १३ मे १८८५ च्या न्या. रानडे यांच्या पत्रास उत्तर पाठविले. ते पत्र 'ज्ञानोदय' ने ११ जून १८८५ च्या अंकात प्रसिद्ध केले. ग्रंथकाराच्या या दुसऱ्या संमेलनाचा 'एकंदर थाट पूर्वीसारखाच होता. फारसे ग्रंथकार आले नाहीत' अशी नोंद न. र. फाटक यांनी केली आहे.

महात्मा जोतीराव फुले यांच्या पत्रातून एकूण मराठी साहित्य आणि साहित्यविषयक भूमिका स्पष्ट होते. मानवी हक्काचा विचार साहित्यातून प्रगट व्हावा मात्र तसे होत नाही. तत्कालीन वर्तनावरून जे दिसते ते या पत्रोत्तरात त्यांनी नोंदवले. मराठी साहित्य मानवी हक्कांबद्दल बोलेल अशी शक्यता दिसत नाही. म्हणून पत्राच्या सुरुवातीलाच ते म्हणतात, '.... परंतु माझ्या घालमोड्या दादा, ज्या गृहस्थाकडून एकंदर सर्व मनुष्याच्या मानवी हक्काविषयी वास्तविक विचार जाऊन ज्यांचे त्यांस ते हक्क त्यांच्याने खुषीने व उघडपणे देववत नाहीत व चालू वर्तनावरून अनुमान केले असता पुढेही देववणार नाहीत, तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनी व त्यांनी केलेल्या पुस्तकातील भावार्थाशी आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाही.' माणूस म्हणून जगण्यासाठीचे काही एक हक्क असतात. तुमच्या 'जगण्यात' आणि 'लेखनात' आम्हाला हे दिल्याचे, त्यामानवी हक्कांविषयी उदाहरणे देण्याचे मान्य असल्याचे दिसत नाही. तुमच्यातील हे दुभंगत्व पाहिले, अनुभवले आहे. लेखनातील भूमिका आणि वर्तनातील भूमिका यात सुसंगती असली पाहिजे, त्यात अव्दैत असले पाहिजे. ते नसल्याने शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांना दास्यात अडकवणारे बनावट ग्रंथ लिहिले गेले. म्हणून ते या पत्रात म्हणतात,' - - - कारण त्यांच्या पूर्वजांनी आम्हावर सूड उगवण्याच्या इराद्याने, आम्हास दास केल्याचे प्रकरण त्यांनी आपल्या बनावट धर्मपुस्तकांत कृत्रिमाने दडपले आहेत. या विषयी त्यांच्यातील जुनाट खल्लड ग्रंथ साक्ष देत आहेत. यावरून आम्हा शूद्रादि अतिशूद्रास काय काय विपत्ती व त्रास सोसावे लागतात, हे त्यांच्यातील उंटावरून शेळ्या वळणाऱ्या ग्रंथकारांस व मोठमोठ्या सभास्थानी आगंतुक भाषण करणारांस कोठून कळणार? हे सर्व त्यांच्या सार्वजनिक सभेच्या उत्पादकांस जरी पक्के माहिती, तरी डोळ्यांवर कातडे ओढून त्याला इंग्रज सरकारांतून पेन्शन मिळताच तो पुनः अट्टल जात्याभिमानी, अट्टल मूर्तिपूजक, अट्टल सोवळा बनून आपल्या शूद्रादि अतिशूद्रांस नीच मानू लागला; व आपल्या पेन्शनदात्या सरकारने बनविलेल्या कागदाच्या नोटीससुद्धा सोवळ्याने बोट लावण्याचा विटाळ मानू लागला! अशीच का शेवटी ते सर्व आर्यब्राह्मण या हतभाग्य देशाची उन्नती करणार!'

आपल्याकडे निर्माण झालेल्या प्राचीन ग्रंथांनी समाजात विसंगती, अंतर्विरोध निर्माण केले. त्यातूनच माणसामाणसात भेद आणि विसंवाद आले. शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांना दास्यात अडकवण्यासाठी बनावट धर्मग्रंथ निर्माण केले. त्यात कृत्रिमता ठासून भरली आहे. या ग्रंथामुळे शूद्र, अतिशूद्र यांच्या जगण्यावरच विपत्ती लादून त्रास दिला. या दास्यातील अपमानास्पद जगण्याची वेदना उंटावरून शेळ्या वळणाऱ्यांना कळणारच नाही. ज्या जगण्याची अनुभूतीच नाही त्याची वेदना कळत नाही. त्यामुळे तुमच्या ग्रंथातून ही वेदना येणारच नाही. शोषणासाठी अनुकूल असणारे लेखन करायचे आणि त्यातून शोषणाचे एक पद्धतीशास्त्र विकसित करायचे एवढेच काम तुमचे ग्रंथ करतात. यासंबंधी तुमचे 'जुनाट खल्लड ग्रंथ' साक्ष देतात. जे अनुभवले नाही, माहिती नाही त्यासंबंधी तुमच्या ग्रंथकारांना आणि सभास्थानी आगंतुक भाषणे देणाऱ्यांना कळणारच नाही. ते तर केवळ उंटावरून शेळ्या हाकणारे लोक आहेत.

'जीस तन लागे वही तन जाने बिजा क्या जाने गव्हारा रे'

तेच लोक हे सांगू शकतील. सार्वजनिक सभा स्थापन करणाऱ्यांनाही हे चांगलेच माहिती होते. मात्र आपल्या स्वार्थासाठी ते डोळ्यांवर कातडी ओढून बसले आहेत. ते इंग्रजांच्या सत्तेचे लाभार्थी आहेत. आपल्या मुलाबाळांचे क्षणिक हित त्यांना दिसत होते. त्यामुळेच ते इंग्रजाच्या दरबारी चाकरी करताना आपले वर्णीय श्रेष्ठत्व विसरल्याचे नाटक दांभिकतेने करीत राहिले. इंग्रजांची चाकरी संपली की त्यांचा जाती अभिमान लगेच उफाळून येतो. मुळात हे सारे अट्टल जाती अभिमानी, मूर्तिपूजक आणि सोवळ्यावाले आहेत. पेन्शन मिळावी म्हणून त्यांच्या वर्तनात ही दांभिकता आली आहे. पेन्शने मिळाली की पुन्हा मूळ रूपात येतात. त्यामुळे पेन्शन देणाऱ्या इंग्रजांनी बनवलेले कागदही त्यांना विटाळून टाकतात. कागदाच्या नोटीसींचा त्यांना विटाळ होतो. ते सर्व आर्य ब्राह्मण या देशाच्या उन्नतीबद्दल बोलणार. ते देशाची काय उन्नती करणार? असा प्रश्नच ते सार्वजनिक सभा स्थापना करणाऱ्यांच्या उदाहरणाने सांगतात.

या पत्राच्या शेवटी महात्मा जोतीराव फुले यांनी आपली भूमिका ही कळवली आहे. ते या संदर्भात म्हणतात, 'आता यापुढे आम्ही शूद्र लोक, आम्हास फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भुलणार नाहीत. सारांश, यांच्यात मिसळल्याने आम्हा शूद्रातिशूद्रांचा काही एक फायदा होणे नाही, याबद्दल आमचा आम्ही विचार केला पाहिजे. अहो, त्या दादांना जर सर्वांची एकी करणे असेल, तर त्यांनी सर्व मानवी प्राण्यांत परस्पर अक्षय बंधुप्रीति काय केल्याने वाढेल, त्याचे बीज शोधून काढावे व ते पुस्तकाद्वारे प्रसिद्ध करावे. अशावेळी डोळे झाकणे उपयोगाचे नाही. या उपर त्या सर्वांची मर्जी. हे माझे अभिप्रायादाखल छोटेखानी पत्र त्या मंडळीच्या विचाराकरिता तिजकडे पाठविण्याची मेहेरबानी करावी. साधे होके बुढेका पहिला सलाम लेव' यातून या ग्रंथकार संमेलनास आल्याने शूद्र, अतिशूद्र यांचा कोणताही फायदा होणार नाही. तुमच्यात मिसळणे म्हणजे पुन्हा त्याच थापांवर विश्वास ठेवणे. आता यापुढे 'आम्ही शूद्र लोक' तुमच्या थापांना भुलणार नाही. आत्तापर्यंत तुम्ही आम्हास थापा मारूनच खात आला आहात. तुम्ही फसवले, तुमचे स्वार्थ पूर्ण केले, भाकडकथा सांगितल्या, जुनाट खल्लड ग्रंथातून थापा मारल्या. मात्र आता आम्ही भुलणार नाही आणि फसणार नाही. शूद्र, अतिशूद्र यांचा यात काही फायदाही नाही. म्हणून यापुढे 'आमचा आम्हीच विचार केला पाहिजे' ही स्पष्ट भूमिका घेतात. शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांनीच त्यांचा विचार केला पाहिजे. आमचे आम्हीच लिहिले पाहिजे. त्यातूनच त्यांच्या वास्तवाचे दर्शन घडेल. त्यांचा विचार त्यांना आत्मभान देईल. त्या आत्मभानातून त्यांच्या इतिहासाचे, त्यांच्या संस्कृतीचे अन्वयार्थ त्यांना लावता येतील. त्यामुळे त्यांच्या गुलामीविरुद्ध, दास्याविरुद्ध संघर्ष करता येईल. शोषण थांबविण्यासाठी व्यवस्था संपविता येईल. नव्या आशा-आकांशा पल्लवित होतील. शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांच्या जगण्याला नवे पंख फुटतील. शोषणमुक्त समाज निर्माण होईल. 'आमचा आम्ही विचार केला पाहिजे' यातून बहुजनांमध्ये विचारांची नवी संस्कृती निर्माण होईल. साहित्यातून आमचा आम्ही केलेला विचार प्रगट होणे फार महत्त्वाचे आहे. त्यातून आमचे साहित्य येईल. साहित्यातून आमची संस्कृती येईल. बहुजनांच्या संस्कृतीचे एक अविष्करण घडेल.

ग्रंथकार संमेलनाच्या आयोजकांना खरेच सर्वांची एकी करण्याची गरज वाटत असेल तर त्यांनी त्यांचे दृष्टिकोन बदलावेत. सर्व मानवांमधील भेदनीती संपवावी. परस्परांमध्ये 'अक्षयप्रीति निर्माण करण्यासाठी साहित्य असावे या भूमिकेने लिहावे. त्याचे बीज शोधावे. पुस्तकातून हे बीज प्रसिद्ध करावे. संपूर्ण मानवाच्या अक्षय 'बंधुप्रीति'ची अपेक्षा या भूमिकेतून आली आहे. विशेष म्हणजे महात्मा जोतीराव फुले यांनी 'ग्रंथोत्तेजक मंडळी'मध्ये या पत्राची चर्चा व्हावी अशी अपेक्षा केली आहे. आपण घेतलेल्या भूमिकेची चर्चा व्हावी ही अपेक्षा म्हणजे परिवर्तनाच्या ध्यासाचा हा भागच आहे. समाजातले शोषण, अन्याय, दास्य, दैन्य हे सारे पाहूनही साहित्य आणि संबंधित संस्था शांत असतात. ते सारे आपल्या मर्जीने जगतात. अन्याय-अत्याचाराविरुद्ध, दैन्य-दारिद्र्याविरुद्ध, दास्य-शोषणाविरुद्ध बोलले पाहिजे

आणि लिहिले पाहिजे. मात्र स्वातंत्र्यावर बोलणारे लोक, लिहिणारे नामांकित लोक आज ही बोलत नाहीत. त्यासंबंधी 'अशावेळी डोळे झाकणे उपयोगाचे नाही' अशी रोखठोक भूमिका घेतात. यानंतरही या लेखकांना भूमिका घ्यायची नसेल तर 'या उपर सर्वांची मर्जी' असा तत्कालीन साहित्यावरचा अभिप्राय स्पष्टपणे नोंदवतात. या पत्रातून मांडलेला विचारांचा परिणाम नंतरच्या कालखंडात शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांच्यावर झाला. त्यामुळे आमचा आम्ही विचार केला पाहिजे.' या प्रेरणेतून नवा विचार, सत्यशोधकी विचार अधिक प्रमाणात लोकांपर्यंत जावेत. त्यासाठी महात्मा जोतीराव फुले यांनी स्वतंत्र भूमिका घेतली. शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांच्या जीवनासंबंधी लिहिले पाहिजे. 'आमचा आम्ही विचार केला पाहिजे' आणि 'आमचे आम्ही लिहिले पाहिजे' हा विचार साहित्यनिर्मितीला प्रेरणा देणारा ठरला. त्यांची भूमिका स्पष्ट आहे. समाजाच्या सामाजिक-सांस्कृतिक उन्नयनासाठी साहित्य उपयोगी पडावे हा हेतू ठेवून लेखन केले गेले. त्यातून अब्राह्मणी साहित्याचे नवे दालनच खुले झाले. परिणामी अभिजनांनी निर्मिलेल्या परंपरागत साहित्याचे साहित्यविषयक निकष, संकेत नाकारले. आपण आपल्याच अनुभवांना आपल्याच भाषेतून साहित्यातून प्रकट करावे, या भूमिकेने लेखन करणाऱ्यांना स्वत:चाच एक वेगळा प्रत्यय येत होता. शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांच्या ऐहिक जीवनातील अनुभव आपल्याच भाषेत लिहिते झाले. आपल्या अनुभवाची भाषा साहित्याची भाषा बनवली. महात्मा जोतीराव फुले यांनी लोकभाषाच साहित्याची आणि ज्ञानाची भाषा बनवली. त्यामुळे लोकव्यवहारातील श्रमसंस्कृतीची भाषा त्यांच्या साहित्याची भाषा झाली आणि त्यांच्या प्रेरणेतून आलेल्या सत्यशोधकी साहित्य प्रवाहाची भाषा झाली. परिणामी महात्मा जोतीराव फुले यांच्या साहित्याच्या भाषेने आणि सत्यशोधकी साहित्य प्रवाहाच्या भाषेने मराठी साहित्याची भाषा समृद्ध, संपन्न झाली.

शूद्रातिशूद्रांना समजणारी भाषा असावी ही भूमिका त्यांनी 'पवाडा : छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा'च्या प्रस्तावनेत ते म्हणतात, 'कुणबी, माळी, महार, मांग वगैरे पाताळी घातलेल्या क्षेत्र्यांच्या उपयोगी हा पवाडा पडावा असा माझा हेतू आहे. लांबच लांब मोठाले संस्कृत शब्द मुळीच घातले नाहीत. जेथे माझा उपाय चालेना तेथे मात्र लहान सहान शब्द निर्वाहापुरते घेतले आहेत. माळी कुणब्यास समजण्याजोगी सोपी भाषा होण्याविषयी फार श्रम करून त्यास आवडण्याजोग्या चालीने रचना केली आहे.' साहित्याच्या भाषेसंबंधी त्यांची ही भूमिका आहे. सामान्य लोकांना समजेल अशी भाषा म्हणजेच लोकभाषा वापरण्याचा त्यांचा कटाक्ष आहे. लोकभाषेचे लोकसंस्कृतीतील आविष्कार त्यांना अभिप्रेत आहेत. म्हणूनच पवाडा आणि अखंडादी रचना ते करतात. लोक व्यवहारातील म्हणी व वाक्प्रचार यांचा वापर त्यांच्या साहित्यातून त्यांनी केला आहे. त्याचे कारण त्यांची भूमिका हेच आहे. मानवी हक्काच्या आग्रही भूमिकेच्या प्रतिपादनासाठी त्यांनी लोकभाषेच्या आक्रमक शैलीतून विद्रोह व्यक्त करण्यासाठी उपयोग केला. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण साहित्यातून अर्थवाहित्व, विचारप्रवर्तकता, चित्रमयता, संवादीत्व, वास्तवता हे सारे विशेष सहजसाध्य झाले आहेत. त्यांच्या सोबत लेखन करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या साहित्यानेही हीच सत्यशोधकी साहित्याची भूमिका घेतली आहे.

महात्मा जोतीराव फुले यांच्या विचाराने, सत्यशोधक समाजाच्या विचाराने, सत्यशोधकी साहित्यविषयक भूमिकेने आणि सत्यशोधक समाजाच्या चळवळीने सत्यशोधक साहित्यप्रवाह निर्माण झाला. महात्मा जोतीराव फुले यांच्यापासून सुरू झालेल्या सत्यशोधक साहित्याची मोठी परंपरा निर्माण झाली. १८५० नंतर सत्यशोधक साहित्यप्रवाह सुरू झाला आणि आजही त्या तत्त्वज्ञानाच्या प्रेरणेने साहित्य निर्मिती होत आहे. पारलौकिक तत्त्वज्ञान सांगणाऱ्या आणि शूद्रातिशूद्रांना दास्यात अडकवणाऱ्या व्यवस्थेच्या विचाराच्या विरोधात लौकिक जीवनाचे तत्त्वज्ञान देणारी ही साहित्य चळवळ आहे. विषमता नष्ट व्हावी आणि समता प्रस्थापित व्हावी यासाठी ही चळवळ आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, मानवता आणि न्याय या मूल्यांसाठी संघर्ष करणाऱ्यांचे हे

साहित्य आहे. 'एकमय समाज' निर्मिती हाच ध्येयध्यास घेऊन सत्यशोधकी साहित्य निर्माण झाले. सत्यशोधक साहित्य प्रवाहाने चळवळ म्हणून त्याचे स्वतंत्र तत्त्वज्ञान, वैविध्यपूर्व साहित्य निर्मिती, ललित साहित्य निर्मिती, साहित्य-सृजनात स्त्री-पुरुषांचा सहभाग, प्रकाशन-वितरण व्यवस्था निर्माण केली. मानवद्रोही मूल्यांना नकार देऊन 'माणूस' म्हणून माणसाला प्रतिष्ठा देण्याची भूमिका घेतली. मराठीतील आधुनिक कवितेचे जनकत्व, स्वतंत्र नाटकाचे जनकत्व, स्वतंत्र सामाजिक नाटकाचे जनकत्व, जागतिक पातळीवरील स्त्रीवादी भूमिकेचे प्रथम लेखनाचे जनकत्व, विडंबन करण्याचे जनकत्व सत्यशोधकी साहित्य चळवळीकडे जाते. नाटक, अखंड लौकिक अभंगे, पोवाडे, लावण्या, प्रहसन, वग, विडंबनकाव्य, खंडकाव्य, कादंबरी, कथा अशा वैविध्यपूर्ण लेखन प्रकारात लेखन केले आहे. वैचारिक लेखन, चरित्र लेखनही विपुल केले. ग्रामीण पत्रकारितेतून संपादक, पत्रकार, नियतकालिके, लघुनियतकालिके या साहित्य चळवळीतूनच निर्माण झाले. या संदर्भात सत्यशोधकी साहित्याचे इतिहासकार आणि सत्यशोधकी साहित्य प्रवाहातील लेखक डॉ. श्रीराम गुंदेकर म्हणतात, 'या साहित्यप्रवाहाचे मानवद्रोही मूल्यांना नकार देवून मानवतामूल्यांचा पुरस्कार केला, भारतीयत्वाशी आपले नाते जोडले. प्रस्थापित मूल्यव्यवस्था आणि सांस्कृतिक मूल्यव्यवस्थेचा तौलनिक अभ्यास केला. जनद्रोही मूल्यांना नकार देऊन मानवी मन, मानवी नातेसंबंधांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. व्यापक आणि सखोल नैतिक भूमिका घेऊन सत्यशोधकी साहित्य निर्माण झाले. (सत्यशोधकी साहित्याचा इतिहास; मनोगत - पान - ८) ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी आणि अन्य साठोत्तरी साहित्यप्रवाह महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रेरणेतून निर्माण झाले. महात्मा जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून हे साहित्य प्रवाह प्रवाहित झाले हे सर्व मीमांसकांनी मान्य केले आहे. महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रेरणेतून आलेल्या सत्यशोधकी साहित्य प्रवाहाने जातिवर्णव्यवस्थेच्या, विषम धर्ममूल्यांच्या, दास्य आणि शोषणाच्या विरोधात चळवळीसह कृतिशील विचार दिला. तोच विचार साठोत्तरी साहित्य प्रवाहातून आला आहे. मात्र त्याचा अनुबंध तर्कशुद्धपणे मांडला नाही. तशी अभ्यासपूर्ण मांडणी होण्याची गरज आहे. तसे झालेतर साहित्येतिहासाची संपूर्ण मांडणी नव्याने होईल.

साहित्य क्षेत्रात नवप्रवर्तन किंवा युगप्रवर्तन घडणारा विचार आला की साहित्य क्षेत्र पूर्णतः बदलते. या बदलासाठी संपूर्ण समाजव्यवस्था बदलाची प्रक्रिया घडावी लागते. या प्रक्रियेसाठी समाजव्यवस्था आणि मूल्यव्यवस्था बदलणारा, त्यात परिवर्तन घडवणारा नवा विचार महत्त्वाचा ठरतो. त्यासाठी साऱ्या समाजाचा विचार करणारा, साऱ्यांच्या समावेशकतेचा विचार करणारा विचारच नवप्रवर्तन घडवून आणतो. समाजामध्ये उलथापालथ घडणाऱ्या घटनांचा या नवप्रवर्तनाशी, युगप्रवर्तनाशी अनुबंध असतोच. राजवटीतील राज्यव्यवस्थेचा दृष्टिकोन बदलणारा अपूर्व बदल, ज्ञान-विज्ञानातील नवे संशोधन आणि समाजव्यवस्थेची मूल्ये बदलणारा क्रांतिकारी विचारातून नवप्रवर्तन घडत असते. यामुळे समाजाचे स्वरूप सर्वार्थाने बदलत जाते. सामान्यांसह सर्वांचेच दृष्टी आणि दृष्टिकोन बदलतात. परंपरागत मूल्ये आणि नवी मूल्ये यातील संघर्ष नवप्रवर्तनास कारण ठरतात. त्यातूनच साहित्य आणि कला क्षेत्रात नवप्रवर्तन-युगप्रवर्तन घडते. प्रस्थापित विषम व्यवस्थेला नकार आणि विषम व्यवस्थेने दिलेल्या मूल्यव्यवस्थेविरुद्ध, संस्कृतीविरुद्ध, इतिहासाविरुद्ध विद्रोह अटळ असतो. असे युगप्रवर्तन महात्मा जोतीराव फुले यांच्या विचार आणि चळवळ यामुळेच घडले. सत्यशोधक समाजाच्या परिवर्तनाच्या चळवळीही यासाठी कारण ठरल्या. सत्यशोधकी साहित्याने साहित्यविषयक भूमिकाच बदलून टाकली. पारलौकिक जीवनाचे चित्रण करणाऱ्या साहित्याऐवजी लौकिक जीवन साहित्यात आणले. कवितेसह संपूर्ण आधुनिक साहित्याचे जनक महात्मा जोतीराव फुले ठरले. अनेक शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांनी साहित्य निर्मितीच्या क्षेत्रात आपली नाममुद्रा उमटवली. महात्मा जोतीराव फुले आणि सत्यशोधक समाजाची चळवळ समाजावर परिणाम करणारी ठरली.

समग्र जीवनावर याचा परिणाम झाला. त्यातूनच आधुनिक जगातील मानवी मूल्यांचे आविष्करण साहित्यात आले. साहित्यविश्व बदलून टाकणारे आणि साहित्याला नवी भूमिका देणारे हे युगप्रवर्तन होते. या युगप्रवर्तनाने नवा इतिहास घडला. जगणे आणि लेखन लौकिक झाले. जगणे, लेखन आणि विचार यातील द्वैत संपून अद्वैत आकाराला आले. साहित्याचा विचार, दृष्टी आणि दृष्टिकोन पार बदलले. साहित्याचा पूर्ण अवकाश बदलला. साहित्यविषयक भूमिका, संकेत, आशय, अभिव्यक्ती आणि अभिरुची सारेच बदलले. साहित्याच्या व्यक्तीकेंद्री विचाराला पूर्णविराम मिळाला आणि समष्टीकेंद्री, समूहकेंद्री लौकिक जीवनाला साहित्याच्या केंद्रस्थानी स्थान मिळाले. सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, स्त्रीविषयक, जातीय पारंपरिक दृष्टिकोन बदलणारे साहित्य आले. त्यामुळे नवप्रवर्तन, युगप्रवर्तन करणारे 'सत्यशोधकी प्रवाह' घेऊनच नवे साहित्य आले. वैविध्यपूर्ण साहित्यप्रकाराचे हे साहित्य नव्या परंपरा निर्मिणारे साहित्य ठरले. या साहित्याचा आरंभ महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे, गोपाळबाबा वलंगकर, नारायण मेघाजी लोखंडे, कृष्णराव भालेकर, स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावारू, गणपतराव सखाराम पाटील, पंडित धोंडीराम नामदेव कुंभार, नारो बाबाजीशास्त्री महाघट पाटील पानसरे, डॉ. यशवंतराव जोतीराव फुले, कृष्णराव अर्जूनराव केळुसकर यांच्या सामर्थ्यशाली लेखनाने झाला. याच विचारातून हा प्रवाह वासुदेव लिंगोजी बिर्जे, तान्हुबाई वासुदेव बिर्जे, मुकुंदराव पाटील, सावित्रीबाई रोडे, हरीभाऊ चव्हाण, अण्णासाहेब लट्टे, दिनकरराव शंकरराव जवळकर, प्रबोधनकार केशवराव सीताराम ठाकरे, रामचंद्र बाबाजीराव जाधव, भास्करराव जाधव यांनी सत्यशोधकी साहित्य प्रवाह समृद्ध केला. पंढरीनाथ सीताराम पाटील, रा. ना. चव्हाण, माधवराव खंडेराव बागल, शामराव देसाई, सीताराम लाड, तुकारामतात्या पडवळ, रघुनाथ राणे, विरोत्तमराव राणे, रामकृष्ण भागवत यांच्यासह अनेकांनी मराठी साहित्यात, सत्यशोधकी साहित्यात आपली 'अक्षरे 'अक्षर' केली. स्वातंत्र्योत्तर काळात डॉ.आ.ह.साळुंखे, डॉ. जयसिंगराव पवार, प्रा. जैमिनी कडू, प्रा. गजमल माळी, प्रा. हरी नरके, डॉ. श्रीराम गुंदेकर, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. रवींद्र ठाकूर, प्रा.जी. ए. उगले, प्रा. भास्कर चंदनशीव, प्रा.डॉ.उमेश बगाडे यांच्यासह अनेकांनी याच परंपरेत लेखन केले आहे.

महात्मा जोतीराव फुले यांच्या साहित्याने आणि साहित्यविषयक भूमिकेने मराठी साहित्याला नवे रूप, नवी दिशा आणि अगणित शूद्रातिशूद्र लेखक कवी मिळाले. साहित्य आणि संस्कृतीला नवी दृष्टी मिळाली. जीवन जगण्याच्या वास्तवाचे प्रत्ययकारी दर्शन घडवण्याचा लौकिकवादी वस्तुपाठच त्यांनी साहित्यासमोर उभा केला. त्यामुळे साहित्याच्या निर्मितीची कारणे, प्रयोजन बदलून गेले, संस्कृती निर्माण करण्यात साहित्य मोलाची भूमिका पार पाडते या मीमांसकांच्या म्हणण्याला नवा अर्थ आणि नवी दिशा दिली. मराठी साहित्याला नव्या विचाराचे अधिष्ठान दिले. साहित्याच्या आविष्काराला लोकभाषा आणि लोकरचना बंध यांना प्रतिष्ठा दिली. त्यामुळेच शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांच्या अनुभूतीचे नवे आविष्करण घडले. गेल्या १७० वर्षांपासून हे आविष्करण घडते आहे. भविष्यातही घडत राहील. महात्मा जोतीराव फुले यांच्यामुळेच बहुजनांची ही 'साहित्यसंस्कृती' घडवली गेली. संस्कृतीने साहित्याला आणि साहित्याने संस्कृतीला बहुजनदृष्टी दिली. साहित्याचा अवकाश व्यापक झाला. बहुजन संस्कृतीला नवी दिशा आणि नवी दृष्टी मिळाली. हे बहुजन संस्कृतीचे निर्माण शक्य झाले.

◆◆◆◆

खानदेशातील सत्यशोधक वर्तमानपत्रे व जलसे

- सर्जेराव भामरे

एखाद्या संघटनेची तत्त्वे, चळवळ सर्वच स्तरापर्यंत पोहोचावी म्हणून जवळपास शंभरच्यावर वृत्तपत्रे प्रकाशित होतात त्यावरुन सत्यशोधक समाजाच्या विचारांची, चळवळींची व्याप्ती व शक्ती लक्षात येते. भारतात या काळात अनेक संस्था, संघटना निर्माण झाल्यात. त्यांची एवढी वृत्तपत्रे निघालेली दिसत नाहीत. जगाच्या वृत्तपत्रीय इतिहासात हे महाराष्ट्राचे उदाहरण एकमेव असावे असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

१८७३ मध्ये महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या निमित्ताने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात उत्कर्षाचे नवे तत्त्वज्ञान उदयास आले. इंग्रजी राजवटीने लाभलेले नवविचार, नवीमूल्ये, पिढ्यान्‌पिढ्यांच्या सांस्कृतिक गुलामगिरीत अडकलेल्या बहुजन समाजापर्यंत नेण्याचे ऐतिहासिक कार्य या सत्यशोधक चळवळीने केले. कष्टकरी, शेतकरी जनतेला नाडणाऱ्या सर्वच स्तरातील मध्यस्थांविरुद्ध सत्यशोधक चळवळीने लढा उभारला. कष्टकरी जनतेत जागृती निर्माण केली. त्यांना संघटित करून अन्यायाविरुद्ध संघर्ष करावयास शिकविले, या संघर्षाचे नेतृत्त्व स्वतः करून अनेक तळागाळातील तरुणांना प्रोत्साहित करून त्यांचे नवनेतृत्त्व समाजात निर्माण केले.

विद्याहीन, धनहीन व सत्ताहीन बहुजन समाजाच्या दुःखाला वाचा फोडणारा क्रांतिकारक जोतीबा फुले यांच्या रूपाने निर्माण झाला. बहुजन समाजाच्या सर्व दुःखदैन्याचे मूळ त्यांच्या अज्ञानात, अंधश्रद्धेत आहे. या दोषांच्या निर्मूलनास शिक्षणाशिवाय दुसरा उपाय नाही. हे महात्मा फुलेंनी जाणले.

महात्मा फुलेंनी 'गुलामगिरी', 'ब्राह्मणांचे कसब', 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातून जुलमी हुकूमशाही वृत्तीच्या धार्मिक प्रवृत्तीवर टीका करून त्यांची चिरफाड करून तिचे मर्मभेदी चित्र महाराष्ट्रातील समाजापुढे उभे केले. याविरुद्ध संघर्ष करण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष कृतीच करण्याचे ठरविले. त्यासाठीच त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री म्हणतात, 'बहुजन समाजावर ब्राह्मण परंपरेने जे युगानुयुगे वर्चस्व गाजविले आणि खालच्या समाजात अज्ञान, दारिद्र्य, धर्म भोळेपणा, मागासलेपणा, अस्वच्छता, मालिन्य, मनोदौर्बल्य आणि हताशवृत्ती यांचेच भागीदार म्हणून राहू दिले. त्यातून बहुजन समाजाला बाहेर पडण्याचा मार्ग दाखविण्याची मूळची धर्मसंस्थेने दिलेली जबाबदारी पार पाडण्यात कुचराई या ब्राह्मणांनी केली आणि स्वतःचे

वर्चस्व ढिले होणार नाही याची खबरदारी बाळगली. त्यामुळे या ब्राह्मण परंपरेच्याविरुद्ध बंड करणारी प्रवृत्ती सत्यशोधक समाजाच्या रूपाने जागी झाली. हजारो वर्ष जो-जो राजकीय सत्ताधारी वर्ग सत्तास्थानी आला त्याने आपल्या सत्येच्या बळकटीकरिता हे ब्राह्मणी वर्चस्व अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला. त्याला फारच थोडे अपवाद भारताच्या इतिहासात सापडतात. त्यामुळे शुद्र व अतिशुद्र म्हणून मानलेल्या कारागीर व श्रमजीवी जमातीचे आर्थिक शोषणही चालू राहिले.'[१] महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांमध्ये पहिली चळवळ म्हणजे सत्यशोधक चळवळ होय. बहुजन समाजाच्या जागृतीची व प्रगतीची चळवळ म्हणजे सत्यशोधक चळवळ होय. भारतामध्ये समाजक्रांतीचे प्रथम प्रकटीकरण या चळवळीने केले. मानवतावाद, बुद्धीप्रामाण्यवाद आणि व्यक्तीस्वातंत्र्य या मूल्यांची जोपासना या चळवळीने केली.

इ.स.१८८५ साली गुढीपाडव्यास सत्यशोधक समाजाच्या झेंड्यांची मिरवणूक काढण्यात आली. त्यावेळी न्या.महादेव गोविंद रानडे त्यामध्ये सामिल झाले व नंतर त्यांनी सत्यशोधकीयांसमोर व्याख्यान दिले.

समाज सुधारक व विचारवंत धनंजय कीर म्हणतात, 'आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ करणारी पहिली संस्था सत्यशोधक समाज ही होय.'

सत्यशोधक ही चळवळ आहे, सत्यशोधक ही दृष्टी आहे, सत्यशोधक ही विचारपद्धती आहे व एक तत्त्वज्ञानही आहे. या सत्यशोधक चळवळीचा प्रसार व प्रचार करण्यासाठी सत्यशोधकीय वृत्तपत्रे व अभिनव प्रकारचे जलसेही काढण्यात आले.

१८ व्या शतकात महाराष्ट्रात सामाजिक व सांस्कृतिक नवयुगाचे वारे वाहू लागले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज व नव्या परिवर्तनशील धर्माची तत्त्वे शेकडो सत्यशोधकांनी घराघरात पोहचविले. सत्यशोधक समाजाचे विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्यासाठी वृत्तपत्रांची निर्मिती करून वैचारिक जागृती घडवून आणली.

सावकार, इंग्रज अधिकारी वर्गाची हुकूमशाही, धर्माच्या नावाखाली चाललेले थैमान, अंधश्रद्धेचे वाढलेले प्रस्थ या सर्व समस्यांनी ग्रामीण जनता त्रस्त झाली होती. गावातील कुलकर्ण्याकडून शेतकऱ्यांचे चाललेले आर्थिक शोषणाविरुद्ध कोणीही ब्र काढण्याची हिम्मत होत नव्हती. याविरुद्ध सत्यशोधकीय वृत्तपत्रांनी समाजाचे दुःख, दैन्य यावर रोखठोक लिखाण करून आवाज उठविला.[२]

समाजासमाजात चाललेल्या अनिष्ट घटनांविरुद्ध लढा उभारुन समाज जागृती करण्याचे काम या सत्यशोधकीय वृत्तपत्रांनी केले. त्याचबरोबर सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, वैचारिक चळवळींवर भाष्य करून अन्यायी बाबींचा खरपूस समाचार या सत्यशोधकीय वृत्तपत्रांनी घेतला.[३]

समाजातील पुरोहित ही केवळ एक धार्मिक, सामाजिक जात नसून तो एक आर्थिक वर्गही आहे याची पूर्वजाणीव असणारे महात्मा फुले हे पहिले विचारवंत होते. ज्या संस्कृतीमुळे शेतकरी आदी शुद्रांचे दारिद्र्य टिकवून ठेवले आहे. ते या वर्गाच्या सामाजिक, आर्थिक वर्चस्वामुळेच. संस्कृतीच्या नावाखाली रुढीपरंपरेच्या माध्यमातून बहुजन वर्गाची आर्थिक दैन्यावस्था टिकवून ठेवणे हेच येथील समाजरचनेचे कार्य होते असा निष्कर्ष महात्मा फुलेंनी काढला.[४] (डॉ.अरविंद देशपांडे, पुणे यांचा लेख)

प्रत्येक परिवर्तनवादी चळवळ आपले विचार सक्रिय करण्यासाठी वाङ्मय निर्मितीची कास धरीत असते.

महात्मा फुलेंच्या सत्यशोधकीय चळवळीच्या वाटचालीत सत्यशोधकीय वृत्तपत्रांचे योगदान मोठे आहे. ही वर्तमानपत्रे प्रामुख्याने सत्यशोधकीय विचारांच्या प्रसारासाठी सुरू झालेली दिसतात. ही वर्तमानपत्रे आणि त्यातून सत्यशोधकीय कार्यकर्त्यांनी केलेली पत्रकारिता हा महाराष्ट्राच्या वैचारिक क्रांतीचा दैदिप्यमान इतिहास आहे. या वृत्तपत्राचा इतिहास वस्तुनिष्ठपणे लिहिला गेला नव्हता. यांच्या इतिहासाकडे फारसे लक्षही दिले गेले नाही.

सन १८७७ ते १९३० या काळात सुमारे पन्नासपेक्षा अधिक सत्यशोधकीय वृत्तपत्रांचा उदय झाला. त्यामुळे महाराष्ट्रात बहुजन समाजात पुरोगामी विचार रुजण्यास

मोलाची मदत झाली. त्यांनी सामाजिक व वाङ्मयीन क्षेत्रात भरीव योगदान दिले. तसेच बहुजन पत्रकारितेची स्वतंत्र परंपरा महाराष्ट्रात मराठीमध्ये निर्माण झाली. परिणामतः समाजबांधवात विविध क्षेत्रात अनेक विधायक स्वरुपाचे रचनात्मक बदल घडवून येण्यास मदत झाली. त्यावेळच्या साहित्यिक, अभ्यासक, संशोधक, समीक्षक व वाङ्मयेतिहासकारांनी याची पुरेसी दखल घेतली नाही असे म्हणावे लागते. यामधून प्रकाशित झालेले वैचारिक साहित्य हे सामाजिक, धार्मिक, राजकारण, इतिहास, कामगार, स्त्रिया, शिक्षण, अस्पृश्यता अशा विविध विषयांना कवेत घेणारे होते. या साहित्याने निरक्षर समाजाची अंधश्रद्धेकडे होणारी वाटचाल, धार्मिक परंपरा, पोथीवाद, कर्मकांड, व्रतवैकल्ये, दैववाद, वर्णव्यवस्था, कुपमंडूकवृत्ती, जातीव्यवस्था, ब्राह्मणवर्चस्व तसेच सावकारशाहीकडून होणारी आर्थिक पिळवणूक या सर्व गोष्टींवर कडाडून हल्ला केला. पर्यायी मूल्यांकन समृद्ध अशी विचारांची दिशा दाखवून समाज प्रबोधनासाठी वृत्तपत्रांबरोबर 'सत्यशोधक जलसे' निर्माण करुन खेड्यापाड्यातील अज्ञान, गरीबी, अनिष्ट रुढी, परंपरा, दलाली, सावकारांची दडपशाही, अंधश्रद्धा याविरोधात लिखाणातून व काव्यातून समाजजागृती घडवून आणली.[५]

महाराष्ट्राच्या वृत्तपत्रांच्या इतिहासात सत्यशोधकीय वृत्तपत्रांची कामगिरी अतिशय मोलाची आहे. या परिवर्तनशील चळवळीच्या प्रसारासाठी महाराष्ट्रात पुणे-२८, कोल्हापूर-१७, मुंबई-१६, सातारा-७ व इतर ठिकाणी म्हणजे महाराष्ट्रात नव्हे तर कराची (पाकिस्थान), बेळगांव (कर्नाटक), बडोदा-२ (गुजरात). येथे महाराष्ट्रात विविध जिल्ह्यातून वृत्तपत्रे निघालीत. त्याद्वारे सत्यशोधक संपादकांनी सामाजिक प्रश्नांना वाचा फोडून अशिक्षित बहुजन समाजाला जागृत करून स्वतःच्या हक्कांची जाणीव करून दिली. महाराष्ट्रात सत्यशोधक विचारांच्या प्रसारासाठी विविध भागातून सुमारे शंभरपेक्षा जास्त वृत्तपत्रे त्याकाळात प्रसिद्ध झालीत. या वर्तमानपत्रांनी फार मोठ्या प्रमाणात वैचारिक जागृती घडवून आणली.

एखाद्या संघटनेची तत्त्वे, चळवळ सर्वच स्तरापर्यंत पोहोचावी म्हणून जवळपास शंभरच्यावर वृत्तपत्रे प्रकाशित होतात त्यावरुन सत्यशोधक समाजाच्या विचारांची, चळवळींची व्याप्ती व शक्ती लक्षात येते. भारतात या काळात अनेक संस्था, संघटना निर्माण झाल्यात. त्यांची एवढी वृत्तपत्रे निघालेली दिसत नाहीत. जगाच्या वृत्तपत्रीय इतिहासात हे महाराष्ट्राचे उदाहरण एकमेव असावे असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

खानदेशातही सत्यशोधकीय वृत्तपत्रांनी जनजागृती घडवून आणली. जळगावात खिरोदा येथून सिताराम चौधरी यांनी 'आत्मोद्धार' हे वृत्तपत्र फेब्रुवारी १९२३ मध्ये काढले. 'राष्ट्रवीर' हे शामराव देसाईंचे वृत्तपत्र निघाले. 'जनसेवक' हे वृत्तपत्र जळगावहून प्रकाशित झाले. १ जानेवारी १८७७ ला कृष्णराव भालेकरांनी 'दीनबंधु' हे वृत्तपत्र काढले. पण १९०७ ला ते प्लेगमुळे बंद पडले. पुढे ते परत त्यांनी काढले. वासुदेव बिर्जे नी आपली पत्नी तानुबाई बिर्जे यांना वृत्तपत्राचे ज्ञान दिले. वासुदेव बिर्जेच्या मृत्युनंतर दीनबंधुची संपूर्ण जबाबदारी तानुबाई बिर्जेनी स्वीकारली. भारतातल्या पहिल्या महिला संपादक म्हणून त्यांचे नाव गाजले. पण वृत्तपत्रसृष्टीने त्यांची फारशी दखल घेतली नाही. १९०८ ते १९१२ पर्यंत त्यांनी दीनबंधुच्या संपादनाची जबाबदारी यशस्वीरित्या सांभाळली. सत्यशोधक वृत्तपत्रांना बडोदानरेश सयाजीराव गायकवाड व कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती शाहू महाराजांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांनी कोल्हापुरात दहा-अकरा वृत्तपत्रांना आर्थिक सहाय्य केले. त्या काळात कोल्हापूरहून सुमारे वीस वृत्तपत्रे प्रकाशित होत होती.

बहुजन वंचित समाजाला अज्ञान, दैन्य व दारिद्र्यातून बाहेर काढावयाचे असेल तर, तसेच त्यांची सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करायची असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही असे महात्मा फुलेंनी कळकळीने सांगितले. त्यांच्या विचारांनी प्रवृत्त होवूनच मुकुंदराव पाटलांनी 'दीनमित्र' हे वर्तमानपत्र १९११ ला सुरू केले.

चालक मंडळीत आण्णासाहेब लठ्ठे, वालचंद कोठारी

हे प्रत्यक्ष चळवळीत सक्रीय कार्य करणारे व्यक्ती होते. डेक्कन रयतला शाहू महाराजांचे सहाय्य होते. देशाच्या राजकारणातील व समाजकारणातील वृत्तपत्रांचे महत्त्व व सामर्थ्य महाराज जाणून होते व ते आपल्याकडे मराठी व इंग्रजी वृत्तपत्रे मागवीत. सर्व वृत्तपत्रांची कात्रणे तयार करून ठेवण्यासाठी महाराजांनी महादेव डांगरे यांची वृत्तपत्र निरीक्षक म्हणून खास नेमणूक केली होती.[६]

२५ ऑक्टोबर १९१८ रोजी भगवंत पाळेकर यांनी 'जागृती' या नियतकालिकाचे संपादन केले. ते नियतकालिक पुढे ३२ वर्षे चालले. 'नव्या मनुतला नवा मराठा' ही लेखमाला फार गाजली. त्यांचे मूळगांव खानदेश बागलाण सटाण्याजवळील 'पाळे' हे होते. खानदेशातील अनेक सत्यशोधकांकडे हे नियतकालिक येत. त्यात खानदेशातील विविध बातम्या असत.

'विजय मराठा' या सत्यशोधक नियतकालिकाचे संपादक श्रीपतराव शिंदे होते. १९०८ ला ते धुळ्यास फौजदार म्हणून सेवेत होते. पुढे नगर, पुणे, जामखेड, पाथर्डी, इंदापूर येथे सेवा केली. त्यांनी बहुजन समाजातील दारिद्र्य, दुःख, देवभोळेपणा, निरक्षरता याचे विदारक दर्शन त्यांना घडले. १ डिसेंबर १९१९ ला पुणे येथून विजय मराठाचा पहिला अंक निघाला. १९२० ते १९३० या काळात सत्यशोधक चळवळीचे एकप्रकारे वैचारिक नेतृत्त्व श्रीपतराव शिंदे यांनी केले.

प्रबोधनकार ठाकरे यांनी १६ ऑक्टोबर १९२१ ला 'प्रबोधन' या नियतकालिकाचे प्रकाशन केले. आजमितीस याला १०१ वर्षे झालीत. या अंकावरील लोगो अतिशय अभ्यासण्यासारखा आहे. आजच्या काळाशी तो सुसंगत आहे. 'प्रबोधन'वरील लोगोत तलवार, दौत आणि पुस्तक होते. पण नंतर त्यांनी तराजूही वापरला. यावरून सगळ्यांना समान वागणूक, उद्योगांची क्षमता वाढविणे, अन्यायाच्या विरोधात जागृती, चळवळी उभारणे व तराजू - यातून उद्यमशीलता दिसते. समाजातील क्रूप्रथांविरुद्ध काम करताना प्रगतीशील विचार तळागाळात पोहोचविण्यासाठी हे मासिक काढले. याचे एकूण ९५ अंक निघालेत. त्यांचे बरेच दिवस वास्तव्य धुळ्यात होते. खानदेशातील अनेक सत्यशोधकांबरोबर त्यांचे सख्य होते.

खिरोदा येथील सिताराम नाना चौधरी यांनी (मधुकरराव चौधरींचे वडील) सत्यशोधक विचार तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी फेब्रुवारी १९२३ ला 'आत्मोद्धार' हे वृत्तपत्र जळगावातून काढले. याचा प्रसार संपूर्ण खानदेशात मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो.

खानदेशातील सत्यशोधकीय जलसे

सत्यशोधकीय जलसा या कलाप्रकाराला सांस्कृतिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेकडो लेखांनी, भाषणांनी जेवढे प्रचारकार्य होणार नाही तेवढे एका जलसाने होते. जलसा हा लोकनाट्याचा एक प्रकार आहे. तो महात्मा फुलेंच्या कलावंत, कार्यकर्त्यांनी समाज सुधारणेसाठी आणि समतावादी व पुरोगामी विचारांना रंजक पद्धतीने जनसामान्यांपुढे मांडण्यासाठी वापरला. जलसाकारांनी परिवर्तनाच्या प्रक्रियेला अधिक गतिमान केले. जलशांचे सामाजिक प्रचारासाठीचे माध्यम म्हणून स्थान मोलाचे आहे. यामुळे बहुजन समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व सामाजिक न्यायाचे आत्मभान प्राप्त झाले. सन १९१० च्या सुमारास सत्यशोधकीय जलसे उभे राहिलेत. भिमराव विठ्ठलराव महामुनी (ओतूर) हे आद्य जलसाकार सन १९०५-०६ भिमपुराण या काव्य, गेय, नाट्य सादरीकरणास 'सत्यशोधक जलसे' असे नामाभिधान प्राप्त झाले. महामुनींच्या जलशांचे अनुकरण करण्याची व समाजकार्य प्रभावीपणे वाढविण्याची प्रेरणा म्हणून पुढील काळात जलसा निर्मिती होण्यास प्रारंभ झाला. महाराष्ट्राच्या विविध भागात जलसे निर्माण झाले. पुढे सर्व महाराष्ट्रात सुमारे १२५ च्या वर जलसे झालेत. खानदेशात सुमारे १४ जलसे होते. त्यात जळगांवला ४-५, त्यानंतर धुळ्याला ३-४, नाशिकला ६-७, खानदेशात एकूण १५-१६ जलसे होते. सन १९१० ते १९४० पर्यंत सत्यशोधकीय जलसाकारांनी संपूर्ण महाराष्ट्रात समाजप्रबोधनाचे वारे नव्हे तर वादळच घोंगावत ठेवले.

सत्यशोधकीय जलशांनी महाराष्ट्रात आपला ठसा उमटविला. खानदेशात धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील मालपूर, कासारे, धाडणे, नंदुरबार

तालुक्यातील खोंडामळी तर जळगांव जिल्ह्यातील जळगांव, बहादरपूर, वाडेगुढे येथील सामाजिक प्रबोधनात मोलाची कामगिरी केली. धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात मालपूरचे माणिक आप्पा भामरे, धाडण्याचे शिवलाल बुधाजी अहिरराव, देऊरचे कॅप्टन विश्वासराव देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सत्यशोधक चळवळ सुरू झाली. खानदेशातील जलशाचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे यात सर्व जातीच्या लोकांचा सहभाग होता. त्यांनी खानदेशात नव्हे तर महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये आपला फड गाजविला.

जुन्या चालीरीतींना फाटा द्या, अज्ञान, अंध:कार नाहीसा करा, आपल्या मुलाबाळांना शिक्षण द्या, खोट्या समजुती व अनिष्ट रुढी फेकून द्या, व्यसनमुक्ती, सार्वजनिक शिक्षण, सामाजिक समता, अंधश्रद्धा निर्मूलन या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी तसेच लग्न समारंभानिमित्तही जलशांचे प्रयोग होत असत.[७]

'आमच्या जिल्ह्यात असे जलसे आम्ही लहानपणी पाहिले, त्या जलशांचा प्रभाव आमच्यावर झाला. शिक्षणाची आवड आमच्यात निर्माण झाली. त्यामुळेच शिक्षण घेऊ शकलो. हे शिक्षण नसते तर मी शिकलो असतो की नाही ही शंकाच आहे.' या शब्दात धुळे जिल्ह्यातील सत्यशोधक समाजाचे त्यावेळचे अध्यक्ष कै. ॲड. नानासाहेब झेड. बी. पाटील यांनी हे मत मांडले आहे.[८]

ॲड. झेड. बी. पाटलांच्या विचारांची जडण-घडण या सत्यशोधकीय जलशातून झाली हे ते स्पष्ट करतात. त्यांनी पुढे शिक्षणाचा प्रचार व प्रसार केला. समाजसेवेच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले. त्यांच्या या फलितातूनच पुढे धुळे येथे जयहिंद हौसिंग सोसायटी व जयहिंद शैक्षणिक संकुल निर्माण झाले. त्यांनी लावलेले हे रोपटे आज शिक्षणाच्या क्षेत्रात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करीत आहे. खानदेशात तरुणांच्या आदर्श पिढ्या घडवित आहे. सत्यशोधक समाजाच्या कार्यातूनच पुढे कर्मवीर भाऊराव पाटलांसारखे ज्ञानयोगी, कर्मयोगी, विचारवंत महाराष्ट्रात विविध ठिकाणी निर्माण झाले. त्यांच्या कार्यामुळेच महाराष्ट्रात प्रबोधनाला चालना मिळाली.

नंदुरबार तालुक्यातील खोंडामळी येथील गोपाळराव माणिकराव पाटील हे प्रसिद्ध जलसाकार होते. त्यांचे शिक्षण चौथीपर्यंत झाले होते.ते बुद्धीने चलाख असून त्यांना वाचनाची गोडी होती. त्यांनी स्वतंत्र जलसा तयार केला. या जलशांमध्ये प्रत्येक अंकानंतर ते व्याख्यानात तात्त्विक भाग सांगत. तसेच सत्यशोधक समाजाची तत्त्वे ते लोकांना समजावून सांगत असत.

कॅप्टन विश्वासराव देवरे धुळे जिल्ह्यातील सत्यशोधक प्रमुख कार्यकर्ते. ही चळवळ खानदेशात रुजविण्यात कॅप्टन देवरे व माणिकराव आप्पा भामरे यांची प्रेरणा व चालनाही मोलाची होती.

कॅप्टन देवरे - १९१४ ते १९१८ या काळात पहिल्या महायुद्धात परदेशात ते लढाईत सहभागी झाले होते. त्यांचे शिक्षण मॅट्रीकपर्यंत झाले होते. परदेशी प्रवास, वाचनात गोडी, महात्मा फुलेंच्या विचारांचा प्रभाव व पगडा त्यांच्यावर पडला. मालपूरच्या माणिक आप्पांचे ते जीवलग मित्रही होते. या दोघांनीही सत्यशोधक समाजाचे विचार खानदेशात रुजविण्यासाठी तन-मन-धनाने प्रयत्न केले. धुळे, जळगांव, नाशिक जिल्ह्यात सत्यशोधक समाजाचे प्रचार व प्रसार कार्य जोमाने केले. सत्यशोधक जलस्यातून त्यांनी सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान व विचार सामान्यांपर्यंत पोहोचविले. ते कृतिशील कार्यकर्ते होते.

मालपूरचे माणिक आप्पा भामरे - जन्म १ मार्च १८९०. पाचवीपर्यंत शिक्षण. मालपूरचे माणिक आप्पा भामरे, सिताराम पाटील, धाडण्याचे शिवलाल बुधाजी, भाऊराव मास्तर, उखाजी आण्णा तर नंदुरबार, खोंडामळी येथील गोपाळराव पाटील, मोतीराम पाटील, साक्री शेवाळीचे अर्जुनराव पाटील व इतर त्यांच्या मित्रांनी भरीव कामगिरी केली. कॅप्टन विश्वासराव देवरे हे जलशातून जागृती करत. मालपूरचे माणिक आप्पा हे जलशाचे मुख्य सूत्रधार. ते फार विनोदी, हजरजबाबी होते.त्यांचे वक्तृत्त्व प्रभावी असून बोलण्यात कोणालाच हात धरु देत नव्हते. मधून-मधून ते जलशात भाषण करत. शिक्षणाचा जोरदार पुरस्कार करीत. अंधश्रद्धेवरही

कडाडून हल्ला करीत असत. जलशात लोकप्रबोधनासाठी खानदेशातील अहिराणी भाषेचा उपयोग करत.

माणिकरावांच्या व्यक्तिमत्त्वावर त्यांची आई गं. भा. रमाबाई यांचा चांगलाच पगडा होता. त्या काळात त्या चारचौघात वाचन करीत. त्यांना चांगले वाचन व लेखन करता येत असे. महात्मा फुले यांच्या विचारांचा जबरदस्त पगडा माणिकरावांवर पडला. त्यांच्या कार्यात मातोश्रींची प्रेरणा मिळाली. त्यांना वाचण्याची आवड निर्माण झाली. माणिकरावांनी आपल्या समविचारी मित्रांचा संच जमवून सत्यशोधक जलसा उभा केला. त्यात ते स्वतः, धाडण्याचे शिवलाल अहिरराव, नवडण्याचे महिपतराव बुवा ही मंडळी काम करीत. स्त्री शिक्षण, विधवा विवाह, केशवपन, अंधश्रद्धा निर्मूलन यावर प्रबोधनपर गीतातून ते जलशात सादर करत.

त्यांना वाचनाचा प्रचंड नाद होता. यासाठी त्यांनी आपल्या वडीलांकडे हट्ट धरला व त्या काळात विविध विषयांची दहा हजारांची पुस्तके त्यांनी घेतली. यासाठी त्यांनी वडीलांना शेत विकायला लावले.

जाती निर्मूलन :- यात प्रत्यक्ष कृती माणिक आप्पा, कॅप्टन देवरे, शंकरराव बेडसे हे एकदा गोविंद महाराकडे घरी जेवायला गेले. या गोष्टीचा गाजावाजा झाला. गावोगावचे मराठा नेते एकत्र आले. त्यांनी एकमताने ठराव करून या सत्यशोधक कार्यकर्त्यांना जाती बहिष्कृत केले. माणिक आप्पा व कॅप्टन देवरे यांनी या संबंधित विषयावरून कोर्टात जाण्याची धमकी दिली. तेव्हा जात पंचायतीने या संबंधी माघार घेतली. माणिक आप्पांनी अस्पृश्यता निर्मूलनाचा प्रारंभ आपल्याच घरापासून केला. दलितांना त्यांच्या घरात मुक्त प्रवेश देवून त्यांना घरातच जेवण दिले जात असे

शैक्षणिक कार्यात सक्रिय सहभाग :- माणिकराव भामरे यांनी शैक्षणिक कार्यातही सक्रिय योगदान दिले. धुळ्याची मराठा बोर्डींग बंद पडू नये म्हणून प्रयत्न केलेत.

उदार देणगी :- माणिकराव पाटील व देवराव पाटील मालपूरकर यांनी प. पू. वडिलांच्या स्मरणार्थ दीडशे रुपये किंमतीची पाटस्थळ जमीन धुळ्याच्या मराठा बोर्डींगला दिली. या उदार देणगीबद्दल उत्तर कार्यास जमलेल्या हजार-बाराशे लोकांनी त्यांना या देणगीबद्दल धन्यवाद दिले.

''माझ्या बंधुंनी आपल्या दानाचा अशारीतीने ओघ संस्थेकडे वळविण्यास धुळे व जळगांव मराठा बोर्डींगचे रुपांतर पुढे श्री शिवाजी हायस्कूल व राजश्री छत्रपती कॉलेज यात खात्रीने होईल. मालपूरकर पाटील बंधुंचे मी संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन करतो.''

- समाजसेवक,
ओंकार ल. पाटील
सु. व. ज. से. मराठा बोर्डींग, धुळे

हा वृत्तांत विजयी मराठा पुणेचे संपादक श्रीपादराव शिंदे यांनी दि.२४/११/१९२४ च्या अंकातील पान ३ वर दिला आहे.

साक्री तालुक्यातील सत्यशोधक कार्यकर्त्यांनी नांदगांव येथील मराठा बोर्डींग या शैक्षणिक संस्थेस मदत केली. श्री. नामदेवराव अहिरराव (साक्री), श्री. माणिकराव पाटील (धाडणे) व श्री. सिताराम पाटील (मालपूर) व मालजी पाटील यांनी वरील संस्थेस शंभर रुपये किंमतीची मदत केली असे शिवराम वेडू पाटील हे कळवितात. (हा वृत्तांत विजयी मराठा, पुणे संपादक श्रीपादराव शिंदे, दि.२९/०४/१९२९, सोमवार पान क्र.३ वर.

माणिकराव पाटील मालपूर यांनी आपल्या मुला-मुलींचे विवाह सत्यशोधक पद्धतीने हुंडा न घेता लावले. ते प्रत्यक्ष कृतीशील कार्यकर्ते होते.

साक्री तालुक्यातील सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते व महाराष्ट्रातील इतर भागातील कार्यकर्त्यांपेक्षा अधिक सक्रिय व क्रियाशील होते. त्यांचे राज्य पातळीवरील अनेक सत्यशोधकीय कार्यकर्त्यांशी चांगले वैयक्तिक संबंध होते.

दिनकरराव जवळकर, केशवराव जेधे, भास्करराव जाधव, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतीवीर नाना पाटील, केशवराव बगाडे, बॅरिस्टर नामदेवराव नवले इत्यादी.

शिवलाल बुधाजी अहिरराव (धाडणे)- यांचाही

सत्यशोधक जलसा होता. त्यांची मित्रमंडळी सधन होती. त्यांनी स्वयंस्फूर्तीने, चिकाटीने व आनंदाने या सत्यशोधकीय जलशात फुकट सेवा दिली.

साक्री तालुक्यातील माणिकराव आप्पा भामरे, धाडण्याचे शिवलाल दासभाऊ यांचे जलसे नाशिक, जळगांव, कोल्हापूर, सातारा येथे गेल्याचे त्यावेळच्या वृत्तपत्राच्या वृत्तांतात आले. त्यावेळच्या विजयी मराठा दीनबंधु व इतर वृत्तपत्रात वृत्तांत आले आहे. या सत्यशोधकीय कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांसाठीही मोलाचे योगदान दिले आहे. साक्री तालुक्यातील मालपूर येथे शासनातर्फे आठ दिवसाचा शेतकऱ्यांसाठी ऊसाचा वर्ग आयोजित केला होता. यात आठ विद्यार्थी यशस्वी झाले. त्यांना त्यावेळच्या कलेक्टरकडून प्रमाणपत्रही देण्यात आले. सत्यशोधक समाजाने शेतकऱ्यांसाठी, शेती उत्पन्न वाढविण्यासाठी सरकारकडे निवेदने दिली. या संबंधी विजय मराठा या वृत्तपत्रात सविस्तर वृत्तांत आले आहे. या सत्यशोधक कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांसाठीही मोलाचे योगदान दिलेले दिसते.

जळगांव जिल्ह्यातही सत्यशोधक जलसे

जळगांव जिल्ह्यात महादेव बापूजी पाटील, कौतिकराव शिवराम भंगाळे, देवराम पाटील, झिपरू भगवान, रामभाऊ लोखंडे, जळगांवचे मुरली महानुभाव, बहादरपूर येथील रसूल पिंजारी या सर्वांनी विविध भागात आपले जलसे सादर केले. त्यातून लोकजागृती घडवून आणली.

१९१६ मध्ये जळगांव जिल्ह्यातील गुढे येथे सत्यशोधक लक्ष्मण शास्त्री यांनी सत्यशोधक जलसा उभा केला. दिनांक ६ डिसेंबर १९१६ च्या दिनमित्र अंकात याचा वृत्तांत आला आहे.

महाराष्ट्रातून विविध भागातून खानदेशात सत्यशोधकीय जलसे सादर झाले. १) विंचूरकरांचा जलसा-राणीचे बांबरुड, १० मार्च तसेच दूधगांव-दत्ताचे शिवे येथे २७ मार्च १९२२. हा वृत्तांत विजयी मराठामध्ये आलेला आहे.

नाशिककर खंडेराव जोपूळकरांचा जलसा (नाशिक) खानदेशात विविध विभागात सादर झाला. (२७ मार्च १९२२, विजयी मराठा)

मोतेरे वाडीकर रुंजाजी पाटील यांचा जलसा-दि.०४/०८/१९२४ ला मालपूर (साक्री) वृत्तांत विजयी मराठा.

मोतेरे वाडीकर सत्यशोधकीय जलसा-खोंडामळी, कलमाडी, विखरण, नंदुरबार, दुसाणे, छडवेल, साक्री (दि.२८/०८/१९२४)

खंडेराव जोपूळकरांचा जलसा-मालपूर, कासारे, धाडणे येथे दि.०४/०८/१९२४

अशा प्रकारे विविध ठिकाणी जलसे होत होते. ते पाहण्यासाठी शेकडो लोक येत असत. या जलशांवर संशोधन होणे आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथ :

१) संपादक-डी. के. बेडेकर, भा. स. भगणे-'भारतीय प्रबोधन' (समीक्षक व चिकित्सा), १९७३, शंकरराव देव गौरवग्रंथ (समाज प्रबोधन संस्था, पुणे) प्रकाशक देवदत्त दाभोळकर, शनिवार पेठ, पुणे-३०, पान नं.२२३.

२) खराट संभाजी, 'सत्यशोधक चळवळ वाटचाल आणि चिकित्सा,' प्रतिभा प्रकाशन, पुणे.

३) तत्रैव.

४) नरके हरी (संपा.) महात्मा फुले, 'शोधाच्या नव्या वाटा' (महाराष्ट्र शासन), प्रकाशन महात्मा जोतीराव फुले चरित्र, प्रकाशन समिती, मुंबई-३०, पान नं.८ व ९.

५) लेले रा. क. - 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४.

६) श्रीपतराव शिंदे (संपा.), 'विजयी मराठा वृत्तपत्र,' ७ जून १९२०, २१, २२.

७) दत्ता परदेशी- 'खानदेशातील सत्यशोधक चळवळ,' सेली प्रकाशन, कानपूर-२२, सन २०१२.

८) पाटील झेड. बी.-(स्मरणिका), सत्यशोधक समाज अधिवेशन बोराडी, १९९१.

◆◆◆

फुलेवादाची मूलतत्वे व त्यांची प्रस्तुतता!

-श्रावण देवरे

वर्गव्यवस्था नष्ट करण्यासाठी शोषित वर्गामध्ये वर्ग-जाणिवा निर्माण होणे गरजेचे असते. ही वर्ग-जाणीव इतकी तीव्र झाली पाहिजे की, ती शोषित वर्गसंघर्षाला प्रवृत्त झाली पाहिजे. त्यासाठी वर्गीय संघटना उभाराव्या लागतात. रशियात कामगार संघटनांनी क्रांती केली, तर चीनमध्ये शेतकरी संघटनेने क्रांती केली. फुलेवाद व मार्क्सवाद येथे एकमेकांशी फारकत घेऊन पुन्हा एकत्र येतांना दिसतात.

फुलेवादाची मूलतत्वे व प्रस्तुतता!

कोणतीही चळवळ म्हटली की, सर्वात आधी आपण ती चळवळ उभी करणारी व्यक्ती कोण याचा आधी विचार करतो. त्यामुळे त्या विचारसरणीला, चळवळीला व्यक्तिगत नावे प्राप्त होत असतात. फुलेवाद, आंबेडकरवाद, मार्क्सवाद, गांधीवाद आदी नावावरून चळवळी व विचारसरण्या ओळखल्या जातात. त्यानंतर त्या चळवळीच्या माध्यमातून त्या व्यक्तीने केलेले संघटन, कार्य, चळवळीचा झालेला परिणाम किती व कसा, लाभार्थी कोण व नुकसानभोगी कोण व सर्वात महत्वाचे म्हणजे आजच्या संदर्भात या चळवळीची प्रस्तुतता काय, इत्यादी बाबी येतात.

कोणत्याही विचारसरणीला तत्त्वज्ञानाचा दर्जा प्राप्त होण्यासाठी ज्या अनेक कसोट्यातून पार पडावे लागते, त्यापैकी एक आहे, तिचे सार्वत्रिकीकरण! मानवी समाजव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून मानवाला पुढच्या प्रागतिक टप्प्यावर नेण्यास सहाय्यभूत ठरणारी विचारधारा तत्वज्ञान म्हणून समजली गेली पाहिजे. या अनुषंगाने विचार केला तर भांडवली लोकशाहीचे तत्वज्ञान भारतीय समाजाला यशस्वीपणे लागू करणाऱ्या गांधीजींचा विचार हा गांधीवाद म्हणून ओळखला जातो. वर्ण-जातिव्यवस्थेच्या अंताची शास्त्रशूद्ध मांडणी करून त्याची काही प्रमाणात यशस्वीता सिद्ध करणारा फुलेविचार फुलेवाद व आंबेडकरविचार हा आंबेडकरवाद म्हणून ओळखला जातो.

या लेखात आपण फुलेवादाची मूलतत्वे कोणती व आजच्या संदर्भात त्यांची प्रस्तुतता काय याचा विचार करणार आहोत! फुलेवादाचा मुख्य उद्देश आहे- वर्णजातीव्यवस्था नष्ट करणे व त्या जागी तुलनेने समतावादी असलेली भांडवली लोकशाही क्रांती करणे. त्यासाठी त्यांनी काही मूलभूत सिद्धांत मांडलेत. त्यांचा पहिला मूलभूत सिद्धांत होता-

'बळीराजाच्या पतनानंतरचा भारतीय इतिहास हा ब्राह्मण-अब्राह्मण संघर्षाचा इतिहास आहे.

ज्यावेळेस मार्क्स आपल्या मार्क्सवादी तत्वज्ञानाचा पहिला सिद्धांत मांडत होता, त्याचवेळेस तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुले हे आपल्या फुलेवादाचा पहिला सिद्धांत मांडत होते व त्यावर अंमलही करीत होते. मार्क्सवादाचा पहिला सिद्धांत हा आहे-

''प्राथमिक साम्यवादी समाजाच्या पतनानंतरचा जगाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे.''

या दोन्ही सिद्धांतांमधील बरेचसे साम्य पाहता हे दोन्ही महापुरुष एकमेकांना भेटले असतील व त्यांनी एकमेकांशी चर्चा करून हा सिद्धांत तयार केला असेल, असे प्रथमदर्शनी वाटते. मात्र हे खरे नाही. कारण मार्क्स व फुले हे कधीच एकमेकांना भेटले नाहीत. तसेच त्यांनी एकमेकांचे भाषण ऐकलेले नाही, एकमेकांची पुस्तके व लेखही वाचले नाहीत. आणि तरीही या दोन्ही महापुरुषांमधील विचारप्रक्रिया तंतोतंत जुळते, हा एक चमत्कारच म्हटला पाहिजे. अर्थात मानवसमाजाचा विकास अनेक पदरी व अनेकविध छटायुक्त असला तरी त्याची दिशा ही सतत पुढे नेणारी (स्प्रिंगसारखी उर्ध्वगामी) असल्याने समकालीन विचारसरण्या व तत्वज्ञानांमध्ये साम्य असणे स्वाभाविक आहे. मार्क्सच्या समोर वर्गसमाज होता म्हणून तो आपल्या सिद्धांतात वर्गीय संकल्पना मांडतो, तर तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुलेंच्या समोर जातीसमाज होता म्हणून तात्यासाहेब वर्णजातीय संकल्पना मांडतात.

मार्क्स व फुले यांच्यात जे अनेक साम्य दिसते, त्यात त्यांनी मांडलेला ऐतिहासिक भौतिकवाद हा एक महत्त्वाच्या तत्वज्ञानाचा भाग आहे. मार्क्सने त्याच्या तात्त्विक मांडणीत प्राथमिक साम्यवादी समाज सांगितलेला आहे. हा समाज पूर्णपणे वर्गविहीन समतावादी होता, असे तो सांगतो. त्याचप्रमाणे तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुले बळीचे राज्य सांगतात. हे बळीचे राज्य जातीविहीन व स्त्री-पुरुष समतावादी होते, असे आपल्याला तात्यासाहेब सांगतात. मार्क्सला आपले आदर्श मॉडेल प्राथमिक साम्यवादी समाज वाटत होते, तर तात्यासाहेब महात्मा फुलेंना बळीचे राज्य आदर्श मॉडेल वाटत होते.

मार्क्स आपला सिद्धांत सिद्ध करण्यासाठी स्वामी विरुद्ध दास, जमीनदार विरुध्द कूळ व भांडवलदार विरुद्ध कामगार अशा वर्गीय संघर्षांची उदाहरणे देतात. तात्यासाहेबांच्या समोर वर्णजातीय समाज असल्याने त्यांनी बळीराजा विरुध्द वामन, एकलव्य विरुद्ध द्रोणाचार्य, शंबूक विरुद्ध राम, कर्ण विरुद्ध परशुराम-अर्जून अशी अनेक वर्णजातीय संघर्षाची उदाहरणे दिलीत. तात्यासाहेब फुलेंनी 'गुलामगिरी ग्रंथातील दशावतारांची केलेली वैज्ञानिक चिकित्सा हा वर्ण-जातीय ऐतिहासिक भौतिकवादाचा भाग आहे. मार्क्सने ज्याप्रमाणे मूलभूत शोषण-शासनाची व्यवस्था म्हणून वर्गव्यवस्था सांगितली. त्याचप्रमाणे तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुले यांनी मूलभूत शोषण- शासनाची व्यवस्था म्हणून वर्ण-जातिव्यवस्था सांगितली. मार्क्सने मांडलेला ऐतिहासिक भौतिकवाद हा वर्गीय होता तर तात्यासाहेब महात्मा फुलेंनी मांडलेला ऐतिहासिक भौतिकवाद हा वर्णीय-जातीय होता.

या दोन्ही समाजव्यवस्थेच्या विरोधात लढणार कोण? याबाबतही तात्यासाहेब व मार्क्स यांच्यात कमालीची एकवाक्यता आहे. शोषणकारी वर्गव्यवस्था मूळातून उखडून टाकण्यासाठी वर्गव्यवस्थेचा सर्वात जास्त बळी ठरलेला कामगार लढेल, असे मार्क्स म्हणतो. तर वर्णजातिव्यवस्था मूळातून उखडून टाकण्यासाठी वर्णजातीने सर्वात जास्त पीडित असलेला स्त्री-अतिशूद्रांचा समाजघटक लढेल, हे तात्यासाहेबांनी कृतीतून सिद्ध केले. तात्यासाहेबांच्या क्रांतीकार्याची सुरूवात मुलींच्या व अस्पृश्यांसाठीच्या शाळा काढण्यापासून झाली. गुरूच्या या वर्ण-जातीसंघर्षाच्या सिद्धांताचा विकास पुढे शिष्य बाबासाहेब आंबेडकर करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राईटिंग्ज एण्ड स्पीचेसच्या ५ व्या खंडात पान नंबर ११२ वर एका चार्टच्या माध्यमातून बाबासाहेब आपल्याला वर्ण-जाती युद्धाचा सिद्धांत समजावून सांगतात. या विकसित सिद्धांतानुसार बाबासाहेबांच्या मते वर्ण-जाती युद्धातील एक शत्रूपक्ष हा ब्राह्मण+क्षत्रिय+वैश्य या तीन वर्णातून निघालेल्या जातींनी बनलेला आहे. या जाती युद्धात

दुसऱ्या पक्षाचे नेतृत्व अस्पृश्य करतात व ओबीसी हा त्यांचा स्वाभाविक दोस्त आहे, असेही ते स्पष्ट करतात.

तात्यासाहेब महात्मा फुले व मार्क्स यांच्यात धर्मचिकित्सा हा सुद्धा एक समान धागा आहे. मार्क्स ज्याप्रमाणे धर्माला अफूची गोळी म्हणून थांबत नाही, तर धर्मानेसुद्धा मानवाच्या विकासाच्या विशिष्ट टप्प्यावर पुरोगामी भूमिका घेतलेली आहे. त्याचप्रमाणे तात्यासाहेब महात्मा फुलेंनी धर्माची चिकित्सा करतांना वर्णजातीव्यवस्थेसाठी ब्राह्मणी वैदिक धर्माला दोषी धरलेले आहे. मात्र बौध्द, जैन वगैरे धर्माना पुरोगामी मानलेले आहे.

वर्गव्यवस्था नष्ट करण्यासाठी शोषित वर्गामध्ये वर्ग-जाणिवा निर्माण होणे गरजेचे असते. ही वर्ग-जाणीव इतकी तीव्र झाली पाहिजे की, ती शोषित वर्गसंघर्षाला प्रवृत्त झाली पाहिजे. त्यासाठी वर्गीय संघटना उभाराव्या लागतात. रशियात कामगार संघटनांनी क्रांती केली, तर चीनमध्ये शेतकरी संघटनेने क्रांती केली. फुलेवाद व मार्क्सवाद येथे एकमेकांशी फारकत घेऊन पुन्हा एकत्र येतांना दिसतात. जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी शोषित जातींमध्ये जात जाणिवा निर्माण झाल्या पाहिजेत, परंतु त्यासाठी जातीय संघटना उभारण्याची गरज नाही. सत्यशोधक समाजासारखे सर्वजातीय संघटन निर्माण करून प्रबोधनाच्या पातळीवर जात-जाणिवा निर्माण करणे व त्या माध्यमातून जातीव्यवस्थेविरुध्द संघर्ष करण्याची प्रेरणा मिळविणे, हेच सूत्र फुलेवादाचे आहे. मग रस्त्यावरच्या संघर्षाचं काय? तर त्याबाबत फुलेवाद व मार्क्सवाद यांच्यात पुन्हा साम्य दिसून येते. रस्त्यावरच्या संघर्षासाठी फुलेवाद वर्गीय संघटनेचा मार्ग स्वीकारतो. फुलेशिष्य भालेराव हे शेतकरी संघटना उभारतात व दुसरे फुलेशिष्य लोखंडे हे कामगार संघटना निर्माण करतात. जातीय प्रबोधन व वर्गीय संघटन या दोन वेगवेगळ्या माध्यमातूनच हे जातीअंताचे युद्ध केले जाऊ शकते, इतके स्पष्टपणे तात्यासाहेब महात्मा फुले आपल्याला प्रत्यक्ष कृतीतून सांगतात.

तात्यासाहेब फुलेंच्या काळात जातीच्या पोटात वर्गाची गर्भधारणा होत होती. तरीही उगवत्या वर्गव्यवस्थेचा दूरदृष्टीने वेध घेऊन वर्गीय संघटना निर्माण करणे व त्या माध्यमातून जातीअंताचा लढा उभारणे याला 'महान द्रष्टेपणा' शिवाय दुसरी कोणतीही उपमा नाही. गुरुच्या याच जात्यंतक वर्गीय सिद्धांताचा विकास १९३६ साली शिष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन करून केला. परंतु १९४४ साली या जात्यंतक वर्गीय सिद्धांतापासून बाबासाहेबांना फारकत घ्यावी लागली. वर्गीय 'स्वतंत्र मजूर पक्ष' बरखास्त करून जातीय पायावरचा 'शेड्युल कास्ट फेडरेशन' स्थापण्यातून जात-संघटनेचा मार्ग पत्करावा लागला. येथून आंबेडकरवादाची फसगत सुरू होते, ती आजतागायत सुरूच आहे.

फुलेवादाचा शैक्षणिक सिद्धांतही क्रांतीकारक आहे. तात्यासाहेब महात्मा फुलेंच्या शिक्षण कार्यात त्यांचे ब्राह्मण मित्र त्यांना मदत करीत होते. शूद्रातिशूद्रांच्या मुलांना जात्यंतक शिक्षण दिले पाहिजे, असे तात्यासाहेब फुले म्हणत असतांना त्यांचे ब्राह्मण मित्र त्यास विरोध करीत होते. ब्राह्मण सहकारी मित्रांना खडसावतांना 'शिक्षण कशासाठी' असा प्रश्न तात्यासाहेब स्वतःच उपस्थित करतात व स्वतःच त्याचे उत्तर देतांना म्हणतात-

''माझे म्हणणे असे होते की, त्यांना (शूद्रातिशूद्रांना) चांगले प्रतीची विद्या देऊन तिजपासून त्यांस आपले बरे वाईट समजण्याची शक्ती यावी.....'' (महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई प्रकाशन, सुधारित सहावी आवृत्ती, पान- १९३)

पुढे तात्यासाहेब स्पष्ट करतात की, 'चांगल्या प्रतीची विद्या घेऊन शूद्रातिशूद्रांना ब्राह्मणांच्या पूर्वजांनी केलेल्या आपल्यावरील अन्यायाची जाणीव होईल व त्याविरोधात संघर्ष करण्याची प्रेरणाही मिळेल. सर्व सरकारी शाळांमध्ये शिकविण्यासाठी तात्यासाहेब महात्मा फुलेंनी 'ब्राह्मणाचे कसब' नावाची एक व बळीराज्यावरील दुसरी अशा दोन अभ्यासक्रम पुस्तिकाही तयार केल्या होत्या. परंतु, भटांच्या भयास्तव इंग्रजांनी या दोन्ही पाठ्यपुस्तिका स्वीकारल्या नाहीत, असे तात्यासाहेब पुढे स्पष्ट करतात. (उपरोक्त, पान- १९२)

फुले-आंबेडकरांनी प्रत्यक्ष मैदानी संघर्ष जितका केला त्यापेक्षा कितीतरी जास्त पटीने त्यांनी लिहिण्याचे काम केले. सांस्कृतिक संघर्ष हा इतिहासाच्या पानांवर अधिक केला जातो. कारण वर्ण-जातीअंताच्या संघर्षाचे दुसरे नाव आहे- 'सांस्कृतिक युद्ध'. या युद्धासाठी नव्या पिढीला तयार करायचे असेल तर त्यासाठी शाळा-महाविद्यालयातून तसे संस्कार करणारे शिक्षणही दिले पाहिजे. त्यासाठी फुले-आंबेडकरांनी लिहिलेले ग्रंथ शाळा-महाविद्यालयात अभ्यासक्रम म्हणून शिकविले गेले पाहिजेत. हे काम इंग्रजांच्या काळात भटांच्या भयास्तव होऊ शकले नाही. आणि स्वातंत्र्य मिळाल्यावर भटांचेच राज्य आल्यामुळे ते होऊच शकत नाही. अशा परिस्थितीत आम्ही १९९३-९४ साली 'फुले-आंबेडकर तत्वज्ञान विद्यापीठ' स्थापन करून हे कार्य सुरू केले. आजतागायत २९ वर्षात या विद्यापीठामार्फत झालेल्या परीक्षांना अभ्याक्रम म्हणून फुले-आंबेडकरांचे सर्व ग्रंथ लावले गेले आहेत. काही ग्रंथांवर अनेक वेळा परीक्षा घेतल्या गेल्या आहेत. परंतु, या विद्यापीठाला पुरोगामी चळवळीचे पाठबळ अद्याप लाभलेले नाही, यावरून आजचे फुले-आंबेडकरी विचारवंत व फुले-आंबेडकरी चळवळी फुले-आंबेडकरवादापासून कोसो दूर आहेत, हे स्पष्ट होते.

सांस्कृतिक युद्धाचा सिद्धांत हा फुलेवादाचा गाभा आहे. 'गुलामगिरी' ग्रंथ लिहून तात्यासाहेबांनी सांस्कृतिक युद्धांचे रणशिंग फुंकले. बळीराजा उत्सव, नवरात्रउत्सव व शिवजयंतीउत्सव अशा प्रकारचे कृती कार्यक्रम देऊन ब्राह्मणी सांस्कृतिक प्रतिक्रांतीला आव्हान दिले. तात्यासाहेब महात्मा फुलेंनी पुकारलेल्या या सांस्कृतिक युद्धाला ब्राह्मणी छावणीने प्रत्युत्तर देऊन यशस्वीपणे शह दिला. बळीराज्याविरोधात गणपती उभा केला व कुळवाडी कुळभूषण शिवाजीच्या विरोधात गो-ब्राह्मण प्रतिपालक शिवाजी उभा करण्यात आला. या सांस्कृतिक युद्धाच्या पुढच्या टप्प्यावर बाबासाहेब आंबेडकरांनी 'रिडल्स इन हिंदूझम' लिहुन भडाग्नी दिला.

वैचारिक पातळीवर एखादे तत्वज्ञान खूप क्रांतीकारक असू शकते, परंतु समाजव्यवस्थेच्या पातळीवर आमुलाग्र बदल त्यातून होणार नसेल तर ते तत्वज्ञान काही काळानंतर वांझोटे सिद्ध होते. जुनी समाजव्यवस्था तिच्या आंतरिक मर्यादांमुळे ताणतणावग्रस्त होत असते. जुनी उत्पादनव्यवस्था कुंठीत होते. त्यातून समाजव्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ असलेली अर्थव्यवस्था खिळखिळी होते. जुनी समाजव्यवस्था नियंत्रित करणाऱ्या शोषक-शासकांच्या विरोधात शोषित-शाषितांचा संघर्ष टोकाला पोहोचतो. या संघर्षाचे फलित म्हणून उत्पादन साधनांचा विकास होऊन उत्पादन वाढते व येऊ घातलेल्या नव्या समाजव्यवस्थेत आधीचे शोषित-शाषित हे पुरोगामी ठरतात व सत्ताधारी युरोपमध्ये सामंतशाहीतील कूळ व कारागिर हे शाषित व शोषित होते, ते नव्या भांडवली लोकशाही क्रांतीमुळे उद्योजक-भांडवलदार बनलेत व उदारमतवादी लोकशाहीवादी (पुरोगामी) म्हणून सत्ताधारी बनलेत.

भारतीय जातीव्यवस्थेमध्ये आमूलाग्र परिवर्तन क्रांतीकारक पद्धतीने घडवून आणण्यात फुलेवाद कुठेही कमी पडत नाही. समाजाचे ब्राह्मणी-अब्राह्मणी असे ध्रुवीकरण घडवून जुन्या व्यवस्थेतील ताणतणाव तीव्र करणे हे फुलेवादाच्या अनेक कृतीकार्यक्रमांपैकी एक महत्त्वाचा कार्यक्रम होता. संघर्ष केल्याशिवाय ब्राह्मण आपले स्वयंघोषित उच्चपद सोडून शूद्रातिशूद्रांसोबत समानतेचे व्यवहार करणार नाहीत, असे स्पष्टपणे तात्यासाहेब महात्मा फुले सांगतात.

We know perfectly well that Brahmin will not descent from his self-raised high pedestal and meet his Kunbee and low castes brethren on an equal footing without a struggle.....

(समग्र वाङ्मय, उपरोक्त, जाड ठसा माझा, पान १३४)

जातीव्यवस्थेत शाषित व शोषित असलेल्या शूद्रातिशूद्रांमधील कष्टकरी व्यावसायिकांना आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण देऊन त्यांच्यातून उद्योजक निर्माण केले पाहिजेत, असे तात्यासाहेब महात्मा फुले सांगतात.

या बळीस्थानातील शेतकऱ्यांच्या शाळांशिवाय घिसाडी, लोहार, बटई-सुतार कढई-चांभार-सोनार-

तांबट-साळी-शिंपी वगैरे कारागिरांच्या मुलांकरिता निरनिराळ्या शाळा घालून त्यामध्ये त्या सर्वांच्या कसबांसबंधी सर्व प्रकारच्या विद्या शिकविण्याच्या कामी थोडा थोडा खर्च केल्याबरोबर....

कारागिर लोकांच्या मुलांकरिता शाळा घातल्याबरोबर ते युरोप व अमेरिका खंडातील कारागिरांसारखे थोड्या किंमतीत नांगर, कुळव, पांभरी, कोळपी, काढणी, मळणी वगेरे नानाप्रकारची यांत्रिक आऊते लागोपाठ सहज शेतकऱ्यांसाठी जेव्हा करतील तेव्हा शेतकरी लोक (जास्त उत्पादन झाल्यामुळे आपल्या सरकारास जास्त कर देण्यासाठी समर्थ होतील.....

(समग्र वाङ्मय, उपरोक्त, कंसातील शब्द माझे, पान- ५४३ व ५४४)

इंग्रजांच्या काळात ब्राह्मणी व्यवस्था कायम असल्याने नव्या तंत्रज्ञानाच्या आधारे शेतीची विकसित उत्पादनसाधने (शेतीची आऊते वगैरे) निर्माण करण्याचे काम ब्राह्मणांच्या किर्लोस्कर कम्पनीने व पारशांच्या कूपर कारखान्याने केले. हेच तंत्रज्ञान जर सुतार, लोहारसारख्या शूद्र कारागिरांच्या मुलांना वेगळ्या तंत्रशाळा काढून दिले असते तर शासित शोषित शूद्रातिशूद्र कारागिरांमधून किर्लोस्करांसारखा व धनजी, शॉ, कूपरसारखा भांडवलदारवर्ग निश्चितच निर्माण झाला असता. भारतात फुलेवादाच्या या मार्गाने भांडवलशाहीचा विकास झाला असता तर शूद्रातिशूद्र जाती-जमातीतून निर्माण झालेल्या वर्गाच्या नेतृत्वाखाली जात्यंतक लोकशाही क्रांती झाली असती व वर्गव्यवस्था जातीव्यवस्थेचे पोट फाडून बाहेर आली असती. जातीव्यवस्थेच्या प्रेतावर थयथय नाचत जात्यंतक भांडवली लोकशाही क्रांती देशात संपन्न झाली असती.

भारतात आज असलेली भांडवली लोकशाही ही ब्राह्मणी भांडवलदारांच्या नेतृत्वाखाली आल्याने ती जातीव्यवस्थासमर्थक आहे. त्यामुळे भारतात भांडवलदारवर्ग, कामगारवर्ग व मध्यमवर्ग प्रत्येक जातीत निर्माण झालाच नाही. जो काही थोडाफार निर्माण झाला आहे तो जातींच्या पोटातच आहे व तो आपली जात सोडायला तयार नाही. त्यामुळे हे वर्ग विकसित होत नाहीत व जातीचे पोट फाडून बाहेरही येत नाहीत. परिणामी आजही फुलेवादी जात्यंतक भांडवली लोकशाही क्रांतीपासून आपण कोसो दूर आहोत.

नवपेशवाईच्या प्रतिक्रांतीचा वाढता आक्रमक आवाका पाहता व डाव्या, अब्राह्मणी छावणीतील बुद्धिजीवी वर्गाचा कुंठीत बौद्धिक आवाका पाहता अशाप्रकारच्या फुलेवादी जात्यंतक लोकशाही क्रांतीची अपेक्षा करणे अशक्यप्राय आहे.

तात्यासाहेब महात्मा फुलेंचा स्त्रीविषयक सिद्धांतही असाच क्रांतीकारक आहे. स्त्री- पुरुष विषयाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून वैज्ञानिक विश्लेषण त्यांनी केले आहे. परंतु अलीकडे फुलेवादाचा सखोल अभ्यास करणाऱ्या विद्वानांनाही तो सिद्धांत आकळला नाही, यावरून तात्यासाहेब काळाच्याही किती पलीकडचे पाहात होते, हे सिद्ध होते. बहुतेक सर्वच पुरोगामी तत्वज्ञानी, विचारक व अभ्यासक स्त्री-पुरुष समानतेची मांडणी करतात. परंतु एकमेव तात्यासाहेब महात्मा फुले हा लैंगिक समानतेचा मुद्दा नाकारतात व नवी मांडणी करतात-

जोतीराव गोविंदराव फुले. उ. - त्यापैकी सर्व प्राणिमात्रांत मानव प्राणी श्रेष्ठ केले आहेत व त्यामध्ये स्त्री आणि पुरुष असे दोन भेद आहेत...

जोतीराव उ. या उभयतांमध्ये ज्यास्ती श्रेष्ठ स्त्री आहे.

(समग्र वाङ्मय, उपरोक्त, पान- ४६५ व ४६६, जाड ठसा मुळचा)

विज्ञानही याच क्रांतीकारक सिद्धांताची पुष्टी करते. स्त्री व पुरुष सर्व प्रकारची कामे आपसात वाटून घेऊ शकतात व आपसात कामांची अदलाबदलही करू शकतात. मात्र एकमेव प्रसूती वेदना अशा आहेत की, पुरुषाने कितीही प्रामाणिक प्रयत्न केला तरी तो प्रसूती वेदनांमध्ये वाटेकरी होऊ शकत नाही. त्या मरणांती वेदना एकट्या स्त्रीलाच सहन कराव्या लागतात, म्हणून स्त्रीच श्रेष्ठ! पुढच्या प्रश्नाचे उत्तर देतांना तात्यासाहेब अनेक पुरावे देऊन सिद्ध करतात की, 'स्त्री व पुरुष उभयतांमध्ये स्त्रीच श्रेष्ठ! गुरुच्या याच क्रांतीकारक सिद्धांताचा विकास करीत शिष्य बाबासाहेब आंबेडकरांनी

'हिंदू कोड बील' तयार केले.

अंतानिओ ग्राम्सी नावाचा तत्वज्ञानी बुद्धिजीवी वर्गाबद्दल बरेच काही सांगतो. भांडवलदार वर्ग पगारी बुद्धिजीवी वर्ग बाळगतो म्हणून त्यांचा विकास होतो, असे ग्राम्सी म्हणतो. श्रमिक वर्गालाही क्रांती करण्यासाठी बुद्धिजीवी वर्गाची आवश्यकता असते, असेही तो म्हणतो. शूद्रातिशूद्रातून विद्वान बुद्धिजीवी वर्ग तयार होण्याची आवश्यकता तात्यासाहेब महात्मा फुले प्रतिपादतात. ते स्पष्टपणे सांगतात-

''बळीस्थानातील एकंदर शूद्रातिशूद्रांसह भिल्ल, कोळी वगैरे सर्व लोक विद्वान होऊन विचार करण्यालायक होईतोपावेतो ते सर्व सारखे एकमय लोक झाल्याशिवाय (Nation) होऊ शकत नाही.....''

(समग्र वाङ्मय, उपरोक्त, पान- ५२३)

स्त्रिया व शूद्रातिशूद्रांना शिक्षणासाठी शाळा, या शाळांमधून जातीअंताचे शिक्षण, शूद्र जातीचे पंतोजी, सरकारी खात्यात शूद्रांसाठी आरक्षण, स्त्री-प्राधान्य आदिंसाठी ते खूप आग्रही होते. संपूर्ण आयुष्यच त्यांनी झिजविले. त्यामागे त्यांचा उद्देशच हा होता की, शूद्रातिशूद्रांतील प्रत्येक जातीतून बुद्धिजीवी वर्ग निर्माण झाला पाहिजे. जात्यंतक शिक्षण घेऊन तयार झालेला हाच बुद्धिजीवी वर्ग जात्यंतक क्रांतीचे नेतृत्व करेल व जातीविहीन समतावादी एकमय देश (Nation) निर्माण करेल, याची त्यांना खात्री होती.

तात्यासाहेब महात्मा फुले यांनी मांडलेला आरक्षणाचा सिद्धांत क्रांतीकारक आहे, कारण तो आक्रमक होता. आता आरक्षणाचा जो सिद्धांत संविधानामार्फत अमलात आणला जात आहे, तो बचावात्मक आहे. तात्यासाहेबांचा आरक्षण सिद्धांत बचावात्मक नसून आक्रमक कसा आहे, ते पुढीलप्रमाणे पाहू या-

''.... भटब्राह्मणांच्या संख्याप्रमाणापेक्षा कामगारांच्या जास्ती नेमणुका होऊ लागल्यामुळे.... भटब्राह्मणास जातीभेदापासून अनंत फायदे होतात.... यास्तव शूद्र शेतकऱ्यांची मुले सरकारी हुद्दे चालविण्यालायक होईतोपावेतो ब्राह्मणास त्यांच्या जातीच्या संख्येच्या मानापेक्षा सरकारी हुद्याच्या जागा जास्ती देऊ नयेत व बाकी उरलेल्या सरकारी हुद्यांच्या जागा मुसलमान अथवा हिंदू ब्रिटन लोकास देऊ लागल्याशिवाय ते (ब्राह्मण) शूद्र शेतकऱ्यांचे विद्येचे आड येण्याचे सोडणार नाहीत.....

(समग्र वाङ्मय, उपरोक्त, पान- ३३१)

भटांच्या दास्यत्वापासून मुक्त होण्यासाठी उपाय काय, असा प्रश्न धोंडींबा यांनी विचारल्यावर उपाय सांगतांना तात्यासाहेब उत्तर देतात-

जो. - याला उपाय, आपल्या दयाळू सरकारने प्रथम भट समाजाच्या संख्येप्रमाणे एकंदर सर्व खात्यात भट कामगार नेमू नयेत, असे माझे मत नाही. परंतु त्याचप्रमाणाने बाकी सर्व जातीचे कामगार मिळाल्यास सरकारने त्याऐवजी फक्त युरोपियन कामगार नेमावेत.....

(समग्र वाङ्मय, उपरोक्त, पान- १८६)

तात्यासाहेब महात्मा फुलेंच्या उपरोक्त दोन वेगवेगळ्या वेळी केलेल्या प्रतिपादनातून अनेक क्रांतीकारक मुद्दे पुढे येतात, जे आजही अमलात आणलेत तर परिवर्तनाच्या चळवळीला खऱ्या अर्थाने क्रांतिकारी वळण लाभू शकते. यात सर्वात महत्त्वाचा पहिला मुद्दा येतो, तो जातनिहाय जनगणनेचा! जातनिहाय जनगणनेचा विषय गेल्या ४० वर्षापासून इतका तीव्र झाला आहे की, ज्यामुळे एकदा केंद्र सरकार पाडले गेले व काही राज्य सरकारेही पाडण्यात आलीत. बिहारचे उदाहरण अगदी ताजे आहे.

उपरोक्तपैकी दुसरे उद्धरण हे 'गुलामगिरी' ग्रंथातील आहे. तात्यासाहेबांनी हा ग्रंथ १८७३ साली लिहिला आणि ब्रिटिशांनी भारताची व्यापक जातनिहाय जनगणना १८८१ सालापासून सुरू केली. याचा अर्थ स्पष्ट होतो की, तात्यासाहेबांच्या सुतोवाचानंतरच ब्रिटिशांनी जातनिहाय जनगणना सुरू केली, हे स्पष्ट होते. ब्रिटिश राज्यकर्ते युरोपियन महाप्रबोधन चळवळीचे अपत्य होते व ते भांडवली लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे समाजसुधारणा, समाजसुधारक व समाजक्रांतीकारक यांच्याकडे पाहतांना त्यांचा दृष्टिकोन उदारमतवादी व लोकशाहीवादी होता. राजाराम

मोहन रॉय यांच्यासारखे समाजसुधारक व तात्यासाहेब महात्मा फुलेंसारखे समाजक्रांतीकारक काय लिहितात, काय बोलतात याकडे इंग्रज गांभिर्याने पाहात होते व त्याप्रमाणे अंमलबजावणीही करीत होते. राजाराम मोहन रॉय यांनी सतीप्रथा बंद करण्याची सूचना केली आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांनी लगेच सतीप्रथा बंदीचा कायदाच केला. तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुले यांनी जातनिहाय जनगणनेचे सूतोवाच केले आणि ब्रिटीश राज्यकर्त्यांनी त्याची अंमलबजावणी सुरू केली. जातीविरोधी भांडवली उदारमतवादी ब्रिटिशांनी जातनिहाय जनगणना सुरू केली आणि स्वातंत्र्यानंतर सत्तेत आलेल्या जातीव्यवस्था समर्थक सरंजामशाहीवादी ब्राह्मणांनी जातनिहाय जनगणना बंद पाडली, यावरून जात्यंतासंदर्भात जातनिहाय जनगणनेचे क्रांतीकारकत्व लक्षात यायला हवे.

जातीअंताच्या दृष्टीने आजही क्रांतीकारक असलेला जातनिहाय जनगणनेचा मुद्दा सर्वप्रथम तात्यासाहेबांनी मांडला, यावरून त्यांचे तत्वज्ञानी म्हणून असलेले द्रष्टेपण समजून घ्यायला हवे. जातनिहाय जनगणना घेतल्यानंतर त्यातून ब्राह्मण जातीची लोकसंख्या काढावी व त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ब्राह्मणांना सरकारी नोकऱ्यात आरक्षण द्यावे, असे स्पष्टपणे तात्यासाहेब सांगतात. ब्राह्मणांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्याचा हा सिद्धांत खरोखरच क्रांतीकारक आहे. जर सर्वप्रथम ब्राह्मणांना आरक्षण दिले गेले असते तर आरक्षणावरून दलित विरुद्ध सवर्ण असे ध्रुवीकरण ब्राह्मणांना करताच आले नसते व देशात ज्या असंख्य जातीय दंगली झाल्यात, त्या झाल्याच नसत्या. ब्राह्मणांना सर्वप्रथम आरक्षण दिल्यामुळे भारतीय समाजाचे ध्रुवीकरण ब्राह्मण विरुध्द ब्राह्मणेतर असे झाले असते व जातीअंतासाठी हे धृवीकरण क्रांतीकारक ठरणारे होते. ब्राह्मण-ब्राह्मणेतर धृवीकरणामुळे ब्राह्मणांचा ब्राह्मणेतरांवरील सांस्कृतिक व धार्मिक प्रभाव कमी झाला असता व ब्राह्मणेतरांचे अब्राह्मणीकरण करणे सोपे झाले असते. त्यामुळे जात्यंताच्या दृष्टिने 'ब्राह्मणांना सर्वप्रथम आरक्षण' हा तात्यासाहेबांचा सिद्धांत क्रांतीकारक ठरतो. एक क्रांतीकारक तत्वज्ञानी म्हणून तात्यासाहेब महात्मा फुलेंचे द्रष्टेपण यावरून लक्षात येते.

तात्यासाहेब महात्मा फुलेंच्या उपरोक्त उदाहरणातून आणखी एक महत्वाचा मुद्दा पुढे येतो. शूद्रातिशूद्र जातींनाही त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण दिले पाहिजे, असा तात्यासाहेबांचा आग्रह आहे. परंतु त्याकाळात शूद्रातिशूद्र जातींमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लायक उमेदवार शूद्रातिशूद्र जातीतून मिळणार नाहीत, याची पुरेपूर जाणीव तात्यासाहेब महात्मा फुलेंना होती. म्हणून ते अत्यंत निक्षून सांगतात की, 'शूद्रातिशूद्र जातीचे लोक लायक होईतोपावेतो त्यांच्या हिस्स्याच्या सरकारी हुद्यांच्या जागा मुसलमान अथवा इंग्रजास द्याव्यात, परंतु त्या जागा ब्राह्मणास देऊ नयेत. ब्राह्मणांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा एकही जास्तीची सरकारी नोकरी देऊ नये, असे सांगण्यामागे तात्यासाहेबांचा काय उद्देश होता? अर्थातच नोकरशाहीचे पूर्णपणे अब्राह्मणीकरण करणे, हाच मुख्य उद्देश होता.

ब्रिटिश भारतात व स्वतंत्र भारतात नोकरशाहीतील ब्राह्मणांचे प्रमाण हे ९० टक्क्यांपेक्षा जास्त राहिलेले आहे, असे आपल्याला मंडल आयोगाचा अहवाल सांगतो. ब्राह्मणीकरणाने ओतप्रोत भरलेल्या नोकरशाहीने पुरोगामी व जात्यंतक कायद्यांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे कधीच होऊ दिली नाही. गुरु असलेल्या तात्यासाहेब महात्मा फुलेंचा हाच सिद्धांत शिष्य असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्याला अधिक स्पष्ट करून सांगतात-

Whether the principle of equal justice is effective or not must necessarily depend upon the nature and character of the civil services who must be left to administer the principle. If the civil service is by reason of its class bias the friend of the Established Order and the enemy of the new order, the new order can never come into being. That a civil service in tune with new order was essential for the success of the new order was recognized

by Karl Marx in 1871 in the formation of the Paris Commune and adopted by Lenin in the constitution of Soviet Communism....

(Dr. Babasaheb Ambedkar: Writing and Speeches, Vol.-5, page- 104)

बाबासाहेब आंबेडकर पुढे अनेक उदाहरणे देऊन सिद्ध करतात की, भारताची नोकरशाही ही दिल्लीपासून गल्लीपर्यंत पूर्णपणे उच्चजातीय म्हणजे ब्राह्मणी आहे. ''ब्राह्मणांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रथम आरक्षण'' हा तात्यासाहेब महात्मा फुलेंचा क्रांतीकारक सिद्धांत बाबासाहेबांनी कॉम्रेड लेनीनप्रमाणे राज्यघटनेत स्वीकारला असता तर, कदाचित नोकरशाहीचे पूर्ण अब्राह्मणीकरण झाले असते व आज भारतात पेशवाईचे झालेले पुनरागमन दिसले नसते.

ब्राह्मणांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रथम आरक्षण या सिद्धांताची चर्चा एका प्रसंगावरून घडते, तो प्रसंगही एका वेगळ्या सिद्धांताला जन्म देऊन जातो. ब्राह्मणांच्या 'सार्वजनिक सभे'तर्फे ब्रिटिश राज्यकर्त्यांकडे एक अर्ज करण्यात येतो, तेव्हा या घटनेवर चर्चा करतांना तात्यासाहेब महात्मा फुले आपल्या कार्यकर्त्यांना सांगतात, 'मोघम आम्हा हिंदुस कलेक्टरांच्या जागा, युरोपियन लोकांसारख्या इंग्रज सरकारने द्याव्यात, म्हणून सार्वजनिक सभेच्या रेकॉर्डात अर्ज असतील, परंतु ते अर्ज अविद्वान शूद्रातिशूद्रांच्या काय उपयोगाचे? कारण मोघम नाव हिंदूंचे आणि उपभोग घेणारे एकटे ब्राह्मण वाहवा रे सभा। वाहवा रे दुटप्पी...!'

(समग्र वाङ्मय, उपरोक्त, जाड ठसा माझा, पान ५२१)

'मोघम नाव हिंदूंचे आणि उपभोग घेणारे एकटे ब्राह्मण' या तात्यासाहेब महात्मा फुलेंच्या सिध्दांतावरुन ब्राह्मणी कसब कसे उघडकीस येते, हे लक्षात येते. जातीव्यवस्थेच्या भरभराटीच्या काळात ब्राह्मणांनी धर्माचा कोणताही आडपडदा न घेता उघडपणे ब्राह्मण म्हणून ओळख दाखवून फायदे उपटलेत व जातीवर्चस्व गाजविले. मनुस्मृतीमध्ये उघडपणे ब्राह्मण म्हणून वर्चस्वाचे कायदे केलेले आहेत. जिझिया करातून सुटका मिळवितांना आम्ही ब्राह्मण आहोत, हिंदू नाहीत, असे स्पष्ट करीतच फायदा घेतला. परंतु ब्रिटिशांच्या आगमनानंतर सुरू झालेल्या जात्यंतक प्रबोधनाच्या दबावापोटी ब्राह्मणांना जातीची आयडेंटी अडचणीची वाटू लागली. म्हणून जातीसाठी फायदे उपटतांना ब्राह्मण ऐवजी हिंदू आयडेंटी त्यांना सुरक्षित वाटू लागली. म्हणून सार्वजनिक सभा हिंदूंच्या नावाने अर्ज करून सरकारी नोकरीत आरक्षण मागते आहे. ब्राह्मणांचे हे षड्यंत्र दूरदृष्टीचे तत्वज्ञानी असलेल्या तात्यासाहेब महात्मा फुलेंच्या नजरेतून कसे निसटेल?

मोघम नाव हिंदू घेऊन जर काही फायदा होणार असेल तर तो ब्राह्मणांनाच होईल, मात्र हिंदू नावाने काही नुकसान होत असेल तर ते शूद्रातिशूद्रांच्या पदरात जाऊन पडले पाहिजे, अशी व्यवस्था ब्राह्मणांनी केलेली आहे. धर्माच्या नावाने दंगली झाल्यात तर त्यात दोन्ही धर्मातील शुद्रातिशूद्रच मारले जातात व गुन्हे दाखल होऊन शूद्रांचे जीवनही बरबाद होते. धर्माच्या नावाने बाबरी मशिद पाडल्यानंतर देशभर धार्मिक दंगली झाल्यात. त्यातून संघ-भाजपाच्या ब्राह्मणांना देशाची सत्ता मिळाली मात्र तेव्हापासून दलित+ओबीसींचे आरक्षण धोक्यात आले आहे. हिंदू नावाने फायदा झाला तरी आणि नुकसान झाले तरी दोन्ही बाजूने शूद्रातिशूद्रच नाडले जातात, हे अनेकदा सिद्ध झालेले आहे.

यास्तव तात्यासाहेब महात्मा फुलेंनी आपल्या विवेचनात हिंदू शब्द फारसा येऊ दिला नाही. ते उघडपणे जातींची नावे घेऊनच विश्लेषण करतात. तात्यासाहेब महात्मा फुलेंना प्रबोधनाच्या पातळीवर या देशाचे जातीय ध्रुवीकरण हवे होते, कारण धार्मिक ध्रुवीकरणातून ब्राह्मणी जातीव्यवस्था भक्कम होते, हे त्यांनी ओळखले होते. त्यातूनच पुढे ब्राह्मणेतर चळवळ फोफावली व राजकीय पक्ष म्हणून ब्राह्मणेतर पक्षही स्थापन झाला. हा ट्रेंड पुढे चालू राहीला असता तर तामिळनाडूच्या आधीच महाराष्ट्रात 'अब्राह्मणी क्रांती' झाली असती. मात्र मराठा नेत्यांच्या सत्तालोलुपतेमुळे हे जातीय ध्रुवीकरण गांधी नावाच्या ब्राह्मणवादात शरणागत झाले व तात्यासाहेब महात्मा फुलेंचे बळीराज्याचे स्वप्न मराठ्यांनी विकून खाल्ले!

मराठा नेत्यांमुळे एकीकडे ब्राह्मण-ब्राह्मणेतर जातीय ध्रुवीकरण लयास जात असतांना दुसरीकडे बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू नावाने धार्मिक ध्रुवीकरण उचलून धरले. अस्पृश्यांचे प्रश्न मांडत असतांना ते सातत्याने शत्रूची ओळख हिंदू म्हणून करून देतात. संशोधन करतांना त्यांच्या लेखनात बऱ्याच ठिकाणी ते ब्राह्मण व ब्राह्मणी संकल्पना मांडतात, परंतु राजकीय लढ्यामध्ये त्यांनी हिंदू संकल्पना वापरून धार्मिक ध्रुवीकरणच उचलून धरले. त्यामुळे दोन दुष्परिणाम झालेत. बाबासाहेबांना स्वतःला दोस्त म्हणून अपेक्षित असलेला ओबीसी पुन्हा हिंदू म्हणून ब्राह्मणांच्या छावणीत ढकलला गेला. दुसरा दुष्परिणाम असा झाला की, त्याच काळात स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हिंदू संघटनेचे काम सोपे झाले. मात्र याच काळात तामिळनाडूमध्ये याच्या अगदी वेगळ्या घटना घडत होत्या. तामिळनाडुतील पेरीयारकृत ब्राह्मणविरोधी चळवळीचे नेतृत्व सुरूवातीपासूनच ओबीसी जातींकडे असल्याने तेथे फुलेवादाला कोणताही दगाफटका होऊ शकला नाही.

तामिळनाडूतील पेरीयार स्कूलमधून जे ओबीसी व बहुजन नेते तयार झालेत, ते सत्तेत आल्यानंतर त्यांनी फुलेवादाची मूलतत्वे मोठ्याप्रमाणात अमलात आणण्याचे काम केले. सत्ता हाती येताच त्यांनी सर्व अ-ब्राह्मणी जाती-जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण दिले, त्यामुळे नोकरशाहीतील अ-ब्राह्मण जातींचे प्रमाण वाढले. त्यांनी ब्राह्मणांना जरी आरक्षण दिले नाही तरी नोकरशाहीतील ब्राह्मणांची टक्केवारी जास्ती होणार नाही, याची काळजी घेतली. नोकरशाहीतील ब्राह्मणांचे प्रमाण तीन टक्क्यांपेक्षा जास्त होऊ नये म्हणून त्यांनी संघ-भाजपाच्या केंद्र सरकारने बनविलेला दहा टक्के आरक्षणाचा कायदा तामिळनाडूत राबविला नाही. कारण दहा टक्के उच्चजातीय आरक्षणाचा फायदा घेऊन तामिळनाडूतील ब्राह्मण नोकरशाहीतील आपली टक्केवारी वाढवू शकतात. याचा फटका तामिळनाडूत ओबीसींच्या नेतृत्वाखाली झालेल्या 'अब्राह्मणी क्रांतीला' बसू शकतो, म्हणूनच तामिळनाडूच्या अब्राह्मणी शासनाने संघ-भाजपाच्या केंद्र सरकारचा दहा टक्के ई.डब्ल्यु.एस. आरक्षणाचा कायदा राबवायला नकार दिला आहे.

तामिळनाडूच्या अब्राह्मणी द्रविड चळवळीने कटाक्षाने धार्मिक ध्रुवीकरण नाकारले. त्यांनी धर्म, धर्मांतर वगैरे मुद्यांवर कधीच भर दिला नाही. तात्यासाहेब महात्मा फुलेंप्रमाणेच पेरियार यांनीही हिंदू धर्मातच समतेची प्रेरणा शोधली व हिंदू धर्मांतर्गतच जातीय ध्रुवीकरण घडवून आणले. त्यामुळेच तेथे अब्राह्मणी क्रांती यशस्वी केली.

तामिळनाडूतील ओबीसींच्या नेतृत्वाखालील द्रवीड चळवळीने फुलेवादाची मूलतत्वे असलेल्या सिद्धांतांना तंतोतंतपणे अमलात आणून अब्राह्मणी क्रांती यशस्वी केली. परंतु ही क्रांती सतत वर्धिष्णु राहावी म्हणून वेळोवेळी कायदे करीत राहणे व त्यांची कडकपणे अमलबजावणी करीत राहणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे या अब्राह्मणी क्रांतीला ब्राह्मणवाद्यांकडून कधीही दगाफटका होऊ शकतो, त्यासाठी डोळ्यात तेल घालून सतत सतर्क राहणेही आवश्यक असते. यात तामिळनाडुचे अब्राह्मणी शासन व प्रशासन कुठेही कमी पडत नाही, हे उपरोक्त विवेचनावरून सिद्ध होते.

मी तामिळनाडूमधील अब्राह्मणी क्रांतीचे जे विश्लेषण केलेले आहे, त्यावरून असा गैरसमज होऊ शकतो की, तामिळनाडूमध्ये जात्यंतक क्रांती पूर्ण झाली असून तेथे जातीव्यवस्था नष्ट झालेली आहे. असा गैरसमज कुणी करून घेऊ नये. तामिळनाडू वगळता इतर राज्यांमध्ये ब्राह्मणी छावणी आज ज्या उन्मादाने सत्तेवर असल्यासारखी मिरवीत आहे, ते पाहता तामिळनाडूमध्ये ब्राह्मणी छावणी पराभुततेचे व अत्यंत मानहानीचे जीवन जगते आहे. आजही तामिळनाडूमधील ओबीसींच्या नेतृत्वाखालील अब्राह्मणी छावणी ताठ मानेने आक्रमक स्वरूपात ब्राह्मणवाद्यांसमोर आव्हान म्हणून उभी आहे. ही बाब निश्चितच क्रांतीकारक आहे. इतर राज्यातील डाव्या, पुरोगामी व फुलेआंबेडकरी चळवळींनी किमान तामिळनाडूइतका तरी क्रांतीचा टप्पा गाठला पाहिजे व त्यासाठी जातीअभिनिवेश बाजूला ठेऊन तामिळनाडूच्या

ओबीसी नेतृत्वाकडून काही शिकले पाहिजे.

भारतात जातीव्यवस्थेविरुध्द लढण्यासाठी अनेक पॅटर्न आलेत आणि गेलेत. कांशिरामजींचा जाती जोडो पॅटर्न, लोहिया+चंदापुरींचा समाजवादी+ओबीसी पॅटर्न हे दोन्ही जात्यंतक पॅटर्न सपशेल फेल होतांना आपण पाहात आहोत. मात्र एकमेव तामिळनाडूतील पेरीयार यांचा फुलेवादी अब्राह्मणी क्रांतीचा पॅटर्न आजही ताठ मानेने लढतांना दिसतो आहे. संपूर्ण देशातील डाव्या पुरोगामी व फुले-आंबेडकरवाद्यांनी तामिळनाडूचा पॅटर्न स्वीकारला तर आज देशावर आलेल्या पेशवाईच्या संकटाचा मुकाबला होऊ शकतो. अन्यथा जातीव्यवस्था शंभरपटीने अधिक जाचक करणारी प्रतिक्रांती देशात अवतरलेली आहेच, ती अधिक मजबूतीने मानगुटीवर बसणारच आहे.

तामिळनाडूतील ही अब्राह्मणी क्रांती नकारात्मक कार्यक्रमावर उभी आहे. केवळ ब्राह्मणविरोध एवढ्या एकाच कार्यक्रमाच्या आधारे जातिव्यवस्था समूळ नष्ट करणारी क्रांती होऊ शकत नाही. प्रबोधनाच्या पातळीवर आमूलाग्र मूल्य परिवर्तन घडवून आणणारी वैचारिक क्रांती होणे गरजेचे आहे. त्यासोबतच जमिनीचे फेरवाटपसारखे जात्यंतक क्रांतीकारक कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. त्यासाठी केवळ मार्क्स, बुद्ध, फुले, आंबेडकर ही तत्वज्ञाने पुरेशी नाहीत. कारण ब्राह्मणी छावणीने ही सर्व तत्वज्ञाने केव्हाच निकामी केलेली आहेत. बदलत्या परीस्थितीनुसार ब्राह्मणवाद जसा विकसित होत असतो, त्याचप्रमाणे आपल्यालाही आपल्या तत्वज्ञानांचा विकास केला पाहिजे. हे काम कॉ. शरद पाटील यांनी 'सौत्रांतिक मार्क्सवाद' या नव्या तत्वज्ञानाच्या मांडणीतून केलेले आहे. अर्थात आजच्या डाव्या, पुरोगामी व फुले-आंबेडकरवादी नेते-कार्यकर्त्यांचा बौद्धिक आवाका बघता त्यांनी तूर्त तामिळनाडूचा फुलेवादी अब्राह्मणी क्रांतीचा पॅटर्न स्वीकारून चळवळीचा एक पुढचा टप्पा गाठावा. पुढचा जात्यंतक क्रांतीचा टप्पा पुढच्या पिढीवर सोपवून देणे योग्य ठरेल! किमान पुढच्या पिढीसाठी तरी आज आपण तामिळनाडू पॅटर्न स्वीकारुया व पुढच्या पिढीसाठी जात्यंतक क्रांतीचा मार्ग सुकर करू या!

◆◆◆

सत्यशोधकीय नियतकालिके

- अरुण शिंदे

सत्यशोधक नियतकालिकांमधून सामाजिक, धार्मिक, शेतकरी, कामगार, स्त्रिया, अस्पृश्य, शिक्षण, राजकारण, इतिहास वगैरे विषयांवरील वैचारिक वाङ्मय प्रसिद्ध झाले आहे. ग्रामकेंद्रित जनसमूह व त्यांच्या समग्र भौतिक विकासाची मांडणी करणारे लेख, अग्रलेख, निबंध वगैरे वैचारिक वाङ्मय प्रकाशित झाले आहे. खेडेगावांची निर्मिती, ग्रामरचना, गावगाडा, बलुतेदार-आलुतेदार व्यवस्था, कृषिकेंद्रित ग्रामजीवन, कुळकर्णी-पाटील, वतनदार इत्यादी ग्रामव्यवस्थेशी निगडित बाबींचा साक्षेपी आढावा घेतला आहे.

एकोणिसावे शतक हे आधुनिक भारताच्या इतिहासात सामाजिक व राजकीय बदलाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे शतक होते. पाश्चात्त्यांचे ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण व प्रगती यांनी प्रभावित झालेला नवशिक्षित वर्ग पाश्चात्त्यांच्या प्रगतीची व हिंदुस्थानच्या अधोगतीची चिकित्सा करू लागला. आत्ममंथन, आत्मपरीक्षण सुरू झाले. भारतीयांच्या अधोगतीचे मूळ येथील धर्मव्यवस्था, वर्ण-जातिप्रधान स्थितिशील समाज, कालबाह्य रूढी परंपरा, अंधश्रद्धा आणि पारंपरिक मानसिकता यांमध्ये आहे, हे सुधारकांच्या लक्षात आले. त्यांनी धार्मिक व सामाजिक पुनर्रचनेचा जोरदार आग्रह धरला. समाजसुधारणेचे कार्य संस्थात्मक पातळीवर करणारे ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, आर्यसमाज स्थापन झाले. त्यांनी आपल्या विचार व कार्याने समाज जीवन ढवळून काढले. एकंदरीत पाहता, एकोणिसावे शतक हे प्रबोधनपर चळवळींचे शतक ठरले. यामध्ये सत्यशोधक चळवळीची तात्त्विक भूमिका व कार्य अधिक मूलभूत आणि व्यापक होते.

सत्यशोधकीय नियतकालिकांची परंपरा

एकोणिसाव्या शतकातील नियतकालिके उच्चवर्णीय पांढरपेशा वर्गातील उच्चशिक्षितांनी सुरू केलेली होती. त्यांच्याच प्रश्नांची चर्चा व आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब नियतकालिकांतून पडलेले असे. 'ब्राह्मणी पत्रे ही पक्षपाती असून ती आपल्या जातीच्या लोकांविरूद्ध लिहीत नाहीत. ती शूद्रातिशूद्रांचे खरे प्रतिनिधित्व करीत नाहीत', असा म. फुल्यांचा आक्षेप होता. 'निबंधमाला', 'विविधज्ञानविस्तार' या पत्रांनी म. फुले व सत्यशोधक समाजाच्या विचार व कार्याचा विपर्यास करून निंदामूलक, गैरसमज पसरविणारी बेताल टीका केली. त्यामुळे सत्यशोधक समाजाच्या विचाराचा प्रचार करण्यासाठी व विरोधकांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी एखादे पत्र असावे, असे सत्यशोधक मंडळींना वाटू लागले.

सत्यशोधक चळवळीच्या प्रचार-प्रसाराच्या

हेतूने १८७७ ते १९३० या काळात सुमारे साठ नियतकालिके निघाली. त्यामुळे बहुजन समाजाच्या ध्येयवादी, प्रबोधनपर, समाजनिष्ठ पत्रकारितेचे नवे पर्व सुरू झाले. 'दीनबंधु' (१८७७) - कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, वासुदेवराव बिर्जे, श्रीमती तानुबाई बिर्जे), 'सत्सार' (१८८५, म. फुले), 'दीनमित्र' (१८८८ - गणपतराव पाटील), 'राघव भूषण' (१८८८ - गुलाबसिंह कौशल्य), 'अंबालहरी' (१८८९ - कृष्णराव भालेकर), 'शेतकऱ्यांचा कैवारी' (१८९२ - कृष्णराव भालेकर), 'मराठा दीनबंधु' (१९०१ - भास्करराव जाधव), 'दीनमित्र' (१९१०, मुकुंदराव पाटील), 'विश्वबंधु' (१९११ - बळवंतराव पिसाळ), 'जागरूक' (१९१७ - वालचंद कोठारी), 'जागृति' (१९१७ - भगवंतराव पाळेकर), 'डेक्कन रयत' (१९१८ - अण्णासाहेब लठ्ठे), 'विजयी मराठा' (१९१९- श्रीपतराव शिंदे), 'सत्यप्रकाश' (१९१९ - नारायण रामचंद्र विभूते), 'गरिबांचा कैवारी' (१९२० -बाबूराव यादव), 'भगवा झेंडा' (१९२० - दत्ताजीराव कुरणे), 'तरुण मराठा' (१९२० - सखाराम पांडुरंग सावंत), 'राष्ट्रवीर' (१९२१ - शामराव भोसले), 'प्रबोधन' (१९२१ - के. सी. ठाकरे), 'संजीवन' (१९२१- द. भि. रणदिवे), 'सिंध मराठा' (१९२४ - दत्तात्रेय वासुदेव अणावकर), 'हंटर' (१९२५ - खंडेराव बागल), 'मजूर' (१९२५ - रामचंद्र लाड), 'कर्मवीर' (१९२५ - शि. आ. भोसले), 'नवयुग' (१९२६ - बाबासाहेब बोले), 'सत्यवादी' (१९२६ - बाळासाहेब पाटील), 'ब्राह्मणेतर' (१९२६ - व्यंकटराव गोडे), 'कैवारी' (१९२८ - दिनकरराव जवळकर) वगैरे प्रमुख नियतकालिके सुरू झाली. मराठी भाषिकांच्या सर्व प्रदेशांपर्यंत ती पोहोचत होती. 'जागृति' हे साप्ताहिक बडोद्याहून तर 'सिंध मराठा' हे कराचीहून प्रसिद्ध होत होते. येवला, जि. नाशिक (राघव भूषण), तरवडी, जि. अहमदनगर (दीनमित्र) अशा ग्रामीण भागातून सर्व प्रकारच्या प्रतिकूलतेवर मात करीत नियतकालिके प्रसिद्ध होत होती.

वरील नियतकालिके प्रकाशित महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांतून झाली. आपल्या परिसरातील सत्यशोधक चळवळीच्या कार्यास त्यांनी प्रसिद्धी दिली. ही छोटी -छोटी स्थानिक पत्रे त्या त्या भागातील सत्यशोधकांची विचारकेंद्रे होती. या नियतकालिकांतून समकालीन घटना, घडामोडी, बातम्या, वृत्तसार, अग्रलेख, वैचारिक व स्फुट लेख, कथा, कविता, कादंबरी, नाटक इत्यादी ललित वाङ्मय, सत्यशोधक-ब्राह्मणेतर परिषदांचे वृत्तांत, नेत्यांची भाषणे, समाज जागृतीचे कार्य, विरोधकांचा समाचार, बाजारभाव, जाहिराती वगैरे मजकूर प्रसिद्ध होत असे.

ध्येयवादी संपादक

सत्यशोधकीय नियतकालिकांनी स्वतःच्या उदरनिर्वाहाच्या साधनांकडे दुर्लक्ष करून ध्येयवादाने झपाटून नियतकालिकांच्या संपादनात स्वतःला झोकून दिले. कृष्णराव भालेकरांनी खुद्द म. फुले यांचा विरोध असताना अनेक अडचणींना तोंड देत सत्यशोधकांचे पहिले नियतकालिक 'दीनबंधु' सुरू केले. तानुबाई बिर्जे यांनी पतिनिधनानंतर मोठ्या धैर्याने व आर्थिक नुकसान सोसून 'दीनबंधु' चालविला. मुकुंदराव पाटील यांनी वयाच्या चोविसाव्या वर्षी 'दीनमित्र' सोमठाणे व तरवडीसारख्या छोट्याशा खेड्यात सुरू करून ग्रामीण पत्रकारितेचा इतिहास रचला. श्रीपतराव शिंदे यांनी पोलीस सबइन्स्पेक्टरच्या नोकरीचा राजीनामा देऊन 'विजयी मराठा' सुरू केले. केशव सीताराम ठाकरे यांनी बहुजन समाजाच्या जागृतीच्या कार्यास वाहून घेण्यासाठी सरकारी नोकरीचा त्याग करून 'प्रबोधन' सुरू केले. स्वतःच्या सुखासीन जीवनावर पाणी सोडून या ध्येयवादी संपादकांनी समाजपरिवर्तनाच्या कार्यात वाहून घेतले.

सत्यशोधकीय नियतकालिके एकखांबी तंबुप्रमाणे होती. कृष्णराव भालेकर, नारायणराव लोखंडे, गणपतराव पाटील, मुकुंदराव पाटील, भगवंतराव पाळेकर, श्रीपतराव शिंदे, शामराव देसाई, बाळासाहेब पाटील आदी संपादक आपल्या नियतकालिकांशी संबंधित सर्व कामे स्वतःच करीत. सकाळी छापखाना उघडणे, तो स्वच्छ करणे, पोस्टात जाऊन टपाल आणणे, बातम्यांचे संकलन, संपादन, अग्रलेखांचे लेखन, मुद्रितशोधन, छपाई, अंक

पोस्टात टाकणे, वर्गणी वसूल करणे इत्यादी सर्व कामे त्यांनी अत्यंत निष्ठेने साधकाप्रमाणे केली. संपादकांना पगार, भत्ता वगैरे काही नसे. सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी मिशनरी वृत्तीने नियतकालिके चालविली.

नियतकालिकांमधील वैचारिक वाङ्मय

सत्यशोधक नियतकालिकांमधून सामाजिक, धार्मिक, शेतकरी, कामगार, स्त्रिया, अस्पृश्य, शिक्षण, राजकारण, इतिहास वगैरे विषयांवरील वैचारिक वाङ्मय प्रसिद्ध झाले आहे. ग्रामकेंद्रित जनसमूह व त्यांच्या समग्र भौतिक विकासाची मांडणी करणारे लेख, अग्रलेख, निबंध वगैरे वैचारिक वाङ्मय प्रकाशित झाले आहे. खेडेगावांची निर्मिती, ग्रामरचना, गावगाडा, बलुतेदार-आलुतेदार व्यवस्था, कृषिकेंद्रित ग्रामजीवन, कुळकर्णी-पाटील, वतनदार इत्यादी ग्रामव्यवस्थेशी निगडित बाबींचा साक्षेपी आढावा घेतला आहे. शेतकऱ्यांनी सर्वप्रथम गावे वसविली व शेतीच्या गरजेतून कृषिकेंद्रित ग्रामजीवन व ग्रामव्यवस्था अस्तित्वात आली. कुळकर्णी व जोशी या वतनदारांनी अज्ञानी शेतकऱ्यांचे आर्थिक व धार्मिक शोषण केले. लोकांना लुबाडून ते गावाचे निरंकुश सत्ताधीश बनले. म्हणून कुळकर्णी व जोशी वतने तत्काळ बंद करण्याची मागणी खंडेराव बागल यांनी केली. सरकारने पुढे ही वतने बंद केली. यावरून या विचारांची मौलिकता व नवसमाजरचनेतील योगदान स्पष्ट होते. खेडे व शहरे यांचा समतोल विकास करण्याचा महत्त्वपूर्ण विचार व्यंकटराव गोडे यांनी मांडला आहे. शहरांमध्ये सोयी-सुविधांची खैरात तर खेडेगावात पायाभूत सुविधांचीही वानवा आहे. विकासाचा हा असम तोल विषमता व असंतोष निर्माण करणारा आहे. त्याचे भविष्यात राष्ट्राला गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला आहे. आज स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशासमोर विकासाचा असमतोल आणि शहरे व खेडी यांच्यामधील दरी हा कळीचा प्रश्न बनला आहे. या पार्श्वभूमीवर व्यंकटराव गोडे यांच्या ग्रामकेंद्रित विकासाच्या संकल्पनेचे द्रष्टेपण जाणवते.

पारंपरिक आचारविचारांमध्ये कालानुरूप बदल करण्याचा विचार सत्यशोधकीय साहित्यामध्ये अभिव्यक्त झाला आहे. सत्यशोधकांच्या मते, यात्रा व जत्रा ही खेडेगावातील सामाजिक संमेलने आहेत. या प्रसंगी पैशाची वारेमाप उधळपट्टी, अंधश्रद्धा, पशूहत्या, हीन अभिरुची वाढवणारी तमाशासारखी करमणुकीची साधने यांसारख्या अनिष्ट प्रकारांना उधाण आलेले असते. त्यांना अटकाव करून लोकशिक्षणाचे कार्य जत्रा-यात्रांतून व्हावे, असा विधायक विचार वैचारिक साहित्यामधून व्यक्त झाला आहे. जत्रेप्रसंगी असणाऱ्या लोकांच्या उत्साहाला विधायक वळण लागावे यासाठी प्रबोधनपर कीर्तने, कुस्त्यांसारखे बलवर्धक खेळ, विद्यार्थ्यांच्या स्पर्धा आयोजित कराव्यात. लोकांना बक्षिसे द्यावीत. रचनात्मक कार्यक्रमांतून नवसमाजरचनेचा विचार लोक मानसात बिंबवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

समाजातील अनिष्ट चालीरीतींचे निर्मूलन करून आधुनिक मूल्याधिष्ठित, विकासाभिमुख नवीन पुरोगामी पर्याय सुचविले आहेत. मूर्तिपूजा, नवस, सोवळेओवळे, अंगात येणे, दानधर्म, मंत्रतंत्र, श्राद्धविधी वगैरे रूढिपरंपरांची तर्कशुद्ध चिकित्सा करून त्यांची निरर्थकता सिद्ध केली आहे. वैज्ञानिक व बुद्धिवादी दृष्टिकोनाची गरज व्यक्त केली आहे. सत्यशोधकांनी तीर्थक्षेत्रांच्या शुद्धीकरणावर भर दिला आहे. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी असणारी अव्यवस्था, पुरोहितांचे प्राबल्य व भ्रष्टाचार यांचे वास्तव चित्रण केले आहे. तीर्थक्षेत्रे म्हणजे बहुजन समाजाला मानसिक गुलाम बनवून त्यांचे शोषण करणारी केंद्रे आहेत, असे प्रतिपादन करून त्यांचे पावित्र्य व माहात्म्य नाकारले आहे. देवस्थानांच्या ठिकाणी जमा होणारी प्रचंड संपत्ती प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करण्याची क्रांतिकारी सूचना केली आहे. आजही हा विचार प्रत्यक्षात आणण्याची मानसिकता व धैर्य, शासन आणि समाज यांच्यामध्ये नाही. सत्यनारायण, गणेशोत्सव यांच्यामागील ब्राह्मणांचे हितसंबंध उघड करून बहुजन समाजास सावध केले आहे. होळी, विजयादशमी, दिवाळी यांसारख्या सणांतील अनुचित प्रकार बंद करून नवे समाजोन्नतीकारक पायंडे पाडण्याची गरज व्यक्त केली आहे. बहुजन समाजाच्या लग्नांमधील

उधळपट्टी, डामडौल, मानपान यावर कडक टीका करून आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले आहे. कमी खर्चात सत्यशोधकीय पद्धतीने विवाह करण्याचा आग्रह धरला आहे. व्यसनाधीनता, अनारोग्य, भिकारी यांसारख्या समाजस्वास्थ्याशी निगडित बाबींची चर्चा करून उपयुक्त, दिशादर्शक पर्याय सूचविले आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा या मूल्यांवर सामाजिक पुनर्रचनेचा विचार मांडला आहे.

सत्यशोधकीय नियतकालिकांमध्ये धर्म व जातीविषयक लेखन प्रसिद्ध झाले आहे. पारंपरिक धर्मव्यवस्थेची चिकित्सा करून इहवादी विचारांचे प्रतिपादन केले आहे. 'नीती व सदाचार म्हणजे खरे धर्माचरण' असे सत्यशोधकांचे मत होते. त्यांनी व्यक्तीच्या भौतिक विकासाला महत्त्व दिले. लाखो देशबांधव अज्ञानांधकारात बुडून पशूतुल्य अवस्थेला पोहोचले असताना त्यांना माणूसपण आणण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रयत्न न करता परदेशात धर्मप्रसार करणाऱ्या उंटावरच्या शहाण्यांना, 'स्वजनद्रोही कृतघ्नता' म्हणून वासुदेवराव बिर्जे यांनी फटकारले आहे. 'प्रबोधन'कार केशव सीताराम ठाकरे यांनी देव व धर्मव्यवस्था नाकारली आहे. 'जगात गुलामगिरीचे फॅड जिवंत ठेवणारे नरक म्हणजे धर्म' असे सडेतोड प्रतिपादन करून त्यांनी धर्माच्या समूळ उच्चाटनावर भर दिला आहे. धर्मामुळे झालेला अनाचार, अत्याचार, रक्तपात व हानीचे ऐतिहासिक दाखले देऊन त्यांनी आपले मत मांडले आहे. मनुष्यत्वास बाधा आणणाऱ्या देव व धर्म कल्पनेस आव्हान दिलेले आहे. शोषणाधिष्ठित, विषम तामूलक, ग्रंथप्रामाण्यवादी व ब्राह्मण्यकेंद्रित हिंदू धर्म व रूढिपरंपरा यांची परखड चिकित्सा केलेली आहे. धर्माचे प्रचलित स्वरूप नाकारून माणूसकेंद्रित, समताधिष्ठित, प्रगतिशील व बुद्धिवादी विचारांचे प्रतिपादन केलेले आहे. इहवाद व मानवी प्रतिष्ठा यांवर भर दिला आहे. मानवजातीचा विकास व सुधारणा या धर्माच्या रूढी व शृंखला तोडून झाल्या आहेत. म्हणून धर्माचे कायम चे विसर्जन केल्याशिवाय मानवी ऐक्य होणार नाही, अशी धर्मातीत मानवी समाजाची संकल्पना दिनकरराव जवळकरांनी मांडली आहे. सत्यशोधकांच्या धर्मविषयक विचारांची चर्चा धर्म चिकित्सेपासून धर्मविरहित समाजाच्या संकल्पनेपर्यंत विकसित झाली आहे, हे लक्षणीय आहे.

धर्मग्रंथ व पोथ्यापुराणांची परखड चिकित्सा करणारे लेखनही मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध झालेले आहे. धार्मिक ग्रंथांचे ब्राह्मणी स्वरूप आणि त्यामधील विषमता व शोषणकारी व्यवस्था बळकट करणारा आशय यावर प्रकाश टाकला आहे. वेदासारख्या ज्या ग्रंथांचे श्रवणही ब्राह्मणेतरांना वर्ज्य होते, त्यांचे अध्ययन व परिशीलन करून वेदांच्या अपौरुषेय निर्मितीच्या सिद्धांताला आव्हान दिले आहे. पोथ्या-पुराणांचे ब्राह्मणी स्वरूप व त्यांची कालबाह्यता सिद्ध केली आहे. ग्रंथप्रामाण्य व शब्दप्रामाण्य मानण्याच्या वृत्तीतून मानसिक गुलाम गिरी येते. म्हणून बुद्धिप्रामाण्यवादाचा पुरस्कार केला आहे. धर्मग्रंथांच्या दास्यत्वातून मुक्ततेसाठी अध्ययन, चिकित्सकपणा व बुद्धिवाद यांचा स्वीकार करण्याचा विचार मांडला आहे.

देव व धर्मव्यवस्थेवर ताबा मिळविणाऱ्या भिक्षुकशाहीवर चौफेर हल्ले चढविले आहेत. ब्राह्मणांनी समाजावर स्वतःचे वर्चस्व व श्रेष्ठत्व राखण्यासाठी धर्मव्यवस्था निर्माण केली. त्यांची कुटिल कारस्थाने व भ्रष्ट आचरण समाजासमोर सप्रमाण मांडून भिक्षुकशाहीच्या उच्चाटनाची मागणी केली आहे. देव व भक्त यांच्यामधील ब्राह्मण पुरोहितांची मध्यस्थी नाकारली आहे. पुरोहितशाहीमुळे जनसामान्यांचे आर्थिक शोषण झाले. श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या पायऱ्या निर्माण झाल्या. धार्मिक, मानसिक गुलामगिरी लादली गेली. म्हणून धार्मिक क्षेत्रातील समता, समानता, स्वातंत्र्य व शोषणमुक्तीसाठी मध्यस्थांच्या उच्चाटनाचा विचार मांडला गेला आहे.

चातुर्वर्ण्यव्यवस्था हे हिंदू धर्माचे व्यवच्छेदक लक्षण आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेची चिकित्सा करून त्याचे दुष्परिणाम स्पष्ट केले आहेत. वर्णव्यवस्थेमुळे कनिष्ठ वर्णीयांची मने गुलाम व निःसत्त्व झाली आहेत. समाज मरण पंथाला लागला आहे. जन्मजात उच्चनीचत्वाची

अशास्त्रीय कल्पना लादून माणसाला संकुचित केले आहे. म्हणून चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या उच्चाटनासाठी सामाजिक क्रांतीचा मार्ग सांगितला आहे. जातिभेदामुळे देशाचे सर्वाधिक नुकसान झाल्याचे सातत्याने प्रतिपादन केले आहे. वर्णजातविरहित समाजाची संकल्पना मांडलेली आहे.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची भागवत धर्मावर अभ्यासपूर्ण लेखमाला 'विजयी मराठा'मधून प्रसिद्ध झाली आहे. त्यांनी भागवत धर्माची निर्मिती, स्वरूप, भक्ती व प्रेमाची परंपरा उलगडून दाखविली आहे. प्रस्थापित वैदिक धर्माला समांतर राहून बहुजन समाजाला भक्ती व मुक्तीचा सर्वजनसुलभ मार्ग दाखविण्याचे कार्य भागवत धर्माने केले आहे. आजही देशभर विविध संप्रदायाच्या रूपाने भागवत धर्म कार्यरत असल्याचे विठ्ठल रामजी शिंदे यांनी दाखवून दिले आहे.

सत्यशोधक चळवळीच्या नियतकालिकांतील वैचारिक साहित्याचा शेतकरी हा केंद्रबिंदू आहे. म. फुले यांनी 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथामधून शेतकऱ्यांच्या दुःख-दारिद्र्याची मूलगामी मीमांसा करून त्यांच्या उत्थानाच्या उपाययोजना सुचविल्या आहेत. कृष्णराव भालेकरांनी 'शेतकरी मालक देशाचे' असे महत्त्वपूर्ण विधान केले आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील शेतकऱ्यांचे मध्यवर्ती स्थान स्पष्ट करून 'शेतकऱ्यांची प्रगती हीच देशाची प्रगती' हे वास्तव अधोरेखित केले आहे. शेतकऱ्यांच्या अधोगतीची ही परखड कारणमीमांसा केली आहे. अज्ञान, दारिद्र्य, रूढी-परंपरांचा पगडा, दैववाद, देवभोळेपणा, अंधश्रद्धा, उधळपट्टीचा स्वभाव, व्यसने वगैरे दुर्गुणांमुळे शेतकऱ्यांचा अधःपात झाला आहे. सरकार, नोकरशाही, सावकार, व्यापारी व भटजी यांच्याकडून शेतकऱ्यांचे आर्थिक व मानसिक शोषण केले जाते, याचे अनेक दाखले देऊन तत्कालीन शेतकऱ्यांच्या परिस्थितीची वस्तुनिष्ठ मीमांसा केलेली आहे. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांची पारंपरिक मानसिकता बदलण्यासाठी व शेतीतून उत्पादनवृद्धी होण्यासाठी विविध उपाय सुचविले आहेत. शेतीचे शास्त्रशुद्ध व आधुनिक तंत्रज्ञानयुक्त शिक्षण देणाऱ्या शेतीशाळा, कृषिमहाविद्यालये सुरू करावीत. त्यामधून शेतीच्या सुधारित पद्धतीचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखवून त्यांना मार्गदर्शन व मदत करावी. शेतीविषयक नवीन शोध व आधुनिक शेतीपद्धतीची माहिती शेतकऱ्यांना समजण्यासाठी सरकारने शेतीविषयक मासिक प्रसिद्ध करावे. अधिक उत्पन्न देणाऱ्या बी-बियाणांचा पुरवठा करावा. कृषिप्रदर्शने भरवावीत. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अवजारांची निर्मिती करावी. शेतीचे आधुनिकीकरण करावे. सरकारने शेतीस प्रोत्साहन देऊन उत्पादनवृद्धीसाठी मदतीचे धोरण अवलंबावे, असे प्रतिपादन केलेले आहे.

सावकार, व्यापारी, दलाल यांच्या आर्थिक लुटमारीतून मुक्त होण्यासाठी सहकार चळवळीचा क्रांतिकारक मार्ग सुचविला आहे. सहकारी पतपेढ्या, सहकारी धान्यपेढ्या, सहकारी दुकाने, सहकारी पाणीपेढ्या, शेतीसंघ अशा सहकारी संस्था स्थापन करण्याची संकल्पना मांडली आहे. सहकाराच्या माध्यमातून आर्थिक सक्षमता व समृद्धीचा मार्ग दाखविला आहे. सहकारी पतपेढ्यांनी शेतकऱ्यांच्या अर्थकारणाचा पाया बदलून त्यांना आत्मनिर्भर, संघटित व सशक्त बनविले. सावकारशाहीच्या जोखडातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. सहकार चळवळ ही सत्यशोधक वैचारिक मंथनातून उदयास आली आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न संघशक्तीच्या जोरावर सोडविण्यासाठी शेतकरी संघटनेची आवश्यकता सांगितली आहे.

सत्यशोधकी नियतकालिकांमधून स्त्रियांविषयी प्रगम नशील विचार व्यक्त झाले आहेत. भारतीय समाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान, धर्मग्रंथांमधील स्त्रियांसंदर्भातील तुच्छतापूर्ण लेखन, पुरुषांची मानसिकता, रूढी परंपरांचा पगडा, शिक्षणाचा अभाव वगैरेंमुळे स्त्रियांची झालेली होरपळ नियतकालिकांमधील साहित्यातून चित्रित झाली आहे. स्त्रियांची माणूस म्हणून प्रतिष्ठा, सन्मानपूर्वक जगण्याचा हक्क व स्त्रियांचे अधिकार यांचा पुरस्कार केला आहे. बालविवाह व जरठकुमारी विवाहातील अमानुषतेचे दर्शन घडवून असे विवाह बंद करण्याची मागणी केली आहे. जोडीदार निवडण्यासाठी स्वयंनिर्णयाच्या तत्त्वास

मान्यता दिली आहे. आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाहांना पाठिंबा दिला आहे. स्त्री-पुरुष समतेच्या पायावरील वैवाहिक जीवनाचा पुरस्कार केला आहे. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मालमत्तेत समान अधिकार देण्याचे आवाहन केले आहे. स्त्रियांच्या खऱ्याखुऱ्या उन्नतीसाठी मुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचा जोरदार आग्रह धरला आहे. 'राष्ट्राची उन्नती ही स्त्री शिक्षणावर अवलंबून आहे', असा महत्त्वपूर्ण विचार कमलादेवी जाधव यांनी मांडला आहे. शांताबाई चव्हाण यांनी स्त्रियांच्या प्रश्नासंदर्भात मौलिक लेखन करून त्यांच्या उत्कर्षाच्या वाटा दाखविल्या आहेत.

माणसाचे माणूसपण नष्ट करून, त्याला गुलाम बनवून त्याचे अमानुष शोषण करणाऱ्या अस्पृश्यतेच्या भयंकर प्रथेस नियतकालिकांतील साहित्यामधून कडाडून विरोध केला आहे. ब्राह्मणांनी समाजावर आपले वर्चस्व व श्रेष्ठत्व कायम ठेवण्यासाठी वर्णव्यवस्था व अस्पृश्यता निर्माण केली. जगाच्या पाठीवर विटाळाचे अवडंबर माजविणारा हिंदू हा एकमेव धर्म आहे, असे वा. चि. भानु यांनी म्हटले आहे. निग्रो गुलामांच्यापेक्षा अस्पृश्यांची स्थिती अनेक पटीने भयानक आहे. निग्रोंच्यामध्ये शिवाशिवीची कल्पना अस्तित्वात नव्हती. विटाळ, दुःख, दारिद्र्य व अवहेलना यांमध्ये बुडालेले अत्यंत हीन व लाजिरवाणे जगणे अस्पृश्यांच्या वाट्याला आले. ब्राह्मण, मराठे, जैन, लिंगायत, माळी वगैरे जातींनी अस्पृश्यांवर जुलूम केले, असे श्रीपतराव शिंदे यांनी म्हटले आहे. अस्पृश्यता निर्मूलनाचा विचार नियतकालिकांमधील साहित्यामधून जोरदारपणे मांडला आहे. अस्पृश्यांना धार्मिक गुलाम गिरीत ठेवून ब्रिटिशांपासून राजकीय स्वातंत्र्याची मागणी करण्याचा उच्चवर्णीयांना काय अधिकार आहे? असा प्रश्न सत्यशोधकीय लेखकांनी उपस्थित केला आहे. धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्यानंतर राजकीय स्वातंत्र्याचा विचार त्यांनी मांडला आहे. भारतासारख्या बहुजातीय देशात सामाजिक लोकशाहीची स्थापना व समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीनंतरच खऱ्या अर्थाने राष्ट्र उभारणीचे कार्य होऊ शकते, असा महत्त्वपूर्ण विचार प्रतिपादन केला आहे. अस्पृश्यता निर्मूलनावर देशाचे स्वातंत्र्य, सुधारणा, प्रगती अवलंबून आहे. धार्मिक, सामाजिक व आर्थिक विषमता कायम ठेवून मिळालेले स्वातंत्र्य टिकाऊ होणार नाही, असे मत शिवराम जानबा कांबळे यांनी 'दीनबंधु' मध्ये १९०७ साली व्यक्त केले होते.

वर्णजातिव्यवस्थेचे मूलाधार असणारे धर्मग्रंथ व शास्त्रपुराणे नष्ट करून नव्या समतामूलक समाजरचनेचा ओनामा करावा. अस्पृश्यता कायद्याने नष्ट करावी. अस्पृश्यांना शिक्षणासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये सवलती द्याव्यात, असा अस्पृश्योद्धाराचा कार्यक्रम नियतकालिकांमधील लेखांतून सुचविला आहे. अस्पृश्यता मानणारा समाज हा मानवतेवरील कलंक असून केवळ सैतानी राज्ये व हृदयेच अस्पृश्यता स्वीकारतील. गुलामी लादणारा धर्म अव्हेरण्याचा हक्क प्रत्येकाला आहे, असा धर्मांतराचा जहाल मार्गही सुचविला गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील दलितांच्या लढ्याची वैचारिक व सामाजिक पार्श्वभूमी तयार करण्याचे काम या साहित्याने केले.

नियतकालिकांमध्ये शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे साधन संबोधले जाते. शिक्षणाचे महत्त्व प्रतिपादन करून शिक्षणप्रसाराच्या आवश्यकतेवर भर दिला आहे. बहुजन समाजाच्या अधोगतीचे मूळ शिक्षणाच्या अभावात म्हणजे अज्ञानात असल्याचे प्रतिपादन केले आहे. 'शिक्षणाअभावी बहुजन समाज केवळ दोन पायाची जनावरे बनला आहे... आग लागलेल्या घरावर पाणी ओतणे जसे महत्त्वाचे आहे, तसेच अज्ञानी समाजावर शिक्षणाचा वर्षाव करणे महत्त्वाचे आहे.' अशी बहुजन समाजाची दारूण अवस्था मुकुंदराव पाटील यांनी निदर्शनास आणली आहे. शिक्षणाचा प्रसार करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. सरकारने सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण द्यावे. शेतकरी व बहिष्कृत वर्गासाठी शिक्षण हेच स्वराज्य आहे, असा शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा जोरदार आग्रह धरला आहे. सरकारने शेतकऱ्यांकडून लोकल फंड व शेतसाऱ्याच्या रूपाने घेतलेला सर्व पैसा शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणावर खर्च करावा. नोकरशाहीच्या वाढत्या पगारात कपात, मोठे जमीनदार व व्यापाऱ्यांवर कर आणि देवस्थानांतील

मिळकत शिक्षणप्रसारासाठी वळवून शिक्षणासाठी निधी उभारण्याचे मार्ग सुचविले आहेत. सध्या भारत सरकारने 'सर्व शिक्षा अभियाना'साठी शिक्षणकर लावला आहे. अशा उपायांचे सूतोवाच नियतकालिकांतील लेखनातून केलेले आहे. सर्वंकष शिक्षणप्रसारासाठी लोकसहभागातून व्यापक चळवळ सुरू करण्याची गरज व्यक्त केली आहे. अशा चळवळीचे स्वरूप व दिशाही सूचित केली आहे. गरीब मुलांच्या शिक्षणासाठी प्रत्येक तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृहे सुरू करावीत, अशी मागणी १८९५ साली नारायण मेघाजी लोखंडे यांनी 'बोर्डिंग स्कूलची कितीतरी आवश्यकता आहे' या 'दीनबंधु'मधील लेखात केली आहे. नियतकालिकांमधील लेखांतून वसतिगृहांच्या स्थापनेची मागणी सातत्याने केली आहे. शिक्षणाच्या महत्त्वाबाबत लोकजागृती करण्यात आली. यातूनच 'मराठा शिक्षण परिषद', 'रयत शिक्षण संस्था' यांसारख्या बहुजन समाजाच्या अनेक शिक्षणसंस्था स्थापन झाल्या. त्यांनी वसतिगृहे सुरू करून ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाचा पाया घातला. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरला अनेक वसतिगृहे सुरू केली. महाराष्ट्रातील विद्यार्थी वसतिगृह चळवळीचा पाया घालण्यामध्ये नियतकालिकांतील शिक्षणविषयक विचारांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्रस्थापितांची तत्कालीन मराठी नियतकालिके उच्च शिक्षणाचे गोडवे गात असताना सत्यशोधक चळवळीच्या नियतकालिकांनी तळागाळातील कनिष्ठ वर्गासाठी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा विचार सातत्याने मांडला. शिक्षणावरच बहुजन समाजाचे व देशाचे भवितव्य अवलंबून असल्याचे प्रमेय मांडून बहुजनांच्या शिक्षणाचे महत्त्व व आवश्यकता अधोरेखित केली. 'सक्तीच्या शिक्षणाचे धरण बांधून शेतकऱ्यांचे मेंदू सुपीक झाल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार आहे', असा शिक्षणाचा संबंध शेतकऱ्यांच्या बौद्धिक विकासाशी व मानसिकता बदलाशी जोडला. शिक्षणामुळे शेती व शेतकऱ्यांचे आधुनिकीकरण झाल्यास उत्पादनवृद्धी होईल, अशी सत्यशोधकीय लेखकांची धारणा होती. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेमध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले. त्यापूर्वी सत्तर वर्षे या प्रश्नांवर सत्यशोधक चळवळीने व नियतकालिकांनी रान उठवून वातावरणनिर्मिती केली होती.

राजकीय विषयावर सत्यशोधकीय नियतकालिकांनी प्रस्थापितांहून भिन्न भूमिका घेतलेली आढळते. राष्ट्रीय सभेचे उद्देश, स्वरूप, कार्य व राष्ट्रीय सभेचे नेते याबाबत नियतकालिकांतील लेखनांमध्ये गंभीर प्रश्न उपस्थित केलेले आहेत. राष्ट्रीय सभेचे नाव जरी राष्ट्रीय असले तरी राष्ट्रीय सभेमध्ये कोट्यवधी शूद्रातिशूद्र शेतकरी-कष्टकरी जनसमुदायाचे किती प्रतिनिधी आहेत? ब्रिटिशांकडून राजकीय स्वातंत्र्याची मागणी करणारी राष्ट्रीय सभेची उच्चवर्णीय मंडळी, त्यांनी बहुजन समाजावर लादलेली धार्मिक व सामाजिक गुलामगिरी का नष्ट करीत नाहीत? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे राष्ट्रीय सभेकडे नव्हती. राष्ट्रीय सभेचे उच्चवर्णीय नेतृत्व, त्यांची हितसंबंधी धोरणे, डावपेच व मर्यादा ओळखून बहुजन समाजाचे हितरक्षण करणारी भूमिका नियतकालिकांतील राजकीय विषयावरील साहित्यातून मांडलेली आहे. ब्रिटिशांशी राजनिष्ठ राहून आपला सामाजिक, राजकीय व आर्थिक उत्कर्ष करण्याचे मत लेखकांनी नोंदविले आहे. मानवाला धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक वगैरे सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त करणारी स्वातंत्र्याची अत्यंत व्यापक संकल्पना त्यांनी मांडली आहे. सामाजिक लोकशाहीचे स्वप्न त्यांनी पाहिले आहे. राजकीय सत्तेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना करण्यात आली होती. ब्राह्मणेतर पक्षाची भूमिका, उद्देश व कार्यक्रमांचा प्रचार-प्रसार नियतकालिकांनी केला. बहुजन समाजात राजकीय जाणिवांची जागृती व राजकीय विचारांची पेरणी करण्याचे कार्य नियतकालिकांतील साहित्याने केले. सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळीच्या राजकीय पर्वाचे वैचारिक नेतृत्व नियतकालिकांनी केले आहे. आज महाराष्ट्रात बहुजन समाजाने राजकारणात स्थानिक स्वराज्य संस्थांपासून विधिमंडळापर्यंत जे राजकीय वर्चस्व प्राप्त केले आहे, त्याची वैचारिक पायाभरणी सत्यशोधक चळवळ व नियतकालकांनी केली आहे.

ऐतिहासिक व चरित्रात्मक लेखनातून सत्यशोधकीय लेखकांनी कृषिजन परंपरेचा वारसा व अस्मितेचा शोध घेतला आहे. गौतम बुद्ध, बळीराजा, महावीर, बसवेश्वर, तुकाराम, राजर्षी शाहू महाराज आदींच्या जीवनकार्याचा व विचारांचा वेध घेतला आहे. या म हापुरुषांनी वैदिक धर्म, भिक्षुकशाही, वर्ण-जातिव्यवस्था, कर्मकांडे यांच्या विरोधात विद्रोह पुकारला. सामाजिक समता व मानव मुक्तीसाठी आपले आयुष्य त्यांनी खर्ची घातले. या महापुरुषांच्या परंपरेशी सत्यशोधक चळवळीने आपले नाते जोडले आहे. बुकर-टी-वॉशिंग्टन यांनी पोपशाहीविरुद्ध पुकारलेल्या धर्मसुधारणा चळवळींशी सत्यशोधकांनी आपले वैचारिक नाते जोडून आपल्या विचारकार्याला एक वैश्विक परिमाण प्राप्त करून दिले. ब्राह्मण इतिहासकारांच्या एकांगी, पक्षपाती इतिहासलेखनाची कठोर चिकित्सा करून त्या संदर्भात गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. वि. का. राजवाडे यांनी 'राधामाधवविलासचंपू' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत मराठे, जैन, बौद्ध यांच्यासंदर्भात विपर्यस्त स्वरूपात केलेल्या लेखनाला महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अभ्यासपूर्ण उत्तर दिले आहे.

सत्यशोधकीय जाणिवांतून आलेल्या आत्मभानामुळे बहुजनसमाजाच्या इतिहासाच्या, पुनर्लेखनाची आवश्यकता व्यक्त होऊ लागली. त्या संदर्भातील वैचारिक मांडणी नियतकालिकांमधील साहित्यातून केली आहे. आजही परिवर्तनवादी चळवळीतील लेखक, संशोधक बहुजन समाजाच्या इतिहासाचे पुनर्लेखन करण्याचा प्रयत्न करीत आहेत. अस्मिताशोध व सत्यशोधनाच्या प्रेरणेतून हे प्रयत्न होत आहेत.

नियतकालिकांमधील वैचारिक वाङ्मयातून स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, मानवता, सहिष्णुता ही श्रेष्ठ मूल्ये प्रकट झाली आहेत. शोषण-मुक्त आधुनिक समाजरचनेचा विचार या वाङ्मयाच्या केंद्रस्थानी आहे. शेतकरी, कष्टकरी, दलित या प्रचंड जनसमुदायाच्या दुःखदैन्याची कारणमीमांसा केली आहे. त्यांच्या सर्वंकष उत्थानासाठी विविध उपायांची मांडणी केली आहे. या साहित्याने मराठी वैचारिक वाङ्मयामध्ये गुणात्मक व मूल्यात्मकदृष्ट्या मोठी भर टाकली आहे.

नियतकालिकांमधील ललित वाङ्मय

सत्यशोधकी नियतकालिकांमधून प्रबोधनपर वैचारिक वाङ्मयाबरोबरच कादंबरी, कथा, कविता, नाटक हे सामाजिक आशयप्रधान ललित वाङ्मयही प्रकाशित झाले आहे.

कृष्णराव भालेकर यांच्या 'बळीबा पाटील' या कादंबरीचे पहिले चार भाग 'दीनमित्र'मधून एप्रिल १८८८ ते जुलै १८८८ या कालावधीत क्रमशः प्रसिद्ध झाले आहेत. भालेकरांनी खेडेगाव, तेथील लोकजीवन, शेती, शेतकरी, त्यांचे कष्ट, दारिद्र्य, पाटलांची कर्तव्ये यांचे वास्तव चित्रण केले आहे. याचबरोबर मानवी जीवनाविषयी काही एक गंभीर वैचारिक चिंतन मांडले आहे. समकालीन मराठी कादंबरीपेक्षा विषय व आशय या अनुषंगाने 'बळीबा पाटील'ची गुणात्मक उंची मोठी आहे. तत्कालीन पार्श्वभूमीवर 'बळीबा पाटील'चा विचार केल्यास ग्रामजीवनाचे दर्शन घडविणारी ती मराठीतील पहिली तत्त्वचिंतनात्मक ग्रामीण कादंबरी ठरते.

मुकुंदराव पाटील यांच्या पाच कादंबऱ्या 'दीनमित्र' मधून प्रसिद्ध झाल्या आहेत. 'होळीची पोळी' (१९१०-१९१२) या कादंबरीतून ग्रामीण भागातील पाटीलकीच्या वतनाचा संघर्ष मांडला आहे. 'चंद्रलोकीची विलक्षण रूढी अथवा दादासाहेबांची फजिती' (१९११) या कादंबरीतून स्त्रीजीवनाच्या व्यथा-वेदनांचे चित्रण केले आहे. 'ढढ्ढाशास्त्री परान्ने' (१९१५) या कादंबरीतून धार्मिक कर्मठपणा व सामाजिक सुधारणांचा विषय विनोदी शैलीतून मांडला आहे. हिंदु-मुस्लीम संघर्षावरील 'तोबातोबा' (१९२४-१९२६) ही कादंबरी धार्मिक सद्भावना व मानवी ऐक्याचा विचार मांडते. खेड्यांची सुधारणा हा विषय 'राष्ट्रीय तारुण्य' (१९२८-१९२९) या कादंबरीमध्ये येतो. मुकुंदराव पाटील यांच्या कादंबऱ्या सामाजिक आशयप्रधान आहेत. समाजातील ज्वलंत, संवेदनशील विषयांचे वास्तव चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांतून येते. वाचकांचे कुतुहल व उत्कंठा जागृत करून त्यांना वर्ण्य विषयांत गुंतविण्यासाठी अद्भुतरम्यता,

रहस्यमयता, वेषांतर इत्यादी वास्तववादी कादंबरीत न बसणाऱ्या तंत्राचा वापरही त्यांनी केला आहे. भाषा साधी, सोपी, प्रवाही आहे. ग्रामजीवनाचे हुबेहूब व चित्रस्पर्शी वर्णन ते करतात. 'ढढ्ढाशास्त्री परान्ने' ही कादंबरी आशय व अभिव्यक्तीच्या अंगाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. समाजसुधारणेसारखा संवेदनशील विषय त्यांनी निर्मळ, निखळ, विनोदी शैलीतून हाताळला आहे. विषय, आशय, अभिव्यक्ती, भाषाशैली वगैरे अंगाने 'अस्सल देशी कलाकृती' म्हणून 'ढढ्ढाशास्त्री परान्ने' या कादंबरीची नोंद करावी लागेल.

१९१० ते १९३० या काळातील मराठी कादंबरी मध्ये मध्यमवर्गीय जाणिवेतून पांढरपेशी जीवनाचे चित्रण होत असे. या पार्श्वभूमीवर मुकुंदराव पाटील यांच्या कादंबऱ्यांतील विषय व आशयाचे वेगळेपण जाणवते. समाजनिष्ठ जाणिवेचा कादंबरीकार, असा मुकुंदराव पाटील यांचा उल्लेख करता येईल.

सत्यशोधकीय नियतकालिकांतील कथांमध्ये सामाजिक आशयावर भर आहे. खेडेगावातील अज्ञानी, शेतकरी-कष्टकरी जनसमूहांचे ब्राह्मण, भटजी व सावकारांकडून होणारे शोषण हे कथांचे मुख्य आशयसूत्र आहे. शेतकऱ्यांचे दारिद्र्य, कर्जबाजारीपण, आत्महत्या, सावकारशाहीचे निरंकुश रूप, धार्मिक शोषण, पारंपरिक मानसिकता, मागासलेपण अशा शेतकरी-कष्टकरी जनसमुदायाच्या जीवनाशी निगडित प्रश्नांचे सूक्ष्म व वास्तव चित्रण कथांमधून येते. ब्राह्मणांची वर्णवर्चस्ववादी मनोवृत्ती, कामगारांचे तसेच विधवांचे दु:खदैन्य अशा बहुविध सामाजिक प्रश्नांचे चित्रण नियतकालिकांमधील कथांतून केले आहे. प्रेमभावनेची विविध रूपे तसेच आंतरजातीय विवाहाचे चित्रण काही कथांतून येते. सामाजिक प्रश्नांचे चित्रण व समाजसुधारणेची मूल्यदृष्टी हे नियतकालिकांमधील कथावाङ्मयाचे वैशिष्ट्य आहे.

सत्यशोधकीय कवितांतून शेतकऱ्यांचे अज्ञान, दारिद्र्य, कर्ज, धर्मभोळेपणा, व्रतवैकल्ये, तीर्थक्षेत्रे, ब्राह्मण, भटजी, सावकार अशी शेतकरी जीवनाशी संबंधित आशयसूत्रे आली आहेत. कृष्णराव भालेकरांचे पोवाडे, उपदेशपर लावण्या व श्रीखंड यांमधून शेतकऱ्यांच्या शोषणाचे विदारक दर्शन घडते. सरकार, नोकरशाही, पोलीस, दलाल, कुळकर्णी यांचेकडून शेतकऱ्यांचे होणारे शोषण, सावकारांच्याकडून होणारी लूटमार, अनिष्ट चालीरीतीमुळे होणारा आत्मघात वगैरे आशयसूत्रे भालेकरांच्या कवितेतून येतात. 'दक्षिणेतील १८७७ चा भयंकर दुष्काळ' या पोवाड्यातून दुष्काळाच्या अस्मानी सुलतानी आपत्तीचे हृदयभेदक वर्णन भालेकरांनी केले आहे. धर्म, जात, ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व, देव व भक्त यांच्यामधील मध्यस्थ, अस्पृश्यता, कर्मकांडे, बुवाबाजी यांसारख्या विषयांवर पं. धोंडीराम नामदेव कुंभार, गोपाळबाबा वलंगकर, ज्ञानगिरीमहाराज वगैरेंनी काव्यलेखन केले आहे. 'अभंग' या पारंपरिक देशी रचनाबंधामध्ये सामाजिक आशय ओतून लोकमनाशी संवाद साधण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

मुकुंदराव पाटील यांची 'कुळकर्णीलीलामृत' (१९१२), 'शेटजी प्रताप' (१९१८) ही दोन खंडकाव्ये 'दीनमित्र'मधून क्रमशः प्रसिद्ध झाली आहेत. या खंडकाव्यांमधून कुळकर्णी व शेट सावकारांच्याकडून शेतकऱ्यांचे होणारे शोषण चित्रित झाले आहे. महाराष्ट्रमध्ये १९१० च्या सुमारास कुळकर्णी हा खेडेगावातील सरकारी अधिकारी व एक प्रकारे निरंकुश सत्ताधीश होता. त्याच्या लेखणी व लीलांनी खेडेगावातील अज्ञानी, गरीब शेतकऱ्यांचे कसे अमर्याद शोषण होत होते, याचे भेदक चित्रण 'कुळकर्णीलीलामृत' मध्ये येते. शेतकऱ्यांच्या दारिद्र्य व अडाणीपणाचा गैरफायदा घेऊन शेट-सावकार कर्जाच्या नावाखाली त्यांना कसे देशोधडीस लावीत होते, याचे वास्तव 'शेटजी प्रताप' या खंडकाव्यातून वर्णन केले आहे. मुकुंदराव पाटलांनी ओवीबद्ध आख्यानकाव्यसदृश्य खंडकाव्याची बहारदार रचना केली आहे. समाजातील वास्तव कथानके, लोकजीवनातील व्यक्तिरेखा, दैनंदिन जीवनातील प्रसंग-घटना, ग्रामीण वातावरण, पौराणिक आख्यानकाव्याच्या धर्तीवर ओवीबद्ध रचना, उपमा, दृष्टांत, स्वभावोक्ती, अनुप्रासादी अलंकारांची रेलचेल, उपहास, उपरोध, वक्रोक्ती या शब्दशस्त्रांचा मर्मभेदी वापर, म्हणी व वाक्प्रचारांची चपखल योजना, रसरशीत,

उत्कट, जिवंत व ओघवते निवेदन आणि शैलीदार भाषा इत्यादी गुणवैशिष्ट्यांनी सजलेली 'कुळकर्णीलीलामृत' व 'शेटजी प्रताप' ही खंडकाव्ये मराठीमध्ये अजोड आहेत. ज्वलंत सामाजिक समस्यांचे कलात्मक चित्रण करणारी 'कुळकर्णीलीलामृत' व 'शेटजी प्रताप' ही मराठीतील पहिली सामाजिक खंडकाव्ये आहेत.

१९२० ते १९३० या काळात नियतकालिकांमधून अनेक कवींच्या स्फुट कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. धर्माचे स्वरूप, देव व भक्तांमधील मध्यस्थांचे उच्चाटन, जातिभेद निर्मूलन, शेतकऱ्यांचे कष्टमय जीवन, दारिद्र्य, कर्जबाजारीपण, रूढी-परंपरांचे उच्चाटन, शिक्षणाची आवश्यकता, व्यसनांचे दुष्परिणाम अशा अनेकविध विषयांचे चित्रण या कवितांमधून येते. शेतकरी-कष्टकरी जनसमूह केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या शोषणाची व उत्थानाची मांडणी सत्यशोधकीय कवितेतून येते.

मुकुंदराव पाटील यांचे 'राक्षसगण' हे अपूर्ण नाटक व काही प्रबोधनपर संवाद नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाले आहेत. 'राक्षसगण' या नाटकात ब्राह्मण लोक आपले वर्चस्व कायम राहावे, या स्वार्थी हेतूने बहुजन समाजाची दिशाभूल करून सत्यशोधक कार्यकर्त्यांच्या समाजप्रबोधनात कसे अडथळे आणतात, हे दाखवून दिले आहे. प्रबोधनपर संवादातून सामाजिक प्रश्नांवर उद्‌बोधन केलेले आहे.

मर्यादा

नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेल्या वाङ्मयाच्या काही मर्यादा आहेत. अनेकदा मांडणीमध्ये एकारलेपण, विचारांची पुनरावृत्ती, आवेश, अभिनिवेश व प्रचारकी उथळपणाचा दोष आढळतो. विविध वाङ्मयप्रकारांमध्ये समान विषय व समान आशयसूत्रे आल्याने मोठ्या प्रमाणात पुनरुक्ती झाली आहे. वाङ्मयीन नियतकालिकांशी तुलना करता सत्यशोधकीय नियतकालिकांतून ललित वाङ्मयास कमी स्थान मिळाले आहे. नियतकालिकांतील लेखक बहुजन समाजातून आलेले, वाङ्मयीन संस्कृतीशी फारसा परिचय नसलेले होते. लेखकांनी प्रबोधनाच्या प्रेरणेतून वाङ्मयनिर्मिती केली. त्यामुळे कलात्मकतेकडे त्यांनी फारसे लक्ष दिले नाही. त्यांनी कलेपेक्षा जीवननिष्ठा, समाजनिष्ठा व मूल्यात्मकता महत्त्वाची मानली आहे. नियतकालिकांचा वाचक वर्ग ग्रामीण भागातील, वाचन व वाङ्मयाची फारशी अभिरुची नसलेला आणि जेमतेम साक्षर होता. त्यामुळे वाचकांच्या स्तराचा व अभिरुचीचा विचार करून त्याला समजेल, आवडेल अशा भाषेत वाङ्मय प्रकाशित करणे आवश्यक होते. त्यामुळे कलात्मकतेचा, लालित्याचा मोह टाळून साध्या, सोप्या भाषेत विषय विवेचन करण्यावर भर आढळतो.

नियतकालिकांचे अर्थकारण

आर्थिक अडचण हा सत्यशोधकीय नियतकालिकांच्या अस्तित्वाला आव्हान देणारा सर्वांत मोठा प्रश्न होता. त्यांच्या कारणांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

वर्गणीदारांची अल्पसंख्या

बहुजन समाजात त्या काळात साक्षरतेचे प्रमाण नगण्य होते. शिक्षणाची गोडी आणि वाचनाची अभिरुची नव्हती. त्यामुळे वाचक आणि वर्गणीदारांची अत्यल्प संख्या ही सत्यशोधक नियतकालिकांची मुख्य आर्थिक समस्या होती. १८७७ साली 'दीनबंधु' काढणे किती अवघड होते, हे सांगताना भालेकरांचे सहकारी सीताराम तारकुंडे यांनी लिहिले आहे, ''त्या वेळेस महाराष्ट्र देशात ब्राह्मणांशिवाय इतर जातींतील फारच थोडे लोक शिकलेले होते. पण जे अगदी थोडे शिकलेले लोक होते, त्यांना वाचनाची बिलकूल अभिरुची नव्हती. वर्तमानपत्रात लेख लिहिण्यास चांगले विद्वान व बहुश्रुत लेखक पाहिजेत. परंतु रा. कृ. पां. भालेकर ह्यांना सर्वच गोष्टी प्रतिकूल होत्या, तरी रा. भालेकर ह्यांनी त्या अडणचींस न जुमानता पदरचे सर्व पैसे खर्च करून १८७९ अखेर 'दीनबंधु' पत्र चालविले.'' (तारकुंडे, १९२२:५). 'दीनबंधु'ला पहिल्या वर्षी फक्त तेरा वर्गणीदार मिळाले आणि १८८० साली 'दीनबंधु' जेव्हा मुंबईला हलवावा लागला तेव्हा ही संख्या जेमतेम ३८० पर्यंत गेली होती. ९ मे १८८० रोजी मुंबईहून प्रकाशित पहिल्या अंकात लोखंडे लिहितात, ''फुकटदेखील पत्रे वाचण्याची गोडी व ईर्षा नाही... बाहेरगावचे राहणारे नामांकित गृहस्थास टपाल हशील भरून (अंक) जात

असत. त्याजकडून पैसे येण्याची मारामार.'' बहुजन समाजात वृत्तपत्राच्या महत्त्वाविषयी उदासीनता, अज्ञान, दारिद्र्य, वाचनाभिरुचीचा अभाव, निरक्षरता व स्वतःच्या अधिकारांच्या व हक्कांच्या बाबतीतील जागरूकतेचा अभाव यांमुळे वर्गणीदारांच्या अल्प संख्येची समस्या सत्यशोधक चळवळीच्या सर्व नियतकालिकांना भेडसावत होती. 'विजयी मराठा'चा साप्ताहिक ८००० खपाचा अपवाद वगळता इतर नियतकालिकांचा खप बेताचा होता. वर्गणीदारांच्याकडूनही नियमित वर्गणी मिळत नसे. या थकीत वर्गणीमुळे नियतकालिके अडचणीत येत.

अपुरे भांडवल व आर्थिक अडचणी

वृत्तपत्रे/नियतकालिके चालविण्यासाठी छापखाना, नोकरवर्ग, बातमीदार, वितरणव्यवस्था, भांडवल इत्यादी गोष्टींचे सुयोग्य व्यवस्थापन असावे लागते. यापैकी अनेक गोष्टींची प्रतिकूलता असताना संपादकांनी नियतकालिके सुरू केली. अपुरे भांडवल, पुरेशा वर्गणीदारांचा अभाव, छापखाना व वृत्तपत्रासाठी आवश्यक व्यवस्थेची अनुपलब्धता, अल्प जाहिराती, ब्राह्मणांच्या तक्रारींमुळे मागितले जाणारे जामीन, खटले, कोर्टकचेऱ्या इत्यादींमुळे सत्यशोधकी नियतकालिके सुरुवातीपासूनच नाना अडचणींशी संघर्ष करीत राहिली. दैनिक चालवण्याइतके आर्थिक पाठबळ बहुतेक सर्वांपाशी नसल्यामुळे साप्ताहिक किंवा पाक्षिक काढणे पसंत केले जात असे. अनेकदा कर्ज घेऊन नियतकालिके सुरू झाली. परिणामी आर्थिक विवंचनेचा ससेमिरा कायमचा मागे लागला.

'दीनबंधु' पत्र तोट्यात चालल्याने झालेले कर्ज फेडण्यासाठी भालेकरांना घर, जमीन, दागिने विकावे लागले. शेवटी त्यांनी 'दीनबंधु' नारायणराव लोखंडे व रामजी संतुजी आवटे यांच्या स्वाधीन केला. लोखंड्यांनी आपल्या मृत्यूपर्यंत 'दीनबंधु' नेकीने चालविला. 'दीनबंधु'वर कर्जाचा बोजा वाढत होता. रा. ब. नरसू सायबू, रामय्या व्यंकय्या अय्यावारू, नागू सयाजी, जाया कराडी लिंगू वगैरे मुंबईतील सत्यशोधकांनी ४००० रुपये वर्गणी जमा करून लोखंड्यांना दिली. त्यामुळे ते अंशतः कर्जमुक्त झाले (बागल, १९३३ : ८७). 'दीनबंधु'ला आर्थिक स्थैर्य प्राप्त व्हावे म्हणून लोखंड्यांच्या काळात हितचिंतकांच्या देणग्यांतून निधी संकलनाचा प्रयत्न झाला होता. 'शेतकऱ्यांचा कैवारी' सुरू करण्यासाठी भालेकरांना रामजी संतुजी आवटे यांनी छापखाना व दोनशे रुपये दिले होते. छापखान्यावर कर्ज झाल्याने 'शेतकऱ्यांचा कैवारी' बंद पडला. १९१० साली भालेकरांनी सोमठाणेकर मंडळींच्या मदतीने छापखाना खरेदी केला. संपादकास पगार व घरभाडे नसतानाही केवळ पत्राचा खर्च भागविण्यासाठी मुकुंदराव पाटलांना २७ वर्षांत १७००० रुपये नुकसान सोसावे लागले होते (दीनमित्र, १९३८:२). श्रीपतराव शिंदे यांनी मित्रांच्याकडून ५० ते ५००० रुपये पर्यंत देणग्या व कर्जाऊ रक्कम घेऊन 'विजयी मराठा' सुरू केले. भगवंतराव पाळेकरांनी अवघ्या सहाशे रुपयांच्या अल्प भांडवलावर बडोद्यासारख्या अल्पसंख्य मराठी भाषिकांच्या प्रदेशात 'जागृति' सुरू केले. पाळेकरांना १९३४ साली पत्नीच्या वीस तोळे सोन्याच्या गोठपाटल्या विकून 'जागृति'साठी कागद खरेदी करावा लागला. 'प्रबोधन'कार के. सी. ठाकरे यांनी आपल्या पत्रास आर्थिक स्थैर्य येईल, या कल्पनेने सातारा रोड (पाडळी) येथून धनजीशाह कूपरच्या साहाय्याने काही काळ पत्र चालविले. बाबासाहेब बोले यांनी दरवर्षी शेकडो रुपयांची आर्थिक तूट सोसणे अशक्य झाल्याने १९३० मध्ये 'नवयुग' बंद केले. कराचीहून प्रसिद्ध होणारे 'सिंध मराठा' हे आर्थिक अडचणींमुळे बंद पडले. सत्यशोधक चळवळीतील छोटी-मोठी बहुतेक पत्रे आर्थिक नुकसानीत सापडून बंद पडली. ती चालविण्यासाठी झालेले प्रयत्नही पुरेसे ठरले नाहीत.

राजर्षी शाहू महाराजांचे साहाय्य

वृत्तपत्र हे समाजप्रबोधन करण्याचे तसेच जनमत तयार करण्याचे प्रभावी साधन असते, याची जाणीव शाहू महाराजांना होती. ब्राह्मणेतर समाजाची बाजू मांडणाऱ्या व ब्राह्मणशाहीविरोधात बहुजन समाजाला जागे करणाऱ्या वृत्तपत्रांना मदत करणे, असे धोरण शाहू महाराजांनी अवलंबले होते. त्यांच्या प्रोत्साहनाने 'विश्वबंधु', 'तरुण मराठा', 'गरिबांचा कैवारी', 'डेक्कन रयत', 'शिवछत्रपती', 'भगवा झेंडा' वगैरे पत्रे

सुरू झाली होती. बिगरशेती जमिनीवर 'दीनमित्र' चा छापखाना उभारला म्हणून मुकुंदराव पाटलांना ७५० रुपये दंड झाला होता. हा दंड भरण्यासाठी व पत्र नव्या जोमाने चालविण्यासाठी शाहू महाराजांनी मदत केली. शाहू महाराजांनी मदत केली. १९२० साली 'दीनमित्र'चा छापखाना गहाण पडला असताना शाहू महाराजांनी आर्थिक साहाय्य देऊन वाचविला (फडके, १९८९ : २६३). 'जागरुक'कार वालचंद कोठारींना १९१९ साली त्यांनी तीन हजार रुपयांची मदत पाठविली होती (पवार, २००१ : २३३). 'विजयी मराठा'स शाहू महाराजांनी वेळोवेळी देणग्या दिल्या (विजयी मराठा, १२ फेब्रुवारी १९२३). बेळगावहून प्रसिद्ध होणारे 'राष्ट्रवीर' हे पत्र शाहू महाराजांच्या प्रेरणेने सुरू झाले होते. 'सुबोधमाला', 'सत्यप्रकाश', 'प्रबोधन', 'जागृति' या पत्रांसही शाहू महाराजांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत केली.

नियतकालिकांचे अन्य आर्थिक स्रोत

सत्यशोधक समाजाचे सभासद, वर्गणीदार, हितचिंतक हे नियतकालिकांना देणग्या देत. देणगीदारांची नावे नियतकालिकांमधून प्रसिद्ध केली जात होती. सत्यशोधकीय कार्यक्रम, विवाह, विधी इत्यादी प्रसंगी नियतकालिकांना देणग्या दिल्या जात होत्या. म. फुले यांनी 'सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजाविधी' या पुस्तकाच्या २००० प्रतींचा खर्च जाऊन राहिलेला नफा 'दीनबंधु'स दिला होता. नियतकालिकांतून जाहिराती येत असत. सत्यशोधक बुक डेपो, पुस्तके, नियतकालिके यांच्या जाहिरातींची संख्या लक्षणीय असे. पुण्यातले सत्यशोधक लक्ष्मणराव घोरपडे आपल्या निळ्या-काळ्या शाईची जाहिरात देऊन बऱ्याचशा पत्रांना साहाय्य करीत होते. जाहिरातींच्या मर्यादित संख्येमुळे व उशिरा आणि तुटपुंज्या मिळणाऱ्या पैशांमुळे नियतकालिके चालविणे जिकिरीचे झाले होते.

प्रस्थापितांचा विरोध

सुशिक्षित ब्राह्मण वर्ग चिपळूणकर, टिळकांच्या प्रभावाने सत्यशोधक नियतकालिकांना विरोध करू लागला. १८७७ ला पुण्यात ब्राह्मणांच्या बालेकिल्ल्यात भालेकरांनी 'दीनबंधु' सुरू केला. ब्राह्मणांवर केलेल्या हल्ल्यामुळे भालेकरांना शारीरिक इजा पोहोचण्याचा धोका निर्माण झाला होता (रायकर : १०). मुकुंदराव पाटलांनी सोमठाणे येथे 'दीनमित्र'चे पुनरुज्जीवन केल्यानंतर त्यांच्यावर कलेक्टरच्या कुलकर्णी नावाच्या चिटणीसाने अंक वेळेवर येत नाहीत तसेच बिगरशेती जमिनीत छापखाना उभारला, या आरोपाखाली दंड केला. छापखाना जप्त करून 'दीनमित्र' बंद पाडण्याचा प्रयत्न केला. 'जागरुक'कार वालचंद कोठारी व 'विजयी मराठा'कार श्रीपतराव शिंदे यांना अंक छापून देण्यास पुण्यातील छापखानेवाले तयार नव्हते. 'प्रबोधन' बंद पाडण्यासाठी पुण्यातील सनातन्यांनी अनेक प्रकार केले. 'प्रबोधन'च्या कचेरीवर हल्ले करणे, कचेरीसमोर घाण टाकणे, प्रबोधन विक्रेत्यांना इतर पत्रे मिळू न देणे, छपाईसाठी पिवळा कागद पुरविणे, छापखाना जप्तीचे प्रयत्न करणे अशा अनेक मार्गांनी विरोधकांनी 'प्रबोधन'कारांना त्रास दिला. माधवराव बागलांनी १९३० मध्ये 'हंटर'मधून लोकहिताच्या मागण्या केल्याने कोल्हापूर दरबारने त्यांच्याकडून ५००० रुपयांचा जामीन मागितला. तो भरता न आल्याने बागलांनी 'हंटर' बंद केले. अशा प्रकारे सत्यशोधकी नियतकालिकांना जन्मापासूनच प्रस्थापितांच्या विरोधाला सामोरे जावे लागले होते.

नियतकालिकांचे योगदान

सत्यशोधकीय नियतकालिकांमधून शेतकरी-कष्टकऱ्यांच्या व्यथा-वेदनांचा आर्त उद्‌गार व्यक्त झाला आहे. सर्वसामान्यांच्या शोषणमुक्तीचा व उत्थानाचा प्रवाह सत्यशोधकी नियतकालिकांनी सर्वप्रथम प्रवाहित केला. पांढरपेशांच्या उपेक्षेची शिकार झालेल्या शेतकरी-कष्टकरी जनसमुदायांच्या जीवनाचे अस्सल चित्रण सत्यशोधकीय नियतकालिकांनी केले. नियतकालिकां मधून प्रसिद्ध झालेल्या वैचारिक व ललित साहित्यामध्ये तत्कालीन समाजजीवनाचे वास्तव प्रतिबिंब पडलेले आढळते. सामाजिकता, भूमिनिष्ठा, प्रबोधनात्मकता, सत्यशोधकीय मूल्यदृष्टी व बोलीभाषेचा वापर यांमुळे सत्यशोधकीय वाङ्मय वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे.

बहुजन समाजातील संपादक-लेखकांची एक परंपरा पहिल्यांदाच सत्यशोधक नियतकालिकांमुळे निर्माण झाली. सत्यशोधकीय नियतकालिकांमधील वाङ्मयाने मराठी वाङ्मयाला प्रबोधनपर, समाजनिष्ठ, भूमिकेंद्रित परिवर्तनवादी वैचारिक साहित्याची मूल्यात्मक दृष्टी व परंपरा दिली आहे. साहित्यनिर्मितीचे प्रयोजन, समाजनिष्ठा, आशयाचे वेगळेपण, अनुभवांचे अस्सलपण, मानवतावाद, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, सहिष्णुता, मानवी प्रतिष्ठा, इहवाद, विद्रोह, बुद्धिवाद, देशीयता, जिवंतपणा, बोलीभाषा, शैली वगैरे नव्या निकषांच्या प्रकाशात सत्यशोधक नियतकालिकांमधील वाङ्मयाचा अभ्यास करणे न्यायोचित आहे.

संदर्भ ग्रंथ :

१. कदम मनोहर : 'भारतीय कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे', म. फुले समता प्रतिष्ठान, पुणे, १९९५, आ. पहिली.

२. कीर धनंजय : 'महात्मा जोतीराव फुले', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९२, आ. चौथी.

३. कुरणे दत्ताजीराव यशवंतराव : 'कै. रा. छ.', श्रीशाहू महाराज यांच्या आठवणी, द. य. कुरणे, श्रीराजाराम प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर, १९६८, आ. दुसरी.

४. कोठारी वा. रा. : 'जुन्या आठवणी', संकल्प प्रकाशन, पुणे, १९७३, आ. पहिली.

५. तारकुंडे सीताराम : 'ब्राह्मणेतर व मराठी यांच्या चळवळीचा पूर्वेतिहास आणि मराठ्यांची पूर्वपीठिका', पुणे, १९२६.

६. नरके हरि (संपा.) : 'आम्ही पाहिलेले फुले', म. फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, १९९३, आ. पहिली.

७. पवार जयसिंगराव (संपा.) : 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१, आ. पहिली.

८. पाळेकर भगवंत : 'नव्या मनुंतला मराठा अथवा 'जागृति' पत्रातील निवडक लेख', सुभाष पाळेकर, बडोदा, १९२१.

९. पाळेकर भगवंत : ''जागृति'कार पाळेकर : आत्मवृत्त आणि लेखसंग्रह', जागृति छापखाना, बडोदे, १९६१, आ. पहिली.

१०. पाटील मुकुंदराव : 'विचार किरण', भाग दुसरा, तरवडी, १९५६.

११. फडके य. दि. : 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', १९०१-१९१४ खंड १, अध्यक्ष, सासवड आश्रम विश्वस्त मंडळ, सासवड, १९८९, आ. पहिली.

१२. फडके य. दि. : 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र (राजकीय इतिहास, १९१४-१९२०)', खंड २, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८९, आ. पहिली.

१३. फडके य. दि. : 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र (राजकीय इतिहास, १९२१-१९२९)', खंड २, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९१, आ. पहिली.

१४. फडके य. दि. (संपा.) : 'म. फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१, आ. पाचवी.

१५. बागल माधवराव (संपा.) : 'सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ', १९३३.

१६. बागल माधवराव : 'बहुजन समाजाचे शिल्पकार', ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६६, आ. पहिली.

१७. बागल माधवराव (संपा.) : ' 'हंटर'कार खंडेराव गोपाळराव बागल यांचे निवडक लेख', दी कोल्हापूर, शुगर मिल्स लि. कोल्हापूर, १९७४.

१८. रायकर सीताराम (संपा.) : 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय', म. फुले समता प्रतिष्ठान, पुणे.

१९. लेले रा. के. : 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कान्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, आ. पहिली.

२०. वलंगकर गोपाळबाबा : 'विटाळ विध्वंसन (१८८९)', पुरोगामी सत्यशोधक, जुलै ते सप्टेंबर, १९७९.

२१. शिंदे अरुण : 'सत्यशोधकीय नियतकालिके', कृष्णा संशोधन व विकास अकादमी मंगळवेढा, २०१९.

◆◆◆

सत्यशोधक समाजाचे वैचारिक साहित्य

- शिरीष लांडगे -पाटील

सत्यशोधक समाजाने विचार दिले. चिकित्सा केली. समाजव्यवस्थेवर प्रहार केले, पर्यायी व्यवस्था निर्माण केली. समाजाचे विचार हे सध्या तळागाळापर्यंत पोहोचतात का? की निव्वळ अकादमिक राहिले ? समाजाचे प्रारंभीच्या विचारांचा अंगीकार सध्याचे समाजी करतात का? मुकुंदरावांसारखे वारकरी सप्ताहामध्ये जाऊन समजावून सांगायचे. सत्यशोधक समाजाचे विचार पोहोचवायचे.

पृथ्वीचे वय चारशे साठ कोटी वर्षे आहे. माणूस पृथ्वीवर येऊन साधारणतः पंचवीस लाख वर्षे झाली आहेत. माणसाचा लिखित इतिहास पाच हजार वर्षांपेक्षा अधिक नाही. हे जग काय आहे ? हे शोधण्याचा माणसाचा अनेक वर्षांपासूनचा प्रयत्न आहे. माणसाने ही उत्तरे धर्म, विज्ञान, शास्त्रातून शोधण्याचा प्रयत्न केला आहे; पण हा शोध संपला नाही. हे एक सत्य आहे. हे पाहता, विश्वाच्या तुलनेत माणसाच्या इतिहासाची, विचारविश्वाची पूर्व परंपरा फार दीर्घ नाही. जगभरात विविध धर्म, संप्रदाय, विचारप्रवाह आहेत. त्याप्रमाणे भारतातही वैदिक, जैन, बौद्ध आदी धर्म आणि त्यानंतरच्या विविध संप्रदायांनी धर्मचिकित्सा केली आहे. याशिवाय अन्यही विविध विचारप्रवाह आहेत. भारतीय विचारविश्वात परिवर्तनाला नकार ते स्वीकार अशा दोन परस्परविरुद्ध विचारधारा पाहावयाला मिळतात. या प्रत्येकाच्या काहीएक सामर्थ्य आणि मर्यादा आहेत. या दीर्घ परंपरेत पुण्यात महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना सन १८७३ मध्ये केली. या परिवर्तनवादी विचारप्रवाहातील सत्यशोधक समाजाची तत्वे, नियम सन १८७६ मध्ये तयार केले गेले. मध्यंतरी काही काळ ते उपलब्ध नव्हते. सध्या ते उपलब्ध झाले आहेत.

'दीनबंधु'च्या २२ व २९ एप्रिल १८९४ च्या अंकात सत्यशोधक समाजाचे नियम आलेले आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

१ शूद्र वर्गाची निकृष्ट स्थिती होत चाललेली आहे. सत्य, असत्य कोणते ? मनुष्याचे वास्तविक अधिकार कोणते ? कर्तव्य कोणती ? सुधारणेस उपाय कोणते ?

२ राजकीय विषयांवर बोलणे वर्ज्य.

३ पशु हिंसा, मद्यपान बंद

४ वार्षिक उत्पन्नापैकी एक दिवसाचे उत्पन्न समाजाला देईन.

५ लोकांमध्ये सत्य व सद्विचारांचा प्रसार करणे.

६ लोकांस वृत्तपत्र आणि व्याख्यानांच्या माध्यमातून बोध करणे.

७ विद्येचा प्रसार करणे. मुंबई विद्यापीठाच्या संबंधाने ज्या विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्यास निश्चय असून आणि होतकरू असून मात्र सामर्थ्य नसेल त्या सहाय्य करण्यास उपाय योजना.

८ शेतकी सुधारण्यास उपाय.

असे काही नियम सत्यशोधक समाजाच्या स्थापनेच्या वेळी करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर सत्यशोधक समाजाच्या वैचारिक साहित्याचा विचार करू.

सत्यशोधक समाजाच्या साहित्याची परंपरा

प्राचीन सत्यशोधकी परंपरा ही जैन, शाक्तपंथ, लोकायत, बौद्ध, सुफी, नाथ, लिंगायत, महानुभाव, वारकरी अशी आहे. आधुनिक सत्यशोधकी साहित्याची पायाभरणी (१८५३-१९००) म. जोतिबा फुले यांनी केली. त्यांनी १८५३ मध्ये महात्मा फुले यांनी 'निर्मिकाचा शोध' ही पद्य रचना केली. हा आधुनिक मराठी सत्यशोधकी साहित्याचा प्रारंभ बिंदू मानावा लागतो. याबरोबरच त्यांनी 'छ. शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' 'ब्राह्मणाचे कसब', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा असूड', 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक', 'अखंडा' दी काव्यरचना आदी लेखन केले. त्यानंतर सत्यशोधकी साहित्याचा जोरकस आविष्कार (१८५३-१९००) सावित्रीबाई जोतिबा फुले, मुक्ता साळवे, कृष्णराव पांडुरंग भालेकर, रा. ब. नारायण मेघाजी लोखंडे, ताराबाई शिंदे, स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावारू, गणपतराव सखाराम पाटील, गोपाळबाबा वलंगकर, पंडित धोंडिराम नामदेव कुंभार, दाजीसाहेब तुकाराम, यादवराव पाटील गोपाळे, नारो बाबाजीशास्त्री, महाघट पाटील पानसरे, डॉ. यशवंतराव जोतीराव फुले, गुरुवर्य कृष्णराव अर्जुनराव केळुसकर आदींनी केला.

जोतीरावांच्या काळात आणि त्यानंतरच्या काही काळापर्यंत सत्यशोधक समाजाचे नियम समोर ठेवून समाजाची वाटचाल सुरू होती. मूलभूत मानवी हक्क, त्यावर आधारलेला विश्वकुटुंबवाद आणि जीवनाचे व विश्वाचे सत्य स्वरूप प्रकट करणारा बुद्धिवाद या आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीकडून मिळालेल्या प्रेरणातून समाजाची निर्मिती झाली. या काळात सत्यशोधक चळवळीला ब्राह्मणेतर चळवळीचे स्वरूप नव्हते.याकाळात अनेक ब्राह्मण सत्यशोधक समाजात होते. १९२० नंतर सत्यशोधक चळवळीला ब्राह्मण - ब्राह्मणेतर असे वळण लागले. १९३० नंतर सत्यशोधक समाज स्वराज्य संपादनार्थ महात्मा गांधींच्या लढ्यात सहभागी झाला. स्वातंत्र्योत्तर काळात सत्यशोधक चळवळीचा इतिहास, चरित्र, लिहिली गेली. चिकित्सा, पुनर्मूल्यांकन करण्यात आले. सत्यशोधक चळवळीचे स्वरूप काहीसे बदलत गेलेले दिसत असले तरी, सत्यशोधक वैचारिक लेखनाचा केंद्रबिंदू ग्रामीण माणूस राहिला आहे. या वैचारिक साहित्याने समकालीन आव्हाने पेलली आहेत. म्हणून सत्यशोधक चळवळीतील वैचारिक साहित्य ही कष्टकरी बहुजन स्त्री पुरुषांची साहित्य परंपरा आहे.

सत्यशोधकीय नियतकालिकांतील वैचारिक साहित्य :

'दीनबंधु', 'सत्सार', 'दीनमित्र', 'जागृति', 'विजयी मराठा', 'सत्यप्रकाश', 'भगवा झेंडा', 'गरिबांचा कैवारी', 'राष्ट्रवीर', 'प्रबोधन', 'हंटर', 'कर्मवीर', 'मजूर', 'ब्राह्मणेतर', 'सत्यवादी', 'कैवारी', 'सिंध मराठा', 'शेतकऱ्याचा कैवारी', 'महाराष्ट्र केसरी' यासारख्या नियतकालिकांतून ग्रामव्यवस्था, रूढी परंपरा, यात्रा - जत्रा, मूर्तिपूजा, नवस, श्राद्धविधी, तीर्थक्षेत्रे, गणेशोत्सव, सण, व्यसने, आरोग्य, वृत्तपत्र, धर्म व जातीविषयक विचार, महाकाव्य, पुराणे, भिक्षुकशाही, शेती व शेतकरीविषयी चर्चा, सावकारशाही, दारिद्र्य, शेतकऱ्यांचे दोष, त्यांच्या उन्नतीचे मार्ग, सहकार चळवळ, स्त्रीमुक्तीविषयक विचार, बालविवाह विरोध, आंतरजातीय - आंतरधर्मीय विवाह पाठिंबा, समतेचा पुरस्कार, स्त्रीशिक्षण, अस्पृश्यता निर्मूलन, सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण, चारित्र्यवान शिक्षकांची गरज, वसतिगृहाची आवश्यकता, अभ्यासक्रम, ग्रामकेंद्रित शिक्षणाचा विचार, समता, बंधुता, स्वातंत्र्याचा पुरस्कार आदींची चर्चा झालेली दिसते. या नियतकालिकांतून वैचारिक मंथन होते. या सत्यशोधकीय नियतकालिकांतून समकालीन समाजस्थितीचे समग्र आणि वास्तवदर्शी दर्शन

घडते. बहुजनांच्या अधोगतीची वस्तुनिष्ठ कारणमीमांसा येते. ही चिकित्सा स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा आग्रह धरणारी आहे. याविषयीचे मूलगामी चिंतन अरुण शिंदे यांच्या ग्रंथातून येते.

सत्यशोधक समाजाच्या वैचारिक साहित्यातील काही लेखक आणि त्यांच्या काही नोंदी :

कृष्णराव पांडुरंग भालेकर हे सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते, प्रचारक, पत्रकार, गायक, अभिनेते, कवी, लेखक, वक्ते होते. ते महात्मा जोतीराव फुले यांचे एक सहकारी होते. १८८५ मध्ये भालेकरांनी पुण्यात सत्यशोधक समाजाच्या झेंड्याची मिरवणूक काढली. १८९५ मध्ये भालेकरांनी राष्ट्रीय सभेच्या मंडपासमोर २२ फूट उंच शेतकऱ्याचा कापडी पुतळा उभा केला. त्यावर सोनेरी अक्षरात आऊट ऑफ अवर नाइन्टिन क्रोअर्स आर देअर नाइन्टिन टू इक्सप्लेन अवर ग्रीव्हन्सेस? लिहून सभेत खळबळ उडविली होती.[१] त्यांनी १९०४ मध्ये पाणी खेचण्याचे यंत्रप्रयोग केला. भालेकरांनी उपजीविकेसाठी आयुष्यभर अनेक कामे केली. कारकून, कंत्राट घेणे, छापखाना काढणे, कारखाने काढणे, वर्तमानपत्र काढणे, व्यवसाय, यंत्रप्रयोग करणे इतकेच काय त्यांना अहमदनगरला एका थिएटरमध्ये नोकरी करावी लागली.

'जातिभेद विवेकसार' या १८६१ च्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत तुकाराम तात्या पडवळ म्हणतात, 'याशिवाय दुसरे असेही समजले पाहिजे की, या ग्रंथकर्त्यास स्वतःचे देवसंबंधी मत लोकांसमोर स्थापित करणे नाही. त्यास कोणताही आवडता धर्म लोकांस सांगावयाचा नाही. फक्त ज्या शोधांचा लाभ या ग्रंथकर्त्यास झाला आहे ते शोध आपल्या स्वदेशीयांस सांगून त्यांस या जातिभेदामुळे प्राप्त झालेल्या नीचत्वापासून मुक्त करण्यापेक्षा दुसरे कोणतेही धर्मसंबंधी कार्य साधावयाचे नाही. त्यास वाटते की, हिंदुजन जी संसारात दुःखे भोगितात त्या किंबहुना सर्व दुःखांचे मूळ हा जातिभेद आहे.'

मुकुंदराव पाटील हे एक विचारवंत होते. पत्रकार होते. लेखक होते. कृतीशील सुधारक होते. या काळात सत्यशोधकांची पहिली पिढी अस्तंगत होत चालली होती. अशा काळात त्यांनी सत्यशोधक समाजाच्या विचारांच्या प्रसारासाठी साहित्याची निर्मिती केली. त्यांची ही निर्मिती आव्हानात्मक मानावी लागते. शिक्षणाची, लेखनाची कोणतीही दीर्घ परंपरा नसणाऱ्या वर्गाचे, बहुजन समाजाचा प्रतिनिधी असणाऱ्या मुकुंदरावांनी मुंबई, पुण्यासारख्या कुठल्याही साहित्यनिर्मितीच्या केंद्राबाहेरच्या परीघात राहून विविध प्रकारात साहित्यनिर्मीती केली. मुकुंदराव पाटील यांची भाषणे 'दीनमित्र'मध्ये प्रसिद्ध झाली आहेत. त्यापैकी नऊ भाषणे आहेत. दि. ६/४/१९१५ रोजी नवी बुधवार पेठ, कोल्हापूर येथे बाबुराव यादव यांच्या अध्यक्षतेखाली 'सत्यशोधक समाजाची आवश्यकता' या विषयावर मुकुंदराव पाटील यांचे भाषण झाले. या भाषणाचा सारांश दीनमित्रमध्ये दि. २१/४/१९१५ रोजी प्रसिद्ध झाला. धर्म आणि धर्मेच्छु किंवा देव आणि भक्त यांच्यामध्ये दलाल नको. असे स्पष्ट करून, जोपर्यंत धर्मविधी दलालाच्या हातानेच होणे सशास्त्र आहे अशी समजूत नष्ट होणार नाही, जोपर्यंत धर्माच्या कामात भटब्राह्मण स्वार्थासाठी आमच्या पवित्र धर्मकार्याचा विध्वंस करता थांबणार नाहीत, तोपर्यंत सत्यशोधक समाजाची आवश्यकता राहणारच राहणार.

डेक्कन रयत समाजाच्यावतीने अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अंतर्गत कर्जत येथे २८ नोव्हेंबर १९१७ रोजी जाहीर सभा झाली. मुकुंदराव पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शेतकरी आणि कारागीर यांच्या हितासाठी कायदे मंडळात स्वतंत्र प्रतिनिधीच्या मागणीसाठी चळवळ उभारली. त्यामागील उद्देश स्पष्ट करताना मुकुंदराव म्हणतात, 'आपल्या देशाचा मुख्य आधार किंवा खंबीर खांब असा जो शेतकरी समाज आणि त्याचे सहकारी कारागीर लोक या सर्वांच्या हिताचा पूर्ण विचार व्हावा म्हणून ही चळवळ सुरू केली आहे. (सत्यवेध, पृ.४१) प्रिय बंधुंनो, शहरातील मूठभर लोकांच्या चकाकीवर जाऊ नका? आपल्या सभोवती पाहा ! आपल्याच रक्तामांसाचे आपले आप्त, खेड्यापाड्यांनी आज कोणत्या स्थितीत आहेत याचा विचार करा ! त्यांना स्वतःच्या खुशालीचे पत्र लिहिता येत नाही किंवा

स्वतःच्या 'पदरात' ला पैसा कोणी नेल्यास त्यासंबंधाने दाद मागता येत नाही, की स्वतःच्या पोटातील रोगावर औषध मागता येत नाही.' (सत्यवेध,पृ.५४) रोकडे वास्तव स्पष्ट करतात.

मुकुंदरावांनी कुकाणा येथे विठ्ठल सप्ताहानिमित्त १३, १४ सप्टेंबर १९२२ रोजी भाषण केले. सध्या तुमचा चालू असलेला वर्तनक्रम पाहिला तर तो विठोबाच्या शिकवणीविरुद्ध आहे असे मोठ्या कष्टाने म्हणावे लागते. (सत्यवेध, पृ.७१) निराश होऊ नका, उद्योग करा, एकमेकांस सहाय्य करा, विनाकारण कोणावरीही आपल्या पोटाचा बोजा टाकू नका! अशी विठोबाची शिकवण आहे! (सत्यवेध, पृ.७१) जगाच्या उपयोगी पडणे याचेच नाव संतपण आहे. (सत्यवेध, पृ.७२) विठोबाचे नाव घेऊ नये, त्याचे भजन करू नये, त्याचे कीर्तन करू नये असे मी म्हणत नाही. सर्व काही करावे पण एवढे करणे म्हणजे आत्म्याचा उद्धार नव्हे, हे लक्षात ठेवले पाहिजे !

भालेकर, तुकाराम तात्या, मुकुंदराव हे सत्यशोधक समाजाचे अनुयायी आहेत. एकूणच सत्यशोधक समाजाने निर्मिलेल्या वैचारिक साहित्याचे काही निवडक प्रतिनिधी म्हणता येतील. या लेखकांच्या साहित्याचे काही निवडक उदाहरणे आपण पाहिली. ती पाहिल्यानंतर काय दिसते? तर हे लेखक केवळ विचार प्रकट करीत नव्हते, तर ते कृतीशील विचारवंत होते.

सत्यशोधक समाजाच्या वैचारिक साहित्याचे साहित्यगत मूल्य आणि वेगळेपण

सत्यशोधक समाजातील वैचारिक साहित्याची परंपरा दीर्घ आहे. या सर्व परंपरेविषयी काही सार निघते का ते पाहू. भालचंद्र नेमाडे म्हणतात, 'फुले पूर्वगद्यलेखकांनी इंग्रजी गद्यातील विविध उपव्यवस्था मराठीत रिचवून छापील गद्यरचना प्रमाणित करत आणली होती. त्यामुळे इंग्रजी छापाखाली मराठीची लय कायमची बिघडली होती आणि ती सुधारण्याचे सर्व प्रयत्न विफल ठरले होते. फुल्यांच्या काळातही इंग्रजीचा दबाव मराठीवर असला तरी आधुनिक युगाला आवश्यक अशा नव्या भाषिक गरजा मराठीची लिखित भाषा झपाट्याने पूर्ण करीत होती. फुले हे मराठीची प्रमाणशैली रूढ होण्याच्या या जोड्यावरच्या काळातील असल्यामुळे त्यांचे गद्य इंग्रजीचा दबाव आणि मराठीची लय यांचा संघर्ष दाखवते. त्यातून हा कालखंड हिंदू संस्कृतीच्या पुनरुत्थानाचा असल्याने नानातऱ्हेच्या निकराचे वैचारिक संघर्ष याच वेळेस सुरू होते. त्यामुळे भाषेच्या बदलत्या रचनेला फरपटत नेणारी अर्थरचनेची विलक्षण धार फुल्यांच्या गद्यशैलीला आलेली दिसते.'

भा. ल. भोळे म्हणतात, 'छापायच्या युगात आणि शिक्षकांच्या वर्तुळात जन्मलेल्या ग्रंथिक भाषेला उभा छेद देणारी जोतीरावांची भाषा चिपळूणकरी परंपरेपेक्षा अगदी विरुद्ध टोकाची होती. ग्रामीण श्रमिकांची व शूद्रातिशूद्रांची भाषा प्रथमच त्यांच्या लेखनामुळे मराठी गद्यात आली. हे फुल्यांचे भाषिक कार्य फारच महत्त्वाचे आहे..... विचारांच्या जोडीलाच वास्तव परिस्थितीचे भेदक वर्णन करून फुले शेतकऱ्यांच्या असूडमध्ये वाचकांपुढे ठेवतात, तेव्हा तत्कालीन खंडनमंडनपरनिबंधापेक्षा अगदीच वेगळ्या प्रकारचा निबंध त्यांच्या लेखणीतून उतरलेला दिसतो.'

धनंजय कीर, स. ग. मालशे म्हणतात, 'महात्मा फुले यांच्या भाषेत स्वाभाविकता, अंत:करणाला भिडणारा घाट आणि निकोप रोखठोकपणा आला. त्यांचे लेखन हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाच आविष्कार असल्यामुळे त्याला अकारण सौम्यता, संकोच, आर्जवीपणा, नागरता व औपचारिकता यांचा स्पर्शही आढळलेला नाही. त्यांची भाषा रांगडी, चढाईखोर, झणझणीत आहे. तिच्या ठाई टवटवीत ताजेपणा व दणकट जिवंतपणा आहे. सत्यशोधक चळवळ ही भारतातील खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचलेली चळवळ होती. ही चळवळ म्हणजे खेडूतांना शिक्षण आणि ज्ञान देऊन त्यांच्या ठाई वसत असलेली अज्ञानाची पूर्वग्रहांची जळमटे झटकून टाकून आधुनिक संस्कृतीचे आणि ज्ञानाचे लोण त्यांच्यापर्यंत पोहोचवणारे एक सामाजिक प्रबोधिनी होती. सत्यशोधक समाजाच्या वैचारिक साहित्याचे हे साहित्यगत मूल्य आणि वेगळेपण लक्षात घेणे आवश्यक आहे.'

सत्यशोधक समाज, वैचारिक साहित्य आणि समकालीन वास्तव :

सत्यशोधक समाजाने विचार दिले. चिकित्सा केली. समाजव्यवस्थेवर प्रहार केले, पर्यायी व्यवस्था निर्माण केली. समाजाचे विचार हे सध्या तळागाळापर्यंत पोहोचतात का? की निव्वळ अकादमिक राहिले ? समाजाचे प्रारंभीच्या विचारांचा अंगीकार सध्याचे समाजी करतात का? मुकुंदरावांसारखे वारकरी सप्ताहामध्ये जाऊन समजावून सांगायचे. सत्यशोधक समाजाचे विचार पोहोचवायचे. या पार्श्वभूमीवर सध्या काय दिसते? विचारांच्या, अनुयायांच्या अभेद्य भिंतींमुळे चर्चा टाळल्या जाऊन निव्वळ वाद होतात. एकमेकांशी संवाद हरवत चालला आहे. त्या पार्श्वभूमीवर मुकुंदरावांचा अनुयय केला जातो का ? मुकुंदराव हे व्यायाम करायचे. त्यांना आयुर्वेदाचे ज्ञान होते. त्यांना वनस्पतींचे उत्तम ज्ञान होते. लोकांवर मोफत औषधोपचार करायचे. ही माणसाविषयीची कणव आणि आस्था दिसते का? म्हणून सत्यशोधक समाजाचे वैचारिक साहित्य हे वैचारिक साहित्य निव्वळ शाब्दिक, घटपटादी चर्चा करणारे नव्हते. या साहित्याला कृतिप्रवणतेची जोड होती. या लेखनात निव्वळ शूद्रातिशूद्रांचा कळवळा नव्हता, तर सर्व वंचितांविषयक एकूण मानव्याविषयी आस्था होती. माणसांमध्ये समता यावी, यासाठी विचार आणि त्यांना प्रत्यक्ष मदत होती. म्हणून हे वैचारिक साहित्य निष्क्रिय असण्यापेक्षा सतत कृतीशील राहिले. जेव्हा ते कृतीशील राहिले, तेव्हाच ते समाजाच्या जवळ राहिले, हे सत्य विसरून चालणार नाही.

संदर्भ ग्रंथ :

१ महात्मा फुले समग्र वाङ्मय, संपा. धनंजय कीर, स. ग. मालशे
२ सत्यवेध, जी. ए. उगले
३ एकोणिसाव्या शतकातील वैचारिक गद्य, खंड १ व २, संपा.भास्कर लक्ष्मण भोळे
४ सत्यशोधकांचे अंतरंग, जी. ए. उगले
५ सत्यशोधकीय नियतकालिके, अरुण शिंदे

◆◆◆

सत्यशोधकीय स्त्रियांचे साहित्य

- प्राजक्ता शित्रे

स्त्रियांच्या व शेतकऱ्यांच्या प्रश्नाला भिडणे आणि समाज जागृतीसाठी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करणे इत्यादी घटनांनी एकोणिसावे शतक उजळून निघाले. महात्मा फुले यांनी समाजसुधारणे बरोबरच आरोग्य, स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, केशवपन, भ्रूणहत्यासारख्या कळीच्या मुद्यांना हात घातला. या सर्वाचे फलित म्हणजे स्त्रिया वाचन लेखन करू लागल्या. महात्मा फुले यांनी स्त्रियांना लेखन प्रेरणा दिली.

एकोणिसावे शतक हे ज्ञान-विज्ञानाचे, प्रबोधनाचे, क्रांतीचे आणि सर्जनशीलतेचे शतक होय. बहुजन समाजाच्या जीवनातील शतकानुशतकाचा अंधार दूर करणारे शतक. इंग्रजांचे आगमन, १८४८ साली महात्मा फुले यांची पहिली मुलींची शाळा, सावित्रीबाई फुले यांची शिक्षिका म्हणून कार्याला सुरुवात इत्यादी क्रांतीकारी घटना भारताच्या दृष्टीने महत्त्वाच्या होत. दर्पण (१८३२), प्रभाकर (१८४८), दीनबंधु (१८७७), सुधारक (१८८८) इत्यादी साप्ताहिक व मासिकांनी स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणे, स्त्रियांच्या व शेतकऱ्यांच्या प्रश्नाला भिडणे आणि समाज जागृतीसाठी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करणे इत्यादी घटनांनी एकोणिसावे शतक उजळून निघाले. महात्मा फुले यांनी समाजसुधारणे बरोबरच आरोग्य, स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, केशवपन, भ्रूणहत्यासारख्या कळीच्या मुद्यांना हात घातला. या सर्वाचे फलित म्हणजे स्त्रिया वाचन लेखन करू लागल्या. महात्मा फुले यांनी स्त्रियांना लेखन प्रेरणा दिली. सत्यशोधक समाजातील लेखिका सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, मुक्ताबाई साळवे, फुलवंताबाई झोडगे, तानुबाई बिर्जे, श्रीमती रत्नाम्माबाई अय्यावारु, शांताबाई पाळेकर, सावित्रीबाई रोडे, नलिनी लढके, शांताबाई बनकर, जनाबाई रोकडे आणि आनंदीबाई शिर्के यांच्या लेखनाचा शोधनिबंधात विचार केला आहे.

सावित्रीबाई फुले

सावित्रीबाई फुले स्त्रीमुक्ती चळवळीच्या प्रणेत्या, भारतीय स्त्रीवादाची जननी, बहुजनसमाजाच्या मार्गदर्शक, उद्धारक आणि क्रांतीकारी नेत्या होत. सत्यशोधक समाजाच्या धडाडीच्या कार्यकर्त्या. थोर समाजसुधारक जोतिराव फुले यांच्या अर्धांगीनी. त्या प्रतिभासंपन्न कवयित्री शिक्षणतज्ज्ञ, समाजसुधारक, आणि तत्त्वनिष्ठ विचारवंत होत, याचा प्रत्यक्ष परिचय त्यांच्या कार्यातून व लेखनातून दिसतो. 'काव्यफुले'(१८५४),'बावन्नकशी सुबोध रत्नाकर'(१८९१), सावित्रीबाईंनी जोतिबांना

लिहिलेली पत्रे (१८५६-१८७७), 'मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे व गाणी'(१८९२), 'जोतिबांची भाषणे'(संपा. २५ डिसेंबर१८५६) इत्यादी साहित्यसंपदा आहे. 'काव्यफुले'(१८५४) आणि 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' (१८९१) हे दोन काव्यसंग्रह मा. गो. माळी यांनी संपादित केली आहेत. वाङमयेतिहासात सावित्रीबाईंच्या काव्याचा कुठेही उल्लेख नाही. आधुनिक कवितेची सुरूवातच मुळी सावित्रीबाईंच्या 'काव्यफुले' या संग्रहातील 'शिकणेसाठी जागे व्हा' या कवितेत त्या म्हणतात, ''उठा बंधुनो अतिशूद्रानो, जागे होऊनि उठा, परंपरेची गुलामगिरी ही, तोडणेसाठी उठा, बंधुनो शिकणेसाठी उठा''[१] किंवा दूर फेकुनि रूढी द्यारे, परंपरेची मोडुनि दारे, लिहीणे वाचणे शिकून घ्यारे, छान वेळ आली.[२] अशा प्रकारे मानवाने जुन्या मतांना नाकारून नवा आधुनिक दृष्टिकोन स्वीकारावा ही नव्या क्रांतीची नांदी ठरेल असा सर्वसामान्यांना धडा दिला. सावित्रीबाईंनी समतेची, क्रांतीची, रूढी-परंपरा नाकारण्याची व्यक्तीस्वातंत्र्याची युगप्रवृत्ती, कृती आणि उक्तीने प्रेरणा दिली. कवी केशवसुत (१५ मार्च १८६६ - ७ नोव्हेंबर १९०५) यांना आधुनिक मराठी कवितेचा पहिला मान संशोधकांनी व अभ्यासकांनी दिला आहे. परंतु काळाचा विचार करता हे बरोबर नाही. केशवसुतांच्या अगोदर अशा प्रकारचे काव्य कोणी लिहिले आहे का? याचा वाङ्मयाच्या इतिहास लेखकांनी एक तर शोध घेतला नाही आणि जर घेतला असेल तर त्याची दखल घेतली नाही. सावित्रीबाईंना अनुल्लेखाने मारण्याचा प्रकार आहे. 'काव्यफुले' या कवितासंग्रहाचा काळ १८५४ हा आहे. आणि केशवसुतांचा जन्म १५ मार्च १८६६ चा आहे. म्हणजेच केशवसुतांच्या जन्माअगोदर सावित्रीबाईंचे काव्यलेखन झाले आहे. 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड १ या ग्रंथात अरुणा ढेरे म्हणतात की, 'ही काव्यसंपदा सावित्रीबाई फुले यांचीच आहे, असा निर्णय आज तरी मराठीचे सर्व अभ्यासक संशोधक एकमताने देत नाहीत. मात्र कवितेतले विचार आणि तिचे स्वरूप पाहता ती सावित्रीबाईंचीच निर्मिती असावी, असे या संदिग्ध परिस्थितीत वाटते. क्षणभर नाव बाजूला ठेवून इथे विचार करायलाही हरकत नाही. तसा विचार केला तर मग मराठीतल्या निर्भय, सामाजिक कवितेचा तो प्रारंभबिंदूच मानला पाहिजे.'[३] थोडक्यात नाव बाजूला ठेवून किंवा जातीभेद लक्षात घेऊन इतिहास लिहिता येत नाही. जेव्हा असा इतिहास लिहिला जातो तेव्हा समाजाची आणि देशाची मोठी हानी होते.

सावित्रीबाई फुले यांचा 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हा दुसरा काव्यसंग्रह. यात एकूण बावन्न कडवी आहेत. 'सावित्री जोतीबा विरचित बावनकशी सुबोध रत्नाकर' असे नाव दिले आहे. महात्मा फुले यांचे हे पहिलेच काव्यमय चरित्र आहे.[४](सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, पृ.१९)

पहिल्या भारतीय महिला पत्रकार व संपादक तानुबाई बिर्जे, आद्य दलित लेखिका मुक्ताबाई साळवे, पहिल्या दलित महिला संपादक सावित्रीबाई रोडे या सगळ्या सावित्रीबाईंच्या विद्यार्थिनी होत्या.[५] सगुणाबाई क्षीरसागर, फातिमा शेख यांचे सहकार्य मोलाचे होते.

मुक्ताबाई साळवे

मुक्ताबाई साळवे ही मातंग समाजातील चौदा वर्षाची मुलगी. तिने 'मांग- महाराच्या दु:खाविषयी निबंध' या विषयी आत्मकथनपर निबंध लिहिला. 'ज्ञानोदय'च्या १५ फेब्रुवारी १८५५ व १ मार्च १८५५च्या अंकात प्रसिध्द झाला.[१३] निबंधाच्या पूर्वार्धात एकोणिसाव्या शतकातील शैक्षणिक अवस्था, मांग महारांचे शोषण, वेद अध्ययन करण्याचा अधिकार नाकारणे, मांग महारांना हाकलून देऊन त्यांच्या जागा बळकावणे इत्यादी नोंदी केल्या आहेत. इंग्रजांचे राज्य ईश्वरानेच पाठवले असा भोळा भाव व्यक्त होतो.[१४] निबंधाच्या उत्तरार्धात उच्च वर्ग महारा-मांगाची संपत्ती लुटण्याची आणि गरोदर बायकांना देहांत शासनातून मुक्ती यावर लिहिले आहे. जुलमी बिगारी, मैदाने आणि बाजार या जागा दलितांना मोकळ्या झाल्या. या तत्कालीन घटनांचा उल्लेख निबंधात केला आहे. सावित्रीबाई फुले यांच्या हयातीतच त्यांच्या विद्यार्थिनींना लेखनाचे धुमारे फुटले ही कौतुकास्पद बाब म्हणता येईल.

ताराबाई शिंदे

ताराबाई शिंदे यांनी 'स्त्रीपुरुष तुलना'(१८८२) हा दीर्घनिबंध लिहिला. 'स्त्रिया व पुरुष यात साहसी कोण हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता हा निबंध'असे उपशीर्षक या दीर्घ निबंधाला आहे. ताराबाई शिंदे यांच्या प्रस्तावनेसह हा दीर्घनिबंध बावन्न पृष्ठांचा आहे. प्रस्तावनेत त्या लिहितात, ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टी उत्पन्न केली, त्यानेच स्त्री-पुरुष निर्माण केले. तरी सर्व प्रकारचे साहस दुर्गुण स्त्रियांचेच अंगी वसतात किंवा जे अवगुण स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरुषांत आहेत किंवा नाहीत हे अगदी स्पष्ट करून दाखवावे याच हेतूने हा लहानसा निबंध मी माझ्या सर्व देशभगिनींचा अभिमान धरून रचिला आहे. यांत अमुकच जाती किंवा कुळ याकडे माझे मुळीच लक्ष नाही. स्त्री पुरुषाची तुलना आहे.[६] स्त्री जाती अभिमानाने निर्भीड होऊन कडक शब्दात लिहिले, असे लेखनामागील प्रयोजनही सांगितले आहे.

'स्त्रीपुरुष तुलना' दीर्घनिबंधाचे दोन भाग करता येतात. एक पूर्वार्ध व दुसरा उत्तरार्ध. पूर्वार्धात अनेक विषयांची चर्चा केली आहे. उदा. स्त्री धर्म म्हणजे काय? हे सांगताना पारंपरिक, पौराणिक आणि आधुनिक स्त्री यांच्यात तुलना केली आहे. गांधारी, द्रौपदी, अहिल्या, सत्यवती, कुंती आणि तारा यांची उदाहरणे देऊन खऱ्या पतिव्रता कोण? असा सवाल केला आहे. ऋषीमुनींच्या कृतीमुळे स्त्रियांचे शोषण होत आहे. विवाहित स्त्री व विधवा स्त्रियांची कुचंबणा आणि शोषण निबंधाच्या पूर्वार्धातील मुख्य विषय आहे. उत्तरार्धात मुख्यत्वे स्त्रियांना दोषी ठरविणाऱ्या पुरुषांच्या ठायी असणाऱ्या दुर्गुणांची चिकित्सा केली आहे. उदा. पुरुष स्त्रियांवर आरोप करतात की, स्त्री म्हणजे जारणमारण यंत्र, स्त्रिया अनेक संशयाचा परिभ्रम भोवरा, स्त्रिया उद्ध्वस्ततेचे केवळ गृहच, स्त्रिया अविचारकर्माचे नगरच, सकल दोषांचे निधान, कपटाची खाण, दुर्गुणांचे उत्पत्तिस्थान आणि स्वर्ग मार्गाचा नाश करणारे यमनगरीचे द्वार इत्यादी. ताराबाई हे सर्व आरोप पुरुषांमध्ये अधिक आहेत हे त्या समप्रमाण पटवून देतात. उदा. 'स्वर्ग मार्गाचा नाश करणारे यमनगरीचे द्वार' हा दोष सांगताना त्या म्हणतात, तुम्ही जन्म कोणाच्या पोटी घेतलात. तुमचे नऊ महिने जिवापाड ओझे कोणी वागविले?[७] थोडक्यात एकोणिसाव्या शतकातील स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्या आपले विचार पेरत जातात. स्त्रियांचे शोषण करू नये यासाठी त्या बालविवाह, विधवा विवाह, केशवपन, भ्रूणहत्या, स्त्री शिक्षण इत्यादी प्रश्नांना थेट भिडतात. पितृसत्ता आणि पुरुषप्रधान व्यवस्थेवर कोरडे ओढले आहेत. ताराबाईंनी भारतीय स्त्रीवादाची पायाभरणी केली आहे.'हा लहानसा निबंध मी माझ्या सर्व देशभगिनींचा अभिमान धरून रचिला आहे.'यामागे भगिनीभाव ही संकल्पना आहे. ताराबाईंनी भाषा शस्त्रासारखी वापरली आहे. धर्मामुळे स्त्रियांवर कडक बंधने लादली जातात. ताराबाईंनी धर्मातील अनेक घोटाळे उदाहरणांसहित मांडले आहेत, असे असताना स्त्रियांना का दोष दिला जातो आणि पुरुषांना सूट का? त्या म्हणतात, बाह्यवेष मिरवी भगवाहे।। अंतरी कुमतिचे भगवाहे हे कोणाला दिसते? दक्षणेचे पैसे सांचवून रांडेकडे जायाचे, इतके करून महाराज संन्याशी.(पृ.३३) अशा प्रकारे थेट प्रश्न केला आहे.

ताराबाईंवर सत्यशोधक चळवळीचा मोठा प्रभाव होता. त्यांचे वडील बापू हरी शिंदे हे सत्यशोधक समाजाचे अनुयायी होते. त्यांच्या घरी वर्तमानपत्र, मासिके, पुस्तके असत. ताराबाई ते वाचत असत. त्यामुळे त्यांचा वाचन व्यासंग दांडगा होता. धार्मिक ग्रंथाबरोबर पंडिती साहित्य, ललित साहित्य, जोतिराव फुले यांचे ग्रंथ त्यांनी वाचले होते. 'स्त्रीपुरुष तुलना' वाचताना याचा प्रत्यय येतो. त्यांची समकालीन ललित साहित्याकडे (मुक्तामाला, मंजुघोषा) पाहण्याची चिकित्सक वृत्ती त्यांच्यातील टीकाकाराची जाणीव करून देते. एकोणिसाव्या शतकातील परमहंस सभा, प्रार्थना समाज, आर्य समाज, सार्वजनिक सभा या सभांवर कडक शब्दात टीका केली आहे.

महात्मा फुले यांनी त्यांच्या 'सत्सार'(१८८५)[८] या अनियतकालिकाच्या अंकात पंडिता रमाबाई व ताराबाई शिंदे यांचा गौरवाने तीन वेळा उल्लेख आला आहे. त्यांच्यावर टीका करणाऱ्या ब्राह्मण व शूद्र पत्रकारांचा

समाचार घेतला आहे. 'ताराबाई पंडिता रमा यांस जाति दादा वैभवे शिकविण्यास।।६।। स्वस्त्रियांते जरि ज्ञान दिले होय। रमातारेशी तरिच शिकवू जाय।।७।।'[९] याचप्रमाणे पृष्ठ ३७३ वरही ताराबाईंवर टीका करणाऱ्या नारायण मेघाजी लोखंडे यांचा समाचार घेतला आहे. त्यावेळी 'दीनबंधु' अंकातही टीका आली होती. नारायण मेघाजी लोखंडे मुंबईत 'दीनबंधु'चे काम पाहात होते. तेव्हा टीका ही त्यानी केली हे स्पष्ट होते

पाश्चात्य लेखिका प्राध्यापक रोझालिंड ओहेन्लन (Rosalind(Polly)O'Hanlon) यांनी तारबाईंच्या 'स्त्रीपुरुष तुलना' दीर्घनिबंधाचा "A Comparison Between Women and Men: Tarabai Shinde and the Critique of Gender Relations in Colonial India' असे भाषांतर केले आहे. त्यांच्यामुळे जगभरातील स्त्रियांना ताराबाईंचा निबंध वाचता आला. महात्मा फुले यांच्या साहित्याचाही त्यांनी अभ्यास केला. त्या म्हणतात की, ताराबाई शिंदे आणि फुले एकमेकांना भेटले नसावेत. पण फुलेंना ताराबाई माहित होत्या आणि ते त्यांचे कौतुक करत असत. त्यांचा दृष्टिकोण परस्परपूरक होता.[१०] रामचंद्र गुहा यांनी ताराबाई शिंदे यांचा समावेश आधुनिक भारताचे विचारस्तंभ मध्ये गौरवाने केला आहे.

फुलवंताबाई झोडगे

फुलवंताबाई झोडगे जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, सावित्रीबाई फुले यांच्या आद्य चरित्रकार म्हणून उभा महाराष्ट्र त्यांना ओळखतो. त्यांनी 'सई' सामाजिक कादंबरी, 'ज्ञानेश्वर नीति', 'तुकाराम नीति', 'थोर शिवाजी', 'राजमाता जिजाबाई' इत्यादी पुस्तकं लिहिली. 'रोहिणी', 'गावगाडा', संध्या', 'समाज शिक्षण' इत्यादी नियतकालिकातून लेखन केले. स्त्रियांच्या विविध प्रश्नांवर लेखनाद्वारे स्त्रियांना सजग केले. शिबिरे व महिला मेळावे आयोजित करून त्यांच्यात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक समता, स्त्री शिक्षण, कमकुवत गटांतील मुलामुलींचे शिक्षण यासाठी त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. महाराष्ट्र शासनाने १९८२-८३ साली सावित्रीबाई फुले पुरस्कार देऊन तसेच पुणे महानगरपालिका, भारती विद्यापीठ, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मिशन या संस्थांनी पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.[११] दादासाहेब झोडगे यांना 'गावगाडा'हे पत्र चालवताना फुलवंताबाई यांनी शेवटपर्यंत साथ दिली.

पत्रकार व संपादक तानुबाई बिर्जे

कृष्णराव भालेकर यांनी १ जानेवारी १८७७ रोजी 'दीनबंधु'हे सत्यशोधक समाजाचे पत्र सुरू केले. त्यानंतर हे पत्र मुंबईत नारायण मेघाजी लोखंडे यांनी सुरू ठेवले. त्यांच्या मृत्यूनंतर हे पत्र सत्यशोधक समाजाचे सभासद वासुदेव बिर्जे यांनी दामोदर यंदे यांच्या साहाय्याने ते सुरू ठेवले. वासुदेव बिर्जे हे बडोद्याहून ग्रंथपालाच्या नोकरीला रामराम ठोकून आले. १९०८साली बिर्जे यांचा महामारीच्या साथीत अंत झाला. त्यानंतर तानुबाई बिर्जे यांनी लक्ष्मण ठोसर आणि बापूराव आवटे यांच्या मदतीने 'दीनबंधु' हे पत्र चार-पाच वर्ष चालवले.[१२] महिला संपादक म्हणून काम पाहिले. तानुबाई संपादित 'दीनबंधु'दर शनिवारी सायंकाळी मुंबईतून प्रसिध्द होत असे. (सत्यशोधकांचे अंतरंग पृ.४१५) त्या काळी ही गोष्ट फार महत्त्वाची होती.

शांताबाई पाळेकर

भगवंतराव पाळेकर यांनी 'जागृति' हे पत्र बडोदे येथे सुरू केले. शांताबाई पाळेकर या भगवंतराव पाळेकर यांच्या त्या सहचारिणी होत. त्यांच्या 'जागृति'या वृत्तपत्रासाठी त्यांनी सहकार्य केले. कामकाजावर जातीने लक्ष घालणे, पत्रासाठी मजकूर लिहिणे, पत्राच्या घड्या घालणे, पत्राची मोजणी इत्यादी कामे त्या दक्ष राहून करत असे. १९२९ साली मंदी आली होती.[१३] शांताबाईंनी त्या काळात तर 'जागृति'या वृत्तपत्रासाठी वाहून घेतले.

प्रकाशक रत्नाम्माबाई अय्यावारू

रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांनी १९११ साली महात्मा फुले यांच्या 'गुलामगिरी' या ग्रंथाची दुसरी आवृत्ती काढली होती. ती दहा महिन्यात संपली. त्यामुळे तिसरी आवृत्ती काढावयाची होती. दरम्यानच्या काळात रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांचे निधन झाले.

श्रीमती रत्नाम्माबाई अय्यावारू यांनी मोठ्या हिंमतीने १९१२ साली तिसरी आवृत्ती काढली. दुसऱ्या आवृत्तीस जोडलेल्या जोतिरावांच्या अल्पचरित्राचा कर्ता कोण याबद्दल नामनिर्देश केलेला आढळत नाही. हे अल्पचरित्र बहुधा रामय्या अय्यावारूंनीच लिहिले असावे. तिसऱ्या आवृत्तीस जोडलेले जोतिरावांचे चरित्र नारायणराव नवल्यांनी पाठविलेल्या चरित्राच्या आधारे सुधारले असल्याचा स्पष्ट उल्लेख रत्नाम्माबाई अय्यावारूंनी प्रस्तावनेत केलेला आढळतो.[१६] त्यांचे अनमोल कार्य विसरता येणार नाही.

पहिल्या दलित महिला संपादक आणि नेत्या सावित्रीबाई रोडे

सत्यशोधक सावित्रीबाई तात्यासाहेब रोडे या महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या मूळ पुणे शाखेच्या अग्रणी कार्यकर्त्या, पदाधिकारी, पुढारी आणि 'क्षत्रिय रामोशी संघ, पुणे' या संस्थेच्या संस्थापक सचिव होत. महात्मा फुले यांची इ.स.१८५६ साली सनातन्यांची सुपारी घेऊन हत्या करावयास आलेल्या धोंडिबा आवजी रोडे यांच्या त्या सुनबाई होत. 'शिक्षण' (सासवड,१९१४), 'शिक्षणापासूनचे लाभ' (अहमदनगर, १९१५), सत्यशोधक समाजाची अनेक अधिवेशनं आणि परिषदांमध्ये सक्रिय सहभाग घेतला व मार्गदर्शन केले. इ.स. १९२० च्या चिंचवड येथे दुसऱ्या रामोशी शिक्षण परिषदेत सावित्रीबाईंना 'विद्यादेवी' या बिरुदावलीने गौरविले. १९२१ साली जनगणना तोंडावर असताना सत्यशोधकांना त्यांनी सुचवले की, 'धर्म आणि जातीच्या रकान्यात स्वधर्म-जातीचा उल्लेख न करता 'सत्यशोधक'अशी नोंद करावी.'[१७]

नलिनी लढके

नलिनी लढके यांचा जन्म अमरावती येथे कोल्हाटी कुटुंबात झाला होता. अमरावतीच्या सत्यशोधक चळवळीच्या 'बेलोरा'गावी शिक्षिका म्हणून अध्यापन केले. सत्यशोधक चळवळीत सक्रिय सहभाग. ९ मे १९४३ रोजी कडवे सत्यशोधक आनंदराव लढके यांच्याशी आंतरजातीय विवाह. 'अशी जगली सावित्रीबाई फुले', हा लेख आणि 'सत्यशोधकांची वारस'हा आत्मचरित्रपर ग्रंथ प्रसिद्ध आहे.[१८]

शांताबाई बनकर

शांताबाई या बिनीचे सत्यशोधक रघुनाथराव बनकर यांच्या कन्या होत. 'सावित्रीबाई जोतीराव फुले यांचे अल्पचरित्र' १९३९ साली लिहिले. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याची महती कालक्रमान्वये सांगणारी ही पहिलीच पुस्तिका होय.[१९]

आनंदीबाई शिर्के

आनंदीबाई शिर्के यांनी अ. भा. मराठा शिक्षण परिषदेत २९ डिसेंबर १९१३ रोजी 'स्त्रियांची सुधारणा करणार, की होऊ देणार' या निबंधाचे वाचन केले.[२०] या निबंधसत्रात सत्यशोधक जनाबाई रोकडे होत्या. आनंदीबाई शिर्के यांनी 'सांजवात' आत्मचरित्रात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, सयाजीराव महाराज गायकवाड आणि सत्यशोधक मंडळींचा गौरवाने उल्लेख केला आहे. या सर्वांच्या कार्याचा आणि विचारांचा परिणाम आनंदीबाईंवर झाला. त्यांचे स्वत:चे विचार अधिक प्रगल्भ होत गेले. त्यांनी जीवनामध्ये सुधारकी विचार आत्मसात केले. प्रेमविवाह केला. हुंडा न घेता देता मुलांचे विवाह पार पाडले. सामाजिक कार्यात सहभागी होत. पुण्याला त्या जेधे मेन्शनमध्ये गेल्या होत्या. आनंदीबाईंनी कथा, कादंबरी, बालकथासंग्रह, आत्मचरित्र, अनुवादित साहित्य, शालेय पुस्तके इत्यादी साहित्यप्रकारात लेखन केले.आनंदीबाई शिर्के यांच्या लेखनाची पाहिजे तशी दखल वाङ्मयेतिहासकारांनी घेतली नाही. त्यांच्या 'रूपाळी' कादंबरीचा कुठेही उल्लेख नाही. आनंदीबाईंनी 'मराठामित्र' कडे एक गोष्ट लिहून पाठवली होती. मोबदलाही मागितला. गोपाळराव दाजीबा दळवी हे मासिक चालवत असे. ती गोष्ट पुष्कळांना आवडली. संपादकांना पत्रे आली. त्यात एक पत्र श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे होते. त्यांनी विचारले होते, ही गोष्ट कुणी लिहिली? पुरुषाने लिहून स्त्रीच्या नावाने छापली नाहीना?[२१] या आठवणी त्यांनी आत्मचरित्रात सांगितल्या आहेत. थोडक्यात स्त्रिया लेखन करू लागल्या तेव्हा पुरुष लेखकांचा विश्वास बसत नव्हता. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्रीपुरुष तुलना'हा निबंध

लिहिला नसून तो फुले यांनीच तर लिहिला नसेल',[२२] अशी शंका खुद्द डॉ. स. गं. मालशे यांनी व्यक्त केली.

सत्यशोधक जनाबाई रोकडे

सत्यशोधक जनाबाई रोकडे यांनी अ. भा. मराठा शिक्षण परिषदेत २९ डिसेंबर १९१३'स्त्री शिक्षण' याविषयी निबंध वाचन केले.

थोडक्यात सत्यशोधक समाजातील अनेक स्त्रियांचे लेखन आजही अज्ञात आहे. जे उजेडात आले आहे त्याच लेखनावर या शोधनिबंधात आढावा घेतला आहे. सत्यशोधक स्त्रियांचे हे कार्य देदिप्यमान असेच आहे. वाङ्मयइतिहासकारांनी याची दखल घेतली नाही. उलट सत्यशोधक चळवळीतील लेखकांना अनुल्लेखाने मारल्याचे सिद्ध होते. सत्यशोधकीय स्त्रियांच्या साहित्याचा शोध घेऊन ते प्रकाशात आणणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

संदर्भ ग्रंथ

१. 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय': संपा. मा. गो. माळी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई ३२, पृ. २४.
२. तत्रैव, पृ.२९.
३. 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड १'(इ. स. १८५० ते १९५०): संपा. डॉ. मंदा खांडगे व इतर, सहित्यप्रेमी भगिनी मंडळ पुणे. प्रथमावृत्ती डिसेंबर २००२, पृ.६२.
४. संपा. मा.गो. माळी,पृ. ८२.
५. महाराष्ट्र टाइम्स, पुणे, ८ ऑगस्ट २०१४. पृ. १२.
६. 'स्त्रीपुरुष तुलना': संपा. विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, दुसरी आवृत्ती १ जून १९९९, पृ. ८७.
७. तत्रैव, पृ. १३४.
८. 'महात्मा फुले समग्र वाङ्मय': संपा. य. दि. फडके, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, चौथी आवृत्ती, जानेवारी १९९१, पृ.३६५.
९. तत्रैव, पृ. ३७१.
१०. 'आधुनिक भारताचे विचारस्तंभ': रामचंद्र गुहा (अनुवाद शारदा साठे) रोहन प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती २०२०, पृ. १५५.
११. 'पहिली भारतीय शिक्षिका सावित्रीबाई फुले': सौ. फुलवंताबाई झोडगे, प्रकाशिका कुमुदिनी यावलकर, नागपूर, चौथी आवृत्ती २००४, पृ. ३.
१२. 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास': रा. के. लेले, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे ३०, चौथी आवृत्ती २०२० पृ. १७२
१३. विलास खोले, उनि, पृ. १९७.
१४. तत्रैव, पृ. १९५.
१५. रा. के. लेले, उनि, पृ. ४४०.
१६. संपा. य. दि. फडके, उनि, पृ. १११-११२.
१७. सत्यशोधकांचे अंतरंग : जी. ए. उगले, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृती २०१७, पृ.५३७.
१८. तत्रैव, पृ. ५४७.
१९. तत्रैव, पृ.३९६.
२०. तत्रैव, पृ. ५३४.
२१. 'सांजवात', मौज प्रकाशन गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, जून १९७२, पृ.९१.
२२. 'स्त्री-पुरुष-तुलना': संपा स. गं. मालशे, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९७५, पृ. १-२.

◆◆◆

महात्मा फुले व सत्यशोधक चळवळ

- शोभा शिंदे

हिंदू समाजातील बहुजन समाजात आत्मप्रत्यय व आत्मलोकन करण्याची आवश्यकता फुल्यांना प्रकर्षाने जाणवली. जोतीबा फुलेंचा विश्वास होता की, ज्यांना स्वत:ची गुलामगिरी समजत नाही ते गुलामगिरीतून कधीही मुक्त होऊ शकणार नाही. शतकानुशतके अज्ञानाने, दारिद्र्याने व हीन संस्कृतीने ग्रासलेल्या हिंदू समाजातील जनतेला आत्मपरीक्षण करण्यास प्रथमत: भाग पाडले.

१९ व्या शतकामध्ये उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या अनेक थोर विभूती महाराष्ट्रात होऊन गेल्या. समाज क्रांतीचा अग्रणी व संघटक म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासात महात्मा जोतिबा फुले यांचे स्थान अढळ आहे. ते सुधारकांचे सुधारक ठरतात. त्यांनी काळाच्या खूप पुढे विचार तर केलाच पण धाडसी कृतीही केली. स्त्रिया, शूद्रातिशूद्र, शेतकरी, कष्टकरी यांच्या हीन-दीन आयुष्यात सामाजिक प्रतिष्ठेचा प्रकाश आणला. त्यांचे तेजस्वी कार्यकर्तृत्व व ओजस्वी जीवन हे एकमेवाद्वितीयच आहे.

सामाजिक समता, धार्मिक सहिष्णूता, आर्थिक न्याय व शोषणमुक्ती यासाठी जोतीरावांनी अथक प्रयत्न केले. त्यांच्या पुरोगामी विचारांना कृतीची जोड तर होतीच, पण कर्तव्य व मानवतेची बैठक होती. यामुळेच जोतीराव फुल्यांनी चळवळीतून, लेखनातून त्यांनी स्थापन केलेल्या संघटनांमधून समाज-क्रांती घडवून आणली. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या नव्या प्रेरणांचे संवर्धन व संगोपन त्यांनी केले. सामाजिक, आर्थिक, धार्मिक क्षेत्रात आमूलाग्र बदल व परिवर्तनाचा ध्यास घेतलेले महात्मा फुले हे विद्रोही चळवळीचे आद्य संघटक आहेत.

हिंदू समाजातील बहुजन समाजात आत्मप्रत्यय व आत्मलोकन करण्याची आवश्यकता फुल्यांना प्रकर्षाने जाणवली. जोतीबा फुलेंचा विश्वास होता की, ज्यांना स्वत:ची गुलामगिरी समजत नाही ते गुलामगिरीतून कधीही मुक्त होऊ शकणार नाही. शतकानुशतके अज्ञानाने, दारिद्र्याने व हीन संस्कृतीने ग्रासलेल्या हिंदू समाजातील जनतेला आत्मपरीक्षण करण्यास प्रथमत: भाग पाडले ते जोतीबांनी. देवाविरुद्ध, धर्माविरुद्ध, तीर्थस्थानांविरुद्ध, पुरोहितशाही विरुद्ध, धर्मग्रंथाविरुद्ध, जातीपाती विरुद्ध, स्त्री-पुरुष विषमता, परंपरेविरुद्ध लढा देणारे जोतीबा यांनी स्वत: याची ऐतिहासिक पार्श्वभूमी लिहून ठेवली आहे.

त्याकाळी ब्राह्मण पेशव्यांच्या हातात मराठी राज्यांची सगळी सूत्रे होती. त्यांच्या राज्यपद्धतीमुळे

अवनतीची बीजे फोफावली होती. हिंदू समाजरचनेचे अंगभूत व स्वाभाविक दोष अधिक उग्र व घनित स्वरूपात प्रकट झाले होते. कायद्याचे स्वरूप अगोदरच अस्पष्ट, ओबड-धोबड व अशास्त्रीय होते. कायद्याची अंमलबजावणीची पद्धत नासलेली होती. सारावसुली, कर्जवसुली व मजुरीची पद्धत फारच जाचक होती. यासंबंधी जोतीबा फुले यांनी ''इशारा'' या त्यांच्या निबंधात मार्मिक चित्र उभे केले आहे:

''थोडकेच दिवसामात्र आर्य पेशवे यांचे शेवटील कुलदीपक पुरुष बाजीराव यांचे कारकीर्दीचा अस्त होईपर्यंत शेतकरी लोक शेतसारा देण्यास थोडे चुकले तर त्यास उन्हामध्ये ओणवे करून पाठीवर एक मोठा दगड देत किंवा त्यांची बायको पाठीवर बसवित आणि खालून मिरच्यांचा धूर देत. ते प्रजा म्हणजे एक प्रकारचे जनावरच समजत. त्यांचा उपयोग म्हणजे त्यांनी राजाकरिता व त्यांच्या जातीच्या लोकांकरता धान्य उत्पादन करावे. वस्त्र विणावित, उन्हातान्हात खपावे, ऐषारामाच्या सर्व गोष्टी पुरवाव्यात.''

जोतीबा पुढे लिहितात : 'त्यावेळेस त्या सरकारात फिर्याद वगैरे लागत नसे. कारण त्यांचे (सावकारीचे) घरातच सरकार होते. मनास वाटेल त्याप्रमाणे कुळास मारावे, झोडावे, त्याचा सर्व माल हिसकावून घ्यावा... त्याच्या मुलामाणसांचे हालहाल करावे, त्यांच्या डोक्या अथवा पाठीवर भले मोठे थोरले धोंडे देऊन भर उन्हात उभे करावे, शरीराच्या नाजूक भागास चाप लावावेत, कोलदांडा घालून मार द्यावा. सात-आठ रुपयांसाठी शेत जाई, गुरे-ढोरे जाई, तळे-मळे जाई आणि सरतेशेवटी तोही देशोधडीस जाण्यास अथवा प्राणत्याग करण्यास सिद्ध होई (लोकराज्य, १९)

जातीभेदाची तीव्रता एखाद्या अवजड यंत्राप्रमाणे सामान्य जनतेला दडपू पहात होती. प्रजेतील उमेद संपली होती. जोतीबांना कळले की, हिंदू समाजाच्या अधोगतीचे मूळ हिंदू समाजात हजारो वर्ष चालत आलेली व खोलवर रुजलेली सामाजिक गुलामगिरीत आहे. या गुलामगिरीच्या मुळाशी ब्राह्मणांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेला धर्म यास जबाबदार आहे. निरक्षरता व दारिद्र्यामुळे बहुजनसमाजावर होणाऱ्या अन्यायाची एकतर जाणीवच नव्हती व अन्यायाचे परिमार्जनाचे मार्ग सूचत नव्हते. जोतीरावांनी जाणले की, शिक्षणाशिवाय ही गुलामगिरीची बेडी सामान्यांना तोडता येणार नव्हती. अंधश्रद्धा भोळाभाव, अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी आधुनिक शिक्षण जरुरी होते. त्यामुळे जनता जातीभेद, अस्पृश्यता, दारिद्र्य, स्त्रियांचे शोषण व इतर प्रकारची आर्थिक व सामाजिक बंधने नष्ट करण्यास समर्थ असेल.

हरी नरके लिहितात : ''जोतीरावांनी आधुनिक विचारांच्या प्रभावाने आणि आंतरिक कळवळ्याने प्रेरीत होऊन भारतीय समाजव्यवस्था आमूलाग्र बदलून टाकण्यासाठी समग्र सामाजिक क्रांतीसाठी विचार मांडले. संघटित चळवळी उभारल्या, सर्वदूर संघर्ष केला. त्यांनी ज्ञानार्जन, जातीनिर्मूलन, धर्मचिकित्सा आणि मध्यस्थ (दलाल) हटाव या सर्वांसह स्त्री-पुरुष समानतेच्या प्रेरणा समाजात रुजविण्यासाठी आयुष्य वाहिले''.

पुरुष प्राधान्य व जातीभेद यांच्यावर फुलेंनी कठोर प्रहार केला. स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार त्या काळात इतक्या मूलगामी युक्तीवादांच्या आधारे व सातत्य राखून करणारे जोतीबा फुले हे स्त्री-मुक्तीचे आद्य कैवारी आहेत. स्त्रियांसाठी शाळा उघडणे, समाज रोष पत्करून स्वत:च्या पत्नीला साक्षर करून शिक्षिका म्हणून प्रशिक्षित करणे, विधवांचे केशवपन टाळण्यासाठी न्हाव्यांचा संप घडवून आणणे, कोणाच्या तरी वासनेला बळी पडलेल्या निराधार स्त्रियांसाठी प्रसूतिगृह उघडणे, आश्रम चालविणे, अशी ठोस कामगिरी फुलेंनी केली. स्त्रीदास्याच्या मागील कारणांच्या खोलात जाऊन शोध घेतला. स्त्री मुक्तीचा प्रश्न हा एकूण हिंदू धर्मकांड व विषमताधिष्ठीत समाजरचनेचाच एक भाग आहे हे फुलेंनी जाणले, संपूर्ण समाज संरचना क्रांतिकारक बदलल्याशिवाय स्त्रिया बंधमुक्त होणार नाही हे त्यांनी जाणले मनुच्या स्त्री-पुरुषासाठी वेगळे असणारे नैतिकतेचे कायदे त्यांनी नाकारले. बालविवाहांचा विरोध केला. पुरुषांमध्ये बहुपत्नीत्वाच्या अनिष्ट प्रथेला नाकारले. जातीयविषमता वाढविण्यासाठीचे समाजाने स्त्री-पुरुष विषमता बळकट केली आहे. हा त्यांचा दृढ विश्वास

होता. चुकीच्या श्रद्धा व त्यावर आधारित कृत्रिम सामाजिक रचनाच जातिव्यवस्थेच्या मुळाशी आहे, ही वस्तुस्थिती जोतीबा फुलेंनी जाणली. समाजातील उच्चवर्णिय स्त्री शूद्रातिशूद्रांना माणूसपणाचा दर्जाही नाकारतात हे फुल्यांनी स्पष्टपणे मांडले. ''पशुपक्षी वगैरे प्राण्यात जातीभेद नाही तर मानवी प्राण्यातच जातीभेद कुठून असणार?'' (भा. ल. भोळे ३६५) ''फक्त त्यांच्या तोंडाच्या थापांवरून जातिभेदांचे थोतांड आपण अंधासारखे डोळे झाकून खरे मानता... हा तुमचा शूद्राचा खरा वेडेपणा आहे. (भा. ल. भोळे, ३६६)

हिंदू समाजाच्या हाडी मुरलेल्या विषमतांचे उच्चाटन करायचे असेल तर संपूर्ण व्यवस्थाच तिच्या मूल्यांसकट बदलावी लागेल हे विचार जोतीबांनी आपल्या लेखनात व्यक्त केले. धर्माची विवेकी चिकित्सा करून रयतेचे शोषण करणाऱ्या सांस्कृतिक परंपरेविरुद्ध जोतीबा एल्गार पुकारतात. विवेक आणि समता या दोन निकषांच्या आधारे जोतीबा सामाजिक बंडखोरी करतात. आमूलाग्र सामाजिक परिवर्तन व नवसमाजरचना त्यांच्या बंडखोरीची उद्दिष्टे ठरतात. 'गुलामगिरी' चे प्रकाशन व सत्यशोधक समाजाची स्थापना हे दोन्ही याचेच द्योतक आहे.

फुल्यांनी उभी केलेली सत्यशोधक चळवळ ही सामाजिक व धार्मिक पुनर्रचनेची चळवळ होती. बुद्धिप्रामाण्य. इहवाद, उदारमतवाद आणि समतावाद ही चळवळीची चतु:सूत्री होती. उच्चनीचता, भेदभाव नष्ट करणे, सामाजिक दर्जा समान करणे, शिक्षणाचे महत्त्व वाढविणे, श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देणे, स्त्री-पुरुष भेदाभेद, जातीभेद नष्ट करणे, अंधश्रद्धा व दुष्ट चालीरीती, परंपरा व रुढी नाकारणे या सर्व कार्यासाठी जोतीबा फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापन २४ सप्टेंबर १८७३ साली केली. समग्र परिवर्तनाचा आग्रह धर्माचा इहवादी दृष्टिकोनातून विचार एकेश्वरवादाचा पुरस्कार, ग्रंथप्रामाण्य व मूर्तिपूजेचा विरोध, जाती व्यवस्थेविरुद्ध टीकास्त्र, अनिष्ट रूढींचे निर्मूलन आणि मानवमात्रांची समता ही सत्यशोधक समाजाची कार्यप्रणाली जोतीबांनी निर्माण केली.

ब्राह्मणशाहीला विरोध हा जोतीरावांच्या सत्यशोधक चळवळीचा फक्त एक भाग होता. तो एकमात्र खचित नव्हता. त्याकाळी शूद्रातिशूद्रांना अज्ञानी राहू देण्यावरच आपला चरितार्थ अवलंबून आहे, हे भटभिक्षूकांनी स्वीकारले होते. पारंपरिक कर्मकांडातच गरीब रयतेला अडकवून ठेवण्यात भटभिक्षुक तरबेज होते. जोतीरावांनी या सर्वदूर खोलवर रूजलेल्या भटशाहीचा परखडपणे व संघटितरित्या विरोध केला. संपूर्ण जाती व्यवस्थाच नष्ट व्हावी व पुरोहित नामक संस्थेलाच स्पष्ट नकार दिला. सर्वच धर्माच्या पवित्र समजल्या जाणाऱ्या धर्मग्रंथांची निर्मिती ही दैवी नाही हे तथ्य त्यांना रुजवायचा होता.

सत्यशोधक समाज ही एक बंदिस्त चळवळ नव्हती. तिची बांधणी व वैचारिक भूमिका लवचिक होती. जोतीबांचे सर्व सहकारी व अनुयायी या चळवळीत सामील होते. या सर्वांना स्वतंत्र बुद्धी व कल्पकता होती व यामुळेच ही चळवळ महाराष्ट्राच्या कोपऱ्याकोपऱ्यात पसरली. शाहू महाराजांच्या काळात सत्यशोधक चळवळीला विशेष गती मिळाली. फुल्यांचा जातीभेद विरोधी, समतावादी, इहलोकवादी व विवेकनिष्ठ विचार हे शाहू महाराज आणि सयाजीराव गायकवाड यांनी पुढे नेले. रयतेपर्यंत शिक्षणाची द्वारे खुली केली व नवजागृतीचे काम सुरू ठेवले. विद्रोही चळवळीचा हा एक आदर्श नमुना ठरला. सत्यशोधक चळवळीमुळेच फुलेंची संघटनाबांधणी, वैचारिक स्पष्टता, लोकाभिमुख कामे, हितचिंतक व मित्रांची ओळख, पर्यायी समाज रचनेसाठी बांधणी व व्यूहरचना ही बहुजन समाजापर्यंत पोहोचली.

महात्मा जोतीबा फुलेंनी सामाजिक जीवनातील विकृतींवर तर हल्ला केलाच पण या विकृतीचे समर्थन करणाऱ्यांवर जोरदार प्रहार केला. त्यांनी जाती अभिमान, धर्माभिमान, पंथ निष्ठा यांना छेद देणाऱ्या मानवनिष्ठेचा प्रसार केला. स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांची रुजवात करण्याचा प्रयत्न केला. पारंपरिक ब्राह्मण-प्राधान्य वर्णवर्चस्व, धर्मग्रंथप्रामाण्य, जुन्या रूढी परंपरांना मोडीत काढून जोतीबांनी आधुनिक विज्ञाननिष्ठ, विवेकवादी मूलभूत मानवी हक्क, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही मूल्य असलेल्या समताधिष्ठीत समाजरचनेचे

विधायक काम केले.

'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक'' हा जोतीरावांचा ग्रंथ म्हणजे तर मानवमुक्तीचा महान संदेश देणारा ज्ञानकोशच आहे.'' (भा.ल. भोळे, ३२), भा. ल. भोळे पुढे लिहितात की, मानवी मनाला बंदिस्त करणाऱ्या प्रत्येक सामाजिक संस्थेवर त्यात टीकास्त्र सोडले आहे. धर्मग्रंथ, पूजाअर्चा, नामसंकीर्तन, अनुष्ठान, धार्मिक विधींपासून स्त्री-पुरुष संबंध, पाप पुण्याच्या कल्पना, जातीभेद, विवाहविधी अशा अनेक विषयांवर प्रस्तुत पुस्तकात चर्चा केली आहे. त्यांनी या सर्व चर्चेत मानवाला मध्यवर्ती स्थानांवर ठेवले आहे. सामाजिक दास्य, गुलामगिरी व शोषणाचे प्रमुख आश्रयस्थान धर्म व ईश्वर या संबंधीच्या भ्रामक कल्पना आहेत. त्यांच्या मते माणसाचा खरा धर्म एकच ठरतो तो म्हणजे 'सत्यधर्म' हा सत्यधर्म मानवी जीवनाच्या ऐहिक-नैतिक सत्यावर भर देतो. (भा. ल. भोळे, ३५)

फुलेंनी मांडलेला सत्यधर्म हा दुर्बलांची उपेक्षित शूद्र अतिशूद्रांची उपासना करतो. पाप-पुण्य, स्वर्ग-नरक तसेच चातुर्वर्णीय समाजरचनेला सार्वजनिक सत्यधर्म नाकारतो. हा सत्यधर्म विश्व मानवाच्या मुक्तीचाच मार्ग दाखवतो. धार्मिक क्षेत्रात पुरोहितगिरीवर फुले प्रखर वार करतात. ईश्वरभक्ती व माणसात कोणत्याही पुरोहिताची मध्यस्थीची गरज नाही हेच फुलेंनी मांडले. सत्यवर्तन करणारे कोणास म्हणावे याचे तेहतीस निकष जोतीबांनी ''सार्वजनिक सत्यधर्म'' या पुस्तकात दिले आहे. स्त्री-पुरुष समानता धर्मकांडाला फाटा, मूर्तीपूजा बंद करणे, प्राणीमात्रांबद्दल भूतदया, धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य, धार्मिक सहिष्णूता, लबाडी, व्यभिचार, चोरी, अघोरी कृत्ये, उच्चनीचता, अस्पृश्यता, अन्याय, पांडित्य, गंडादोरे यांना सगळ्यांना नाकारणे हे लिहिले. फुले लिहितात की श्रमिकाचा आदर्श करणे आणि मानवी प्रतिष्ठेला धक्का लागेल असे कोणतेही कृत्य होऊ न देणे हीच सत्यवर्तनाची लक्षणे आहेत. शोषणमुक्तीचा संदेश व समता, स्वातंत्र्य, बंधुत्व ही या धर्माची शिकवण आहे.

जोतीबांनी जी सत्यशोधक विवाहपद्धती सांगितली आहे. ती मूळतः स्त्री-पुरुष समानतेवर आधारित आहे. ही विवाहपद्धत स्त्रीला स्वातंत्र्य व स्वायत्त व्यक्तीचा दर्जा देते. विवाहेच्छू स्त्री-पुरुषांनी मोकळेपणी, पूर्ण सारासार विचारांनी व लहान-थोर इष्टमित्रांच्या सल्ल्याने आपल्या जोडीदारांची निवड करावी हे सुखी वैवाहिक जीवनाचे सूत्र त्यांनी सांगितले. सत्यशोधक समाजाच्या विवाह-विधीत वधू-वरांनी घ्यावयाच्या प्रतिज्ञा या स्त्री-पुरुष दोघांसाठी सारख्याच आहेत. दोघांवर सारखीच बंधने घालणारी आहे. दोघांचे व्यक्तिस्वातंत्र्य जपणारी आहे व विधायक समाज कार्याकडे वर-वधू यांनी वळावे हा संदेश देणारी आहे. या लग्नसोहळ्यात कुठेही पुरोहिताची गरज नाही. समाजाच्या साक्षीने अतिशय साधेपणाने हा विवाह संपन्न होई.

सार्वजनिक सत्यधर्म ही जोतीबांची संकल्पना ही काळाच्या खूप पुढे जाणारी होती. १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना करून व्याख्याने, पुस्तिका, लहानमोठे उपक्रम, विधायक प्रचार या सर्व माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात व तळागाळापर्यंत जनसमूहात ती प्रसृत केली गेली. धर्मामुळे, खोट्या समजुतींमुळे, अज्ञान व अंधश्रद्धेमुळे सामान्य लोकांच्या मनातील भय काढण्याचा हा प्रयत्न होता. शूद्रातिशूद्र, शेतकरी, कष्टकरी, स्त्रिया यांच्या मनात आत्मविश्वास व हक्काविषयी जाणीव, शिक्षण प्रसार अशा स्वरूपात सार्वजनिक सत्यधर्माची कल्पना आविष्कृत होत गेली. सत्यशोधक समाजाने तळागाळातील लोकांपर्यंत हा संदेश पाहेचविण्याचा प्रयत्न केला. ही पर्यायी धर्मकल्पना सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून जोतीरावांनी सर्वदूर पसरवली.

जोतीरावांचा सत्यधर्म हा सार्वजनिक आहे. तो विश्वधर्म आहे. हा धर्म कोणत्याही एका समूहाचा नाही. त्यात सांप्रदायिकता नाही. माणसामाणसात लिंग, जात, धर्म, वर्ण यांच्याआधारे पक्षपात करणे निषेधात्मक आहे. व्यक्तीचे मत स्वातंत्र्य व तिची स्वयंसिद्ध प्रतिष्ठा, बुद्धी व सदसद्विवेक बुद्धी हीच ज्ञानाची साधने आहे. अन्य धर्माविषयी सहिष्णूता हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. ही सत्यधर्माची भूमिका सार्वजनिक सत्यात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकहितवादी दृष्टिकोन अपेक्षित होता.

आधीच्या व सर्व समकालीन सामाजिक चळवळींपेक्षा सत्यशोधक चळवळीची व्याप्ती व खोली ही जास्त होती हे सर्वमान्य आहे.

फुल्यांच्या निधनानंतर सावित्रीबाई फुले, नारायण मेघाजी लोखंडे, कृष्णराव पांडुरंग भालेराव, ताराबाई शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सत्यशोधक समाजाच्या अनुयायांनी फुल्यांची चळवळ गतिमान केली. फुलेंच्या मूळ विचारांमध्ये भर घालून ती दलित आदिवासी, भटके-विमुक्त, स्त्री हक्क, अंधश्रद्धा निर्मूलन, जाती निर्मूलन, मुस्लीम सत्यशोधक, देवदासी, कष्टकरी, तसेच पर्यावरणवादी अशा अनेक आघाड्यांवर वाटचाल करण्याइतपत शक्तीशाली झाली.

आजच्या संदर्भात सत्यशोधक चळवळीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. बहुजन समाजाच्या प्रगतीत सत्यशोधक चळवळीचा मोठा हातभार आहे. या चळवळीने एक वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. अहिंसक व शांततेच्या तत्त्वावरील अढळ निष्ठेमुळे सत्यशोधक समाजाचे काम तळागाळापर्यंत पोहोचू शकले. कुठेही आर्थिक किंवा संघटनात्मक पाठबळ नसतांना प्रसंगी स्वत:च्या खिशातून चळवळीच्या कार्यकर्त्यांनी उदात्त हेतूने कार्य केले.

सत्यशोधक चळवळीचा विचार लोकांपर्यंत पोहोचावा म्हणून पत्रकार कृष्णराव पांडुरंग भालेराव यांनी स्वत:चे घर गहाण ठेवून १८७७ 'दीनबंधु' हे साप्ताहिक सुरू केले. पुढे १८८८ साली गणपतराव पाटील यांनी 'दीनमित्र' हे मासिक प्रकाशित करायला सुरुवात केली. मुकुंदराव पाटील यांनी १९१० साली 'दीनमित्र' हे साप्ताहिक सुरू केले. १९१० ते १९६७ सालापर्यंत जवळजवळ ५७ वर्षे दीनमित्र साप्ताहिक अत्यंत तडफेने व जिद्दीने मुकुंदराव पाटलांनी चालविले.

१९६५ ते १९७१ पर्यंत मुकुंदरावांचे चिरंजीव आबासाहेब पाटील यांनी 'दीनसेवा' साप्ताहिक संपादित करून उत्कृष्ट योगदान दिले. ही पत्रकार सृष्टीतील क्रांतीच म्हणावी लागेल. या कार्याचा महाराष्ट्रामध्ये मूलगामी परिणाम झाला. १९८८ साली औरंगाबाद येथे अखिल भारतीय सत्यशोधक परिषदेचे अधिवेशन झाले.

धुळ्यात अखिल भारतीय सत्यशोधक समाजाची पहिली महिला परिषद ५ व ६ ऑक्टोबर २००२ साली आयोजित केली होती. ही एक ऐतिहासिक परिषद ठरली. कारण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तळा-गाळातून जवळ जवळ ५००-६०० सत्यशोधक समाजाचे खंदे कार्यकर्ते स्त्री-पुरुष या परिषदेत सहभागी होते. त्यावेळेला सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष ॲड. वसंतराव फाळके व माजी अध्यक्ष व्यंकटराव रणधीर उपस्थित होते. परिषदेचे स्वागताध्यक्ष जयहिंद शैक्षणिक ट्रस्टचे अध्यक्ष, शेतकरी कामगार पक्षात कार्यरत असलेले सत्यशोधक समाजाचे अनुयायी ॲड. नानासाहेब झुलाल भिलाजीराव पाटील तर कार्यवाह म्हणून मी स्वत: प्रा. शोभा पदमाकर शिंदे यांनी आयोजन, संयोजन केले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा. आ. ह. साळुंखे, मा. हरी नरके, मा. सीमाताई साखरे व इतर मान्यवर आमंत्रित होते. परिषदेतील परिसंवादाचे विषय महिला प्रश्नांना व सत्यशोधक समाजाच्या जनजागृतीच्या कामास सुसंगतच होते १) माझा धर्म -सार्वजनिक सत्यधर्म २) सामाजिक गुलामगिरी विरुद्ध महिलांचे बंड. सत्यशोधक समाजाच्या महाराष्ट्राच्या वाटचालीत धुळ्यातील ही परिषद मैलाचा दगड ठरली.

आज काळ बदलला आहे. नितिमत्तेच्या कल्पना बदलल्या आहेत, तरी महात्मा फुलेंच्या विचारांची मौलिकता आणि उपयुक्तता आजही कायम आहे. आजच्या धार्मिक कलहाच्या युगात जोतीबांचे विचार आपल्याला अंतर्मुख करायला लावतात. हे विचार इतके अभिनव व सामर्थ्यशाली आहेत की ते सतत समाजाला प्रेरणा देत राहतील.

संदर्भ ग्रंथ :

१) प्रा. हरी नरके संपा., ''आम्ही पाहिलेले फुले'' महाराष्ट्र शासन, अकरावी आवृत्ती २०१८.

२) ''लोकराज्य'' : महात्मा जोतीराव फुले स्मृतिशताब्दी विशेषांक, महाराष्ट्र शासन, फेब्रुवारी १९९१

३) भास्कर लक्ष्मण भोळे, ''महात्मा जोतीराव फुले : वारसा आणि वसा'' साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

४) डॉ. अशोक एरंडे संपा., ''सत्यशोधक मुकुंदराव पाटील'', स्फूर्ती प्रकाशन, नगर, १९९६.

५) डॉ. अशोक एरंडे संपा. ,'विचारकिरण: दीनमित्रकार मुकुंदराव पाटील,' खंड १, सायन प्रकाशन, पुणे २०२१

६) डॉ. प्रतिभा अहिरे संपा., 'महात्मा फुले : समग्र वाङ्मय', संपादन - साद प्रकाशन, औरंगाबाद, २०१३.

•••

आदिवासी लोकसंस्कृती व लोककलेचे सांस्कृतिक-भाषिक वैशिष्ट्य सिद्ध करणारा 'आमची श्रीवाणी'चा विशेषांक

आदिवासी लोकसंस्कृती, लोकसाहित्य, लोककला आणि बोलीविषयक भाषिक संशोधन विशेषांक

मोजक्याच प्रती शिल्लक आहेत.

त्वरित मागणी करावी

मूल्य : रु.१८०/-

*** संपर्क ***

संपादक, 'आमची श्रीवाणी'

का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था,

नकाणेरस्ता, देवपूर, धुळे. दूरध्वनी : (०२५६२) २२३६५४

सत्यशोधकीय परंपरेतील नाटके : स्वरूपविचार

- दैवशाला हाक्के

सत्यशोधकी नाटकांनी आधुनिक भारताच्या सुरुवातीस समाज परिवर्तनाचा विचार अभिव्यक्त केला. प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान दिले. नागरी परंपरा विरूद्ध नागरी परंपरा रूढ केली. बहुजन हिताचे विविध मार्ग सांगितले. स्त्री, शूद्र, शेतकरी, कष्टकरी यांचे जिणे कथानकाच्या केंद्रस्थानी आणले. प्रस्थापितांचा दुटप्पीपणा सप्रमाण उघड केला. आजही सत्यशोधकी नाटके मानव मूल्यांची जोपासना करतात.

हे वर्ष सत्यशोधक समाज स्थापनेचे शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. आधुनिक भारताच्या अगदी सुरुवातीस तत्कालीन समाजास समता, बंधुता, स्वातंत्र्य अशा मानवी मूल्यांची ओळख करून देण्याच्या हेतूने म. फुले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे शहरात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्य हे शाश्वत मूल्य असून त्याचा स्वीकार प्रत्येक नागरिकाने करणे अनिवार्य आहे. केवळ जन्माने श्रेष्ठ वा कनिष्ठ हे मूल्य अन्यायकारक असून अशी व्यवस्था समाजात भक्कम करण्यासाठी उभी केलेली संपूर्ण यंत्रणा नाकारणे आवश्यक आहे, हे अत्यंत क्रांतिकारी सूत्र सत्यशोधक समाजाच्या मुळाशी होते. येथील ब्राह्मण वर्ग बहुजनांच्या सर्वांगीण शोषणाचे मूळ आहे हे सप्रमाण पटवून देऊन म. फुले यांनी समताधिष्ठित सत्यशोधक मूल्ये जनमानसात रुजविण्यास सुरुवात केली. त्यासाठी प्रचार आणि प्रसाराचे महत्त्वाचे माध्यम म्हणून साहित्य लेखनाचा आधार घेतला. त्यातही नाटक हा साहित्यप्रकार सादरीकरणाचा असल्यामुळे जनमाणसात तो अधिक सहजतेने पोहचेल हे लक्षात आल्यानंतर सत्यशोधकी विचार पेरणारे असंख्य नाटके सत्यशोधक लेखकांनी लिहिली. सत्यशोधकी परंपरेतील नाटकांचा संशोधनासाठी अभ्यास करत असताना प्रस्तुत नाटकांचे नेमके स्वरूप कसे आहे, हे समजून घेणे अगत्याचे ठरते. पुढीलप्रमाणे त्याचा विचार करू.

उद्दिष्टे

१. सत्यशोधकी परंपरेतील नाटकांचे नेमके स्वरूप समजून घेणे.
२. सत्यशोधकी नाटकातील विषय समजून घेणे.
३. सत्यशोधकी नाटके निर्मितीमागच्या प्रेरणांचा मागोवा घेणे.

गृहितके

१. लोकनाट्य, विधीनाट्य, विविध धार्मिक कार्यात वठवली जाणारी सोंगे, जलसे अशा स्वरूपात नाटकांचे जनसामान्यांना परिचय आहे.

२. आधुनिक मराठी साहित्यात अस्सल देशी नाट्यलेखन म. फुले यांच्यापासून सुरू झाले.
३. सत्यशोधकी विचारांनी प्रेरित नाटकांची परंपरा आजही मराठी साहित्यात रूढ आहे.
४. सत्यशोधकी नाटके हेतुप्रधान असली तरी नाट्य आणि साहित्यमूल्य या दृष्टीने ती सरस आणि सकस आहेत.

१. विश्लेषणात्मक बाजू

साहित्यातून समाज हित जोपासले जावे असे कोणत्याही भाषेतील परिवर्तनवादी साहित्याचे स्वरूप असते. साहित्य समाजाचा आरसा असतो. परिणामी समाजातील दुसरी बाजू उजेडात आणणे हेही साहित्यातून घडायला हवे. सत्यशोधक लेखकांनी याच जाणिवेतून नाटके लिहिली आहेत. वर्षानुवर्ष सतत बहुजनांचे हित नाकारणारी ब्राह्मणी व्यवस्था मोडीत निघाल्याशिवाय बहुजनांचे सर्वांगीण हित जोपासले जाणे शक्यच नाही, याची जाणीव झाल्यानंतर जगासमोर प्रस्थापितांच्या खऱ्या रूपाचे दर्शन घडविणे तसेच अज्ञानी बहुजनांना प्रगतीच्या मार्गावर आणण्यासाठी प्रेरित करणे या दुहेरी हेतूने सत्यशोधकी नाटके लिहिली गेली. प्रस्तुत लेखाच्या निमित्ताने सत्यशोधकी परंपरेतील नाटकाचे नेमके स्वरूप संक्षेपाने समजून घेऊ.

२. सत्यशोधकी परंपरेतील नाटकांचे स्वरूप

कथा, कविता, नाटक, कादंबरी आदी साहित्याचे महत्त्वाचे प्रकार आहेत. हे प्रवाह प्रामुख्याने इंग्रजी साहित्याच्या अनुकरणातून मराठीत रूढ झाले. असे असले तरी आधुनिक भारताच्या सुरुवातीला सत्यशोधकी साहित्यिकांनी अस्सल देशी वळणाचे साहित्यही निर्माण केले होते हे वास्तव नाकारता येत नाही. सत्यशोधकी हेतूने प्रेरित कथा, कविता, कादंबरी, नाटक, वैचारिक लेखन, स्फुट लेखन, वृत्तपत्रीय लेखन सत्यशोधक लेखकांनी केले आहे. येथील प्रस्थापित लेखक, अभ्यासकांनी जाणीवपूर्वक सत्यशोधकी साहित्याची दखल घेतली नसली तरी सत्यशोधकी साहित्याचे मूल्य कमी होत नाही. इथे सत्यशोधकी परंपरेतील नाटकांचे नेमके स्वरूप समजून घेऊ.

नाटक म्हणजे मानवी जगण्याचे वाचिक व कायिक अभिनयाच्याद्वारे घडवलेले जीवनदर्शन असते. हे जीवनदर्शन अधिकाधिक स्वाभाविक वाटावे अशी अपेक्षा असते. यासाठीच मग व्यवहारात जी भाषा वापरली जाते, ती तिची सगळी वैशिष्ट्ये घेऊन नाटकात येते. अर्थात विषय सापेक्षतेनुसार तिची रूपे बदलत जातात.[१] डॉ. सुधाकर शेलार यांनी नाटकाच्या स्वरूपासंबंधाने नोंदवलेले मत सत्यशोधकी नाटकाच्या बाबतीत महत्त्वाचे आहे. अस्सल जीवनदर्शन घडविण्याच्या उर्मीतून सत्यशोधक नाटककारांनी नाट्य निर्मिती केली. बोली व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या बोलींचा आशयाच्यादृष्टीने समर्पक वापर करून, जमेल त्या सुविधांच्या आधारे नाटक सादर करून नाट्यलेखनाचा मूळ हेतू साध्य करण्यावर सत्यशोधकी नाटकारांचा अधिक भर होता. वर्षांवर्षांपासून दबलेला, दाबला गेलेला उपेक्षित समाज प्रगतीच्या मुख्य प्रवाहात यावा, आपल्या नैसर्गिक हक्काची जाणीव त्याला व्हावी हा हेतू असल्यामुळे साहजिकच समकालीन शोषण व्यवस्थेविरुद्ध सत्यशोधक पेटून उठतात. शिवाय गावकुसाबाहेर फेकला गेलेला वर्ग आणि गावाच्या आत आरामात राहणारा वर्ग हे दोन्ही एकाच समाजाचे घटक होते. त्यांच्यात असलेली दरी दूर करण्यासाठी तिचे वास्तव रूप जगासमोर आणणे नितांत आवश्यक होते. परिणामी ब्राह्मणवादास विरोध करताना तो केवळ व्यक्तीनिष्ठ असणार नाही याचे भानही सत्यशोधकी नाटककारांनी जपल्याचे दिसते.

अ) प्रबोधनात्मक स्वरूप

सत्यशोधकी नाटकांचे स्वरूप प्रामुख्याने प्रबोधनात्मक आहे. बहुजन समाजास कृतीप्रवण बनविण्याच्या हेतूने सत्यशोधकी विचारांचा प्रसार आणि प्रचार समाजातील सर्वस्तरापर्यंत होणे अगत्याचे होते. डॉ. अशोक चोपडे यांनी नमूद केल्याप्रमाणे, सत्यशोधक चळवळीच्या विचारांच्या व कार्याच्या प्रेरणेतून महाराष्ट्रातून निर्माण झालेल्या नाटकांचे प्रबोधनात्मक मूल्यात्मक दृष्ट्या मोठे योगदान आहे.[२] मूळ सत्यशोधकी विचारधारा प्रबोधनाच्या तत्वाचा अंगीकार करत असल्यामुळे साहजिकच सत्यशोधकी नाटके प्रबोधनाच्या

हेतूने लिहिलेली दिसून येतात.

ब) आक्रमकता हा स्थायीभाव

प्रक्षोभ, नकार, चीड, आक्रमकता, ब्राह्मणीव्यवस्थेस विरोध, फाजील मानपानास विरोध, धर्माच्या आधारे समाज जीवनात प्रचलित असलेल्या प्रत्येक बहुजन विरोधी विधीस नकार हा सत्यशोधकी साहित्याचा स्थायीभाव आहे. याला सत्यशोधकी नाटकेही अपवाद नाहीत. एका बाजूला प्रतिगामी रूढी, प्रथांना नकार आणि दुसऱ्या बाजूला पुरोगामी विचारांचे स्वागत आणि स्वीकार असे सत्यशोधकी नाटकाचे दुहेरी स्वरूप आहे. जुने नाकारल्याशिवाय नव्या विचारांना स्वीकारण्याची गरज निर्माणच होत नाही, ही भूमिका याच्या मुळाशी आहे. याबाबत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे पुढील मत विचारात घ्यायला हवे. इंग्रजांच्या आगमनापूर्वी या देशातली समाजव्यवस्था ही धर्माधिष्ठित होती आणि धर्म म्हणजे काय तर पुरोहित जे सांगतील तो धर्म. त्यामुळे समाजव्यवस्था धर्माधिष्ठित होती म्हणण्यापेक्षा पुरोहितधिष्ठित होती असेच म्हणावे लागते. न्यायव्यवस्था, अर्थव्यवस्था सारेच मुळी धर्माधिष्ठित. जीवनातल्या कुठल्याही प्रश्नाचे उत्तर धर्मातच शोधले जाई आणि धर्म हा जसा नेहमीच प्रस्थापितांच्या बाजूने असतो तसाच तेव्हाही होता, तेव्हा तर अधिकच होता. प्रस्थापितांना सुरक्षित करणाऱ्या भोंगळ कल्पना समाजमनावर वर्चस्व गाजवीत होत्या. अमुक माणसाच्या वाट्याला दुःख का? तर त्याचे पूर्वजन्मीचे संचित. म्हणजे पुनर्जन्म आणि कार्यसंचित या कल्पनांनी इथल्या लोकांची विचारशक्ती आणि निर्मितीशक्तीच मारली होती.[३] सत्यशोधकी साहित्यातून अभिव्यक्त होणाऱ्या आक्रमकतेची नेमकी कारणमीमांसा डॉ. नागनाथ कोत्तापल्ले मांडतात. धर्मसत्ता, अर्थसत्ता, न्यायसत्ता, राजसत्ता हाताशी धरून येथील भट, भिक्षुक, पुरोहितांनी कायम स्वतःचे आणि स्वजातीचे हीत जोपासले. पाप - पुण्य, धर्मकार्य, पूर्वजन्माचे संचित अशा गोंडस नावाने येथील बहुजनांना कायम अंधारात ठेवले. येथील मूलनिवासी बहुजनांचे माणूसपण हिरावून घेतले. म्हणून येथील ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध म. फुले आणि त्यांचे अनुयायी पुनः पुन्हा बंड पुकारतात. डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या मते, वर्ण, जाती, स्त्रीदास्य या व्यवस्थेला नकार देणारे, सर्वप्रकारचे कर्मकांड नाकारणारे, मानवतामूल्यांचा, विवेकनिष्ठेचा पुरस्कार करणारे साहित्य सत्यशोधकी असते. सत्यशोधकी साहित्यामध्ये सत्यशोधकी संवेदना, जाणीव आणि मूल्य असतात. हेच सत्यशोधकी साहित्याचे निराळेपण आहे.[४] सत्यशोधकी नाटके आक्रमक आहेत कारण येथील वर्णव्यवस्था अन्यायकारक, अनैसर्गिक, मानवनिर्मित, स्वार्थकेंद्रित आहे.

क) सत्यशोधकी जलशांशी साधर्म्य

सत्यशोधकी नाटके काहीसे सत्यशोधकी जलशासारखे आहेत. गायन, अभिनय, नाट्य, संगीत यांच्या साथीने कुठेही सहजपणे सादर करता येईल हे सत्यशोधकी जलशाचे वैशिष्ट्य सत्यशोधकी नाटकातही दिसून येते. सत्यशोधक जलसा म्हणजे सहजासहजी कुठेही, केव्हाही सादर करता येईल असे फारसिकल संगीत नाटक होय.[५] विलास घोगरे यांचे वरील मत सत्यशोधकी जलसा आणि सत्यशोधकी नाटके यांच्यातील साम्य अधोरेखित करते. लोकनाट्य, तमाशाशी जवळीकता साधणारा जलसा हा लोककलाप्रकार सर्वसामान्य लोकांच्या जगण्याचा भाग आहे. रंजन आणि उद्‌बोधन अशी दुहेरी भूमिका लीलया पार पाडणारी जलसे आजही जनसामान्यांना आपलेसे वाटतात. सत्यशोधकांनी आपल्या प्रचाराचे प्रभावी माध्यम म्हणून जलसांचा आधार घेतला. तीच किमया सत्यशोधकी नाटकांनीही साधली आहे. सत्यशोधकांनी आपल्या प्रचाराचे प्रभावी माध्यम म्हणून जलशांचा आधार घेतला तीच किमया सत्यशोधकी नाटकांनीही साधली आहे. अभिनय, नाट्य, समर्पक गीते, उपलब्ध साधनांच्या आधारे केलेली नेपथ्य योजना, वेशभूषा, प्रेक्षकांच्या अगदी मनात उतरणारे संवाद हे सत्यशोधकी जलशाचे अभिव्यक्ती तंत्र सत्यशोधकी नाटकांनी स्वीकारल्याचे दिसते.

ड) प्रेक्षकाभिमुख स्वरूप

सत्यशोधकी नाटके प्रामुख्याने प्रेक्षकाभिमुख राहिली आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील अज्ञानी, अल्पशिक्षित वाचक तसेच प्रेक्षकवर्ग डोळ्यासमोर

ठेवून ती लिहिली गेली. मुळात प्रस्तुत नाट्यलेखकही अल्पशिक्षित होते. नाटकाची व नाट्यलेखनाची कसलीही परंपरा नसताना केवळ सत्यशोधकी विचार प्रसाराचे प्रभावी माध्यम म्हणून त्यांनी नाटके लिहिली. परिणामी कधीकधी पात्रांची अनावश्यक गर्दी, अंक व प्रवेशसंख्येमध्ये काहीसा गोंधळ, प्रचार हा मुख्य हेतू असल्यामुळे संवादाची लांबी अधिक असणे, उपदेशाच्या हव्यासामुळे काहीशी बोजड रूक्ष वाटणारी भाषा आदी बाबींचाही विचार होणे गरजेचे आहे. असे असले तरी सत्यशोधकी नाटकांनी समकालीन समाजमन विचारप्रवण बनविले होते, हे विसरता येत नाही.

३. समारोप

आधुनिक भारताच्या उभारणीत सत्यशोधकी विचाराचे योगदान आहे, हे निर्विवाद सत्य आहे. स्त्रीशिक्षण, अस्पृश्यता निवारण यासारख्या कितीतरी मूलभूत बदलांची सुरुवात सत्यशोधकांनी केली. म. फुलेंवर सतत टीका करणाऱ्या ब्राह्मणांनी देखील आपल्या मुली फुल्यांनी सुरू केलेल्या शाळेत घातल्या यावरून म. फुले यांचा शुद्ध हेतू समकालीन कर्मठांनाही पटत होता, हेच सिद्ध होते. मात्र म. फुले यांची धर्मावर आणि ब्राह्मणांच्या एकाधिकारशाहीवर केलेली जळजळीत टीका समकालीन ब्राह्मणांना कधीच रुचली नाही. धनंजय कीर यांनी म्हटल्याप्रमाणे, ब्राह्मणी धर्म हा किती विघातक व अमानुष आहे पहा. वर्गशिक्षक ख्रिस्ती असताना ब्राह्मणी मुलांना त्याचा विटाळ होत नसे. आपल्या क्षुद्र स्वार्थासाठी ते आपले धर्मनियम, चालीरीती आणि तत्वे यांचा भंग करण्यास तयार असत परंतु आपल्या अन्याय व निर्दय चालीरीतींचे पालन आपल्या धर्मबांधवांनी कठोरपणे केले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा असे.[६] म. फुले आणि त्यांच्या अनुयायांना हाच दुटप्पीपणा कधीही मान्य नव्हता. म्हणून ते ब्राह्मणीव्यवस्थेला इतका कडाडून विरोध करत असत हे इथे लक्षात घेतले पाहिजे. यातील काही निष्कर्ष

१. सत्यशोधकी साहित्याचे स्वरूप प्रबोधनात्मक आहे.
२. सत्यशोधक लेखक हे प्रथम सुधारक असल्यामुळे अधिक वास्तववादी लेखन त्यांनी केले.
३. सत्यशोधकी विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचे सहज सुलभ साधन म्हणून नाट्यतंत्राचा आधार घेतला.
४. प्रक्षोभ, नकार, चीड, आक्रमकता हा सत्यशोधकी नाटकांचा स्थायीभाव आहे.
५. सत्यशोधकी नाटकाचे स्वरूप सत्यशोधकी जलशाशी साधर्म्य साधते.
६. सत्यशोधकी नाट्यलेखन प्रेक्षकाभिमुख आहेत.
७. सत्यशोधकी नाटकांचे सादरीकरण उपलब्ध साधनांच्या आधारे कुठेही सहज करता येऊ शकते.

वरीलप्रमाणे काही महत्त्वाचे निष्कर्ष नोंदवता येतील. सत्यशोधकी नाटकांनी आधुनिक भारताच्या सुरुवातीस समाज परिवर्तनाचा विचार अभिव्यक्त केला. प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान दिले. नागरी परंपरा विरूद्ध नागरी परंपरा रूढ केली. बहुजन हिताचे विविध मार्ग सांगितले. स्त्री, शूद्र, शेतकरी, कष्टकरी यांचे जिणे कथानकाच्या केंद्रस्थानी आणले. प्रस्थापितांचा दुटप्पीपणा सप्रमाण उघड केला. आजही सत्यशोधकी नाटके मानव मूल्यांची जोपासना करतात.

संदर्भ सूची –

१. शेलार डॉ. सुधाकर - साहित्य संशोधन : वाटा आणि वळणे - प्रथम आवृत्ती १३ जून २०१९ -अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे - पृ. ५७.
२. जामोदकर सतीश (संपा) -भाग्यवान सुशीला अथवा विवाहविषयक सत्यशोधकी मार्ग - प्रथम आवृत्ती २४ सप्टेंबर २०१८ - सुगम प्रकाशन, अमरावती-प्रस्तावना डॉ. अशोक चोपडे- पृ. १४.
३. कोत्तापल्ले नागनाथ (संपा) - स्त्री पुरुष तुलना - दुसरी आवृत्ती १९९२ - कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद - प्रस्तावना, पृ. ११.
४. गुंदेकर डॉ. श्रीराम - सत्यशोधकी साहित्याचा इतिहास (खंड पहिला) - प्रथम आवृत्ती १ मे २०१० - सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, लातूर - पृ. ६.

५. भिंगारदिवे डॉ. गजानन - सत्यशोधक जलसे : परंपरा, स्वरूप आणि वाटचाल - प्रथम आवृत्ती २६ जून २०१९ - शब्दशिवार प्रकाशन, मंगळवेढा - पृ. ५७.

६. सरदार कै. गं. बा. (संपा) - महात्मा फुले : प्रेरणा व तत्वज्ञान - प्रथम आवृत्ती नोव्हेंबर १९९० - प्रतिष्ठान प्रकाशन, औरंगाबाद - लेख - महात्मा फुले : शैक्षणिक तत्त्वज्ञान व कार्य - कै. धनंजय कीर - पृ. ६०.

◆◆◆

'आमची श्रीवाणी'चा खास

कन्नड-मराठी भाषेचा सांस्कृतिक अनुबंध साधणारा संशोधक अभ्यासकांसाठी
उपयुक्त असणारा अभ्यासपूर्ण
शोधनिबंध समाविष्ट असलेला

'कन्नड-मराठी सांस्कृतिक अनुबंध' विशेषांक

मूल्य फक्त २००/- रुपये

मोजक्याच प्रती शिल्लक आहेत.

विशेष सवलतीत उपलब्ध

सत्यशोधक नियतकालिके

- अमृता तायडे

ग्रामीण समाजरचना, गावगाडा आणि ग्रामजीवन हा सत्यशोधकांच्या चिंतेचा आणि चिंतनाचा प्रमुख विषय होता. गावगाड्याचे पारंपरिक स्वरूप, शोधकतत्त्वे व मागासलेपणास कारणीभूत घटक यांचे अचूक आकलन सत्यशोधकांना होते. गावगाड्यामध्ये शिक्षणाचे, विचारांचे, आत्मभानाचे, कालानुरूप बदलाचे वारे वाहण्याची नितांत आवश्यकता होती. अन्यथा सरंजामशाहीचे बुरसटलेले अवशेष कवटाळून बसणारी गावे बदलत्या जगापासून दूर फेकली जातील.

'मानवाचा धर्म नसावा अनेक
निर्मिक तो एक ज्योती म्हणें'

असा मानवतेच्या कल्याणाचा विचार म. जोतीबा फुले यांनी आपल्या अखंडातील काव्यरचनेतून दिला. त्यासोबतच 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा आसूड', 'ब्राम्हणांचे कसब', 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथातून बहुजनांच्या कल्याणाचा विचार मांडतांना त्यांचे धार्मिक, सामाजिक, मानसिक, सांस्कृतिक शोषण कशाप्रकारे होते. धर्म, पंथ, लिंगाच्या आधारे माणसाचे शोषण करणारे घटक कोणकोणते आहेत हे वरील ग्रंथात सोदाहरण पटवून दिले. या विषमतेतून मुक्त होण्याकरिता सार्वजनिक सत्यधर्माची वाट दाखविली व परंपरागत धर्म बंधनातून मुक्त होऊन सत्यशोधक विचाराची बांधणी केली. काही नियतकालिकांच्या माध्यमातून सत्यशोधक चळवळीचे उदरभरण केले. या निबंधाद्वारे त्या नियतकालिकांचा आढावा घेऊया.

आपली चळवळ संघटित करून तिच्याद्वारे आपला संदेश सर्व ठिकाणी पोचवावा अशा निर्धाराने व ध्येयाने जोतीरावांनी ती संस्था स्थापली, त्यांनी स्वतःच तिचे नाव 'सत्यशोधक समाज' असे ठेविले. महाराष्ट्रव्यापी अशी समाजसुधारणेची महाराष्ट्रातील ही पहिली चळवळ होय.[१] असे धनंजय कीर यांचे मत योग्य ठरेल.

या क्रांतिकारी समाजाने ग्रामीण जीवनात विद्रोहाचे तुफान पेटवले. आपला गरीब, कष्टकरी, बहिष्कृत आणि शोषणग्रस्त समाज क्रांतीच्या रणमैदानावर एकत्र आणण्यासाठी सत्यशोधक समाजकार्य करीत होता. सावकार आणि जमीनदार यांना सत्यशोधक समाजाने आपले शत्रू मानले कारण ते गरीब माणसांची अत्यंत निर्दयपणे आर्थिक पिळवणूक करीत होते. समाजाने सावकार-जमीनदारांच्या मग्रुरीला अगतिक केले. धर्माच्या देवाच्या नावाखाली इथे सामाजिक विषमता वंदनीय मानली जाते. पिळवणूक करण्याचे हत्यार म्हणून शोषणकर्ते धर्माचा उपयोग करतात. धर्म हर घडी गरीब माणसाला लुटतो आणि अत्याचाराविरूद्ध कोणताच

आवाज निघू देत नाही. सत्यशोधक समाजाने या धर्माच्या पायात सुरुंग पेरला. गरिबांना या ना त्या प्रकारे लुटणारी, वरिष्ठ माणूस ब्राह्मण असो की बहुजन असो तो सत्यशोधक समाजाला मानवतेचा दुष्मन वाटतो. आर्थिक पिळवणूक करणाऱ्यांमध्ये ब्राह्मण, मारवाडी यांच्यापासून मराठ्यांपर्यंत अनेक असतात. जातीय आणि धार्मिक अत्याचार करणाऱ्यात ब्राह्मण आणि मराठे-बहुजन यांचाही समावेश होतो. यामुळे जाती निर्मूलनाचा आणि आर्थिक विषमतेच्या निर्मूलनाचा लढा सत्यशोधक समाज एकसाथ करू इच्छित होता.[२] असे मत यशवंत मनोहरांनी मांडले आहे.

सत्यशोधकीय नियतकालिकांची परंपरा

सत्यशोधक समाजतत्त्वांचा प्रचार-प्रसार करण्याच्या व विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देण्याच्या उद्देशाने सत्यशोधक चळवळीचे आद्य नियतकालिक 'दीनबंधु' हे कृष्णराव भालेकरांनी सुरू केले. तत्कालीन पांढरपेशा वरिष्ठ वर्गातील नवशिक्षितांनी सुरू केलेल्या नियतकालिकांचे विश्व त्यांच्या वर्गापुरतेच मर्यादित होते. 'दीनबंधु'मुळे कृषिजनसमुहांच्या जीवनाचे प्रतिबिंब पहिल्यांदाच मराठी नियतकालिकांत उमटले. मराठी नियतकालिकांमध्ये शेतकरी-कष्टकरी, श्रमिक, शोषित, पीडित जनसमुहांचे खरेखुरे प्रतिनिधित्व करण्याचा पहिला मान 'दीनबंधु' कडे जातो. 'दीनबंधु'ने शेतकरी, मजूर, कामगार यांची दुःस्थिती मांडून त्यांच्या व्यथा-वेदनांना वाचा फोडली. त्यांच्या दुःखदैन्याची कारणमीमांसा केली. शोषणमुक्त समाजनिर्मितीसाठी जनसामान्यांचा, बहुजनांचा आवाज मुखर करणारे 'दीनबंधु' हे मराठीतील पहिले नियतकालिक होते. 'दीनबंधु' पासून सत्यशोधक चळवळीच्या ध्येयवादी व समाजनिष्ठ नियतकालिकांची परंपरा निर्माण झाली.[३] आणि या परंपरेने आपले इच्छित ध्येय साधून जोतीरावांचे स्वप्नपूर्ण करण्यास हातभार लावला.

दीनमित्र

कृष्णराव भालेकर यांचे भाचे गणपतराव सखाराम पाटील यांनी एप्रिल १८८८ मध्ये पुणे येथून 'दीनमित्र' मासिक सुरू केले. 'दीनमित्र' च्या मुखपृष्ठावर "THE FRIEND OF POOR' आणि 'शेतकरी व कारागिर लोकांकरिता मासिक पुस्तक' असे छापलेले असे. 'जे का रंजले गांजले' हा तुकारामांचा अभंगही मुखपृष्ठावर असे.[४] रंजल्यागांजल्यांचा मित्र म्हणून दीनमित्राने आपले ध्येय पूर्ण केले.

राघव भूषण

सत्यशोधक चळवळीचा प्रसार करणारे 'राघव भूषण' नावाचे साप्ताहिक १८८८ च्या सुमारास नाशिक जिल्ह्यातील येवले येथे निघाले. गुलाबसिंह कौशल्य हे पत्राचे संपादक होते. या पत्राचे अंक उपलब्ध झाले नाहीत. त्याची जाहिरात 'दीनमित्र' मध्ये आली आहे. शेतकऱ्यांच्या गाड्या बिगारीसाठी धरताना पोलीस शेतकऱ्यांवर कसा जुलुम करतात यासंबंधी एक मोठे चित्र भालेकरांनी प्रसिद्ध केले होते. त्या चित्रामुळे चिडलेल्या पोलिसांनी भालेकरांना पकडून पुराव्याची मागणी केली. त्याचवेळी 'राघव भूषण' पत्रातून प्रसिद्ध झाले होते की, 'भालेकर यांच्या चित्राप्रमाणेच हुबेहूब आमच्या छापखान्यापुढे गाडीचा धराधरीचा देखावा पाहण्यात आला.' भालेकरांनी तोच अंक पुराव्यादाखल दाखविला (दीनमित्र, ३ ऑगस्ट १९२२). शेतकऱ्यांचे शोषण व त्यांच्या प्रश्नांबाबतची 'राघव भूषण' ची सजग सक्रियता या प्रसंगातून जाणवते. १८९६ साली 'राघवभूषण' चा साप्ताहिक खप ५०० होता. यावरून त्या काळात हे पत्र बरेच लोकप्रिय असावे, असे दिसते.[५] असे मत अरुण शिंदे आपल्या 'सत्यशोधकीय नियतकालिके'मध्ये मांडतात.

अंबालहरी

ब्राह्मणेत्तर लोकांची उन्नती होण्यासाठी पुण्यात एखादे साप्ताहिक असावे, असा विचार कृष्णराव भालेकर, गणपत सखाराम पाटील, हरिश्चंद्र नारायणराव नवलकर, सीताराम रघुनाथ तारकुंडे यांनी केला; परंतु पत्र सुरू करण्यासाठी भांडवलाची अडचण होती. त्यावेळी 'दीनमित्र' हे पत्र नारायण अंबाजी नावाच्या वंजारी गृहस्थांच्या 'अंबाप्रसाद' छापखान्यात छापले जात होते. भालेकर आणि त्यांचे सहकारी यांनी लिहिण्याचे काम सांभाळावे व वर्गणी आणि जाहिरातीचे उत्पन्न

छापखान्याच्या मालकाने घ्यावे, असे सर्वानुमते ठरले. या नवीन साप्ताहिकाचे नाव 'अंबालहरी' असे ठेवण्यात आले. १८८९ च्या विजयादशमीपासून प्रत्येक मंगळवारी 'अंबालहरी' प्रकाशित होत होते.[६]

शेतकऱ्यांचा कैवारी

शेतकऱ्यांचा कैवारी' हे पत्र दामोदर सावळाराम यंदे व रामजी संतूजी आवटे यांनी १८८१ मध्ये मुंबई येथे सुरू केले होते. दामोदर सावळाराम यंदे हे संपादक होते. या पत्रात शेतकरी व मागासलेला समाज ह्यांची सुधारणा व्हावी, म्हणून चांगले लेख येत असत. ही गोष्ट सयाजीराव महाराजांना समजल्यावर आपल्याही राज्यात एक मराठी पत्र असावे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. महाराजांनी यंदे व आवटे यांना बडोद्यास बोलाविले. या उभयंतांनी 'शेतकऱ्याचा कैवारी' बंद केला व सन १८८४ साली ते बडोद्यास गेले. तेथे 'बडोदा वत्सल' हे पत्र सुरु केले. (नरके, १९९६ : ६९). आवटे यांना आपले पत्र बंद पडले, याची फार हळहळ वाटत होती. म्हणून त्यांनी १९८२ साली माजगांव प्रिंटिंग प्रेसचा लिलाव ५००० रूपयांना घेतला व त्या छापखान्याचे नवीन नाव 'शेतकऱ्याचा कैवारी' असे ठेवले. हा छापखाना व वरखर्चास २०० रूपये रोख त्यांनी भालेकरांच्या स्वाधीन केले. अशा रीतीने भालेकरांच्या संपादकत्त्वाखाली 'शेतकऱ्यांचा कैवारी' १८९२ साली पुन्हा सुरू झाला.[७]

मराठा दीनबंधु

सन १९०० साली 'दीनबंधु' बंद झाल्यानंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी भास्करराव जाधव यांनी 'मराठा दीनबंधु' या नावाने नवे पत्र सुरू केले. 'मराठा दीनबंधु' असा नावात थोडासा बदल करण्यामागे मालकी हक्काचा प्रश्न उद्भवू नये, हे कारण होते. १२ फेब्रुवारी १९०२ पासून 'मराठा दीनबंधु'च्या पहिल्या पृष्ठाच्या शिरोभागी 'विद्येत मागासलेल्या सर्व लोकांकरिता' असे शब्द झळकू लागले.[८]

विश्वबंधु

राजर्षी शाहू महाराजांच्या प्रोत्साहनाने बळवंत कृष्ण पिसाळ यांनी 'विश्वबंधु' हे पत्र १९११ साली कोल्हापूर येथे सुरू केले. ब्राह्मणांच्या मक्तेदारीवर व टिळक पक्षाच्या स्वार्थी राजकारणावर 'विश्वबंधु' अतिशय कठोर हल्ले करीत असे. ब्राह्मणी वृत्तपत्रातून शाहू महाराजांच्यावर केल्या जाणाऱ्या विखारी टिकेस प्रत्युत्तर देण्याचे काम 'विश्वबंधु'ने चोखपणे केले. 'विश्वबंधु' हे दर रविवारी प्रसिद्ध होत असे.[९]

सत्योदय

करजगांव (वऱ्हाड) येथून 'सत्योदय' हे मासिक प्रकाशित होत होते. कृष्णाजी कर्काजी चौधरी हे संपादक होते. 'सत्योदय'चा पहिला अंक जानेवारी १९१५ मध्ये प्रसिद्ध झाला. त्या अंकात एकूण १६ पृष्ठे होती. हे पत्र शेतकरी व मागासलेल्या वर्गासाठी व सत्यशोधक मताचे होते. 'मुकं करोति वाचालं । पंगु लंघयते गिरिम' हे 'सत्योदय' चे ब्रीदवाक्य होते. निबंध, गोष्टी, कविता, 'सत्योदय' मधून प्रसिद्ध होत असत.[१०]

जागरूक

१९ जुलै १९१७ रोजी वालचंद कोठारी यांनी सत्यशोधक चळवळीच्या प्रचारासाठी 'जागरूक' नावाचे साप्ताहिक पुणे येथे सुरू केले. 'जागरूक' मध्ये सत्यशोधक समाजाच्या तीन तत्त्वांचा प्रामुख्याने पुरस्कार करण्यात येत असे - १. देव आणि भक्त यांच्या दरम्यान मध्यस्थाची जरूरी आहे. देवापर्यंत पोहोचण्याचा प्रत्येक भक्ताला, मग तो कोणत्याही जातीचा असो हक्क आहे. २. मनुष्याची योग्यता त्याच्या गुणावरून ठरावी. केवळ जन्मामुळे काहीना अस्पृश्य समजण्याची रूढी सत्यशोधकांना मान्य नाही. ३. सर्व प्रकारची विद्या संपादन करण्याचा सर्वांना हक्क आहे आणि ती सर्वांनी संपादन केली पाहिजे.[११]

जागृति

भगवंतराव पाळेकरांनी २५ ऑक्टोबर १९१७ रोजी बडोदा येथून 'जागृति' नावाचे साप्ताहिक सुरू केले. मराठा शिक्षण परिषदेच्या प्रचारकार्यासाठी वर्तमानपत्राची आवश्यकता पाळेकरांना तीव्रतेने वाटू लागली होती. या अस्वस्थतेतूनच त्यांनी ६०० रूपयांच्या तुटपुंज्या भांडवलावर 'जागृति' पत्र सुरू केले. मराठी माणसांच्या आश्रयावर अवलंबून प्रवाहाच्या उलट पोहण्याचे धाडस पाळेकरांनी केले होते. 'जागृति'

चे पहिले दोन अंक आर्यसुधारक छापखान्यात छापून घेतले. परंतु भरमसाठ बिले भरण्याची कुवत नसल्याने त्यांनी दामोदर सावळाराम यंदे यांचेकडून टाईप घेतला. १९२१ साली 'जागृति' स्वतःच्या छापखान्यातून प्रसिद्ध होऊ लागले. 'जागृति' चा सारा संसार एकखांबी तंबूसारखा होता. सकाळी छापखाना उघडणे, तो स्वच्छ करणे, पोस्टात जाऊन टपाल आणणे, पत्रांची उत्तरे लिहिणे, 'जागृति' चा मजकूर लिहिणे, प्रूफ वाचणे, पेज भरणे इत्यादी कामे पाळेकरांनी सतत बत्तीस वर्षे एकट्याने केली. पत्राचे दैनंदिन काम चालविण्यात त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाईंनीही खूप कष्ट घेतले. १९३४ साली आर्थिक अडचणीच्या वेळी शांताबाईंनी वीस तोळे सोन्याच्या गोठपाटल्या कागद खरेदीसाठी दिल्या (मोरे, १९९६ : ७१). एक व्रत म्हणून पाळेकर पती-पत्नींनी 'जागृति' पत्र चालविले. वाचक व चाहत्यांनीही देणगी रूपाने 'जागृति'च्या संसारास हातभार लावला.[१२] येथे लक्ष्मीबाईची आपल्या पतीच्या कामात स्वतःला पूर्ण झोकून देण्याची श्रद्धाप्रतीत होते. 'जागृति'ला पुढे नेण्यासाठी लक्ष्मीबाईंनी आपल्या अलंकाराविषयीही मोह दाखविला नाही. म्हणून 'जागृति' पुढे जाऊ शकली.

डेक्कन रयत :

डेक्कन रयत संघ १९१६ साली स्थापन झाला. या संघटनेचे प्रमुख म्हणून अण्णासाहेब लठ्ठे व लालचंद कोठारी यांनी ३ ऑक्टोबर १९१८ रोजी पुणे येथे 'डेक्कन रयत' नावाचे इंग्रजी पत्र सुरू केले. मद्रास प्रांतातील 'जस्टिस' या ब्राह्मणेतरांच्या पत्राप्रमाणे आपली बाजू इंग्रज सरकार व इंग्रजी जाणणाऱ्या लोकांपुढे मांडण्याचा प्रयत्न करणे, हा हे पत्र सुरू करण्याचा उद्देश होता. या पत्राचा अंक शाहू महाराजांनी त्यांचे गुरू फ्रेजर यांना दाखविला, तेव्हा 'डेक्कन रयत' सुरू करून सार्वजनिक सेवा बजावल्याबद्दल फ्रेजर यांनी महाराजांचे अभिनंदन केले होते.[१३]

सत्यप्रकाश :

नारायण रामचंद्र विभूते यांनी 'सत्यप्रकाश' हे साप्ताहिक १९१९ साली सातगाव येथून सुरू केले. मुखपृष्ठावर पुढील श्लोक छापलेला असे - 'सत्यापरी महितळी गुरूज्ञान धर्म । हे जाणती विदुष त्यापरि सुज्ञ वर्म । सत्यीं वसे विजय निश्चिती सर्वकाळ । सत्याप्रती त्याजियल्या सुयशा मुकाला ।' 'सत्यप्रकाश'च्या अग्रलेखांवर पुढील श्लोक असे - 'भोंदू धूर्त फसविती असत्य धर्मे अशिक्षिती लोका । सत्यप्रकाश इच्छी व्हावी त्यांची तयांतुनी सुटका ।। सत्यापरता नाही धर्म । सत्य तेचि परब्रह्म । सत्यापाशी पुरुषोत्तम । सर्वकाळ तिष्ठतसेः ।' (सत्यप्रकाश, ३० नोव्हेंबर १९१९). प्रत्येक अंकाच्या शेवटी पुढील श्लोक छापलेला असे, 'सत्यप्रकाश लोकी करिती सत्यप्रकाशवंत नर । तम काय करिली दीप्ति करितो की तो जसा सहस्त्रकर ।।' या श्लोकांवरून 'सत्यप्रकाश'च्या ध्येयधोरणांवर प्रकाश पडतो.[१४]

विजयी मराठा :

१ डिसेंबर १९१९ पासून 'विजयी मराठा' हे साप्ताहिक पुण्याहून सुरू केले. 'शेतकरी व मजूर सुखी तर जग सुखी' हे 'विजयी मराठा' चे ब्रीद होते. 'मराठा व विद्येत मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी राजकीय, सामाजिक, धार्मिक व शिक्षणवादी विषयांवर निर्भीड, मार्मिक, भारदस्त व जोमदार असे लेख प्रसिद्ध होतील', अशी जाहिरात 'विजयी मराठा' ने केली होती. (विजयी मराठा, १ डिसेंबर १९२१). राजकारण, समाजकारण व धर्मकारणात सत्यशोधक तत्त्वांची प्रस्थापना करणे, हे 'विजयी मराठा' चे ध्येय होते.[१५]

गरिबांचा कैवारी :

सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांचा प्रसार करणारे 'गरिबांचा कैवारी' हे साप्ताहिक बाबूराव यादव यांनी एप्रिल १९२० मध्ये सुरू केले. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रोत्साहनाने निघालेले हे पत्र कोल्हापूर येथून प्रसिद्ध होत होते. पत्राची वार्षिक वर्गणी तीन रूपये होती. 'गरिबांचा कैवारी' चार पृष्ठांचे होते. मुखपृष्ठावर 'कैवारी गरिबांचा आला करवीरि जन्म घेवोनी । जागविण्या जनते ते तनु मन धन सर्वथैव अर्पोनी ।।' असे वचन लिहिले जात असे.[१६]

भगवा झेंडा

'भगवा झेंडा' साप्ताहिक दर गुरूवारी प्रसिद्ध होत

असे. मुखपृष्ठावर 'भगवा झेंडा' या नावाच्या मधोमध शाहू महाराजांचा फोटो छापला जाई. कोल्हापूर वृत्त, वर्तमान सार, विविध विषयांवरील लेख व राजर्षी शाहू महाराजांच्या आठवणी प्रसिद्ध होत. 'भगवा झेंडा' मधील अग्रलेख व इतर लेखांमधून धर्म, जातिव्यवस्था, शिक्षण, शेतकरी, अस्पृश्य अशा विषयांवर महत्त्वाचे विचार मांडले जात. शेतकऱ्यांच्या संदर्भात लेखमाला प्रसिद्ध होत असे. सत्यशोधक समाजाच्या कार्यासंबंधी बातम्या दिल्या जात. विरोधी पत्रांतील मतांचा समाचार घेतला जात होता. सत्यशोधक मतांना प्रसिद्धी दिली जात होती. सत्यशोधक पुस्तकांच्या जाहिराती येत असत. १९२८ मध्ये 'भगवा झेंडा' मोठ्या आकारात प्रसिद्ध होऊ लागला.[१७]

तरुण मराठा

१९२० सली सखाराम पांडुरंग सावंत यांनी 'तरुण मराठा' हे नियतकालिक कोल्हापूरहून सुरू केले. राजर्षी शाहू महाराजांची मदत व प्रोत्साहनामुळे पत्र सुरू झाले. बहुजन समाजातून वृत्तपत्रे निर्माण व्हावीत व ब्राह्मणी पत्रांतून होणाऱ्या अपप्रचारांना त्यांनी प्रत्युत्तरे द्यावीत, हा शाहू महाराजांचा दृष्टिकोन होता. पुण्यातील जहाल वक्ते व लेखक दीनकरराव जवळकरांच्या लेखणीची धार व प्रचारकी तडफ लक्षात घेऊन शाहू महाराजांनी त्यांना कोल्हापूरला बोलावून घेतले व 'तरुण मराठा' त्यांच्या स्वाधीन केले.[१८]

राष्ट्रवीर

९ मे १९२१ रोजी शिवजयंतीच्या दिवशी 'राष्ट्रवीर' साप्ताहिक बेळगांव येथून सुरू झाले. शामराव भोसले यांच्यावर संपादनाची जबाबदारी सोपविण्यात आली. 'राष्ट्रवीर'चे ध्येयधोरण स्पष्ट करताना म्हटले आहे की, केवळ ब्राह्मणांच्याच अन्यायाचा बीमोड करण्यासाठी राष्ट्रवीराने जन्म घेतला नसून, ज्या ज्या व्यक्तीकडून अगर व्यक्तिसमूहाकडून अन्याय घडला असेल किंवा घडेल, त्या व्यक्तीस अगर समूहास अन्यायासहित समरांगणावर खेचून आणून, त्यांचा परामर्श घेण्यासाठी व सुधारलेली राष्ट्रे जे स्वातंत्र्यसुख अनुभवीत आहेत ते स्वातंत्र्य, स्वदेशासही प्राप्त होईल अशा मतांचा, प्रसंग ओळखून जबाबदारपणे प्रसार करण्यासाठीचा हा राष्ट्रवीर अवतरला आहे.[१९]

प्रबोधन

१६ ऑक्टोबर १९२१ रोजी के. सी. ठाकरे यांनी 'प्रबोधन' पाक्षिकाचा पहिला अंक मुंबईहून प्रसिद्ध केला. पत्राच्या मुखपृष्ठावर 'उत्तिष्ठित जाग्रत प्राप्य वरान्निबोधत' असे वचन छापलेले असे. PRABODHAN – A Fortnightly Journal devoted to the Social Religious and Maral Regeneration of the Hindu Society या इंग्रजी मजकुरात सामाजिक, धार्मिक व नैतिक उत्थापनाचे 'प्रबोधन' चे उद्दिष्ट सांगितले होते. पहिल्या अंकात 'प्रबोधन'चे ध्येय स्पष्ट करताना ठाकरे यांनी कवी वसंतविहारांच्या काव्यपंक्ती सुरुवातीस देऊन म्हटले होते, 'समाजकार्यी स्वधर्मतत्वी सदा शिलेदार । प्रजापक्षनवमतसंवादी राजस सरदार ।। विशिष्टपंथ प्रवर्तकांची व्यर्थ न करि पूजा । व्यक्तीचा नच मिंधा, बंदा सत्याच्या काजा ।। विश्व निर्मिले जसें दयाळें त्या जगदीशाला । भिउनी केवळ, नच अन्याला, लागे कार्याला ।।' प्रबोधन हा पक्का नवमतवादी आहे. नवयुगात या अफाट हिंदी राष्ट्राने सर्व जगाला चकित करून सोडण्यासारखी अननुभूत कर्तबगारी, उदात्त प्रगमनशीलता आणि विश्वव्यापक धर्माचे साम्राज्य प्रसृत करण्याची प्रेमपूर्ण तडफ दाखवावी, अशी प्रबोधनाची महत्त्वाकांक्षा आहे.[२०] ही साध्य होण्यासाठी धार्मिक व सामाजिक जीवनात उदारपणा, लवचिकपणा व आत्मव्रत् सर्व भूतेषु' असला भातृभाव यांची खरीखुरी जाणीव उत्पन्न करण्याची कामगिरी प्रथम चोखाळण्याचे प्रबोधनाने ठरविले आहे.

संजीवन :

सत्यशोधक समाजमताच्या प्रसारासाठी त्यांनी 'संजीवन' हे पाक्षिक पुणे येथे सुरू केले. 'संजीवन' चा पहिला अंक १ नोव्हेंबर १९२१ रोजी प्रसिद्ध झाला. 'संजीवन'मध्ये सत्यशोधक पंचांग, सत्यशोधक भूगोल, बौद्धिक गुलामगिरीवरील हल्ले, स्वैर आचार, वाङ्मय सृष्टी, ब्राह्मणेत्तरांच्या चळवळीवर लेख इत्यादी सदरे असत. रणदिवे यांचे सामाजिक विषयावरील वैचारिक

लेख व कविता 'संजीवन' मधून प्रसिद्ध झाल्या आहेत. 'संजीवन' हे वाङ्मयीन मूल्य असणारे नियतकालिक होते.[२१]

शिवछत्रपती

राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने कीर्तीवानराव निंबाळकर व केशवराव बागडे यांनी 'शिवछत्रपती' हे साप्ताहिक १९२१ साली पुणे येथून सुरू केले.[२२]

सिंध मराठा

रामचंद्र सावंत यांनी समाजप्रबोधनासाठी 'सिंध मराठा' हे साप्ताहिक १९२४ साली सुरू केले. मुखपृष्ठावर 'सिंध मराठा' या नावाखाली "THE SINDH MARATHA' असे इंग्रजी नाव छापले जात असे.[२३]

हंटर

हरिभाऊ लक्ष्मण चव्हाण यांनी मे १९२५ मध्ये 'हंटर' हे साप्ताहिक कोल्हापूरहून सुरू केले. 'हंटर' च्या मुखपृष्ठावर 'फणसा अंगी काटे । आत अमृताचे साठे । नारळ वरुता कठीण । परी अंतरी जीवन ।' हा शेख महंमदांचा प्रसिद्ध अभंग छापला जात असे. याशिवाय 'हंटर' चे धोरण सांगणारी 'अस्पृश्योद्धार - ब्राह्मणेत्तर हितसंवर्धन, माणुसकीच्या हक्कासाठी, अज्ञजनांच्या सेवेसाठी' अशी वचने मुखपृष्ठावर छापली जात होती. कृत्रिम विषमता व उच्चनीच भाव निर्मूलनाचा प्रयत्न करणे, समता, उद्योगप्रियता, धाडस, स्वाभिमान, स्वावलंबन या गुणांचा प्रसार ब्राह्मणेत्तर जनतेत करणे, हे 'हंटर'चे ध्येय होते.[२४]

मजूर

१९२५ साली पुणे येथून 'मजूर' पत्र सुरू झाले. म. फुले पुतळा प्रकरण, छत्रपती मेळे, 'देशाचे दुश्मन' प्रकरण अशा तापलेल्या पार्श्वभूमीवर 'मजूर'ने शिष्टाचाराच्या मर्यादा ओलांडून ब्राह्मणांवर टीका केली.[२५]

कर्मवीर

'कर्मवीर' हे पाक्षिक कोल्हापूर येथून १ ऑक्टोबर १९२५ रोजी सुरू झाले. 'श्रीमत् क्षात्रजगद्गुरू करवीर यांचे आश्रयाखालील पत्र' असे मुखपृष्ठावर छापलेले असे.[२६]

नवप्रभा :

बाबासाहेब रामचंद्र घोरपडे यांनी सावंतवाडी येथून १९२५ साली 'नवप्रभा' हे साप्ताहिक सुरू केले. 'स्वतंत्र विचाराचे व उच्च ध्येयाचे साप्ताहिक' अशी जाहिरात 'नवप्रभा'ने केली होती. (हंटर, ९ ऑक्टोबर १९२५). 'धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक गुलामगिरीचे गुपित रहस्य फोडून समता, नीती आणि विश्वबंधुत्व यांच्या नवज्योतीने, बहुजन समाजास नवजीवन देण्यास व आत्मोद्धार, देशोद्धार यांचा निर्भीडपणे सरळमार्ग दाखविण्यास नवप्रभेचा उदय होत असतो.[२७]

ब्राह्मणेत्तर

व्यंकटराव गोडे यांनी वर्ध्याहून 'ब्राह्मणेत्तर' या नावाचे साप्ताहिक १४ जुलै १९२६ रोजी सुरू केले. पत्रावर 'ब्राह्मणेत्तर पक्षाचे साप्ताहिक' असा उल्लेख आहे. कवी धनुर्धर यांच्या पुढील काव्यपंक्ती छापलेल्या आहेत - 'मज म्हणती ब्राह्मणेत्तर । ध्येय माझे देशोद्धार ।। घेई दीनांचा कैवार । हेच ठरले ब्रीद सार ।। जुलमी सत्तेचा धिक्कार । दुष्ट रूढींचा संहार ।। नूतन सत्यमत प्रचारक। करिन चैतन्य संचार ।।'[२८]

महाराष्ट्र केसरी

'महाराष्ट्र केसरी' हे साप्ताहिक १९३१ च्या सुमारास अमरावतीहून सुरू झाले. 'वऱ्हाड मध्यप्रांत शेतकरी संघाचे साप्ताहिक मुखपत्र' असे या पत्राच्या मुखपृष्ठावर छापलेले असे. 'समता स्वातंत्र्य व बंधुप्रेम' हे 'महाराष्ट्र केसरी' चे ब्रीद होते. 'महाराष्ट्र केसरी' या नावाखाली 'दृष्टीसमोर समता ठेवी, स्वातंत्र्या धरि शिरी बंधु प्रेमा मागे लावी, महाराष्ट्र केसरी' असे वचन छापलेले असे.[२९]

प्रतिनिधी

ठाणे जिल्हा ब्राह्मणेत्तर काँग्रेसतर्फे 'प्रतिनिधी' हे पाक्षिक सखाराम हरी गोलतकर यांच्या संपादकत्त्वाखाली १५ ऑगस्ट १९२६ रोजी वसई येथे सुरू झाले. पहिल्या अंकातील 'आमचे कार्य' या अग्रलेखात संपादकांनी ब्राह्मणांचा द्वेष करण्यासाठी ब्राह्मणेत्तर पक्ष निर्माण झाल्याच्या आरोपाचा इन्कार करून स्वोद्धाराचा प्रयत्न करणे ही आमच्या कार्याची दिशा असल्याचे म्हटले

आहे.[३०]

लोकहितवादी :

'लोकहितवादी' हे साप्ताहिक केशव सीताराम ठाकरे यांनी ३१ ऑगस्ट १९२७ रोजी पुण्यातून सुरू केले. अव्वल इंग्रजी काळात सर्वांगीण सुधारणेचा पुरस्कार करणारे लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांच्या स्मरणार्थ हे साप्ताहिक काढले होते. या साप्ताहिकाचा उद्देश स्पष्ट करताना ठाकरे लिहितात, सरदार लोकहितवादींच्या स्मृती नष्ट होऊ पाहत असलेल्या महाराष्ट्राला नवमतवादी सिद्धांताचा परिचय करून देणे, हे तर मुख्य कर्तव्य आहेच पण त्याबरोबर महाराष्ट्रात एक वेळ गाजलेल्या आगरकरांच्या सुधारक मताचा जीर्णोद्धार करणे हेही लोकहितवादीचे धोरण राहिल.[३१]

सत्यशोधकीय नियतकालिकांतील वैचारिक साहित्य

वैचारिक साहित्य विचारप्रधान असल्यामुळे इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळे असते. विचारवंतांच्या विचारविश्वातून स्फुरलेल्या कोणत्याही विषयावरील मूलभूत चिंतन वैचारिक साहित्याचा भाग असू शकते. धर्म, समाज, भाषा, साहित्य, कला, संस्कृती, शिक्षण, इतिहास, भूगोल, विज्ञान, न्याय, नीती, अर्थशास्त्र, वैद्यकशास्त्र, पर्यावरण अशा कोणत्याही विषयावर विचारवंत, लेखक सखोल, सप्रमाण, मुद्देसूद विवेचन-विश्लेषण करीत असतो. त्यातून संबंधित विषयाच्या विविध पैलूंचा परिचय होतो. एखाद्या विषयाच्या मुळापर्यंत जाण्याची एक बौद्धिक विचारयात्रा म्हणजे वैचारिक साहित्य. लेखकाचा अभ्यास, व्यासंग, संशोधन, अनुभव, चिंतन, निरीक्षणे, दृष्टिकोन यांमधून वैचारिक साहित्य आकारास येत असते. वैचारिक साहित्यामध्ये आशयाइतकीच लेखनशैलीही महत्त्वाची असते. लेखकाच्या शैलीचा वाचकांवर प्रभाव पडत असतो.[३२]

वैचारिक साहित्यामध्ये विचार केंद्रस्थानी असतो. विचार प्रकटीकरणाची एक शैली असते. तर्कशुद्धता, सूत्रबद्धता, चिकित्सकता, खंडनमंडन, मूल्यात्मकता, चिंतनशीलता, साधार ससंदर्भ विवेचन, विश्लेषकता, बुद्धिनिष्ठता, शास्त्रीयता, आवाहकता, वैज्ञानिक दृष्टिकोन, कार्यकारणभावात्मकता, विचारसंपृक्तता, मूल्यनिर्णयन ही वैचारिक वाङ्मयाची काही वैशिष्ट्ये आहेत. वैचारिक लेखनामध्ये निःपक्षपातीपणा, तटस्थपणा अत्यंत महत्त्वाचा असतो. लेखकाने नीरक्षीरविवेकबुद्धीने, न्यायाधीशाच्या भूमिकेतून सद्सद्विवेकबुद्धी व अभ्यास यांना प्रमाण मानून विचार प्रकटीकरण केले पाहिजे.[३३]

मराठी वैचारिक साहित्यामध्ये समकालीन मराठी जनसमूहांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वार्षिक, वाङ्मयीन, शैक्षणिक जाणिवांचे, धारणांचे, मतमतांतरांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. वैचारिक साहित्यामुळे मराठी समाजाच्या स्थित्यंतराची, विचारविकसनाची माहिती मिळते. मराठी जनसमूहांचे विचारविश्व व मराठी गद्यशैली यांचे आकलन होते. वैचारिक साहित्याचे समाजाच्या विचारप्रक्रियेला व कृतिकार्यक्रमांना प्रभावित करून सुधारणेचा मार्ग दाखविला होता. या दृष्टीने पाहता मराठी जनसमूहांच्या आधुनिकीकरणामध्ये व समाजसुधारणेमध्ये वैचारिक साहित्याने अनन्यसाधारण योगदान दिल्याचे लक्षात येते.[३४]

समारोप :

ग्रामीण समाजरचना, गावगाडा आणि ग्रामजीवन हा सत्यशोधकांच्या चिंतेचा आणि चिंतनाचा प्रमुख विषय होता. गावगाड्याचे पारंपरिक स्वरूप, शोधकतत्त्वे व मागासलेपणास कारणीभूत घटक यांचे अचूक आकलन सत्यशोधकांना होते. गावगाड्यामध्ये शिक्षणाचे, विचारांचे, आत्मभानाचे, कालानुरूप बदलाचे वारे वाहण्याची नितांत आवश्यकता होती. अन्यथा सरंजामशाहीचे बुरसटलेले अवशेष कवटाळून बसणारी गावे बदलत्या जगापासून दूर फेकली जातील, त्यांच्या मागासलेपणास सीमा राहणार नाही, हे येणारे वास्तव सत्यशोधकांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी ग्रामीण समाजरचनेची चिकित्सा केली. कालबाह्य घटकांच्यावर कठोर टीका करून जनसामान्यांना आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले. आधुनिकतेच्या प्रकाशात परिवर्तनाच्या दिशा दाखविल्या, ग्रामविकासाचा समतामूलक, शोषणमुक्त, बुद्धिवादी आशय असणारा आराखडा मांडला. भारत हा श्रमजीवींचा, खेड्यांचा देश असल्याने खेड्यांची सुधारणा

झाल्यास देशाची सुधारणा खऱ्या अर्थाने होईल, असा ग्रामकेंद्रित विकासाचा महत्त्वपूर्ण विचार सत्यशोधकीय नियतकालिकांमधील साहित्यामधून मांडला गेला आहे.

यावरून सत्यशोधक चळवळीमध्ये नियतकालिकांचे म्हणजेच पर्यायाने साहित्य चळवळीचे महत्त्व विशद करता येईल.

संदर्भ ग्रंथ

१. कीर धनंजय, 'महात्मा जोतीराव फुले', सा. पुनर्मुद्रण २०२२, पृ. क्र. १५८, पॉप्युलर प्रकाशन मुंबई.

२. मनोहर यशवंत, 'संग्रामनायक जोतीराव फुले', द्वि.आ. २०२१, पृ. क्र. १०५, सनय प्रकाशन, जुन्नर, पुणे.

३. शिंदे अरूण, 'सत्यशोधकीय नियतकालिके', द्वि.आ. २०१९, उनि, पृ.क्र. ९२, १०६, १११, ११२, ११३, ११५, ११६, ११७, १२०, १२३, १३०, १३१, १३४, १४०, १५०, १६२, १६४, १८१, १८३, कृष्णा संशोधन व विकास अकादमी, मंगळवेढा, सोलापूर.

'आमची श्रीवाणी'ला हवे आहे आपले सकस,
दर्जेदार समीक्षा व संशोधनपर साहित्य.

'आमची श्रीवाणी'चे वर्गणीदार व्हा

आपल्या संस्थेला व मित्रांना वर्गणीदार करून घ्या!

वार्षिक वर्गणी फक्त रु. ३००/- (अंक ३)
द्वैवार्षिक वर्गणी फक्त रु. ५००/- (अंक ६)
संस्था आणि व्यक्तीकरिता ५ वर्षांसाठी रु.१५००/-

बँकेचा तपशील -
K.S.Wani Institue, Dhule
I.D.B.I.Bank, Dhule.
A/c No.48310010000610
IFSC-IBKL0000483

ऑनलाईन वर्गणी पाठविल्यास संस्थेच्या **kswmarathi@gmail.com** या मेलवर
अथवा ९४०५७ ५६४३६ या व्हॉटसॲपवर पावती पाठवावी.
संपर्क - (०२५६२)२२३६५४

सत्यशोधकी जलशांचे समाजप्रबोधनातील योगदान

- प्रशांत भंडे

सत्यशोधक समाजाने प्रागतिक, आधुनिक विचारांची कास धरली आणि बहुजन समाजात नवचैतन्य निर्माण करून परिवर्तन घडवून आणले. महाराष्ट्राच्या विविध भागातील जलसाकारांच्या जलशाचा परामर्श घेतल्यावर असे लक्षात येते की, ज्या अमानवी परंपरेने शूद्र, स्त्रिया, कष्टकरी, शेतकरी आणि मजुरांना शतकानुशतके अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र्यात ठेवले, लुबाडले, ठकविले ती परंपराच या जलशांनी ठोकरून लावली.

महात्मा फुले यांचे विचार आणि सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान लोककलेच्या माध्यमातून जनसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी जलशांची निर्मिती झाली. तमाशा, लळित दंडावतार इत्यादी लोकप्रिय कला त्या काळात समाजात रूढ होत्या. त्यातील संगीत, अभिनय, गीतरचना विविध वाद्ये समाजात लोकप्रिय असल्याने भीमराव महामुनी, भाऊराव पाटोळे, तातोबा यादव, गणपतराव मोरे या कलावंतांनी कला पथकाच्या माध्यमातून गण, गवळण, छक्कड, झगडा, लावणी वग इत्यादी घटकांच्या माध्यमातून पुरोगामी सत्यशोधकी विचार जलशांमधून सादर केले. जलशामध्ये अभिनय करणारे कलावंत स्वतः कवी प्रतिभेचे शाहीर होते. लोकवाद्यांची सर्व जाण त्यांना होती. अशा शाहीर कवींनी जलशाच्या माध्यमातून अनिष्ट चाली रीतीविरुद्ध जनजागरण केले. आद्य सत्यशोधकी लोकशाहीर भीमराव महामुनी यांनी १८८० ते १८८८ च्या दरम्यान सत्यशोधकी कला पथकांच्या माध्यमातून जलशांची निर्मिती केली.

जलसा: व्याख्या

१. जलसा अथवा तमाशा हे शब्द आणि त्यांच्या उत्पत्ती संदर्भातून आनंद देणाऱ्या उत्स्फूर्त कला. - कृ पां. कुलकर्णी

२. समतेच्या प्रस्थापनेसाठी समाजप्रबोधनाचे मूल्य रुजविणारी कलाकृती म्हणजे जलसा. - डॉ. वि.ल. धारूरकर

३. सहज सादर करता येणारा फार्शीकिल नाटकाचा संगीत प्रकार म्हणजे जलसा. - किरण अग्रवाल

४. समता, स्वातंत्र्य, न्याय व आत्मसन्मान शिकवून समाज प्रबोधनाचे मानस तयार करणारी बहुजनावर्ती संगीत लोकनाट्यात्मक कृती म्हणजे सत्यशोधक जलसा. - डॉ. अशोक चोपडे

५. वाद्य, संगीत, गायन, अभिनय, नाट्य, संवादफेक इत्यादी प्रयोगसिद्ध लोककला प्रकारातील वैशिष्ट्यांच्या आधारे सत्यशोधक विचार आणि

चळवळीच्या प्रसारासाठी सादर करण्यात येणारा दृकश्राव्य कलाप्रकार म्हणजे सत्यशोधकी जलसा होय. - डॉ. श्रीराम गुंदेकर

जलसा निर्मितीचे प्रयोजन

१. समाज प्रबोधन घडवून आणणे सत्यशोधकी तत्त्वज्ञान समाजापुढे आणणे.
२. अज्ञानी समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे.
३. महात्मा फुले यांचे निर्मिक संकल्पना समाजात रुजविणे.
४. महात्मा फुले यांचे विचार आणि कार्य लोकांपर्यंत पोहोचविणे.
५. समाजातील वाईट रूढी परंपरा अंधश्रद्धा यांना विरोध करणे.
६. खुळचट धर्मकल्पना मोडीत काढून सार्वजनिक सत्यधर्म समाजापुढे आणणे.
७. तत्कालीन ब्राह्मणांच्या ब्राह्मण्य प्रवृत्तीवर टीका करणे. इत्यादी

सत्यशोधकी जलशातील विषय

सत्यशोधकी जलशांनी तत्कालीन समाजातील अनेक प्रश्नांना वाचा फोडली. सावकारी पाशात अडकलेला, भटजीकडून नागावला गेलेला शेतकरी, स्वर्गप्राप्तीच्या मार्गातील अडसर मानल्या जाणाऱ्या स्त्रिया, अस्पृश्य समाजाचे बहिष्कृत जगणे अशा अनेक घटकांचे चित्रण सत्यशोधकी जलसाकारांनी केले. त्यातील प्रमुख विषय पुढील प्रमाणे;

मुलामुलींनो शाळेत जाऊ
विद्या देवीचे मंदिर पाहू
भटांचे तोंड खंडन
स्त्री वर्गास विनंती
वर्णभेद कोणी केला
भट सदाचारी की व्यभिचारी ब्रह्मदेव किती बापाचा
शेतकऱ्यांचे हाल
ज्ञान मार्गाला लागा
लबाडाला देव म्हणू नका
लहानपणाच्या लग्नाचा प्रकार
बालविवाहाचे मुंडन
केशवपणाचा फार्स
सत्यनारायणाचा फार्स

पुनर्विवाह. इत्यादी विषय जलसाकारांनी जलाच्या माध्यमातून समाजापुढे मांडले व समाजाचे लोकरंजनातून प्रबोधन केले.

प्रमुख सत्यशोधकी जलसाकार

ओतूरचे भीमराव महामुनी यांना आद्य सत्यशोधकी जलसाकार म्हटले जाते. ते प्रत्यक्ष महात्मा फुले यांच्या विचार व कार्याचे साक्षीदार होते. भीमराव महामुनी (विद्याप्रकाश), शास्त्री नारो महाघट व शास्त्री डुंबरे पाटील यांनी विदर्भातील वाडेगाव जिल्हा अकोला येथे 'भीमपुराण' १९०६ साली सादर केले. महाघटांनी पूजाविधि हे पुस्तक लिहिले. मो. तू. वानखडे यांनी 'भटांचे थोतांड खंडन' 'संगीत शेतकऱ्याची गोफण', 'संगीत सत्यशोधक चाबूक', 'संगीत सत्याचा शोध' इत्यादी ग्रंथ निर्मिती केली. ह.ल.चव्हाण 'जलशांकरिता पदसंग्रह' 'भटांचा धुला पदे' इत्यादी, रघुनाथ लेवे 'जलसा प्रकाश', भाऊराव पाटोळे 'जलसा शिक्षक', गोविंदराव फुटाणे 'सुधर्म विजय नाटक', रामचंद्र बाबाजी जाधव 'सुबोध सुमनावली', तातोबा यादव 'सत्याचा शोध', श्यामराव कुलट 'सत्यशोधक समाजाचे अभंग', संपादक य. खु. देशमुख 'देशोद्धार', गोपाळ देशमुख 'संगीत ग्रामोद्धार' इत्यादी कवी लेखकांनी जलसे लिहिले. या जलशांसाठी कर्मवीर भाऊराव पाटील, राजर्षी शाहू महाराज, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, पंढरीनाथ पाटील, भाऊराव पाटोळे, जोत्याजीराव फाळके यांनी सर्वतोपरी मदत केली.

सत्यशोधकी जलशांचे समाजप्रबोधनातील योगदान

तत्कालीन समाजाचे प्रबोधन करण्याचे कार्य सत्यशोधकी जलशांनी केले आहे. दैनंदिन जीवनातील लोकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न जलशात असायचे. जलशातील आशय पाहून लोक रडायचे. तासनतास एकाच ठिकाणी बसून जलसे पाहायचे जलशातून बोध घेऊन लोक आपली मुले शाळेत पाठवू लागली.

ब्राह्मणांच्या मदतीशिवाय लग्नविधी व इतर विधी करण्यात येऊ लागले. ब्राह्मणाचे कपटकारस्थान ओळखून लोकांनी त्यांच्या शेतीत काम करण्यास बहिष्कार घातला. अस्पृश्यता व जातीयता कमी होऊ लागली. लोक अंधश्रद्धा व कर्मकांडाऐवजी कष्ट करण्यावर भर देऊ लागले. लोकांना आपल्या शोषणाचे अधोगतीचे कारण समजले. ते भट ब्राह्मणांच्या कारस्थानांना बळी न पडता शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तनाच्या प्रवाहात येऊ लागले. असे समाजजीवनावर जलशांचे व्यापक परिणाम झाले.

निस्वार्थ, त्याग, सेवाभाव आणि सामाजिक सुधारणाची तळमळ या उदात्त भावनेने प्रेरित होऊन जलशासाठी लेखन करणारे शाहीर जलसा पथक चालवणारे जलसाकार व जलशात काम करणारे कलावंत यांनी कार्य केले आहे. सत्यशोधक तत्त्वज्ञान घराघरात पोहोचले पाहिजे. लोकांनी शिक्षण घेतले पाहिजे. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक या क्षेत्रात परिवर्तन झाले पाहिजे. या तळमळीने जलसाकाराने कार्य केले आहे. शाहीर, जलसाकार व कलावंत यांनी अर्थप्राप्तीसाठी कार्य न करता निस्वार्थपणे कार्य केले आहे. स्वतःचे पैसे खर्च करून शाहीर आणि पद लेखनाची पुस्तके छापली. जलसाकार व कलावंतांनी मानधन न घेता गावोगावी जाऊन जलसे सादर केले. त्यांनी पुरस्कार सन्मान पैसा या गोष्टीची अभिलाषा न ठेवता पदरमोड करून जलसे चालविले.

सत्यशोधक चळवळीच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार प्रसार करण्यासाठी वृत्तपत्रे, मासिके, सभा, संमेलने, कीर्तन, जलसा ही माध्यमे वापरण्यात आली. यापैकी जलसा हे अत्यंत प्रभावी माध्यम ठरले. जलसा अशिक्षित, शेतकरी, कामगार, बहुजन, स्त्रिया अशा बहुसंख्य समाजात लोकप्रिय होता. आद्य जलसाकार भीमराव महामुनी, भाऊराव पाटोळे यांनी सत्यशोधक समाजाची अधिवेशने, संमेलने अशा ठिकाणी प्रबोधन करण्यासाठी जलसा या माध्यमाचा वापर केला. लोकाभिरूची लक्षात घेऊन दैनंदिन जीवनातील विषय व समस्या लोकभाषेतून मांडण्याचे काम जलसाकार व कलावंतांनी केले आहे. त्यामुळे समाजप्रबोधनाच्या चळवळीत जलसा हे अत्यंत उपयुक्त माध्यम आहे

सत्यशोधक जलसाकार हे महाराष्ट्राच्या विविध प्रदेश व्यवसाय व जाती स्तरातील असल्यामुळे लोकभाषेचा प्रभावी वापर त्यांनी केला आहे. त्यामुळे जलसा लोक चळवळ ठरते. जलसा पाहण्यासाठी गरीब, श्रीमंत, महिला, पुरुष व विविध जाती स्तरातील लोकांची गर्दी होत असे. यात्रा, उत्सव, सभा, संमेलने, अधिवेशने अशा गर्दीच्या ठिकाणी जलसे सादर केले जात होते. त्यामुळे जलसा पाहण्यासाठी लोक हजारोंच्या संख्येने उपस्थित असायचे. लोक रात्रभर जागे राहून जलसा पाहायचे. जलसा कलावंतांना पाठिंबा व संरक्षण द्यायचे.

जलसा : सामाजिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक ठेवा

महाराष्ट्र राज्याची परिवर्तनवादी प्रगतशील व पुरोगामी राज्य अशी उभारणी करण्यात जलशांचे अनन्यसाधारण योगदान आहे. साहित्यनिर्मितीचे वेगळेपण व प्रयोगात्मक नाट्यकला या दृष्टीनेही जलशांचे महत्त्व अधोरेखित करण्यासारखे आहे. सत्यशोधकी तत्त्वज्ञानावर आधारित पर्यायी व परिवर्तनवादी संस्कृती निर्माण करण्यामध्ये जलशांची भूमिका मोलाची ठरली आहे. गण, गौळण, लावणी, बतावणी, वग या घटकाच्या आधारे गीत, संगीत व अभिनय कलेच्या माध्यमातून जलसा सादर करण्यात येत. आज जलशांच्या सादरीकरणाचे प्रमाण कमी झाले असले तरी जलशाचे महत्त्व कमी होत नाही. आजच्या चंगळवादी व जातीय स्तरीकरण वाढलेल्या काळात जलशांची नितांत गरज आहे येणाऱ्या अनेक वर्षानंतर हे जलशाचे सामाजिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक योगदान सुवर्णअक्षराने लिहिण्यासारखे आहे.

जलसे हे वाङ्मयमूल्य व जीवनमूल्यांनी ओतप्रोत भरलेले आहेत. शोषित, उपेक्षित, वंचित माणसाच्या अंतःकरणातील आवाज जलशातून व्यक्त झाला आहे. अन्याय, गुलामगिरी व शोषणामुळे हतबल झालेल्या माणसांना जलशांनी जगण्याचे व लढण्याचे बळ दिले. अडाणी देव भोळ्या व अन्यायग्रस्त माणसाला डोळस बनवले. भारतीय संविधानाने जगाला दिलेली

स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मानवतावादी तत्त्वे जलशात आढळतात. स्त्री पुरुष समानता, एकेश्वरवाद, जातविरहित समाजरचना, कर्मकांडास विरोध अशा विविध विचारांचा आग्रह जलशातून व्यक्त झाला आहे. म्हणून जलसा कलेचे जतन करणे, संवर्धन करणे, नव्या पिढीतील तरुणांना जलशाचे महत्त्व सांगून जलसा निर्मितीस प्रेरणा व प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे.

जलशाचे महत्त्व सांगताना डॉ. अशोक चोपडे म्हणतात, सत्यशोधक जलसाकारांनी रूढीपरंपरेला मूठ माती देणारे विचार दिले. नवीन न्यायाची, समतेचा समाज निर्माण करणारी व्यवस्था सांगितली. प्रागतिक आधुनिक विचारांची कास धरली आणि बहुजन समाजात नवचैतन्य निर्माण करून परिवर्तन घडवून आणले. महाराष्ट्राच्या विविध भागातील जलसाकारांच्या जलशाचा परामर्श घेतल्यावर असे लक्षात येते की, ज्या अमानवी परंपरेने शूद्र, स्त्रिया, कष्टकरी, शेतकरी आणि मजुरांना शतकानुशतके अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र्यात ठेवले, लुबाडले, ठकविले ती परंपराच या जलशांनी ठोकरून लावली. जलशांनी ज्ञान, विज्ञान आणि जीवनाची प्रशंसा केली. धर्मग्रंथ, धार्मिक रूढी परंपरा, कर्मकांड, देव व दैववाद यांची चिकित्सा करून नवविचार जागृतीचे कार्य केले. म्हणून जलसा हा महाराष्ट्रातील सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक व वाङ्मयदृष्ट्या अनमोल असा ठेवा आहे.

संदर्भ ग्रंथ

१. चोपडे, डॉ. अशोक, 'विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य', कँडीड प्रकाशन वर्धा. प्रथमावृत्ती २००३.

२. उगले, जी.ए., 'सत्यशोधक समाज अधिवेशने : चिंतन आणि चिंता', मराठवाडा सार्वजनिक सभा, औरंगाबाद प्रकाशन.
प्रथमावृत्ती २००६-

३. बागल, माधव खंडेराव, संपादक, 'सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ', श्री. शाहू सत्यशोधक ग्रंथ प्रकाशन, करवीर. प्रथमावृत्ती १९३३.

४. जोशी, पंडित महादेव शास्त्री, 'भारतीय संस्कृती कोश', भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे. खंड आठवा, प्रथमावृत्ती १९७४.

५. गुंदेकर, डॉ. श्रीराम, 'सत्यशोधकी साहित्याचा इतिहास', खंड पहिला, सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, लातूर. प्रथमावृत्ती २०१०.

६. खराट, संभाजी, 'महात्मा जोतिराव फुले आणि सत्यशोधक जलसे', साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती १९९०.

◆◆◆

सत्यशोधक चळवळ आणि कोकणातील तीन सत्यशोधक विचारवंत .

- बाळकृष्ण लळीत

'जातिभेदविवेकसाराचे वैशिष्ट्य म्हणजे जातिव्यवस्थेची, जातिभेदाची आणि त्यामुळे होणाऱ्या अनिष्ट परिणामांची सविस्तर चर्चा करणारा तो आधुनिक भारतीय भाषांमधील पहिला ग्रंथ आहे. जातिभेदाच्या खंडनासाठी तुकारामतात्यांनी जे संस्कृत व मराठी आधार घेतले आहेत; त्यावरून त्यांचा व्यासंग आणि जे युक्तिवाद केले आहेत, त्यावरून त्यांची विचारशक्ती या दोहोंचा परिचय होतो.

इंग्रजी राजवटीत धार्मिक आणि सामाजिक दास्यांमध्ये अनेक वर्षे दडपल्या गेलेल्या बहुजन व दलित समाजाच्या मुक्ततेसाठी महात्मा जोतिबा फुले यांनी १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. मानवाच्या समतेवर विश्वास घोषित करणारी आधुनिक महाराष्ट्रातील ही पहिली चळवळ होय. उच्चवर्णियांच्या श्रेष्ठत्वाला व वर्चस्वाला धक्का देऊन सामाजिक समता प्रस्थापित करावयाची असेल तर चातुर्वर्ण्य-पद्धती, जन्माधिष्ठित जातीव्यवस्था, धार्मिक रूढी, जीर्ण चालीरीती नष्ट केल्या पाहिजेत, असा समग्र क्रांतीचा विचार महात्मा फुले यांनी व्यक्त केला. यासंबंधी डॉ. अशोकराव एरंडे म्हणतात,-

इ. स. १९१० नंतर सत्यशोधक समाजास आलेली मरगळ झटकून टाकून तिला नवे रूप देण्याचे महत्त्वाचे कार्य दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांनी केले आहे. महात्मा फुले आणि कृष्णराव भालेकरांच्या विचारांचा नंदादीप स्वत्वाचे तेल घालून आमरण तेवत ठेवण्याचे मोलाचे कार्य त्यांनी 'दीनमित्र' पत्रातून केले आहे. सत्यशोधक समाजाचा झेंडा खांद्यावर घेऊन नि:स्वार्थी व तत्त्वनिष्ठेने वाटचाल करणाऱ्या सत्यशोधक कार्यकर्त्यांमध्ये त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे.

पण त्यापूर्वी कोकणात जन्मलेल्या तीन विचारवंतांनी या चळवळीत स्वतःला झोकून दिले व सत्यशोधक विचार सामान्य लोकांच्यासमोर नेले त्यापैकी एक म्हणजे तुकारामतात्या पडवळ. दुसरे केशवराव विचारे आणि तिसरी व्यक्ती म्हणजेच... भास्करराव जाधव.

या तिन्ही विचारवंतांची कर्मभूमी जरी घाटमाथ्यावरील विविध ठिकाणी असली तरीपण त्यांचे जन्म व निष्ठा संदर्भातील गुण खास कोकणातील. 'मोडेन पण वाकणार नाही' हा बाणा आणि सतत कार्यतत्पर असणे हा संस्कार दिसून येतो.

या शोधलेखात त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेत आहे; अर्थात त्यांच्या सत्यशोधकीय कार्याचे मूल्यमापन ज्या समीक्षक-अभ्यासकांनी पूर्वी केले

त्यातूनच हा शोध घेण्यात येत आहे.

*** महात्मा फुले यांचे सहकारी–तुकोबांच्या अभंग गाथेचे संपादक, सत्यशोधक–**

*** तुकारामतात्या पडवळ**

कोकणात जन्मलेले संत साहित्याचे अभ्यासक व सत्यशोधक समाज कार्यात अविस्मरणीय कार्य करणाऱ्या तुकारामतात्या पडवळ यांच्या जीवनकार्याचा शोध सुरवातील घेऊया. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील वरवडे या गावी भंडारी समाजात १८२० साली झाला अशी माहिती मिळते. अव्वल इंग्रजी काळातील 'मराठी साहित्यिक' म्हणून ते ओळखले जातातच; पण 'सत्यशोधक समाजाचे सदस्य' म्हणून त्यांनी केलेले लेखन महत्त्वाचे आहे. त्या काळातील मुंबईतील एक व्यापारी, दानशूर व्यक्ती म्हणूनही त्यांना ओळखले जाते. लेखनाबरोबरच' तत्त्वविवेचक छापखान्याचे मालक म्हणूनही त्यांची ओळख महत्त्वाची आहे. वारकरी संतांच्या अभंगगाथा तसेच काही इंग्रजी ग्रंथ त्यांनी प्रकाशित केले. १८८० साली ते थिऑसॉफिकल सोसायटीचे सदस्य झाले, संस्थेला भव्य वास्तू बांधून दिली.

'जातीभेद विवेकसार' या मौलिक पुस्तकाचे लेखक (अश्वघोषाच्या वज्रसूचीवर आधारित) ग्रंथ १८६१ साली प्रसिद्ध केला होता. त्याची दुसरी आवृत्ती महात्मा फुले यानी १८६५ साली स्वखर्चाने प्रकाशित केली होती. तुकारामतात्या पडवळ यांच्या समग्र तुकाराम गाथेत ८४०० अभंग आहेत. तुकारामतात्या पडवळ यांनी लिहिलेले वा प्रकाशित केलेले ग्रंथ पुढील प्रमाणे-

१) जातिभेद विवेकसार २) समग्र तुकाराम गाथा ३) तुकारामबाबा आणि त्यांचे शिष्य यांच्या अभंगांची गाथा ४) श्रीएकनाथ महाराजांच्या अभंगांची गाथा

'जातीभेद विवेकसार' या ग्रंथाचे कर्ते तुकाराम तात्या पडवळ त्यांचे प्राथमिक शिक्षण गावी झाल्यावर पुढील शिक्षण मुंबई येथील 'रॉबर्ट मनी हायस्कूल' मधून झाले. त्यांचा 'थिऑसॉफी आणि हिन्दू धर्मशास्त्र' यांचा दांडगा व्यासंग होता. शालेय शिक्षणानंतर त्यांनी स्वत:ची पेढी (बँक) काढून व्यापारात आपला जम बसविला होता. ग्रंथवाचन व लेखनाच्या आवडीपायी त्यांनी 'तत्त्वविवेचक' या नावाचा छापखाना काढून त्या छापखान्यातून संस्कृत धर्मग्रंथ, वारकरी संतांच्या अभंगगाथा व काही इंग्रजी ग्रंथ प्रकाशित केले. त्यांनी संत तुकाराम महाराजांचे आठ हजार चारशे अभंग एकत्र करून 'समग्र तुकाराम गाथा'या नावे छापले.

या ग्रंथाचे महत्त्व सांगताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे लिहितात,

'जातिभेदविवेकसाराचे वैशिष्ट्य म्हणजे जातिव्यवस्थेची, जातिभेदाची आणि त्यामुळे होणाऱ्या अनिष्ट परिणामांची सविस्तर चर्चा करणारा तो आधुनिक भारतीय भाषांमधील पहिला ग्रंथ आहे. जातिभेदाच्या खंडनासाठी तुकारामतात्यांनी जे संस्कृत व मराठी आधार घेतले आहेत; त्यावरून त्यांचा व्यासंग आणि जे युक्तिवाद केले आहेत, त्यावरून त्यांची विचारशक्ती या दोहोंचा परिचय होतो. ग्रंथामधील काही मुद्यांचा फार चांगला उपयोग पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेला दिसून येतो. हिंदुजन संसारात जी दुःखे भोगितात त्या, किंबहुना सर्व दुःखांचे मूळ हा जातिभेद आहे, असे ते म्हणतात. जातिभेदांपासून होणाऱ्या तोट्यांचे मानसिक, नीतिसंबंधी, व्यावहारिक आणि राजकीय असे वर्गीकरण करून त्यातील प्रत्येक वर्गासंबंधी तुकारामतात्यांनी सविस्तर व साधारण विवेचन केले आहे. हे सर्व करताना जास्तीत जास्त आधार घेण्यात आले आहेत, ते तुकोबांच्या अभंगांचेच.' (पृ. २३०)

तुकारामतात्या पडवळ यांच्या अविस्मरणीय कार्याविषयी डॉ. सदानंद मोरे यांनी आपल्या 'तुकाराम दर्शन' या ग्रंथात त्यांच्या कार्याचे मूल्यमापन पुढील शब्दांत केले आहे.

तुकारामतात्या पडवळ हे एकोणिसाव्या शतकामधील एक विलक्षण व्यक्तित्व होते. भंडारी जातीतील हे गृहस्थ अगोदर दादोबा पांडुरंगाच्या परमहंस सभेचे सभासद होते. प्रार्थना समाजाशी त्यांचे जवळचे नाते होते. त्याचा थिऑसॉफीकडे कल होता. विशेष म्हणजे त्या काळचे प्रसिद्ध आणि वादग्रस्त समाजसुधारक

संमतिवयाच्या कायद्याचे शिल्पकार मलबारी शेठ यांच्या साह्याने तुकारामतात्यांनी मुंबईमध्ये होमिओपथीचा धर्मार्थ दवाखानाही चालवला होता.

तुकारामतात्या हे महात्मा फुल्यांचे सहकारी होते. फुल्यांच्या सत्यशोधक समाजाला त्यांची सक्रिय मदतही असे. 'मुंबईकर व्यापारी' या नावाने सत्यशोधक समाजाच्या रिपोर्टात देणगीदार म्हणून दाखल असलेले दानशूर गृहस्थ म्हणजे हेच तुकारामतात्या पडवळ, आपल्या दृष्टीने तुकारामतात्यांचे महत्त्व संतवाङ्मयाचे संग्राहक, मुद्रक आणि प्रकाशक असे आहे. 'तत्त्वविवेचक छापखाना' ही संस्था काढून त्यांनी अनेक संतांचे अभंग प्रसिद्ध केले. देहू परिसरात महात्मा फुल्यांबरोबर फिरून त्यांनी तुकोबांचे अभंग तर मिळवलेच, परंतु बहिणाबाई, गोपाळबाबा, कचेश्वर, शिवदिन केसरी, नामा शिंपी, विठ्ठलनाथ, वामन पंडित, रंगनाथ, मोरोपंत इत्यादींनी केलेल्या रचनाही मिळवल्या आणि तुकोबांच्या अभंगांच्या द्विखंडात्मक संहितेत समाविष्टही केल्या. तुकारामांच्या चाहत्यांवर त्यांचे अनंत उपकार आहेत. 'तुका म्हणे' अगर तत्सदृश मुद्रेने त्यांना जेवढ्या म्हणून रचना मिळाल्या त्या सर्व त्यांनी तुकारामगाथेत समाविष्ट केल्या. त्यातील काही रचना नि:संशयपणे देहूकर तुकोबांच्या नाहीत; पण काही रचना अशा आहेत की, ज्या नक्कीच देहूकर तुकोबांच्या आहेत. परंतु काही कारणांमुळे त्यांचा समावेश अधिकृत संहितांमध्ये केला गेला नाही. (तुकाराम दर्शन, पृ.१५४)

या ग्रंथात त्यांच्या लेखनकार्याविषयी आणखी एक नोंद सापडते व ती म्हणजे बहिणाबाई या वारकरी परंपरेतील अखेरच्या कवयित्री त्या तुकाराम महाराजांच्या समकालीन होत्या. डॉ. सदानंद मोरे लिहितात, 'बहिणाबाईंचे आणखी एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे बौद्ध तत्त्वचिंतक अश्वघोष ब्राह्मणविध्वंसक वज्रसूचि या कृतीवर त्यांनी केलेले अभंगात्मक भाष्य. अश्वघोषांनी या कृतीत जन्माधिष्ठित ब्राह्मण्याला कडाडून विरोध केलेला आहे. ब्राह्मण कोणाला म्हणायचे, याचे विवेचन करणारी ही कृती एकोणिसाव्या शतकातील दादोबा पांडुरंग, तुकारामतात्या पडवळ, म. जोतीराव फुले अशा सुधारकांना मार्गदर्शक ठरली.

जातिभेदविवेकसार या तुकारामतात्यांनी सिद्ध केलेल्या पुस्तकात वज्रसूचि अवतीर्ण होते. बहिणाबाईंचे काही अभंगही त्यांनी समाविष्ट केलेले आहेत. या पुस्तकाची दुसरी आवृत्ती महात्मा फुले यांनी काढली आणि आपल्या दुकानी विकायलाही ठेवली. (तु. द. पृ. ५९)

तुकारामतात्यांनी बहिणाबाईंचे काही अभंग १८६० दरम्यान प्रसिद्ध केले. 'महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर तुकारामतात्यांच्या लेखनाचा- कार्याचा प्रभाव पडला होता असे दिसून येते. या संदर्भात 'तुकाराम दर्शन'कार डॉ. मोरे यांनी पुढील शब्दांत त्यांच्याविषयी लिहिले आहे.

जातिभेद विवेकसार प्रसिद्ध झाल्यानंतर तत्कालीन समाजात केवढी खळबळ उडाली असेल, याची आपण कल्पना तर करू शकतोच; पण या कल्पनेचे प्रत्यंतरसुद्धा तत्कालीन वृत्तपत्रांमध्ये आलेल्या परीक्षणांवरून पाहू शकतो. अर्थात, असल्या विवेकसारांनी काहीही परिणाम होणार नाही, असे नि:संकोचपणे बजावणारे विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारखे परंपरेचे पाईकही तेव्हा होतेच.

ग्रंथाची पहिली आवृत्ती काढून वासुदेव बाबाजी नवरंगे व्यावसायिक कारणासाठी विलायतेला गेले. ही आवृत्ती हातोहात खपली, तेव्हा महात्मा फुले यांनी स्वतः पुढे येऊन दुसरी आवृत्ती काढली. या पुस्तकांची ते विक्रीही करत. त्यांच्या विचारपद्धतीवर या पुस्तकाचा परिणाम झालेला होताच. त्यांचे व तुकारामतात्यांचे संबंध अखेरपर्यंत मैत्रपूर्ण राहिले व तुकारामतात्या सत्यशोधक समाजाला आर्थिक मदतही करत. तुकारामतात्या व्यापारी किंवा मुंबईकर या नावाने आढळणाऱ्या देणग्यांच्या नोंदी याच तुकारामतात्यांच्या. तुकारामतात्यांचे प्रमुख कार्य म्हणजे संतवाङ्मयाचे प्रकाशन. ज्ञानेश्वरी, नामदेवरायांची गाथा, निळोबारायांची गाथा त्यांनी हस्तलिखिते जमवून छापल्या. त्यांनीच सिद्ध केलेली एकनाथांची गाथा त्यांच्या पश्चात त्यांच्या चिरंजीवांनी प्रसिद्ध केली; पण या प्रकाशनांपैकी सर्वांत महत्त्वाचे प्रकाशन म्हणजे तुकारामतात्यांनी दोन भागांत छापलेली तुकाराम गाथा.

या गाथेचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अभंगांची हस्तलिखिते शोधून त्यांच्यामधील तुकोबांची नाममुद्रा असलेले सर्व अभंग, त्यांचे वर्गीकरण करून प्रसिद्ध केले. ही संख्या साधारण आठ हजारांच्या आसपास आहे. तुकोबांच्या नेहमीच्या गाथांमधून आढळणाऱ्या चार-साडेचार हजार अभंगापेक्षाही संख्या अधिक आहे. अर्थात, या अतिरिक्त अभंगांपैकी अनेक अभंग तुकोबांचे नाहीत हे उघड आहे; पण तरीही त्यातील काही अभंग निश्चितच तुकोबांचे, म्हणजे देहूकर तुकोबांचे आहेत (तु. द. पृ. २३०) या वरून एकूणच तुकारामतात्यांच्या योगदानाची पूर्ण कल्पना येते. त्यांचे निधन ३ जून १८९८ रोजी झाले.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग 'नागाव'चे भास्कर‌राव जाधव

यानंतर कोकणात जन्मलेले दुसरे सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते भास्कर‌राव जाधव होत. महात्मा फुले यांच्यानंतर सत्यशोधक समाजाचे एक अध्यक्ष विद्याव्यासंगी, विचारवंत म्हणून भास्कर‌राव विठोजी जाधव यांचा उल्लेख करावा लागतो.

आजच्या रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील नागाव या गावी १७ जून १८६७ रोजी त्यांचा जन्म झाला. महाड, नागाव, बाणकोट, हर्णे, राजापूर, भिवंडी इत्यादी ठिकाणी त्यांचे शिक्षण झाले. १९८८ साली ते महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुणे येथे आले. ज्येष्ठ सत्यशोधक स्वामी रामय्या अय्यावरू यांच्या निवासस्थानी याच वर्षी महात्मा फुले व भास्कर‌राव यांचा परिचय झाला. पुढे मुंबई विद्यापीठातून ते एम. ए. व नंतर एल. एल. बी. झाले. पूर्वी पारंपरिक विचारांचा पगडा असलेल्या भास्कर‌रावाना अय्यावरुंच्या सहवासात आल्यावर वैचारिक परिवर्तन झाले पुढे तर ते कोल्हापूर सत्यशोधक शाखेचे आधारस्तंभ झाले. कोल्हापूरला राजश्री शाहू महाराजांकडे ते सेवेत रूजू झाले. मुंबईहून प्रसिद्ध होणारे 'दीनबंधु' पत्र बंद पडल्यावर ते त्यांनी १९०३ साली कोल्हापूरहून सुरू केले. १९३० साली झालेल्या लंडन येथील गोलमेज परिषदेला ते उपस्थित होते. पुढे सातारा येथे काही वर्षे राजकारण सोडून त्यांनी वकिली सुरू केली.

लेखन

या विषयी जी.ए.उगले यांनी म्हटले आहे की, 'भास्कर‌राव जाधव यांचा कल लेखनाकडे असल्याने त्यांनी दीनबंधु, मराठा, दीनमित्र पत्रांमधून प्रासंगिक लेखन केले. प्रस्तुत पत्रामधून सत्यशोधक चळवळीवर वारंवार लेखन केले. भास्कर‌राव जाधव हे चतुरस्त्र सत्यशोधक लेखक असून 'रामायणावर नवा प्रकाश' हा त्यांचा महत्वाचा सत्यशोधकी ग्रंथ असून 'रामायणावर' त्यांनी सत्यशोधकी दृष्टीने नवा प्रकाश टाकला आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ३२० या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षपद भास्कर‌राव जाधवांनी भूषवले. याप्रसंगी 'मराठे व त्यांची भाषा' या विषयावर त्यांचे एक व्याख्यान झाले होते याच भाषणाचे सन १९३२ साली 'मराठे आणि त्यांची भाषा' या शीर्षकाचे दासराम (रामचंद्र बाबाजी जाधव) यांनी प्रकाशक म्हणून पुस्तक प्रसिध्द केले होते. या ग्रंथाला शा.सं. भोसले यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. या ग्रंथात मराठा समाजाचा प्राचिन इतिहास नोंदविला असून मराठे हे आर्य असल्याचे मतही भास्कर‌रावांनी सप्रमाण नोंदविले आहे. भास्कर‌राव जाधवांनी अनेक सत्यशोधक ग्रंथांना मौलिक प्रस्तावना लिहिल्या आहेत. १९१३ साली प्रसिध्द झालेल्या दीनमित्रकार मुकुंदराव पाटलांच्या कुळकर्णी लीलामृत या खंड काव्याची भास्कर‌राव जाधवांची प्रस्तावना मौलिक सदरातच मोडली जाते. महात्मा फुले यांचा सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ विसाव्या शतकाच्या आरंभी दुर्मिळ झाला होता. या ग्रंथाची दुसरी आवृत्ती दासराम यांनी १५ फेब्रुवारी १९३८ साली प्रसिध्द केली. (सत्यशोधक समाज, साहित्य आणि विचार, पृ. ९१) पुणे, बेळगाव, कोल्हापूर इ ठिकाणी झालेल्या सत्यशोधक अधिवेशन काळात त्यांनी महत्त्वाचे लेखन व आयोजनात सहभाग घेतला. दलित, बहुजन समाजात सुधारणा व्हावी म्हणून ते आयुष्यभर कार्यरत होते. २६ जून १९५० रोजी कोकणात जन्मलेल्या या सत्यशोधक विचारवंतांचे निधन झाले. 'शाहू महाराजांची माणसे'या कृ. भा. बाबर यांच्या पुस्तकात तसेच अनेक ग्रंथ,

स्मरणिका, कार्यवृत्तातून त्यांच्या कार्याविषयी माहिती मिळते.

रत्नागिरीचे सत्यशोधक– केशवराव विचारे गुरुजी

सत्यशोधक चळवळीत 'गुरुवर्य', गुरूजी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केशवराव विश्राम विचारे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यात 'अडूर'या गावी झाला. कोकणातील या गावी फक्त ४थी पर्यत शाळा असल्याने त्यांना १२ व्या वर्षी मुबंईत पाठविले गेले. दिवसभर काही कामे करून ते रात्रशाळेत जात. तेथे त्यांना वाचनाची आवड निर्माण झाली. अनेक भाषेवर त्यांनी प्रभुत्व मिळविले. पुढे रेल्वेत नोकरी मिळाली ते मिरज, कोल्हापूरला आले. धार्मिक विचार व आचार करणाऱ्या केशवराव यांनी एकदा भास्करराव जाधव यांच्या सभेस उपस्थित राहून विचार ऐकले व धर्मनिष्ठेपेक्षा कर्मनिष्ठा महत्त्वाची हे मानले. ते सत्यशोधक विचारानी भारावून गेले व कार्यकर्ते बनले. रेल्वेच्या नोकरीचा राजीनामा दिला पण ही गोष्ट रा.शाहू महाराजांना समजल्यावर त्यांना कोल्हापूरला बोलावले व आपल्या संस्थानात मामलेदार केले. पुढे त्यांनी सत्यशोधक कार्याला वाहून घेतले. आपल्या एका लेखात सत्यशोधक विचारे गुरुजींच्या कार्यावर प्रा.उज्वला नलावडे यांनी प्रकाश टाकला आहे. त्या लिहितात. '१९१९ ते १९५७ असे एकूण ३८ वर्षे केशवराव विचारे यांनी म. फुल्यांच्या तत्त्वज्ञानास अनुसरुन सत्यशोधक चळवळीचे कार्य केले. हे कार्य करीत असतांना त्यांनी या चळवळीला एक वेगळी दिशा व वेगळे स्वरूप दिले. बदलत्या काळात सत्यशोधक समाजाचे कार्य केवळ व्याख्याने देवून होणार नाही याची जाणीव झाल्यामुळे त्यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य वाढविण्यासाठी एका नव्या मार्गांची आखणी केली. ग्रामीण परिसरात त्यांनी लोकशिक्षणासाठी प्रौढ शिक्षणाची मोहीम राबविण्याचे ठरविले. केशवरावांची ही प्रौढ शिक्षणाची मोहीम निरक्षराला साक्षर करण्याबरोबरच साक्षराला जागृत करून वैचारिक दृष्ट्या सक्षम व शहाणा बनविण्यासाठी होती. त्यासाठी त्यांनी कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघ, पोस्टल क्लासेस व सत्यशोधक विद्यार्थी संघ, इ. उपक्रम सुरू केले.'

समाजसुधारणेबरोबरच आर्थिक व धार्मिक सुधारणा आणण्याचा केशवरावांचा प्रयत्न होता. सामाजिक समतेबरोबरच आर्थिक समतेचे बीज त्यांच्या उपक्रमात होते. सामाजिक समतेच्या स्थापनेसाठी प्रथमतः सामान्य माणूस शहाणा करण्याचे व्यवहारी काम केशवराव विचारे यांनी केले. सत्यशोधक समाजाचा कार्यकर्ता वक्ता झाला पाहिजे. त्याला चालू राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे यथोचित ज्ञान असले पाहिजे, त्याला सहकाराची सखोल माहिती दिली गेली पाहिजे आणि याबरोबरच सामान्य कष्टकरी जनतेमध्ये 'आपली उन्नती आपल्या हाती' ही जाणीव निर्माण करुन त्यांचा स्वकर्तृत्वासंबंधीचा आत्मविश्वास वाढविला पाहिजे असे अनेक उद्देश्य डोळयांसमोर ठेवून केशवरावांनी कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघ, पोस्टल क्लासेस व सत्यशोधक विद्यार्थी संघ इ. उपक्रम सुरू केले. या उपक्रमासाठी त्यांनी स्वतः इतिहास, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, राजकारण, सहकार, इ. विषयांचा सर्वांगिण अभ्यास करून अभ्यासक्रम तयार केला. हा अभ्यासक्रम पत्रव्यवहाराद्वारे पाठवून कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघ व पोस्टल क्लासच्या माध्यमातून त्यांनी लोकजागृतीचे कार्य सुरू केले. परंतु त्यामुळे त्याला काही मर्यादाही पडत होत्या. त्यामुळे असे पत्रव्यवहारातून अभ्यासवर्ग चालवण्यापेक्षा माणसेच संघटित करून त्यांना आपले विचार पटवून द्यावेत आणि यामधून तयार झालेल्या कार्यकर्त्यांना गावोगाव पाठवून लोकशिक्षणाचे कार्य केल्यास ते अधिक व्यापक आणि प्रभावशाली होईल आणि कामालाही वेग येईल असे त्यांना वाटू लागले, असे प्रा.उज्वला नलावडे यानी म्हटले आहे. (पृ. ९९)

तसेच १९३९ ते १९५६ दरम्यान त्यांनी महाराष्ट्रात विविध ठिकाणी शिबिरे आयोजित केली. ब्राह्मण्य, जातीभेद, वर्णवर्चस्व, अंधश्रद्धा, वाईट चालीरीती इ, विषयावर आवाज उठवला. लोक जागर व्हावा म्हणून शाहिरी कलापथके तयार केली. केवळ टीका करत रहाण्यापेक्षा बहुजनांच्या प्रगतीसाठी आर्थिक, सहकार, शेती, उद्योग निर्माण कसे होतील यावर मार्गदर्शन

केले. ४७ एकर स्वतःच्या जागेत कृषी औद्योगिक वसाहत जांभुळवाडी येथे सुरू केली. त्यात शेतीला जोड उद्योग सुरू करायला प्रोत्साहन दिले, महात्मा फुले यांचे कार्य पूर्णत्वास देण्याचा प्रयत्न केला. आचार्य प्र. के. अत्रे यांनीही त्यांच्या कार्याचे जाहीर कौतुक केले.

निष्कर्ष –

१) महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीला सर्वसामान्य बहुजनांपर्यंत पोचविण्याचे कार्य कोकणात जन्मलेल्या या तीन महान विचारवंतांनी केले.

२) १८२० साली रत्नागिरी जवळच्या वरवडे गावी जन्मलेल्या तुकारामतात्या पडवळ यांनी सत्यशोधक समाजाचे नुसते सदस्यत्व स्वीकारले नाही तर वेळोवेळी आर्थिक मदत केली, शिवाय स्वतःच्या मालकीचा छापखाना काढून अनेक ग्रंथ प्रकाशित केले.

३) 'जातीभेदविवेकसार' व संत तुकाराम महाराजांची अभंग गाथा संपादन केली त्यासाठी स्वतः अभंग संकलित केले.

४) १८२० साली रत्नागिरी जवळच्या वरवडे गावी जन्मलेल्या तुकारामतात्या पडवळ यांनी सत्यशोधक समाजाचे नुसते सदस्यत्व स्वीकारले नाही तर वेळोवेळी आर्थिक मदत केली, शिवाय स्वतःच्या मालकीचा छापखाना काढून अनेक ग्रंथ प्रकाशित केले.

५) 'जातिभेद विवेकसार' हा जातिव्यवस्थेवर व जातीभेद व त्यामुळे होणाऱ्या अनिष्ट परिणामांवर चर्चा करणारा भारतीय भाषेतील पहिला ग्रंथ आहे. असे डॉ. सदानंद मोरे यांनी म्हटले आहे. महात्मा फुले यांचे सहकारी असलेल्या तुकाराम तात्या पडवळ यांनी सत्यशोधकीय कार्य पुढे नेण्यासाठी सातत्याने सहकार्य व सहभाग घेतला. हे त्यांचे योगदान वेळोवेळी दखल घ्यावी असे आहे.

६)रायगड जिल्ह्यातील नागाव येथे जन्मलेल्या भास्करराव जाधव यांनी १८८८ पासून महात्मा फुले यांच्या विचारातून प्रेरणा घेत स्वतः उच्चशिक्षण घेतले. १८९५ पासून राजर्षि शाहूमहाराजांच्या संस्थानात नोकरी करताना सत्यशोधक समाज कार्याला वाहून घेतले.

७) सत्यशोधक विचारांचे 'मराठा दीनबंधु' १९०१ पासून सुरू केले. १९३० ला लंडन गोलमेज परिषदेला उपस्थित राहिले. दरम्यान अनेक प्रासंगिक लेख, सत्यशोधक ग्रंथांना प्रस्तावना, सत्यशोधक अधिवेशनाच्या स्मरणिका संपादन-शिक्षण परिषदांचे आयोजन केले. याकाळात मंदावलेल्या सत्यशोधक चळवळीचे कार्य चालू ठेवण्याची कामगिरी केली. १९१० पासून सत्यशोधक अधिवेशने आयोजित करून समाजाची विस्कटलेली घडी सुस्थिर करण्याचे कार्य या कोकण सुपुत्राने केले. दलित-बहुजन समाजाची समूळ सुधारणा व्हावी म्हणून प्रयत्न केले. सत्यशोधक आयुष्यभर लढणारे भास्करराव जाधव यांचे १९५० साली निधन झाले.

८) कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील अडूर या खेड्यात जन्मलेल्या केशवराव विचारे गुरुजींनी मुंबईतील रात्रशाळेत शिक्षण घेतले. रेल्वेत नोकरी केली. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने भास्करराव जाधव यांच्या सभेतील विचार ऐकून 'कर्मनिष्ठ' विचारसरणी स्वीकारली.

९) १९१९ पासून सत्यशोधक समाजाचे कार्य अखंडपणे सुरू केले. प्रथम जिल्हा संघटक झाले. व्याख्यानांपेक्षा कार्यावर भर दिला. प्रौढ साक्षरता वर्ग सुरू केले, आर्थिक सुधारणांवर भर दिला. विद्यार्थी संघ स्थापन करून लोकशिक्षणावर भर दिला.

१०) कलापथकांची निर्मिती केली सहकार चळवळ सुरू करून जांभुळवाडी येथे ग्रामीण लोकांसाठी औद्योगिक वसाहत सुरू केली. स्वतःच्या सुखी जीवनाला बाजूला सारून महात्मा फुले यांच्या तत्त्वज्ञानानुसार समाजाची जडणघडण करण्याचे कार्य केले.

सारांश-कोकणात जन्मलेल्या या तीन निष्ठावंत व्यक्तींच्या योगदानामुळे महाराष्ट्रात उदयाला आलेली 'सत्यशोधक समाज चळवळ' अधिक जोमाने कार्य करू लागली व समाजाला वैचारिक बळ मिळाले आणि आवश्यक परिवर्तन घडण्यासाठी उपयुक्त ठरले, असे म्हटले तर तर वावगे ठरू नये.


संदर्भ ग्रंथ

१) ज्ञानवेध, 'पंडितराव पवार व इतर' (सं,) मोरया प्रकाशन, डोंबिवली, २०००, पृ.१३३,३४.

२) मोरे सदानंद, 'तुकाराम दर्शन,' सकाळ प्रकाशन, २०१४, पृ. ५९,१५४,२३०...

३) 'सत्यशोधक समाज-साहित्य आणि विचार', ऋतू प्रकाशन, अहमदनगर, २०१०.

◆◆◆



प्राचीन मराठी पदबंधाची संगीत प्रेरणा आणि परंपरा विशद करणारा मराठीतला पहिला ग्रंथ.

ओवी ते लावणी

लेखक-डॉ.श्री.रं.कुलकर्णी

मूल्य रु. २००/-

'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील यांची खंडकाव्ये : आशय विचार

- गोविंद काळे.

'दीनमित्र' हे सलग ५७ वर्षे चालणारे महाराष्ट्रातील एकमेव ग्रामीण नियतकालिक होते. जनकपिता कृष्णराव भालेकर यांना मृत्यूसमयी दिलेल्या वचनाप्रमाणे २३ नोव्हेंबर १९१० साली त्यांनी 'दीनमित्र' पुन्हा सुरू केले. २३ नोव्हेंबर १९१० रोजी सोमठाणे येथून निघालेल्या पहिल्या अंकात मुकुंदरावांनी आपला हेतू स्पष्ट केला आहे. मुख्यतः (दीनमित्र) मधून शेतकरी आणि कारागिरादी लोकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीसंबंधाने विशेष चर्चा होत जाईल.

'सत्यशोधक समाज' स्थापनेस दीडशे वर्षे पूर्ण झाली आहेत. म. फुले, सावित्रीबाई फुले आणि त्यांच्या अनुयायांनी आधुनिक भारताच्या सुरुवातीस बहुजनांच्या सर्वांगीण हिताचे विचार सप्रमाण मांडले, प्रत्यक्ष कार्यही केले. सत्यशोधकी विचार प्रचार आणि प्रसारासाठी सत्यशोधकी साहित्यलेखनास सुरुवात केली. पुढीलकाळात सत्यशोधकी विचारांनी प्रेरित असंख्य लेखकांनी त्यात भर घातली. त्यापैकी 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील हे सत्यशोधकी साहित्यातील महत्त्वाचे लेखक आहेत. ते सत्यशोधकांच्या दुसऱ्या पिढीतील आघाडीचे समाजसुधारक होत. म. फुले, सावित्रीबाई फुले, कृष्णराव भालेकरादी पहिल्या पिढीच्या अस्तानंतर क्षीण होत जाणाऱ्या सत्यशोधक चळवळीस सावरण्याचे कार्य मुकुंदरावांनी समर्थपणे केले. त्यांचे नेतृत्व खंबीर तसे लेखनही दमदार होते. जनकपिता कृष्णराव भालेकरांच्या मुशीत तयार झालेल्या मुकुंदरावांनी मृत्यूसमयी भालेकरांना दिलेल्या वचनानुसार १९१० साली 'दीनमित्र' साप्ताहिकाचे पुनरुज्जीवन केले. मुकुंदरावांचे जवळजवळ सर्वच साहित्य 'दीनमित्र'मधून क्रमशः प्रकाशित झालेले असल्यामुळे 'दीनमित्र'चा उल्लेख ओघाने येतोच. प्रस्तुत लेखात त्यांनी लिहिलेल्या खंडकाव्यांचे आशयसूत्र समजून घेऊ.

उद्दिष्टे

१. मुकुंदराव पाटील यांच्या खंडकाव्यातील सत्यशोधकी तत्वे अभ्यासणे.
२. समकालीन जीवन आणि मुकुंदरावांचे लेखन यातील सहसंबंध तपासणे.
३. सत्यशोधकी साहित्य आणि समग्र आधुनिक मराठी साहित्यातील स्थान अभ्यासणे.

गृहीतके

१. समाजास परिवर्तनासाठी प्रवृत्त करणे हे मुकुंदराव पाटील यांच्या काव्यलेखनाचे मुख्य प्रयोजन आहे.
२. समकालीन ग्रामीण समाजवास्तव त्यांनी चित्रित केले आहे.

३. भटजी - शेटजी - लाटजी यांची कृष्णकृत्ये त्यांनी जगासमोर आणली आहेत.

१. सत्यशोधकी साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा

सत्यशोधकी साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा प्रामुख्याने सत्यशोधकी विचारधारेत शोधाव्या लागतात. म. फुले यांनी घालून दिलेली बहुजन हिताची तत्वे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचावी यासाठी प्रचार आणि प्रसाराचे प्रभावी माध्यम म्हणून सत्यशोधकी लेखकांनी जाणीवपूर्वक लेखन केले.

१) प्रत्येक व्यक्तीस भक्तीचा अधिकार असून त्याला भक्ती करण्यास कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही.

२) सत्यशोधन ही सत्यशोधकी साहित्यनिर्मितीची मूलभूत प्रेरणा होती, ती आजही आहे.

३) म. फुल्यांनी घालून दिलेल्या तत्त्वांना स्वीकारणे, जे जे जनविरोधी त्याचा जोरकसपणे विरोध करणे; स्त्री, शूद्र, शेतकरी, कष्टकरी यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रगतीचा, परिवर्तनाचा मार्ग दाखविणे ही सत्यशोधकी साहित्याची मुख्य प्रेरणा आहे.

४) सत्यशोधक तत्त्वांचा प्रचार आणि प्रसार करणे या गरजेतून सत्यशोधकी साहित्य लिहिले गेले. जे जे बहुजन विरोधी, लोकविरोधी, त्याला त्यांचा विरोध होता. पोटात एक ओठात एक अशी त्यांची दुटप्पी भूमिका नव्हती. अतिशय सुस्पष्ट, तर्कसंगत, शास्त्रीय, विवेकनिष्ठ, तत्त्वज्ञानाधिष्ठित अशी त्यांची भूमिका होती. ती त्यांच्या साहित्यातून प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे व्यक्त होते.[१] सत्यशोधकी साहित्य इतिहासाचे लेखक, गाढे अभ्यासक डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे मत याबाबतीत महत्त्वाचे आहे.

५) सर्वच सत्यशोधकांनी सामाजिक बांधिलकी स्वीकारून कार्य आणि लेखन केले. समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी काही एका राजकीय आणि वैचारिक भूमिकेचा आणि कार्यक्रमाचा पुरस्कार आपल्या कलाकृतींमधून करणारा लेखक 'प्रतिबद्ध' अथवा 'बांधील' म्हणून ओळखला जातो. त्याची त्याच्या भूमिकेशी आणि समाजाशी बांधिलकी असते.[२]

वरील भूमिका सत्यशोधकी विचार व लेखनाची मूलभूत प्रेरणा आहे, हे इथे विचारात घेतले पाहिजे.

२. मुकुंदराव पाटील यांचा परिचय :

२० व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात मुकुंदरावांचा उदय झाला. ते सत्यशोधक कार्यकर्ते, ग्रामीण पत्रकार, संपादक तथा साहित्यिक होते. पहिल्या पिढीच्या अस्तानंतर सत्यशोधक चळवळीत निर्माण झालेली पोकळी त्यांनी भरून काढली. जनकपिता कृष्णराव भालेकर यांचा सहवास, दत्तकपिता गणपतराव पाटील आणि म. फुले यांच्या विचार व कार्याच्या प्रभावातून मुकुंदराव सत्यशोधकी विचारांकडे वळले.

'दीनमित्र' हे सलग ५७ वर्षे चालणारे महाराष्ट्रातील एकमेव ग्रामीण नियतकालिक होते. जनकपिता कृष्णराव भालेकर यांना मृत्यूसमयी दिलेल्या वचनाप्रमाणे २३ नोव्हेंबर १९१० साली त्यांनी 'दीनमित्र' पुन्हा सुरू केले. २३ नोव्हेंबर १९१० रोजी सोमठाणे येथून निघालेल्या पहिल्या अंकात मुकुंदरावांनी आपला हेतू स्पष्ट केला आहे. मुख्यतः (दीनमित्र) मधून शेतकरी आणि कारागिरादी लोकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीसंबंधाने विशेष चर्चा होत जाईल. विद्याप्रसार व शांतता यास अडथळा करण्यासारख्या ज्या ज्या चळवळी उपस्थित होत जातील त्या सर्वांचा पूर्ण निषेध करीत जाईल.[३] केवळ तिसरीपर्यंत शिक्षण झालेल्या मुकुंदरावांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत स्वतंत्र पत्र सुरू करणे आणि वरील हेतूने चालविणे, हे ते सत्यशोधक होते म्हणूनच शक्य झाले.

कथा, कविता, चित्रपट कथा, नाटक, कादंबरी, ललित लेख, वैचारिक लेख, स्फुट लेख असे विपुल लेखन करून ते क्रमशः 'दीनमित्र'मधून प्रकाशित केले. इथे त्यांनी लिहिलेल्या कवितेचाच विचार करावयाचा आहे.

३. मुकुंदराव पाटील यांची खंडकाव्ये : आशयसूत्र –

'कुळकर्णी लीलामृत, शेटजी प्रताप, सुबोध श्लोक, देशभक्त लीलासार' ही मुकुंदरावांची खंडकाव्ये प्रकाशित आहेत. शिवलीलामृत, पांडवप्रताप अशा धार्मिक पोथ्या

वाचनाची ग्रामीण भागात परंपरा आहे. मुकुंदरावांनी तोच धागा पकडून लोकांना सुधारणेचा मार्ग दाखविला आहे. डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी म्हटल्याप्रमाणे, लीळा - लीला म्हणजे ईश्वर किंवा अवतारी महापुरुषांच्या जीवनातील प्रसंग, म्हणून शिवलीला, भक्तलीला, संतलीला, लीळाचरित्र अशी ग्रंथनामे स्वीकारली. हाच शब्द कुलकर्णी लीला असा वापरला जातो तेव्हा त्यातील अतिशयोक्ती लक्षात येते आणि कुठे तो ईश्वर किंवा अवतारी पुरुष आणि कुठे हे पोटार्थी दुष्ट, कपटी, कुलकर्णी असे वाटून या नावातील उपहास लक्षात येतो. त्यामुळे कुलकर्णी हास्यास्पद ठरतो.[४] जे सूत्र 'कुळकर्णी लीलामृत' खंडकाव्याचे तेच इतर खंडकाव्याचे. उपहास आणि विडंबनाचा प्रभावी वापर करून मुकुंदराव सत्यशोधकी परिवर्तनवादी विचार रुजविण्यात यशस्वी झाले आहेत. जाणीवपूर्वक ओवी छंदाचा वापर करून अज्ञानी, अल्पशिक्षित, महिला वर्गास काव्य वाचण्यास प्रवृत्त केले आहे.

अ) कुळकर्णी लीलामृत

'कुळकर्णी लीलामृत' हे मुकुंदरावांचे पहिले खंडकाव्य. १३ मार्च १९१२ ते १४ जून १९१३ या काळात ते 'दीनमित्र' मधून क्रमशः प्रकाशित झाले. पुढे जुलै १९१३ मध्ये कोल्हापूरचे सत्यशोधक 'विठ्ठल बिराजी डोणे' यांनी ते पुस्तक रूपाने प्रसिद्ध केले. प्रस्तुत खंडकाव्य कोल्हापूर संस्थानचे 'रावबहादूर रघुनाथ व्यंकाजी सबनीस' यांना परमादराने व प्रेमपूर्वक अर्पण केले आहे. ना. भास्करराव जाधव यांनी समर्पक प्रस्तावना लिहून मुकुंदरावांची बहुजन समाजसुधारणेची तळमळ स्पष्ट केली आहे.

प्रस्तुत खंडकाव्यात एकूण दहा अध्याय असून ओवीसंख्या १०६२ आहे. पहिला अध्याय सर्वात लहान असून ज्यात ३० ओव्या आहेत तर चौथा अध्याय सर्वात मोठा असून त्यात १४२ ओव्या आहेत. यात वतनदार कुलकर्ण्याची कृष्णकृत्ये जगासमोर मांडणाऱ्या एकूण सात कथा आहेत. 'कोंडाजी पाटील, अंजनपूरचे भीमाजी पाटील, मांडवपूरचे शिवा आणि भिवा पाटील, सोनगावचे गोविंदराव कोष्टी, रुचीरनगरीचे धोंडू पांचाळ, भोळापूरचे गुंडोपंत कुलकर्णी आणि बेळगावचे द्विमुख कुलकर्णी' यांच्या ह्या कथा आहेत. प्रस्तुत कथा वेगवेगळ्या गावांत घडलेल्या असल्या तरी दक्षिण देश तथा महाराष्ट्रातील कोणत्याही गावाची स्थिती यापेक्षा वेगळी नाही.

कुलकर्णी लीलामृत ग्रंथ प्रचंड ।
महाराष्ट्र पुराण दक्षिण खंड ।
श्रवण करोत पाटील अखंड ।।

प्रत्येक अध्यायाच्या शेवटी अशी स्थलमुद्रा दिली आहे. याशिवाय मंगलास्तवन, ईशस्तवन, एखादे आख्यान आणि शेवटी फलश्रुती आदी धार्मिक पोथीचे संकेत पाळले आहेत. कुलकर्णी लीला गहन, अतर्क्य, अनाकलनीय, दुर्बोध असल्यामुळे ग्रंथाचा विस्तार प्रचंड झाल्याचे मुकुंदरावांनी नमूद केले आहे. तसेच वतनदार पाटलांनी याचे सतत वाचन, श्रवण, मनन, चिंतन करावे अशी आशा व्यक्त केली आहे.

प्रस्तुत खंडकाव्याचे कथानक स्थल, कालातीत आहे. कुलकर्णी वतन प्राचीन काळापासून ग्रामजीवनाचा अविभाज्य घटक आहे. तो एकटाच शिक्षित असल्यामुळे सरकारी, कौटुंबिक तसेच धार्मिक जीवनातील महत्त्वाची कामे तो पाही. इंग्रजी आमदानीत तो गाव आणि सरकार यांच्यातील दुवा होता. शिवाय भूदेव असल्याचा गैरफायदा घेऊन तो स्वतःची खळगी भरत असे. अज्ञानी पाटलाचा तो लेखनिक. पाटलास वाट्टेल तेव्हा तो मूर्खात काढत असे. धर्मभोळे लोक त्याला कायम वचकून असत. वास्तविक त्याने पाटलास मदत करणे अपेक्षित होते पण कुलकर्णी 'ध' चा 'मा' करून स्वतः चा स्वार्थ साधण्यात सतत अग्रेसर असे. कधी धर्माची भीती घालून, कधी अज्ञानाचा फायदा घेऊन, कधी खानदान, मोठेपणास फाजील महत्त्व देऊन, विविध धर्मकार्याची खरी खोटी महती सांगून, विविध व्रतवैकल्ये करण्यास भाग पाडून पाटील तथा समस्त पापभिरू, धर्मभोळ्या ग्रामस्थांना तो लुबाडत असे. ही कुलकर्ण्याची कृती म्हणजेच एक एक लीला होय.

शेटजीप्रताप

'शेटजीप्रताप' हे मुकुंदरावांचे दुसरे खंडकाव्य.

१९ एप्रिल १९१६ ते ११ जून १९१९ या कालावधीत ते 'दीनमित्र' मधून क्रमशः प्रसिद्ध झाले. पुढे १९२४ साली 'कोंडीबा गणपत फुलवाले' यांनी ते ग्रंथ रूपाने प्रसिद्ध केले. प्रस्तुत खंडकाव्य मुंबई स्थित कंत्राटदार 'शेठ रघुनाथ देवाजी बनकर' यांना अर्पण केले आहे. सत्यशोधक ना. भास्करराव जाधव यांनी प्रस्तुत खंडकाव्यास साक्षेपी प्रस्तावना लिहून प्रतिपाद्य विषयाची अर्थपूर्णता आणि उपयोगिता स्पष्ट केली आहे.

मुकुंदरावांचे मित्र अबकारी इन्स्पेक्टर 'इ. स. शामसन' यांनी सोमठाणे येथे जाऊन विनंती केली की, अज्ञान व मूर्ख लोकांस अडचणीत धरून, कधी कधी त्यांच्या भोवती अडचणी निर्माण करून हे सावकार पारध्याप्रमाणे मनुष्याची शिकार करत आहेत, भूतदयेचा मंत्र फुंकून हे शेतकऱ्यांचे रक्त पीत आहेत. जमीनदार वतनदार म्हणणारे देशमुख पाटील उपरे होऊन मारवाड्याच्या येथे भांडी घासत आहेत. तरी या लोकांचे डोळे उघडतील अशी एखादी पोथी रचा.[१] शेट सावकार यांच्याकडून गावकऱ्यांचे होणारे आर्थिक शोषण हा सर्वकालीन कळीचा प्रश्न आहे.

प्रस्तुत खंडकाव्यात १३ अध्याय असून ओवी संख्या १३१२ इतकी आहे. ११९ ओव्यांचा दुसरा अध्याय सर्वात मोठा तर ७६ ओव्यांचा १३ वा अध्याय सर्वात लहान आहे. यात 'सुंदरपूर आणि भडंगपूर' या खेड्यातील शेटजीच्या दुष्ट कार्याचे वर्णन केले आहे. विविध उपकथानकाद्वारे एकाच कथेचा विस्तार हे प्रस्तुत खंडकाव्याचे वैशिष्ट्य आहे.

जे ऋण व्यसनी पावले अपाय ।
त्या हीन दीन ग्रामजनाय।
शेटजीप्रताप ग्रंथोपाय । ऋणिकार्पणमस्तु।।

या एकाच ओवीने प्रत्येक अध्यायाचा शेवट केला आहे.

दक्षिणेतून एका लोट्यानिशी सुंदरपूर गावात आलेला हिरालाल तसेच धनजी शेट, कलम बहाद्दर कुलकर्णीच्या मदतीने पाटलाच्या गढीचे मालक कसे होतात याचे सुरस वर्णन प्रस्तुत खंडकाव्यात केले आहे. तसे पाहता प्रस्तुत गावे प्रातिनिधिक आहेत. तत्कालीन कोणतेही खेडे यापेक्षा वेगळे नव्हते. बहुजनाचे अज्ञान, आर्थिक नियोजनाचा अभाव, फाजील मानपान, लग्नादी समारंभातील डामडौल, भाऊबंदकीचे वाद, बहूपत्नीत्व, अतिरेकी दानधर्म आदी बहुजन समाजातील दुर्गुणही काव्याच्या केंद्रस्थानी आहेत.

वर्षभर गावकऱ्यांना लागेल ते साहित्य सावकाराने पुरवावे आणि वर्ष अखेर सर्व खाते चुकते करावे अशी वहिवाट होती. सावकाराने लिहिलेले खाते प्रमाण मानले जाई. कधी कधी व्याजाने घेतलेल्या रकमेसाठी गहाणखत करून द्यावे लागे. अशाप्रसंगी कुलकर्णी मध्यस्थी करे. गावकऱ्यांचे अंगठे तेवढे घेतले जात. बरे, कर्ज आणि व्याज यात एकसूत्रता नसे. कर्ज घेणाऱ्याची गरज ओळखून व्याज कमी अधिक होत असे. गहाणखत करताना वस्तूचा योग्य मोबदला ठरविला जात नसे. जिथे पेशव्यांनाही सावकारापुढे झुकावे लागे तिथे सामान्यांची काय बात. कर्जाऊ काढलेल्या मूठभर रकमेसाठी घर, जमिनी सावकाराच्या घशात गेल्याची कितीतरी उदाहरणे आहेत. आजही खासगी सावकारीला कंटाळून असंख्य शेतकरी आत्महत्या करताना दिसतात यावरून प्रश्नाचे नेमके गांभीर्य लक्षात येते. त्यावेळची स्थिती किती भयंकर असेल याचा अंदाज केलेला बरा. खेड्यात परप्रांतस्थ व्यापारी थोड्या भांडवलावर थोड्या काळात हवेल्या बांधतात, दागदागिने करतात. अल्पावधीत हे सावकार कसल्याही श्रमाशिवाय श्रीमंत होतात. याचे कारण गावकऱ्यांच्या अज्ञानात आणि त्याच्या खोटेपणात आहे.

इथे मुकुंदरावांनी सावकार आणि त्याला 'अर्थपूर्ण' मदत करणारा कुलकर्णी यांचीच दुष्टकृत्ये सांगितली नाहीत तर बहुजनांच्या आचार, विचारात असलेल्या दुर्गुणांचा सडेतोड समाचार घेतला आहे.

देशभक्त लीलासार

'देशभक्त लीलासार' हे मुकुंदरावांचे तिसरे खंडकाव्य होय. १४ जानेवारी ते १६ जून १९५४ या कालावधीत ते 'दीनमित्र' मधून क्रमशः प्रसिद्ध झाले. प्रस्तुत खंडकाव्य स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सात वर्षांनी लिहिले आहे. काँग्रेसचे पक्षीय कार्य, देशभक्तांच्या बदलत्या

निष्ठा, स्वकीयांच्या सत्तेतील एकूण राजकीय स्थितीचा विडंबनात्मक वेध यातून घेतला आहे. स्वातंत्र्यानंतर सत्तेचे विकेंद्रीकरण झाले नाही. स्वातंत्र्यासाठी झटणारे पुढे सरकार स्थापनेत केंद्रस्थानी आहे. सत्ता म्हटली की सत्तासंघर्ष, तडजोडी आल्या. या प्रक्रियेत सर्वसामान्य माणूस कुठेच नव्हता त्यांच्या लेखी स्वातंत्र्य म्हणजे फक्त सरकार बदलले. बाकी त्यांच्या जगण्यात मात्र फारसा बदल झाला नाही.

'देशभक्त लीलासार' हे १८ अध्यायी खंडकाव्य ज्ञानेश्वरांच्या 'भावार्थदीपिका' ग्रंथाशी साम्य दर्शविते. म. गांधी इंद्रसभेत प्रकटतात आणि भारतातील आपल्या शिष्यपरिवाराची विचारपूस करतात. त्यांच्या विनंतीनुसार इंद्र पृथ्वीवरील एका एका हयात असलेल्या देशभक्तांची कथा सांगतात. त्या कथा हेच प्रस्तुत खंडकाव्याचे आशयसूत्र आहे. स्वातंत्र्यचळवळीतील देशभक्तांचे योगदान आणि स्वातंत्र्यानंतर त्यांची बदललेली निष्ठा असे प्रस्तुत खंडकाव्यातील कथानकाचे दोन भाग करता येतात.

इंद्र सभेमाजी । प्रगटले महात्माजी ।
इंद्रे सत्कारूनी शेजी । बसविले तया ।।१।।
इंद्र पुसे कर जोडून । कां झाले आगमन ।
कळो द्या कारण । सेवेसाठी ।।२।।
शिष्ये स्नेहे मोहित ।आणि होऊन उत्कंठित ।
येरू इंद्राशी पुसत । शिष्यवार्ता ।।३।।

याप्रमाणे म. गांधींनी इंद्रसभेत जाऊन इंद्राला आपल्या शिष्यांची वार्ता विचारली.

प्रस्तुत खंडकाव्यात अशा एकूण १७ कथा वर्णिल्या आहेत. ज्याची ओवी संख्या एकूण १९९९ इतकी असून पहिला सर्वात लहान अध्याय ९० ओव्यांचा तर १८ वा अध्याय सर्वात मोठा असून ज्यात १४१ ओव्या आहेत. मुकुंदराव वारकरी साहित्याचे अभ्यासक होते. परिणामी प्रस्तुत खंडकाव्यात संत ज्ञानेश्वरांचा अनुनय आणि संत तुकारामांच्या अभंगातील परखडपणा दिसून येतो. खादी ही काँग्रेसची ईश्वरी असल्यामुळे ज्ञानेश्वरीच्या धर्तीवर तिचे निरुपण केले आहे. स्वातंत्र्यानंतर खादी आणि गांधी हे सत्तेचे हमखास सूत्र बनल्यामुळे त्याच्या गैरवापरातून असंख्य नेते उदयाला येण्याची शक्यता नाकारता येत नाही. अफाटनगरचा खोपटलाल, कुंदनपुरचा बुळासाहेब, हिंगनगरचा धणेशास्त्री, सुंदरपूरचा बणगीबुवा, पूर्णवे गावचा भणंगनाथ, जंगमनेरचा स्वामी, कान्हुगावचा काकोपंत, जामगावचा कुंतिलाल, मूठकोलीनगरचा आप्पा, चौरंगपूरचा गिरीचंद, चिंचळगावचा शंभुराव, नाशिकचा भातपांडे, तुंबापूरचा सुरानी, प्रेमनगरचा चंद्रशेखर, शालवीचा काकवल्ली, औरसप्रांतचा साडूबंधू आणि किल्लीनगरचा महंत पेरू अशा एकूण १७ कथा, उपकथानकासह आल्या आहेत. गांधी आणि खादीचा नावापुरता वापर, घराणेशाही, गुंडगिरीचे उदात्तीकरण, गुन्हेगारीला राजाश्रय, भ्रष्टाचार, नोकरशाहीचा वाढता प्रभाव आणि अशा वातावरणात हळूहळू क्षीण होत जाणारी लोकशाही याचे वर्णन प्रस्तुत खंडकाव्यातून आले आहे.

स्वातंत्र्य मिळून पहिल्याच सार्वत्रिक निवडणुकीस सामोरे जाताना मतदान आणि मतदार विकत घेणे सुरू झाले.

दारू गांजा पाजून । दिले शिरापुरीचे जेवण ।
लाचलुचपतीचे दान । आले निवडून शंभूराव ।।२७।।७

आजची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. बहुमत लोकशाहीचा मूलाधार असल्याकारणाने हरतऱ्हेने ते मिळविले जाऊ लागले. या कालातीत वास्तवाला शब्दबद्ध करण्याचे धाडस मुकुंदरावांनी दाखविले आहे. इथे त्यांची भविष्याचा वेध घेण्याची क्षमताही अधोरेखित करता येते.

सारांश

'स्वीकार आणि बदल' हे एकाच नाण्याचे दोन पैलू आहेत. आधी काय चुकीचे आहे हे स्वीकारावे लागते आणि नंतर त्यात बदल करण्यास सुरुवात करावी लागते. मुकुंदरावांनी आपल्या काव्यातून धार्मिक, आर्थिक आणि राजकीय जीवनातील चुकीच्या बाबी प्रथम सप्रमाण वाचकांसमोर आणल्या. ग्रामजनांच्या शोषणाची कारणे स्पष्ट केली आणि त्यावरील उपायही सांगितले.

१. ग्रामजनांचे अज्ञान, मानापमानास अतिरेकी महत्त्व, देवभोळी वृत्ती, शिक्षणाचा अभाव आणि यामुळे सर्वच पातळीवरून बहुजनांचे होणारे शोषण स्पष्टपणे चित्रित केले.

२. सत्यशोधकी विचारांचा प्रचार आणि प्रसार हे लेखनामागील प्रयोजन यशस्वीपणे साध्य केले.

३. लेखकाची आंतरिक इच्छा असल्यास देशी अभिव्यक्ती तंत्राचा प्रभावी वापर करूनही आधुनिक परिवर्तनवादी विचार मांडता येतो, हे दाखवून दिले.

४. रंजन आणि उद्‌बोधन हे त्यांच्या काव्याचे खास वैशिष्ट्य आहे.

५. त्यांनी आधुनिक ग्रामीण खंडकाव्याची सुरूवात जशी केली तसेच आशयप्रधान चमत्कृतीपूर्ण विविध शब्दांची निर्मिती करून आधुनिक कवितेस समृद्ध केले.

मुकुंदराव 'दीनमित्र'च्या एका अंकास पुरेल इतकेच लिहीत असल्यामुळे काही ठिकाणी निवेदनातील पुनरावृत्ती आणि एकाच पात्राची दोन भिन्न नावे असे दोषही आढळतात. आधुनिक काळात सत्यशोधकी साहित्याने जी परंपरा चालवली, मुकुंदराव पाटील हे त्या परंपरेतील मैलाचा दगड आहेत.

संदर्भ ग्रंथ

१. गुंदेकर डॉ. श्रीराम ' म. जोतिबा फुले : साहित्य आणि साहित्यमूल्ये' - प्र.आ. १५ ऑगस्ट २०२२- प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ. ३६४.

२. डहाके वसंत व इतर (संपा) - ''वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश'', प्र.आ. डिसेंबर २००१ - जी.आर. भटकळ फाऊंडेशन, मुंबई, पृ.२७९.

३. एरंडे डॉ.अशोक - 'सत्यशोधक मुकुंदराव पाटील'- प्र. आ. १९९६- स्फूर्ती प्रकाशन, अहमदनगर, पृ.११३.

४. गुंदेकर डॉ.श्रीराम- 'सत्यशोधकी साहित्य: परंपरा आणि स्वरूप', प्र.आ. २००३- जिजाऊ प्रकाशन, औरंगाबाद, पृ. १३६.

५. सत्यशोधक 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील यांचे समग्र वाङ्मय - प्र.आ.जुलै १९९०- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.१२९.

६. गुंदेकर डॉ. श्रीराम (संपा)- देशभक्त लीलासार- प्र.आ. २ मे २००३ - 'दीनमित्र' कार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी- अध्याय - पृ.६६.

७. तत्रैव पृ. १५३.

◆◆◆

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना – १९ नोव्हेंबर, १९६०)

रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१

ई-मेल :secretary.sblc-mh@gov.in संकेतस्थळ https: // msblc. maharashtra.gov.in

मंडळाच्या योजना

१. पुस्तक प्रकाशन योजना – विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक व पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री. पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना

मंडळाची निवडक प्रकाशने

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित – संपा. मारुती चित्तमपल्ली, पं. नरसिंगशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व – डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G. Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकांचे भाषांतर) – स. गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास – रेखा देशपांडे
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश – संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला – के. के. चौधरी
७. श्री चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) –स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज – श्री. रवींद्र गोळे

मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई.
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई.
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.

मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.@gov.in संकेतस्थळाला भेट द्या.

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना - १९ नोव्हेंबर, १९६०)

रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला

अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१

ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in संकेतस्थळ https: // msblc. maharashtra.gov.in

५. अक्षरसाहित्य, चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग.
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव.
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर.
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद.
१७. दिपाली बुक एजन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, उस्मानाबाद.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर.
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेपो, कर्जत, जि. रायगड
२८, सुशांत बुक डेपो, नंदुरबार.
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मीरज, सांगली.
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी.
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली.
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा.
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोंदिया
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते

१) संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३, २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२) व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी.पो.ओ. नजीक, पुणे ४११ ००१ दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

३) व्यवस्थापक, शासकीय मुद्राणालय व ग्रंथागार. सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४) सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ,
औरंगाबाद ४३१००१. दूरध्वनी : (०२४०) २३३९१०९७

५) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क,
कोल्हापूर - ४१६ ००३. दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५, २६५०४०२

मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblec.maharashtra.@gov.in संकेतस्थळाला भेट द्या.

मान्यवर लेखक

डॉ. प्रल्हाद लुलेकर : २५ अ, सारंग हौसिंग सोसायटी,
गारखेडा परिसर,
औरंगाबाद - ९
भ्रमणध्वनी - ९८३४३ ६५०३४

डॉ. सर्जेराव भामरे : ६ अ, शिवाजी कॉलनी,
धुळे रोड, नंदुरबार
जि. नंदुरबार
भ्रमणध्वनी -९४२३९ ७९३६६

प्रा. श्रावण देवरे : २०१, स्पर्श हाइट बिल्डिंग,
Inox सिग्नलजवळ, पुणेरोड,
नाशिक- ११
भ्रमणध्वनी - ९४२२७ ८८५४६

डॉ.अरुण शिंदे : मराठी विभाग प्रमुख,
नाईट कॉलेज,
कोल्हापूर - ४१६ ००२
भ्रमणध्वनी : ९४२१० २४०५५

प्रा.डॉ.शिरीष लांडगे : मा.अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय
ज्ञानेश्वरनगर, पो.भेंडे, ता.नेवासा,
जि.अहमदनगर
भ्रमणध्वनी -९४०४९८०३२४/
८३२९०२८५६२

डॉ. प्राजक्ता शित्रे : सहाय्यक प्राध्यापक,
मराठी विभाग, आर. के. तलरेजा
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
उल्हासनगर -३, जि. ठाणे.
भ्रमणध्वनी - ९९७०२२९७१६

डॉ. शोभा शिंदे : माजी संचालक,भाषा अभ्यास प्रशाळा
क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव
भ्रमणध्वनी - ९९२३२५३०३३

दैवशाला हाक्के : संशोधक विद्यार्थी, (मराठी विषय)
गट शिक्षण कार्यालय,
पंचायत समिती, उस्मानाबाद.
भ्रमणध्वनी - ८३२९९१६२०९.

अमृता तायडे : विद्याभारती महाविद्यालय कॅम्प,
अमरावती.
भ्रमणध्वनी -७७७४८७४६७०

प्रा.डॉ. प्रशांत भंडे : मराठी विभाग प्रमुख,
कै. रसिका महाविद्यालय,
देवणी
भ्रमणध्वनी - ८२७५००६९६१

डॉ. बाळकृष्ण लळीत. : मराठी विभाग प्रमुख व समन्वयक,
मराठी संशोधन केंद्र
चां. ता. बोरा महाविद्यालय,
शिरूर, जि.पुणे -१०,
भ्रमणध्वनी- ९६६५९९६२६०

डॉ. गोविंद काळे. : सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
शिरुर ताजबंद, ता. अहमदपूर,
जि. लातूर.
भ्रमणध्वनी - ९८२३८४३४९६

नोंदी

नोंदी

आमची श्रीवाणी

- मध्ययुगीन मराठी साहित्य विशेषांक.....४०/-
- 'तुकारामाच्या वाङ्मयाचे विविधांगी आकलन' विशेषांक (भाग १).....५०/-
- 'तुकारामाच्या वाङ्मयाचे विविधांगी आकलन' विशेषांक (भाग २).....३०/-
- र. वा. दिघे विशेषांक ६०/-
- गांधी – विनोबा आणि भारतीय साहित्य विशेषांक.....५०/-
- तौलनिक साहित्याभ्यास व संत ज्ञानेश्वर विशेषांक.....५०/-
- भारतीय साहित्यशास्त्र व समीक्षा विशेषांक ५०/-
- महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरा आणि मराठी साहित्य विशेषांक.....५०/-
- दिलीप चित्रे : मुलाखत विशेषांक १००/-
- साहित्य आणि राजकीय आशय.....५०/-
- साने गुरुजी विशेषांक ३०/-
- भारतीय स्त्रियांचे लेखन आणि परंपरा..१५०/-
- भारतीय संतसाहित्य आणि आधुनिकता१००/-
- समाजसेवकांचे साहित्य १००/-
- जागतिकीकरण व मराठी साहित्य.....१००/-
- प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य.....६०/-
- कन्नड-मराठी साहित्यातील अनुबंध ...२००/-
- वर्तमानकालीन मराठी रंगभूमी आणि मराठी नाटक.....१५०/-
- आदिवासी लोकसंस्कृती, लोकसाहित्य, लोककला आणि .....१८०/- बोलीविषयक भाषिक संशोधन
- लोकवाङ्मयाचे प्रादेशिक आविष्कार .१८०/-
- भारतीय स्त्रीवाद : बदलते आयाम.....१८०/-
- नव्वदोत्तरी मराठी साहित्य १६०/-
- चळवळी आणि मराठी साहित्य १६०/-
- मराठी वाङ्मयेतिहास : नवे दृष्टिकोन...२००/-
- आदिवांसींसमोरील सामाजिक आणि सांस्कृतिक पेच १५०/-
- लिंगभाव, पुरुषसत्ता आणि सांस्कृतिक बदल.....२५०/-
- समकालीन मराठी साहित्य : प्रेरणा आणि प्रवृत्ती (भाग-१) १८०/-
- समकालीन मराठी साहित्य : प्रेरणा आणि प्रवृत्ती (भाग-२) ३००/-

आमची प्रकाशने

- **प्राचीन मराठी हस्तलिखिते** १२०/-
  – श्री. रं. कुळकर्णी
- **ओवी ते लावणी** २००/-
  – श्री. रं. कुळकर्णी
- **स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजन** .. २००/-
  संपादक डॉ. मंगला वरखेडे
- **मराठी साहित्य संशोधन – स्वरूप व दिशा** . १५०/-
  डॉ. श. रा. राणे
- **शून्य आणि इन्फिनिटी (कवितासंग्रह)** १००/-
  पुष्पलनि – डॉ. निं. कृ. ठाकरे
- **मिथक आणि मराठी साहित्य** १२०/-
  संपादक – डॉ. मु. ब. शहा
- **खानदेशचा सांस्कृतिक इतिहास** (खंड ५) ४००/-
  संपादक – डॉ. मु. ब. शहा
- **खानदेशातील ग्रामदैवते आणि लोकगीते**.....१८०/-
  डॉ. सयाजी पगार
- **आमची श्रीवाणी साहित्यसूची**.....२५०/-
  डॉ. मीनाक्षी बऱ्हाटे

का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था
कार्यालय : उन्नति नगर, नकाणे रस्ता, देवपूर, धुळे - ४२४ ००२
☎ (०२५६२) २२३६५४, २२२७६२ email : kswmarathi@gmail.com